# समाधी साधन

डॉ. अनिल सहस्रबुद्धे

सा विद्या या विमुक्तये

वीहा पब्लिकेशन

**समाधी साधन**
**Samadhi Sadhan**

**लेखक**
**डॉ. अनिल सहस्रबुद्धे**
'आई', समर्थनगर, श्रीरामचौक,
पाईपलाईन रोड, अहमदनगर ४१४००३
दूरध्वनी : (०२४१) २४२४१६७
भ्रमण भाष– ९८८१५००९४२
usahasrabuddhe@gmail.com
Website - www.anilsahasrabuddhe.com

© सौ. उषा अनिल सहस्रबुद्धे
मो. ९८५०७३१६४०

**प्रकाशक** : वीहा पब्लिकेशन्स,
प्लॉट नं. २१, अजिंक्यनगर, बोरुडे मळा,
भुतकरवाडी, सावेडी रोड, अहमदनगर ४१४००३

**प्रथम प्रकाशन (आवृत्ती)** : २४ ऑगस्ट २०२४

**टाईपसेटींग** :
श्रीपाद कुलकर्णी, अहमदनगर
मो. ९८५०२३२८९०

**मुद्रक** : वीहा पब्लिकेशन्स, अहमदनगर

**सेवा मूल्य** २००/-

या पुस्तकातील मतांशी प्रकाशन मंच सहमत असेलच असे नाही.



**संजीवन समाधीस**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | ब्रह्मविद्यायाम् योगशास्त्रे ! | ५ |
| २. | रामराष्ट्रस्वरूपता आणि सद्‌गुरु शक्तिपात - समाधी सिद्धता | ३६ |
| ३. | श्री गुरु गोरक्षनाथविरचित सिद्ध-सिद्धान्त-पद्धति-योग गौतमीचा आविष्कार (अद्वैत योगसाधनेतील कुंडलिनी शक्तीचे जागरण) | ४८ |
| ४. | 'आत्मसंयम योग' अंतर्गत समाधी साधना प्रक्रिया भगवद्‌गीता आणि भावार्थदीपिका तथा ज्ञानेश्वरी | ५९ |
| ५. | जीवनमुक्ती अनुभवामृत | ७३ |
| ६. | श्री संत शेखमहंमद महाराज श्रीगोंदेकर कृत योगसंग्राम : सोहं सिद्धी प्रक्रिया (राजयोग) (समाधीसाधना) स्पष्ट करणारा ग्रंथ | ८६ |
| ७. | श्री संत एकनाथ चर्चित योगमार्गातील सिद्धीविचार | १०६ |
| ८. | अमृतसिद्धी योगी जगद्‌गुरु संत तुकाराम | १२२ |
| ९. | कर्मयोगाचा वस्तुपाठ : संत सांवता माळी | १३९ |
| १०. | स्वामी विज्ञानानंदांची प्रकाश समाधी : एक ऐश्वर्ययोग | १४९ |




# ब्रह्मविद्यायाम् योगशास्त्रे !

भारतीय धार्मिक तथा आध्यात्मिक परंपरेत आणि संस्कृतिसारणीमध्ये योगशास्त्र आणि समाधी साधना यांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतीय दर्शनांमध्ये अर्थात शास्त्रांमध्ये सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा तसेच जैन, बौद्ध व चार्वाक या दर्शनांनी योगशास्त्र आणि समाधी साधना यांचा विचार महत्त्वाचाच नव्हे तर केंद्रस्थानी मानला आहे. वेदोपनिषदांना प्रमाण मानून त्यांचा समतोल विचार करून, प्रकटलेली, सांख्य, योग, न्याय, वैशेषिक, पूर्वमीमांसा, उत्तरमीमांसा ही आस्तिक दर्शने आणि जैन, बौद्ध व चार्वाक ही नास्तिक दर्शने ही भारतीय चिंतनातूनच निर्माण झाली आहेत हे लक्षात ठेवावे लागते. योगदर्शन आणि समाधी साधना यांचा विचार या सर्व दर्शनांनी या ना त्या प्रकारे काही प्रमाणात भिन्नपणाने व भिन्न परिभाषा वापरून केला असला तरी; या सर्व विचारभिन्नतेमध्ये अंतरविरोध आहे असे म्हणता येणार नाही.

**१) अद्वैत विचारपरंपरा :-**

वेदोपनिषदे या श्रुतिवाङ्मयाचा सारांश म्हणजे अद्वैत विचार होय. या अद्वैत विचारासंदर्भानेही श्रीमद् जगत्‌गुरु आद्यशंकराचार्य यांनी अद्वैत तत्त्वज्ञान स्पष्ट केले. अहं ब्रह्मास्मि, तत्त्वमसि, प्रज्ञानं ब्रह्म आणि अयमात्मा ब्रह्म या चार महावाक्यांवर हे तत्त्वज्ञान आधारलेले आहे. विवर्त, अविद्या, माया, अध्यास आणि बिंब-प्रतिबिंब न्याय या पारिभाषिक शब्दांनी या अद्वैत चर्चेला स्फुट केले आहे. या अद्वैत तत्त्वज्ञानाची चर्चा काहीशा भिन्नपणाने काही आचार्यांनी केली आहे. यात रामानुजाचार्यांनी विशिष्टाद्वैत स्वरूपात म्हणजे पुराणे आणि उपनिषदे यांतील ईश्वरवाद व ब्रह्मवाद यांचा समतोल प्रदर्शित करीत चर्चा केली आहे. वल्लभाचार्यांनी शुद्धाद्वैत वादाची चर्चा भक्तिसंप्रदायाच्या अंगाने केली आहे. मध्वाचार्यांनी स्पष्टपणाने द्वैत तत्त्वज्ञान मांडले असून जीव आणि ईश्वर, जडपदार्थ आणि ईश्वर, जीव आणि जीव

भेद, जडपदार्थ व जीवभेद, जडपदार्थांची परस्पर भेदमूलकता या पाच भेदांनी विचार मांडला आहे. मात्र निंबाचार्यांनी वैष्णवधर्माचा प्रसार करतांना, जीव हा ब्रह्मापासून केवळ अवस्थेने भिन्न असतो. जीवात्मा, प्रकृती आणि परमात्मा ही प्रमुख तत्त्वे मानली आहेत. जीवात्मा सूक्ष्म अणुरूप असतो. प्रत्येक प्राण्यात जीव वेगळा असतो तरी सर्व बाबतीत जीव हा परमेश्वरावरच अवलंबून असतो. प्रकृती म्हणजे जड किंवा अचेतन अशा प्रकारचे जगत होय, असे सांगत सर्वदोषरहित व सर्वगुणसंपन्न अशा परमात्म्याला अर्थात श्रीकृष्णाला शरण जावे असे स्पष्ट केले आहे. तरी अंततोगत्वा अद्वैत आणि द्वैतही तत्त्वज्ञानाला परमेश्वरस्वरूप असे अद्वैतच अपेक्षित आहे.

**२) अद्वैतानुभूतीसाठी साधना :–**

अद्वैतानुभूतीसाठी योगमार्गाने समाधी साधना करणे आवश्यक आहे. ही अनुभूती म्हणजे सच्चिदानंद अनुभूती होय. ध्यान जेव्हा ध्येयस्वरूपच होते आणि इतर पदार्थांचे निराळे ज्ञान राहातच नाही या अवस्थेला समाधी असे म्हणतात. विशेष ज्ञानमय अवस्था प्राप्त झाल्यावर योग्याची देहभावना नष्ट होऊन पूर्ण निरिच्छ, निरपेक्ष अवस्था प्राप्त होते ही साक्षात्कारासाठीची अवस्थाप्राप्ती होते. या अवस्थेला सर्वमेध समाधी अर्थात सत्व, रज, तम गुणातून मुक्त होऊन 'कैवल्य' अवस्था प्राप्त होते. हीच सर्वश्रेष्ठ अवस्था सिद्धी होय.

**३) पातंजल योगदर्शन तथा भारतीय मानसशास्त्र :–**

योग विचार ही केवळ तात्त्विक काथ्याकूट नाही. मन आणि देह यांचे संपूर्ण स्वास्थ्य राखण्याचे ते शास्त्र आहे. समाधी साधनेसाठी पातंजल योगविज्ञान समजावून घेणे आवश्यक आहे. पातंजल योगविज्ञान म्हणजे भारतीय मानसशास्त्र होय.

योगदर्शन लिहिणारे भगवान पतंजली हे इ.स.पू. दुसऱ्या शतकात काश्मीर, गोंड किंवा अवध प्रदेशातील अर्थात उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्यात म्हणजे गोनर्दमध्ये किंवा उज्जैनमधील गोनर्दमध्ये होऊन गेले असे मानले जाते. याचा सामान्य अर्थ भगवान पतंजली हे इ.स.पूर्वी अनेक वर्षे कदाचित द्वापारयुगाच्या सुरुवातीला अर्थात भगवान व्यासांच्या समकालीन होऊन गेले असे मानता येते. त्यांच्या मातेचे नाव गौणिका असे सापडते. त्यांच्या योगदर्शनानुसार, संसारी आणि मुक्त असे दोन प्रकारे जीव मानले जातात. बाह्य जगताविषयी योगशास्त्राप्रमाणे चर्चा केली जाते. आत्मा हा सच्चिदानंदरूप आहे; हे त्यांचे पायाभूत तत्त्व होय. हे शास्त्र ईश्वरवादी आहे. सांख्य तत्त्वज्ञानातील २५ तत्त्वांमध्ये ईश्वर या तत्त्वाची भर



घालून, प्रकृति पुरुषातील पुरुष हा विशेष ईश्वर आहे असे मानले आहे.

**(i)** समाधी प्रक्रियेविषयी हे शास्त्र शास्त्रीय तर्कशुद्ध आणि त्रिकालाबाधित मांडणी करते. या शास्त्राच्या मते चित्तवृत्तीचा निरोध म्हणजे समाधी होय. हे या शास्त्राचे पायाभूत गृहितक असून जीवा-शिवाच्या अद्वैत प्रक्रियेतच जीवनमुक्ती आहे. हाच राजयोग होय. अशी तात्त्विक मांडणी केली आहे.

**(ii)** यातील अद्वैत तत्त्वज्ञानावर व समाधी साधनेवर अनेक प्रकारे चर्चा झाली आहे. त्यातील शुद्धाद्वैत विष्णूच्या रूपांना जाणून घेणे म्हणजे विष्णूस्वरूपाशी स्वरूप होणे म्हणजे मुक्ती किंवा सच्चिदानंदमग्नता होय. असे मानले तर विशिष्टाद्वैत विदेहमुक्ती अर्थात देहीच विदेही होऊन स्वरूपस्थितीने वावरणे किंवा असणे म्हणजे मुक्ती असे मानते. द्वैताद्वैतात विदेहमुक्तीला मान्यता आहे मात्र विशिष्टाद्वैताप्रमाणे जीवनमुक्तता मानत नाहीत. श्रीकृष्णार्पणमस्तु हाच आत्मकल्याणाचा मार्ग होय यावर ठाम आहेत तर द्वैत सिद्धांत शाश्वत सुखाची अनुभूती म्हणजे मुक्ती असे मानून सालोक्य, सामीप्य, सारुप्य आणि सायुज्य अशा चार मुक्ती मानतात. अलीकडील काळात 'एकं सत् विप्रा बहुधा वदंती' या उक्तीप्रमाणे योगशास्त्राचे महत्त्व लक्षात घेऊन समाधी साधनेचा अभ्यास केला जात आहे.

**(iii)** पातंजल योग विज्ञान हे समाधी साधनेचे मानसशास्त्र आहे. स्वयं ब्रह्मा, विष्णू, महेशांपासून सर्व ऋषी, मुनी, तपस्वी, सिद्ध, साधू, परिव्राजक, यति आदि महामानवांनी आपल्या शरीर आणि मन यांचा आत्मतत्त्वाशी असलेल्या संबंधाविषयी निदिध्यासपूर्वक चिंतनातून सिद्ध केलेले समाधी तथा आत्मसंयम शास्त्राचे असंख्य अनुभव, भगवान पतंजलींनी स्वानुभवासह, परंपरेतील अनुभवसिद्ध सूत्रांसह एका सुविहित शास्त्रात पद्धतशीर बांधून योगदर्शन सिद्ध केले आहे.

**(iv)** त्यातील समाधी विषय प्रक्रिया शास्त्र हे विश्वातील मानवजातीसाठी अनुसरणीय आहे. त्याचबरोबर ते मानव आणि मानवेतरांच्या अर्थात समस्त जडचेतन, चराचर भूतमात्रांसाठी उपकारक आहे. परमात्मा हे ज्ञान होय तर त्या ज्ञानाचा विलास ज्या सृष्टीत 'बहुस्याम' स्वरूपात प्रकट झाला ते म्हणजे विज्ञान होय. हेही त्या परमात्म्याचे विश्वरूप दर्शन होय. ज्ञान आणि विज्ञानाचा परस्पर संबंध असा एकात्म स्वरूपाचा आहे. ज्ञानाने आरशात स्वतःचे दर्शन घेतले तर विज्ञानाचे प्रतिबिंब ज्ञानस्वरूपात दिसते. या स्वरूपसंबंधाचे ज्ञान होणे म्हणजे समाधी साधना सिद्ध होणे होय. आत्मा-परमात्म्याचे अद्वैत अनुभूत होऊन दृष्य स्वरूपातील कर्मभोगव्यवहार ज्ञानवानपणे घडण्याची प्रक्रिया सुरू होणे होय.

**(v)** सृष्टी ही कैवल्याची नाट्यपूर्ण क्रीडा आहे. तशीच स्थितप्रज्ञ समाधीसिद्ध योग्याचे निरपेक्ष तरी कर्तव्यतत्पर कर्म ही क्रीडाच घडू लागते. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति' ही गोष्ट ठरवून किंवा प्रसिद्धीसाठी घडत नाही तर ती परमात्म्याची स्वसंवेद्यता असते. हेच समाधीयोगाचे फलित होय. मनाची अशी ज्ञानस्वरूप अवस्था अभ्यासाने कशी घडते याची सशास्त्र मांडणी भगवान पतंजलींनी योगविज्ञानात मांडली आहे हे लक्षात घेऊनच या दर्शनाचा अनुभव घेतला पाहिजे.

याच योगशास्त्राचा भौतिक आणि पारलौकिक जीवनाच्या दृष्टीने तात्त्विक चिंतन भगवान श्रीकृष्णांच्या मुखाने, ज्ञानवान कर्म घडण्याची जिज्ञासा उरलेल्या अर्जुनाच्या निमित्ताने सर्व मानवमात्रांसाठी प्रस्तुत झाले. श्रीमद् भगवत्गीतेत प्रत्येक अध्यायाच्या शेवटी 'ब्रह्मविद्यायाम योगशास्त्रे' असे आवर्जून घोषित केले आहे. भगवान पतंजलींच्या चिंतनाचा एवढा व्यापक विचार श्रीकृष्णांनी मांडलेला पाहून श्रीकृष्ण हे योगेश्वर आहेत याचा प्रत्यय विश्वाला आला.

**vi) पातंजल योगसूत्रे** : भगवान पतंलजींनी मांडलेली पातंजल योगसूत्रे पाहिली तर त्यांची संख्या सुमारे २०० पर्यंत जाते. काहींनी ही निश्चित संख्या १९५ मानली आहे. ही संख्या चार पादात (अध्यायात) विभागली आहे. (१) समाधिपाद (२) साधनपाद (३) विभूतिपाद आणि (४) कैवल्यपाद अशी ही विभागणी आहे.

**(१) समाधिपाद** : नऊ उपविभागांमध्ये मांडलेल्या 'समाधिपादात' आलेली चर्चा मूळ योगसूत्रात उल्लेखिलेली नाही. त्यात प्रारंभिकमध्ये **योगाचे उद्दिष्ट 'चित्तवृत्तीनिरोध'** आहे हे स्पष्ट करून अशा निरोधाने साधक आत्मनिष्ठ बनतो हे स्पष्ट केले आहे. पुढे वृत्तीविचारात प्रमाण, विपर्यय, विकल्प, निद्रा व सृती या पाच चित्तवृत्तींचे स्पष्टीकरण आले आहे. चित्तवृत्तीनिरोध क्लिष्ट तथा कठीण व अक्लिष्ट तथा सहज असतो. निरोधाच्या अभ्यासाने वैराग्य प्राप्त होते. नंतर **संप्रज्ञात** आणि **असंप्रज्ञात** अशा दोन प्रकारच्या समाधींचा विचार केला असून, संप्रज्ञात समाधीचे सवितर्क, सविचार, सानंद आणि सस्मित असे चार प्रकार वर्णिले आहेत. चित्तवृत्तीचा विराम किंवा लय झाल्याचा अनुभव सतत येत राहाणे म्हणजे असंप्रज्ञात समाधी हे स्पष्ट केले आहे. **कैवल्यास्वरूप होण्याची उत्कट अमर्याद इच्छा असेल तरच समाधी सिद्ध होते.** यासाठी ईश्वराची अनन्यभक्तीपूर्ण उपासना अर्थात ईश्वराचे प्रणिधान आवश्यक असते. ईश्वर पूर्ण-सर्वज्ञ आणि ब्रह्माविष्णूमहेशादिंचाही सद्‌गुरु असतो. ॐकाराची उपासना यासाठी महत्त्वाची असते. यासाठी मनाची एकाग्रता साधावयाची असते. ही एकाग्रता सर्व ऐहिक अडथळ्यांवर मात करून; मैत्रभाव, करुणा, पापपुण्याबद्दल स्थितप्रज्ञता यांच्या अभ्यासाने मनाची एकाग्रता होते. त्यासाठी समापत्ती अर्थात मनाची पारदर्शकता आवश्यक असते हे स्पष्ट करून निर्विचार, निर्वितर्क समाधीची अवस्था येते अर्थात ऋतंभरा प्रज्ञा स्वरूपातील अवस्था येते. या अवस्थेमुळेच, **निर्बीज समाधी** प्राप्त होते. **या समाधी**मुळेच **साधक जीवनमुक्त होतो.**

**(२) साधनपाद** : साधनपादामध्ये क्रियायोगाला अग्रक्रमाने महत्त्व असते. तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान यांना क्रियायोग असे नाव आहे. यांच्या अभ्यासांमुळे चित्ताठायी, अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश आदि प्रकारे येणारा क्लेश नष्ट करण्यास मदत होऊन चित्त एकाग्र होते. ध्यानाने हे क्लेश नामशेष होतात. **क्रियाजोगाबरोबर कर्मविपाकाचा विचार तेवढाच महत्त्वाचा ठरतो.** जोवर क्लेश तोवर दुःखभोग अटळ असतात. अगदी विवेकी पुरुषालासुद्धा यामुळे जीवन दुःखदायक वाटते. तरी दुःखावर मात करण्यासाठी व्यक्ती उपाय शोधू शकते. साधनपादात विशेष, अविशेष, लिंगमात्र, अलिंग अशा त्रिगुणात्मकतेने निर्माण होणाऱ्या अवस्थांचा 'हान' अर्थाविनाश होणे महत्त्वाचे असते. पंचीकरणात्म अवस्थांवर विजय मिळवावा लागतो. यालाच कैवल्यावस्था म्हणतात. यासाठी अष्टांगयोगाची मांडणी केली आहे. यात **(अ)** अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य व अपरिग्रह या स्वरूपात वर्तनाला **'यम'** असे म्हणतात. **(ब)** शरीर व मन शुद्धीसाठी शौच अर्थात **'नियम'** पाळणे आवश्यक असते. त्यासाठी संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वराची उपासना महत्त्वाची असते. यमनियमांच्या पालनात अडथळे अर्थात वितर्क येता कामा नये याची दक्षता घ्यावी लागते. **(क)** यासाठी मन आणि शरीर ज्यामुळे सुखी होते अशा **आसन** स्थितीचा उपयोग करावयाचा असतो. आसनांचे विविध प्रकार संशोधनपूर्वक मंडित केले आहेत. उदा. पद्मासन, वज्रासन, भुजंगासन इ. **(ड)** अष्टांगयोगात प्राणायामाला विशेष महत्त्व असते. श्वासोच्छवासाच्या नैसर्गिक गतीवर नियंत्रण मिळविणे म्हणजे **प्राणायाम** होय. हा प्राणायाम रेचक, पूरक आणि कुंभक अशा तीन प्रकारे अनुसरावयाचा असतो. यासाठी स्थिर आसनात बसण्याचा अभ्यास करावा लागतो. अष्टांग योगातील **'प्रत्याहार'** ही अतिमहत्त्वाची पायरी होय. अष्टांगयोगातील **धारणा, धान** व **समाधी** यांचा विचार विभूतिपादांत करावा लागतो.

**(३) विभूतिपाद** : या स्तरावर **(अ) संयम** विचाराला अतिशय महत्त्व असते. यातील **'धारणा'** म्हणजे चित्ताला एका जागी स्थिर करणे. धारणेशी दीर्घकाळपर्यंत

एकरूप होणे याला **'ध्यान'** असे नाव आहे. ध्यान करतांना स्वतःचाही विसर पडणे अर्थात देहभावाचाही विसर पडणे यालाच **'समाधी'** असे म्हणतात. म्हणजे **धारणा, ध्यान व समाधी या तीनही अवस्थांना एकत्रितपणे 'संयम' असे म्हणतात.** **(ब)** संयम विचारानंतर **'परिणाम विचार'** करावयाचा. ध्यान स्थिर होणे याला निरोध परिणाम, तर ध्यानात स्थिर राहण्याची मनाला सवय होते याला समाधी परिणाम असे म्हणतात. या अवस्थेनंतर साधक **'धर्मी'** अवस्थेस प्राप्त होतो. धर्मी स्थितीस पोचलेला साधक हा भूत, वर्तमान आणि भविष्य या तीनही धर्मात अर्थात अवस्थात स्थित असतो.

विभूतिपादात **'सिद्धीविचार'** अंतर्भूत आहे. ध्यानाच्या एकाग्र अवस्थेत सिद्धाला/साधकाला भूत व भविष्याचेही ज्ञान वर्तमानाच्या अनुबंधासह प्राप्त होते. सर्व भाषांचे ज्ञान, प्राणिमात्रांची भाषा, पुनर्जन्माचे स्मरण या गोष्टी अवगत होतात. मैत्री, करुणा, मुदिता, उपेक्षा या भावनांवर संयम प्राप्त होतो. सिद्धी विचारामध्ये योग्याला जे विविध प्रकारचे ज्ञान व सामर्थ्य प्राप्त होते त्यामुळे, मानवी मनोव्यापारांचे ज्ञान, जगातील भौतिक घटकांबद्दलचे ज्ञान इ. प्राप्त होऊन, त्या ज्ञानाचा उपयोग भूतमात्रांच्या कल्याणासाठी करता येतो. **सिद्धी प्राप्त झालेली विभूति जनसामान्यांच्या सर्व प्रकारच्या समस्या सोडवू शकते. एक प्रकारे देवत्व प्राप्त झाल्याचा अनुभव जनसामान्यांना येतो.**

**(४) कैवल्यपाद** : पातंजल योगविज्ञानातील ही अखेरची अवस्था सर्वश्रेष्ठ अशी अवस्था म्हणता येते. यांत **(अ)** सिद्धींचा विचार येतो. विशिष्ट जन्म, औषधी, मंत्र, तप व समाधी यामुळे सिद्धी प्राप्त होतात. तंत्रशास्त्राचा विनियोग विवेकाने करणे अभिप्रेत असते. **(ब)** जात्यंतर परिणाम सिद्धीयोगाच्या साधनेमुळे योग्याला विविध जन्म, विविध रूपे धारण करता येतात आणि या सर्व अवस्थांमध्ये चित्ताची अवस्था योगिक साधनेअंतर्गत स्थिर राहाते. **(क)** कर्मविपाकाच्या निमित्ताने विविध जन्मात आणि विविध रूपांतही स्मृती व संस्कार मात्र एकरूप राहतात अर्थात स्थिर राहतात. **(ड)** वासनांचा क्षय होतो. अतीत, अनागत व वर्तमान अशा तीनही प्रकारच्या वासना क्लेशासह प्रकटतात. मिथ्या ज्ञान प्रकटते. ही सर्व वासनात्मकता लयास जाणे कैवल्यपादात गृहित आहे. **(इ)** चित्त चंचल असते त्यामुळे मिथ्या ज्ञानाची शक्यता असते. एकच वस्तु पाहातांना वेगवेगळे ज्ञान संभवते. म्हणूनच चित्ताची स्थिरता महत्त्वाची असते. **(प)** चित्ताची पराधिनता अभ्यासाने नष्ट करता येते. **(फ)** 'पुरुष' चित्ताला जाणतो. चेतनपुरुष अविकारी असतो. तोच वस्तुस्वरूप होऊन ज्ञान मिळवितो. द्रष्टा व दृश्य यांच्याशी चित्त संबद्ध असल्याने चित्ताला ज्ञान होते. **(ब)** विशेष ज्ञानाने देहभावना नष्ट होऊन; शुद्धज्ञान प्रकटल्याने भोगी निरिच्छ होतो. त्याला **साक्षात्काराची अवस्था** साध्य होते. या अवस्थेला **'धर्ममेध समाधी'** असे नाव आहे. त्यामुळे त्रिगुणात्मक कार्य संपून **'कैवल्य'** अवस्था प्रकटते हीच **स्वरूपावस्था** किंवा **निजरुपावस्था** होय.

पातंजल योगसूत्रे अशी चार पादात विभागलेली आहेत. यातील शरीरविषयक नियंत्रणावर 'हटयोग विचार' अवलंबित आहे. योगविद्या ही अनुभवाने सिद्ध होणारी विद्या आहे. हा केवळ तात्त्विक विचार नाही. म्हणूनच ती विद्या आत्मसात करून स्वरूपसिद्धी घडण्यासाठी सद्गुरुंची आवश्यकता असते.

भगवान पतंजलींचे पातंजल योगदर्शन हे ऐतिहासिक, सांस्कृतिक महत्त्वाचे कार्य आहे. हे कार्य वैदिक ऋषीपरंपरेपासून भगवान योगेश्वर श्रीकृष्णांपर्यंत व त्यापुढील काळात परंपरेने नाथ संप्रदाय व तत्सम संप्रदायातून पातंजल योगशास्त्राची चर्चा झाली आहे. त्यात आवश्यकतेनुसार मार्गदर्शन केले आहे.

**(vii) पातंजल योगविज्ञानाचा अनुबंध** : वेदांताचा मुख्य भर श्रुतीवर आहे. शंकराचार्यांच्या नंतरच्या काळात अद्वैत वेदांतात तात्त्विक विचारसरणी कळसाला पोचली. त्यात दर्शनातील व प्रामुख्याने सांख्य आणि योगदर्शनातील संकल्पनांचे परीक्षण करण्यावर भर दिसतो. शांकर संप्रदायाचे तत्त्वज्ञान शांकरभाष्यातून स्पष्ट होते. हे शांकरभाष्य ब्रह्मसूत्रांवर केलेले भाष्य आहे. नंतर भामती ही वाचस्पतींची टीका, पद्मपादांची पंचपदिका, प्रकाशात्मयतींचे विवरण, सर्वज्ञात्ममुनींचे संक्षेप शारीरक, विद्यारण्यांचा 'विवरण प्रमेयसंग्रह', प्रकाशानंदांची सिद्धांतमुक्तावली, मधुसूदनसरस्वतींची अद्वैतसिद्धी या टीकांचा प्रामुख्याने उल्लेख होतो. शांकरवेदांताचा पुढील प्रवास मध्ययुगातील महाराष्ट्राच्या संतपरंपरेत दिसतो. वारकरी तत्त्वज्ञानाची बैठक अर्थात अद्वयानंदाची बैठक उपनिषदे, शांकरीय वेदांत, भगवद्गीता, श्रीमद्भागवत व नाथांचे शिवाद्वैत शिवशक्तिसमावेशन यांवर आधारलेली आहे. पातंजल योगविज्ञानाचा थेट अनुबंध या सर्व परंपरेशी आहे.

**(viii) पातंजल योगविज्ञानाचे योगसाधनेतील पडसाद** : योगशास्त्राचा विचार केला तर पातंजल योगविज्ञानाचे पडसाद दिसतात. चित्तवृत्तीनिरोध अर्थात मनाच्या अवस्थांचे नियंत्रण होय. म्हणजेच जीव आणि शिव यांचे मिलन घडवून आणणे. यात पंचविधवृत्तींचे नियमन, समाधी साधनेची पूर्वतयारी, म्हणजे साधना किंवा सराव होय. योगाच्या आठ शाखा अर्थात अष्टांगयी आहेत व चार प्रकाराने म्हणजे राजयोग अर्थात समाधीयोग, हटयोग अर्थात शारीरसंयमावर आधारित योग. मंत्रयोग मंत्राच्या माध्यमातून सच्चिदानंदापर्यंत पोचणे अथवा ईश्वर तथा ईश्वराशी

अद्वैत अनुभूती घेणे आणि यंत्रयोग अर्थात सच्चिदानंद स्वरूपातील महत्तत्त्व आणि महाशक्ती यांशी विशिष्ट शक्ती किंवा लक्षणांचे प्रतीकस्वरूप यंत्र मांडून ते सिद्ध करून त्याद्वारे स्वरूपसिद्धीपर्यंत पोचणे. अर्थातच तंत्रविद्या, मंत्रविद्या या योगसाधनेचाच भाग होत. यांसाठी कर्मकांडाची आणि व्रतस्थतेची मांडणी झालेली दिसते.

**(५) योगशास्त्रात कुंडलिनीची संकल्पना** : शिव व शक्ती अर्थात परमात्म्याच्या ठायीचे महत्तत्त्व आणि महाशक्ती समावेशन हे अद्वैतावर आधारित आहे. तंत्रशास्त्राच्या विकासातून ही संकल्पना पुढे आली आहे. वास्तव पायाभूत 'ब्रह्म' हेच सत्य होय. मानवी देहामध्ये कुंडलिनीच्या स्वरूपात ते वास करते. जीवमात्रामध्ये ही शक्ती सुप्तावस्थेत वास करते हे गृहितक आहे. गंधर्वतंत्रानुसार ''जोवर कुंडलिनी मूलपद्मामध्ये निद्रिस्तस्थितीत पडून राहते, तोवर मंत्र, यंत्र, अर्चना यांसारख्या तांत्रिक विधींपैकी कशानेही सिद्धीप्रत जाता येणार नाही. जेव्हा ती देवता जागी होते त्यानंतरच हे सर्व विधी परिणामकारी होऊ लागतात.'' ही कुंडलिनी सर्वसत्य ब्रह्माची, अर्थात सर्व देवदेवता शक्ती यांची प्रतिनिधी, त्रिविध सृष्टीची जननी आहे. देहाच्या सर्व घटकात ती अवतरली की अवघी मंत्रसृष्टी सिद्ध होते. गंधर्वतंत्रानुसार षट्चक्र किंवा पद्मांची कल्पना मांडली जाते. गुद्द्वार व शिश्न अशा योनीच्यामध्ये चार पाकळ्यांचे **मुलाधार पद्म** शिश्नाच्या किंवा योनीच्या पायथ्याशी सहा पाकळ्यांचे **स्वाधिष्ठान चक्र,** नाभीपाशी दहा पाकळ्यांचे **मणिपूर पद्म,** हृदयाशी **अनाहतपद्म,** कंठापाशी सोळा पाकळ्यांचे **विशुद्धिपद्म,** भुवयांच्या मध्ये दोन पाकळ्यांचे **आज्ञापद्म** अशी षट्चक्रे आहेत, असे 'ब्रह्मनः सुखे मोहरला झरा' या भारतीय इतिहास व संस्कृति यांचा यथार्थ अभ्यास खंड बारामध्ये प्रधान संपादक डॉ. श्रीपाद दत्तात्रय कुलकर्णी यांनी, श्री भगवान वेदव्यास इतिहास संशोधन मंदिर (भीष्म) मुंबई यांनी १९९४ मध्ये प्रकाशित केलेल्या ग्रंथात नोंदविले आहे. (पृ. ३१२) याशिवाय मेंदूच्या आत सहस्त्र पाकळ्यांचे एक कमळ असते, त्याला **सहस्त्रपद्म** असते. आगमरहस्याप्रमाणे एक गोष्ट स्पष्ट केली आहे की ही कमळे किंवा चक्रे सुषुम्ना नाडीच्या अंतर्भागात असतात. सुषुम्ना नाडीलाच ब्रह्मनाडी असे म्हणतात. तिचा विकास झाल्यानेच सर्वोच्च आनंदाचा लाभ होतो. म्हणजेच साधना सिद्ध होते. आधुनिक शास्त्रात या नाडीला मज्जारज्जु असे नाव आहे. सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणी ती असते. उपरोक्त ग्रंथात कुंडलिनी संबंधात नाडी व वायू ही फार महत्त्वाची संकल्पना आहे. चैतन्य वायूतून उगम पावते आणि हे चैतन्य नाड्यातून सर्व देहात वाहाते. देहातील एकूण नाड्यांची संख्या बहात्तर



हजार एवढी आहे. त्यापैकी महत्त्वाच्या दहा नाड्यांवर योगशास्त्र आणि कुंडलिनी व्यवहार अवलंबून आहे. यामुळेच दहा नाड्या आणि दहा वायूंची कल्पना मांडली आहे. **नाड्यांची नावे अशी** : इडा, पिंगळा, सुषुम्ना, गांधारी, हस्तिजिव्हा, प्रसवा, अलंबुषा, यशा, कुला आणि शंखिनी. याच दहा नाड्यांपासून इतर नाड्या फुटतात व शरीरभर पसरतात. **दहा वायू असे** : प्राण, अपान, समान, उदान, व्यान, कर्म, नाग, क्रिकर, देवदत्त आणि धनंजय.

या सर्व नाड्यांमध्ये सुषुम्ना नाडी सर्वात महत्त्वाची होय. तीच मस्तकातील शिवाला स्पर्श करून पुन्हा पूर्व स्थानी येते.

आगमरहस्यात असे सांगितले आहे की, हंसमंत्राचा प्रयोग करून कुंडलिनीला शिवाच्या स्थानापर्यंत वर जायला प्रवृत्त करावे आणि सोऽहं मंत्राचा प्रयोग करून तिला तिच्या मूळच्या जागी परत आणावे. याच पद्धतीला 'प्रपंच सारसंग्रह' नामक ग्रंथात '**योगमुद्रा**' असे म्हटले आहे, असेही उपरोक्त 'ब्रह्मन' ग्रंथात नोंदविले आहे.

**(६) मनोस्वरूपस्थितीचे महत्त्व** : योगसाधनेने अद्वैतापर्यंत पोहोचण्यासाठी, अर्थात् सच्चिदानंदस्वरूप होण्यासाठी, ठायीच्या आत्मरूपाचा व्यवहार लक्षात घ्यावा लागतो. मनोस्वरूप स्थितीने अर्थात मन आणि आत्मा यांच्या मुळातील अद्वैत स्थितीची सिद्धता होणे आवश्यक असते. सनतकुमारांनी नारदांना दीक्षा देतांना ''मन एव मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः।'' या शंकराचार्यांच्या सूत्राप्रमाणे उपदेश केला आहे. सनतकुमारांपासून शंकराचार्यांपर्यंत सर्वांनी मनाची ही निर्णायकता स्पष्ट केली आहे. पातंजलयोगविज्ञान हे भारतीय मानसशास्त्र होय या म्हणण्याचा अर्थही हाच आहे.

ऋग्वेदकार ऋषींनी, ''कामस्तदग्रे समवर्तताधि मनसः रेतः प्रथमं यदासीत'' (ऋ. १२९-४) या शब्दात मनाचे महत्त्व स्पष्ट केले आहे. सृष्टीनिर्मिती करण्याचे ठरविल्यावर प्रथम ईश्वराने मन उत्पन्न केले आणि त्यामध्ये कर्मे करण्याची व प्रजोत्पत्तीची इच्छा ओतली. असा अप्रकटातून प्रकट सृष्टीचा उगम झाला. प्राण, संवेदना, वासना, सारे सचेतन घटक हे स्वतः अव्यक्त राहिलेल्यांची अर्थात आत्मरूपांची रूपे आहेत. उपरोक्त ग्रंथातील या नोदींबरोबरच, औपनिषदीय ऋषींना सर्व सजीव व निर्जीव वाटणाऱ्या गोष्टीतदेखील ब्रह्माचे म्हणजेच त्या आत्मरूपाचे प्रकटीकरण आढळले असे म्हटले आहे. एवढेच नव्हे तर निर्गुणाचे सगुण कसे होते ते आपणाला समजत नाही. कारण ब्रह्माची ती अंगभूत शक्ती आहे, असे स्पष्ट केले आहे. संत माउली ज्ञानेश्वर महाराज, श्रीमद् भगवद्गीतेवरील

म्हणजे 'ब्रह्मविद्या-योगशास्त्र' यावरील प्रवचन सुरू करतांना त्या ब्रह्माचं स्वरूप स्पष्ट करतात. ते मानवमात्रांच्यासाठी दोन प्रकारे प्रबोधित करतात. **ॐ** नमो जी **आद्या** । वेद प्रतिपाद्या । जय जय **स्वसंवेद्या । आत्मरूपा** ।।१।। **आद्य** आत्मरूप स्वसंवेद्य आहे म्हणजेच मनोस्वरूप आहे. ते वाणीद्वारा मानवमात्रांसाठी संज्ञापित होण्याकरिता शब्दब्रह्म स्वरूपात म्हणजेच ॐ स्वरूपात प्रकटलेले आहे. म्हणूनच ॐ हे आद्य असे स्वसंवेद्य आत्मरूप दर्शविणारे वाणीस्वरूप असून, त्या वाणीद्वारा त्यांनी संपूर्ण प्राकट्याचे दर्शन घडविणाऱ्या वाणीस्वरूप वेदांचे प्रतिपादन केले आहे. यासंदर्भात ब्रह्म अर्थात आद्य स्वसंवेद्य आत्मरूप अशा अस्तित्वाचे मी (डॉ. अनिल सहस्रबुद्धे) 'मनोस्वरूप विचार' या मोरया प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या ग्रंथात विस्तृत विवेचन केले आहे.

'ब्रह्मन' या ग्रंथातील 'भक्ती-प्रेम यांचा मार्ग' या उल्लेखात, मनोभूमीची परिपूर्ण निश्चलता म्हणजे समाधी अवस्था होय हे स्पष्ट करून; ते म्हणतात, ''मनोदेहासंबंधी बोलायचे तर, विचारवहनापुरती ती पूर्णपणे स्थैर्याची अवस्था असते, परंतु खुद्द मनाच्या चौकटीमध्ये मात्र (जाणिवेच्या कक्षेत मात्र) परमाणूंच्या फार मोठ्या गतिमानतेची अवस्था असते. मनोदेहाच्या परमाणूंमध्ये अति उच्च कंपनस्थिती निर्माण होते, परंतु त्याचवेळी शरीर मात्र स्थिरतेच्या परिपूर्ण अवस्थेत असल्याचे दिसते. अशा प्रकारे मनोदेहाच्या परमाणूंच्या कंपनामध्ये अभ्यासाद्वारे एक लय उत्पन्न होते व असा लयीचा प्रवास म्हणजे समाधीजन्य मनःशांती. जी समाधीची स्थिरता वाटते. ती वस्तुतः यथाशक्य सर्वोच्च गतिशीलता असते'' असे स्पष्ट केले आहे. ''छांदोग्य उपनिषद म्हणते की, 'यो वैभूमा तदमृतं अथयदल्पं तन्मर्त्यम्' जे परिपूर्ण असते ते अमर सुख आणि जे अपूर्ण असते ते नाशवंत सुख होय.'' भक्तिमार्ग हा अशा शाश्वत सुखाकडे घेऊन जाणारा मार्ग होय. 'नारदभक्तिसूत्रे' यातील व्याख्या, 'सा त्वस्मिन् परम प्रेमरूपा अमृत स्वरूपा च'- ईश्वरावरील सर्वश्रेष्ठ प्रेमाचा मार्ग असून तो शाश्वत स्वरूपाचा आहे - नोंदवून, ग्रंथकारांनी शांडिल्य ऋषींनी केलेली 'परानुरक्तिः ईश्वरे' ही व्याख्या पुष्टीकरणार्थ दिली आहे. याचाच पुरस्कार आदिशंकराचार्यांच्या व्याख्येत दिसतो- ''स्वरूपानुसंधानं भक्तिः इति अभिवीयत'' - स्वतःच्या स्वभावाशी अत्यंत निकटचा संपर्क ठेवणे याला भक्ती असे नाव आहे. हेच याज्ञवल्क्यमुनींनी ''आत्मनस्तु कामाय सर्वं प्रियं भवति - स्वतःचा जीव हे आपले प्रेमभाजन असल्यामुळे व हा जिवात्मा साऱ्या प्राणिमात्रांमध्ये समानरित्या उपस्थित असल्यामुळे सर्वांवर प्रेम करणे आपल्याला क्रमप्राप्त होते.'' याचा संदर्भ देऊन समाधी स्थितीचा भक्तियौगिक



मार्ग स्पष्ट केला आहे. नवविधा भक्तिमार्गाच्या अनुसरणाने सामान्य प्रापंचिकांना अर्थात संसारी माणसांनाही शाश्वत आनंदापर्यंत पोचता येते हे स्पष्ट केले आहे. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ । कोणाही जीवाचा न घडो मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।। ही संत तुकोबारायांची अभंगोक्ती भक्तिमार्गाने निर्माण होणाऱ्या समाधी अवस्थेचेच वर्णन करते.

**(७) समाधीमग्न आत्मरूप हेच जगताचे कारण** : नासदीय सुक्तातील वेदांत समजावून घेतला तर समाधीमग्न आत्मरूपच संपूर्ण सृष्टोत्पत्तीचे कारण आहे हे ध्यानात येऊन पूर्णावस्थेची जाणीव होईल. समाधी ही अशी पूर्णावस्था असते. ऋषींना ब्रह्ममानसपुत्र असे संबोधले जाते; ते या त्यांच्या ठायी सिद्ध झालेल्या समाधी अवस्थेमुळेच! परमेश्वराच्या अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, महाशून्य, केवल, निज, आद्य, आत्मरूप, स्वसंवेद्य अशा परब्रह्माचे सच्चिदानंद स्वरूप हेच या समाधी अवस्थेने ठायीच जाणवते. अवघ्या अस्तित्वाचे कारण आणि निराकारण ठायीच असल्याची प्रचिती येते. 'ब्रह्मन' या ग्रंथात नासदीय सुक्तातील वेदांत स्पष्ट करतांना, ''नासद् आसीत नो सदासीत् तदानीम्' - अशी त्या सुक्ताची सुरुवात असल्याचे सांगून; सृष्टीनिर्मितीच्या आधी काही नव्हते असे म्हणता येणार नाही आणि काही होते असेही म्हणता येणार नाही. कारण सत् म्हणजे काहीतरी असणे आणि असत् म्हणजे काहीच नसणे. या दोन्ही अवस्था सृष्टीच्या उत्पत्तीनंतरच अर्थपूर्ण ठरतात. नासदीय सुक्तांचा कर्ता म्हणतो 'आनीत अवातं स्वधया तदेकम्' - अर्थात तेव्हा तेथे जे काही तत्त्व होते ते वायुविरहित स्थितीतही स्वयंप्रेरणेने श्वासोच्छवास करीत होते, म्हणजेच तेच तत्त्व चैतन्यशील होते. म्हणजेच ते तत्त्व निखळ आनंदपूर्ण होते. समाधीयोगाने ही निखळ आनंदपूर्णता भोगता येते. तीच अवस्था शाश्वत अवस्था होय.

सनत, सनक, सनंदन, सनातन, सप्तर्षी, वैदिक ऋषी, मरिची, काश्यप, नारद आदि समस्त ब्रह्ममानसपुत्रांपासून एवढेच काय स्वयं ब्रह्मा, विष्णू, महेश, माया, सरस्वती, लक्ष्मी, पार्वती यांपासून चालत आलेल्या ब्रह्मविद्येला अर्थात योगशास्त्र अनुभवसिद्धतेने विकास होत राहिला आहे.

**(८) महर्षी अगस्तिमुनींचे रामोपासना आगम** : महर्षी अगस्त्यमुनींच्या रामोपासना या प्राचीनतम आगमशास्त्रात परब्रह्म, परमात्मा, कैवल्य, सच्चिदानंदस्वरूप, निजरूप, अविनाशी, आद्य स्वसंवेद्य आत्मरूप या दृष्टीने रामतत्त्वविचार विस्तारला आहे. रामतत्त्व आगमशास्त्र, अगस्त्य संहितेत येते. हे वैष्णवागम शास्त्र म्हणूनही ओळखले जाते. हेमाद्रिपंडितांच्या चतुर्वर्गचिंतामणीतही याचा उल्लेख आहे.

रामोपासनेमधून अध्यात्म रामायणाची परंपरा प्रस्तुत झाली आहे. या वैष्णवागमाच्या निमित्ताने मंत्रयोग आणि तंत्रयोग या दोन्ही योगशास्त्रांचा विकास झाला आहे. यातूनच नवविधा, पंचविधा, अनेकविधा भक्तियोगाची मांडणी झाली आहे. अगस्त्य संहितेत प्रभुरामचंद्र, सीताशक्ती आणि लक्ष्मण यांचा उल्लेख आहे. हे लक्षात घेता हे रामोपासना आगमशास्त्र त्रेतायुगात रामांचा लंकाविजय संपादिल्यानंतर झाला असेल असे मत पुढे येऊ शकते. महावीर जैन मंदिर प्रकाशन, पटनाने, पं. भवनाथ झा यांनी संपादिलेल्या 'अगस्त्य-संहिता' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत, उपनिषदातील आगमशास्त्रीय 'रामरहस्योपनिषद' तथा 'रामतापिनीयोपनिषद' यांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे नोंदविले असून, सामान्यजनांना ग्रहस्थांना षोडशोपचार, पंचोपचार, एकादशोपचार पूजा विधी द्वारा, ऐहिक व मोक्ष तथा पारलौकिक जीवनाची यशस्विता कशी गाठता येते हे कथन केले आहे. मात्र हे सर्व कर्मकांड करतांना निष्कामभावाने दान, जप, हवन, पूजन, भजन, कीर्तन केल्यानेच ब्रह्म्याशी अद्वैत साधण्याची ज्ञानमय अवस्था प्राप्त होते हे स्पष्ट केले आहे. याचा अर्थ ज्ञानवान कर्मतत्परता हीच ठायीची सच्चिदानंद अनुभूती होय, हेच स्पष्ट केले आहे.

**(९) योगवासिष्ठातील साधनामार्ग विचार** : 'योगवासिष्ठ अर्थात वासिष्ठरामायणाचे तत्त्वज्ञानात विशेष महत्त्व आहे. प्रत्येक सर्गाच्या अखेरीस ''इत्मार्षे श्रीवासिष्ठमहारामायणे वाल्मिकीये मोक्षोपारेषु... प्रकरणे... सर्ग'' असे आवर्जून नमूद केले आहे. याचा अर्थ सच्चिदानंदप्राप्तीचा साधनमार्ग म्हणूनच या रामायणाची रचना झाली आहे. प्रारंभीच्या सर्गात 'स्फुरन्ति सीकरा यस्मादानन्दस्याम्बरेऽवनो । सर्वेषां जीवनं तस्मै ब्रह्मानन्दात्मने नमः ।। असे उल्लेखिले आहे. यातील तत्त्वज्ञान शंकराचार्यांच्या केवलाद्वैताच्या जवळ जाणारे असून; औपनिषदिक अद्वैतवाद आणि बौद्धांच्या महायान विज्ञानवाद याशी अनुबंध सांगणारे आहे असे म्हणता येते. यात नीतिशास्त्रदृष्ट्या ज्ञानकर्मसमुच्चयाचा पुरस्कार केला असून, कर्मयोग मांडलेला आहे. 'ब्रह्मन्' या औपनिषदिक संज्ञेनेच अंतिम सत्याचा निर्देश केला आहे. ईश्वराशी, वेदांत्यांच्या ब्रह्माशी, सांख्यांच्या पुरुषाशी, विज्ञानवाद्यांच्या विज्ञानाशी आणि शून्यवाद्यांच्या शून्यांशीही सांगड यात घातली असून; कैवल्याच्या निर्विकारतेचा निर्देश केला आहे. नित्यसंवित्सरूप असा (स्वसंवेद्य) या आत्म्यावर विश्व मृगजळासारखे भासते म्हणून त्याला आदिकारण म्हणायचे इतकेच. स्पन्द आणि अस्पन्द या आत्मरूपाच्या स्वभावामुळे (स्वसंवेद्य स्वभावामुळे) विश्वाचे उत्पत्ति आणि लय भासतात. वासिष्ठरामायणातील



तत्त्वज्ञानाची अशी तुलनात्मक नोंद करून मराठी विश्वकोशात शब्दांनी व्यक्त करता येणार नाही, पण मुक्त अवस्थेचा अनुभव घेता येतो, ही ज्ञानात्मक कर्मयोगाची सिद्धता निर्देशित केली आहे.

**(१०) श्रीमद् देवी भागवतातील विचार** : श्रीमद् देवी भागवत पुराणात महाशक्ती हीच परब्रह्मस्वरूपात स्थित असून, परमात्म्याच्या मातृरूपाच्या उपासनेचे वर्णन आहे. तंत्रयोगाच्या दृष्टीने ही उपासना येते तशीच भक्तियोगाच्या दृष्टीनेही उपासना येते. सारस्वत कल्पाशी म्हणजे विद्यासाधनेशी अनुबंधित तंत्रयोग आणि मंत्रयोग साधनेने शक्तीशी अद्वैत साधता येते. विश्वातील समस्त प्रापंचिक लीला शक्तिस्वरूपामुळे घडतात. त्यांच्याठायी शक्तिस्वरूप ज्ञानाने सामोरे जाणे अभिप्रेत आहे. मंत्र, तंत्र आणि अनेकविधा भक्तिअनुष्ठान असे या योगसाधनेचे स्वरूप असते. श्रीमद् शंकराचार्य कृत भवान्यष्टकात देवीरुक्मिणीच्या आगमानुसार उपासना करून सर्व दुःखांचा विलय कसा साधला जातो हे भक्तियोग माध्यमातून स्पष्ट केले आहे. शक्ती देणारी तंत्रविद्याप्रणित यंत्रे वैदिक काळापासून परंपरेत असून, यंत्रयोग हा मंत्रयोगापेक्षा महत्त्वाचा आहे असे पौरोहित्य शिकविणाऱ्या स्वयंपुरोहित ग्रंथात स्पष्ट केले आहे. अशा यंत्राची व तंत्राची यादी मोठी आहे.

आगमशास्त्रांचा यज्ञसंस्थेशी घनिष्ठ संबंध असून, यज्ञसंस्था मंत्रयोग व तंत्रयोग तसेच यंत्रयोगाचे केंद्र आहे. वैदिक परंपरेपासून राजयोगातून साधावयाच्या अद्वैतसिद्धीपर्यंत किंवा सच्चिदानंद अनुभूतीपर्यंत या मार्गाने जाता येते असे मानले जाते.

**(११) भगवद्गीतेतील ब्रह्मविद्या-योगशास्त्र** : श्रीमद् भगवद्गीतेतील योगेश्वर श्रीकृष्णांचे प्रतिपादन योगमार्गांचे व्यापक विवेचन करते. श्रीमद्भगवद्गीतेतील मुख्य विषय सांख्ययोग आणि कर्मयोग होय. (१) सांख्ययोगाने सच्चिदानंदानुभूतीपर्यंत पोहोचायचे तर मन इंद्रिये आणि शरीर यांच्या द्वारा होणाऱ्या कर्माचा मी कर्ता आहे हा अभिमान सोडून द्यावा लागतो-

*नैव किञ्चित्करोमीति युक्तो मन्यते तत्त्ववित् ।*
*पश्यञ्शुण्वन्स्पृशञ्जिघ्रन्नश्नन्गाच्छन्स्वपञ्श्वसेन् ।।५-८।।*
*प्रलपन्विसृजन्गृह्णन्नुन्मिषन्निषन्नपि ।*
*इन्द्रियाणीन्दियार्थेषु वर्तन्त इति धारयन ।।५-९।।*

योग्याने पाहाताना, ऐकताना, स्पर्श करीत असतांना, वास घेतांना, भोजन करीत असतांना, चालत असतांना, झोपत असतांना, श्वासोच्छवास करीत असता, बोलत असता, टाकीत असता, घेत असता, डोळ्यांची उघडझाप करीत असता, सर्व

इंद्रिये आपापली कामे करीत आहेत हे लक्षात घेऊन यात मी काहीच करीत नाही असे समजावे. पुढे भगवंत म्हणतात, आसक्ती सोडून जो पुरुष कर्मे परमात्म्याला अर्पण करतो, कमलपत्राप्रमाणे पापाने (कमलपत्र पाण्यात राहूनही पाण्याने लिप्त होत नाही) लिप्त होता कामा नये. सर्वव्यापी सच्चिदानंदघन परमात्मस्वरूपात नित्य एकरूप राहण्याच्या अभ्यासाने सच्चिदानंदघन वासुदेवाशिवाय अन्य कोणीशीही आपला सापेक्ष वा निरपेक्षही संबंध नाही अशी भावना ठेऊन निर्लेपपणाने जगणे म्हणजे सांख्ययोगी होणे होय. (२) कर्मयोगात सर्व काही भगवंत इच्छेने घडते आहे असे मानून यशापयशात समदृष्टी ठेवून, फळाची अपेक्षा सोडून देऊन, भगवंतांच्या आज्ञेप्रमाणे सर्व कर्मे केवळ त्याच्यासाठीच आपल्याकडून कर्तव्यतत्परतेने घडत आहेत. कर्म करीत राहाणे आवश्यक असते. श्रद्धा व भक्तिपूर्वक मन, वाणी आणि शरीराने सर्वस्वी भगवंतांना शरण जाऊन त्यांचे नाम, गुण आणि प्रभावासह त्यांच्या स्वरूपाचे अखंड चिंतन करणे ही कर्मयोगाची साधना म्हणजे कर्मयोगी होणे होय. भगवंत म्हणतात–

*योगस्थः कुरु कर्माणि सङ्गं त्यक्त्वा धनञ्जय ।*
*सिध्द्यासिध्द्योः समो भूत्वा समत्वं योग उच्चते ।।४८।।*

हे धनंजया सिद्धी आणि उपसिद्धीमध्ये समभाव राखत आसक्तीरहित, योगात स्थिर होऊन कर्तव्य कर्म कर. समत्वालाच योग असे म्हटले आहे.

या दोन्ही प्रकारे विवेचन करतांना नित्य जगव्यवहारापासून दूर जायला सांगितलेले नाही. म्हणूनच भगवद्‌गीतेचा प्रधान विषय शरीर आणि मनाचे ठिकाणी संघर्ष हाच आहे. त्यासाठी आत्मसंयम महत्त्वाचा होय. जीवनव्यवहारातील संघर्षावर यशस्वीरित्या मात करून सच्चिदानंदस्वरूप होण्याचे शास्त्र भगवंत आपल्या मुखाने निवेदित करीत आहेत. या शास्त्रानुसार आत्मसंयम योग आणि भक्तियोग हे दोन मार्ग भगवंतांनी सांगितले आहेत. भगवान श्रीकृष्णांनी या संपूर्ण गीता निवेदनप्रसंगाचे वर्णन 'ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे' असे करून, आपण संपूर्ण जीवनाचे शास्त्र निवेदन करीत आहोत असे स्पष्ट केले. प्रत्येक जीव हा योगीच आहे असे गृहित धरून प्रामुख्याने मनुष्यमात्राला सर्वांगीण जीवनसंघर्षाचा आणि संघर्षावर मात करून जीवन पुरुषार्थपूर्ण करण्याचा मार्ग सांगितला आहे. हे लक्षात घेऊन प्रत्येकाने योगी व्हावे अर्थात यौगिक जीवनशैली असावी असे सुचविले आहे. संघर्ष कर्मतत्परतेने करणे म्हणजे ज्ञानमयतेने जीवन जगणे होय. हे स्पष्ट करतांना अर्जुनाला केलेला बोध अठरा प्रसंगात प्रसृत करतांना प्रत्येक प्रसंगाला योग असेच म्हटले आहे. यौगिक शैलीने जीवन अनुसरण्याचा साक्षात्कार भगवंत



करतात. म्हणूनच भगवान श्रीकृष्णांना जगद्‌गुरु योगिराज असे बिरुद आपण लावतो. अर्जुनविषादयोग, सांख्ययोग, कर्मयोग, ज्ञानसंन्यासयोग, योगगर्भयोग, आत्मसंयमयोग, ज्ञानविज्ञानयोग, ब्रह्माक्षरनिर्देशयोग किंवा अक्षरब्रह्मयोग, राजविद्याराजगुह्ययोग, विभूतियोग, विश्वरूपदर्शनयोग, भक्तियोग, प्रकृतिपुरुषयोग किंवा क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग, गुणातीतयोग किंवा गुणत्रयविभागयोग, पुरुषोत्तमयोग, दैवासूरसंपद्विभागयोग, श्रद्धादिनिरुपणयोग किंवा श्रद्धात्रयविभागयोग आणि सर्वगीतार्थसंग्रहयोग किंवा मोक्षसंन्यासयोग अशी नावे दिली आहेत. योगसाधना करणाऱ्याला अर्थात राजयोग्याला संपूर्ण साधनामार्गावर प्रशस्त केले आहेच. त्याचबरोबर संसारप्रपंचव्यवहार करणाऱ्या गृहस्थ, समाजस्थ तथा राजव्यवहारस्थ माणसाला कर्मयोगाने ठायीच सच्चिदानंदप्राप्ती अर्थात पूर्ण ज्ञानमय अवस्था प्राप्त करून शांती कशी मिळू शकते यासंदर्भातील साधनामार्गही प्रशस्त केला आहे. जीवनमार्ग प्रशस्त करतांना अर्जुनाला युद्धासाठी सिद्ध केले खरे, पण त्याला समदृष्टी देऊन अर्थात समाधिस्थ करून, भगवंतांनी अर्जुनाला समाधी दिली म्हणजे आनंदरूप करून; अर्थात शोकमायेच्या पलीकडे कायमचे नेऊन ठेवले. माउली ज्ञानेश्वर म्हणतात–

*तेथ निजानंदा बहुवसा– । माजीं अर्जुन तो सहसा ।*
*हरपला चंद्रु जैसा । चांदिणेनि ।।४२४।अ. १७।।*
*अहो संग्रामु हा वाणिया । मापे नाराचाचिया आणिया।*
*सूनि मांस घे मवणियां । जीवितेंसीं ।।४२५।अ. १७।।*
*ऐसिया समयीं कर्कशें । भोगीजत स्वानंदराज्य कैंसें ।*
*आजि भाग्योदयो हा नसे । आणिके ठाईं ।।४२६।अ. १७।।*

ही अर्जुनाची अवस्था वर्णन करून या ब्रह्मविद्या योगशास्त्राच्या अनुसरणाचे महत्त्व स्पष्ट करतांना माउली ज्ञानेश्वर म्हणतात–

*म्हणौनि मनें कायें वाचा । जो सेवक होईल इयेचा ।*
*तो स्वानंदसाम्राज्याचा । चक्रवर्ती करी ।। अ. १८।१६६७।।*

योगशास्त्राचा अर्थात ब्रह्मविद्येचा असा समग्र जीवनव्यापी विस्तार विकास करून, समाधीयोगाबरोबरच जीवनयोग भगवंतांनी मानवमात्रांना प्रदान केला. म्हणूनच श्रीमद्‌भगवद्‌गीता हे ब्रह्मविद्या अर्थात योगशास्त्र म्हणून जगाला ललामभूत झाले आहे.

**(१२) ब्रह्मविद्येअंतर्गत 'समाधी' आणि सिद्धी संकल्पना :** ब्रह्मविद्या अर्थात योगशास्त्राची चर्चा करू लागले की सर्वसामान्य माणसांच्या मनात दोन गोष्टींविषयी

कुतूहल निर्माण होते. एक म्हणजे समाधी आणि दुसरी गोष्ट म्हणजे सिद्धी. या दोन्ही गोष्टींचा विचार योगसाधनेत केला आहे. येथे थोडक्यात त्याविषयी चिंतन करूया.

**(अ) समाधी** :-

परमात्मा नित्य, निर्गुण, निराकार, निर्विकार, केवल, निजरूप, महाशून्य, अविनाशी, आद्य आहे. तेच पूर्ण सत्य, परिपूर्ण, चैतन्यमय व आनंदमय असे उत्सवस्वरूप आहे. त्याचा महत्त्वाचा स्वभाव म्हणजे ते स्वसंवेद्य आहे. तेच आत्मरूप अर्थात परमात्मा सर्व चराचराच्या ठायी अंशात्मक आत्मतत्त्व म्हणून नांदते. म्हणजे त्या चराचराच्या अर्थात अणुरेणुंच्या साकार सर्व रूपांच्या, मग ती रूपे जड वा जीव असोत त्या प्रत्येक अस्तित्वात आत्मतत्त्व आहे. परमात्म्याची सर्व गुणात्मकता त्या अंशात्मक आत्मतत्त्वातही आहेच. कारण परमात्म्यातूनच तो आत्मांश प्रकट होतो किंवा निष्पन्न होतो किंवा विघटित होऊन प्रकटतो. तसाच त्या आत्मांशाचा अंततः विलय होतो. याचा सरळ अर्थ देहाठायीचा आत्मा अविनाशी, सच्चिदानंदरूप, स्वसंवेद्य आहे.

परमात्म्यापासून विघटन प्रक्रियेने महत्तत्त्व व महाशक्ती असे द्विविध अवस्थारूप प्रकटते. तेव्हाही महाशक्तीच्या ठायी महत्तत्त्व असतेच आणि महत्तत्त्वाठायी महाशक्ती असतेच. त्या द्विविधतेतून पंचविध तत्त्वे प्रकटतात. ती तत्त्वे म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश. यांना महातत्त्वे असे संबोधिले आहे. या महातत्त्वांच्या ठायीही पंचमहाशक्ती असतात. अर्थातच त्यांच्याही सर्वांठायी आत्मरूप नांदतेच. या पंचतत्त्वांच्या अंशांच्या संघटना तथा समावेशनामधून जड, जीव सगुण, साकार, आकार प्रकटतात. या आकारांच्या प्राकट्याबरोबरच पंचमहातत्त्वांची गुणात्मकता संघटनसमयी कमी-अधिक तत्त्वांशांनी प्रकटते. या तत्त्वातील ज्या महत्तत्त्वांची गुणात्मकता अधिक प्रमाणात सगुणसाकारतेत प्रकटते त्या गुणात्मकतेचा अधिक प्रभाव त्या सगुणसाकारतेत असतो.

जीव अर्थात देह अशा पंचमहाभूतात्मक संघटनेतून अस्तित्वात येतो तेव्हा पंचमहातत्त्वांचा देहभाव तर त्याच्या ठायी असतोच; त्याचबरोबर अविनाशी, सच्चिदानंदरूप, स्वसंवेद्य आत्मरूपही त्याच्याठायी असतेच. देहभावाने जीवाचे वर्तन सुरू होते, तर आत्मरूपाने जीवाचे जिवंतपण संवेदित होते. असे असले तरी देहभावामुळे अविनाशी, सच्चिदानंदरूप, स्वसंवेद्य आत्मरूपाचाच विसर जीवाला पडतो. पंचभौतिक जीवाचाच अहंकार त्याच्या ठायी निर्माण होतो. जीवअवस्थेची माहिती म्हणजे विज्ञान; तर जीवावस्थेत ठायीच असलेल्या स्वसंवेद्यतेची



अविनाशित्वाची सच्चिदानंदस्वरूप आत्मतत्त्वाची जाणीव म्हणजे ज्ञान होय. परमात्मतत्त्वाची सच्चिदानंदस्वरूपता, स्वसंवेद्यता आणि अविनाशित्वाची अर्थात कैवल्यतेची जाणीव होणे ही सर्वोच्च शाश्वत ज्ञानमय अवस्था होय. ही अवस्था प्राप्त होणे म्हणजे परमात्मस्वरूपाचा उत्सव अनुभवणे होय. सच्चिदानंद अवस्था भोगणे होय.

चराचर सृष्टीतील मानव हे पंचतत्त्वांचे वैशिष्ट्यपूर्ण व परिपूर्ण असे संघटन होय. मानवाला ठायीच्या अविनाशित्वाचे, सच्चिदानंदस्वरूपाची आणि स्वसंवेद्यतेची जाणीव देहाठायीही झाली. हेच मानवाच्या देहाचे माहात्म्य आणि अन्य जीवांपेक्षा वेगळेपण होय. अन्य जीवांना मानवांप्रमाणे परिपूर्ण अनुभूती येत नाही. काही प्रमाणातच ती जाणीव होते. याचाही अनुभव मानवाने घेतला. अपरिहार्य अशा प्रकारचे कर्मधर्मभोग, देहावस्थेला भोगावे लागतात. त्यात क्षणिक समाधान, आनंद, तृप्तता अनुभवता येते. शाश्वत, परिपूर्ण अशी निखळ आनंदमयता भोगण्यासाठी जीवावस्थेठायी उत्सुकता, आतुरता, ओढ, आसुसलेपण निर्माण होते. या सच्चिदानंद, अविनाशी अशा अवस्थेच्या ओढीतून मानवाने ब्रह्मविद्या किंवा योगशास्त्र निर्माण केले आहे. गुरुपरंपरेने ते आत्मसात करीत मानवाने जीवनविषयक सुखदुःखाची चर्चा करीत, शाश्वत सुखाची अनुभूती स्वतःला आणि सर्वांना मिळावी अशी कांक्षा केली. यातूनच साधना व समाधी अवस्था, सिद्धतेची प्रक्रिया सुरू झाली.

**जीवाच्या ठायीच्या अर्थात मानवी देहाठायीच्या आद्य, अविनाशी, निर्गुण, निराकार, निर्विकार, महाशून्य, केवल, स्वसंवेद्य, सच्चिदानंदरूप अशा परमात्मरूपाची, ठायीच्या अंशात्मक आत्मरूपाला, अद्वैतरूपाची अर्थात आपण तेच परमात्मरूप आहोत याची, जाणीव होऊन; क्षणभंगुर व संघटनात्मक तसेच विघटनात्मक पंचभौतिक महातत्त्वांच्या देहरूपांची आसक्ती नाहीशी होणे, तसेच चराचरातील वस्तुमात्र व भूतमात्र यांच्या ठायीही तेच परमात्मस्वरूप आहे, याची जाणीव होऊन; भूतमात्रांच्या ठायीच्या आत्मरूपाविषयी प्रेमभाव अर्थात आत्मभाव निर्माण होऊन; समत्व दृष्टीने सच्चिदानंदस्वरूपाने विदेहीभावाने असणे तथा वर्तन घडणे म्हणजे समाधी होय.** समाधी ही एक अवस्था आहे. या अवस्थेतील योगी **दोन प्रकारे** सच्चिदानंदस्वरूपाने चौदा चौकड्यांच्या अंती घडणाऱ्या महाप्रलयापर्यंत, सच्चिदानंदमग्नतेने, परमात्मस्वरूपाने, जाणिवेसह, सृष्टीरूपांशी प्रेमपूर्णतेने व्यवहार करू शकतो. असा समाधीमग्न योगी, ऋषी, मुनी, सिद्ध, स्वामी, संत इ.

(१) आहे त्या देहाचा उपयोग सर्वकल्याणात्मक जीवनव्यवस्थेसाठी करू शकतो. व्यवहारतः अशी विभूति समाजजीवनात, सारणीनुसार कर्तव्यतत्पर असते. मात्र निरहंकार, निरपेक्षता, निर्वेद आणि सर्वांभूती प्रेमपूर्णता त्या विभूतीच्या वर्तनातून सतत प्रकट होत असते किंवा पाझरत असते.

(२) समाधीमग्न अवस्थेतील विभूती अविनाशीपणे लोककल्याणाकरिता अविरत रत राहण्यासाठी, लोकांना समाधी अवस्थेपर्यंत अर्थात ज्ञानमय अवस्थेपर्यंत पोचवून, शाश्वत सुखानुभूती प्राप्त करून देण्यासाठी प्रबोधित करीत, अविनाशीपणे कार्य करीत असते. अर्थातच यासाठी ही विभूती देहाच्या मर्यादा ओळखून विदेही होते किंवा देहविसर्जनाचा निर्णय घेते. आपला देह पंचत्वात विलीन करण्यासाठी कलेवर सांडते. मात्र **अविनाशी, सच्चिदानंदरूप स्वसंवेद्य असे ठायीचे आत्मतत्त्व पुनर्संघटन विघटनासाठी पंचमहाभूतांमधील, स्वभावानुरुप तत्त्वांत स्थित करते.** तेथून जीव आणि जगत् कल्याणासाठी, पंचतात्त्विक संघटन प्रक्रियेतील कोणत्याही जड वा चेतन रूपात प्रकट होऊन; प्रत्यक्ष लोकजीवनात कार्य करू शकते. ही विभूती जीवन जगत असतानाचे कलेवर किंवा देहरूप, पंचतत्त्वातून पुन्हा संघटित करूनही साक्षात्कारित होऊ शकते.

देह विसर्जनसमयी ती ठायीचे आत्मतत्त्व, परमात्मतत्त्वाशी अद्वैतस्वरूपात अर्थात समाधीस्वरूपात व स्वाभाविक अशा तत्त्वात म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश यांत स्थित करते. ज्या तत्त्वात विभूती आपले सच्चिदानंदमग्न आत्मतत्त्व स्थित करते, त्या तत्त्वात त्या विभूतीने समाधी स्वीकारली असे अनुभूत होते. यामुळे पंचतत्त्वानुसार समाधीचे प्रकार ठरतात. अर्थात् ही समाधीअवस्था संजीवन समाधीची असते. बहुतांशी विभूतिमत्त्वे जनलोकांच्या ठायी सामान्यपणे **वायुसमाधी** स्वीकारतात. **प्रकाश किंवा तेज समाधी, जल किंवा आप समाधी, भू किंवा पृथ्वी समाधी, आकाश समाधी** असे या समाधीस्थितीचे प्रकारात्मक वर्णन करता येते.

समाधी अवस्थात्म सिद्ध झालेल्या विभूती या सामान्य जीवाप्रमाणे मृत झाल्या असे म्हणता येत नाही. मृत्यू आणि समाधी या अवस्थांत असा भेद आहे.

सामान्य जीवाच्या मृत्यूत्तोर त्याचे कलेवर अग्नी, पृथ्वी किंवा पाणी यामध्ये विघटनासाठी विसर्जित करतात. येथे स्पष्टपणे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की समाधी स्थिती स्वीकारलेल्या विभूतिमत्त्वाचेही पंचत्वात विघटन होण्यासाठी विसर्जन करावयाचे असते. मात्र हे विसर्जन त्या विभूतीच्या इच्छेनुसार किंवा



मार्गदर्शनानुसार पृथ्वीमध्ये समाधी नावाचे बांधकाम किंवा वृंदावन नावाचे बांधकाम करून करावयाचे असते किंवा विभूतीच्या इच्छेनुसार सामान्य माणसाप्रमाणे दहन, दफन किंवा जलविसर्जन आदि प्रकारे करावयाचे असते.

जागोजागी विभूतिमत्त्वांच्या समाध्या बांधलेल्या दिसतात. त्यात दोन प्रकार असतात- (१) त्या विभूतीचे स्मरण म्हणून समाधीस्वरूपातील बांधकाम करून तेथे पादुका मांडून पवित्र स्मरणस्थळ निर्माण केले जाते. एकाच विभूतीच्या असंख्य ठिकाणी समाधीस्थळी असल्याचे यामुळेच सांगता येते. ती भक्तिस्थळे किंवा स्मरणस्थळे असतात. (२) विभूतीने अमूक ठिकाणी देह ठेवून समाधी बांधण्यास सांगितले असेल त्या स्थळी समाधीस्थळ केले जाते. ते स्थळ समाधी सिद्ध करतांनाचे, देह विसर्जनाचे स्थान असते.

विशेषतः ऋषी, मुनी, साधू, सिद्ध, चिरंजीव अशा विभूतिमत्त्वाच्या या दुसऱ्या प्रकारातील समाधी असणे अपवादात्मकच असते.

समाधीमग्न विभूतिमत्त्वे आणखी एकप्रकारे आपला देह ठेवतात. या प्रकारात देहाचे पार्थिवतः स्तंभन केलेले असते. असे प्रकार सहसा सामान्य लोकांना कुठे पाहावयास मिळत नाहीत.

समाधी साधना करतांना देहासह अंतर्धान पावणे किंवा देहासह स्वर्गारोहण करणे अशा अनुभूती काही विभूतींकडून घडतात. त्यांच्या संदर्भात स्वतंत्रपणे योगशास्त्रीय घटना त्या विभूतींनी घडविलेल्या असतात.

समाधी संदर्भातील उदाहरणे येथे दिलेली नाहीत. ग्रंथाच्या अन्य भागात ही उदाहरणे आपसुकच आली आहेत. ब्रह्मदेव माया किंवा ब्रह्मा, विष्णू-वैष्णवी, शिव-पार्वती किंवा शिवा यांच्यापासूनची ही समाधी अवस्था प्रक्रियेची परंपरा सांगता येते.

**(ब) सिद्धी :-**

सिद्धी ही योगसाधना करतांना स्वाभाविकपणे प्राप्त होणारी अवस्था तथा शक्ती आहे. या अवस्थेत आपणास अंतर्ज्ञान प्राप्त होते. दुसऱ्याच्या मनातले विचार योगी जाणू लागतो. साधनेच्या बळावर दुसऱ्याला सूचना देऊन हवी असलेली कोणतीही गोष्ट मिळवू शकतो किंवा नष्ट करू शकतो. सिद्धींचा दुरुपयोग होण्याची शक्यता असल्याने, सिद्धीपासून दूर राहावे असे सद्‌गुरु सांगतात. सिद्धीमुळे चमत्कार वाटतील अशा गोष्टी घडविता येतात. यातच भोगी, अहंकारवश होऊन गुंतून पडतो आणि मार्गभ्रष्ट होतो. आत्मज्ञान प्राप्तीच्या मार्गात सिद्धी हा मोठा अडथळा असतो, तो या कारणानेच होय. श्रीमद्‌भागवत पुराणात श्रीकृष्णार्जुन

संवादात आणि श्रीकृष्ण-उद्धव संवादात सिद्धींची चर्चा केली आहे. भगवान विष्णूंच्या तथा श्रीविष्णूअवतार श्रीगणेशांच्या ठायी रिद्धी आणि सिद्धी शक्ती नित्य दासीरूपात वास करतात. सिद्धींविषयी भगवंतांनी अर्जुनाला स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, अर्जुनाने सिद्धी प्राप्त केल्या तर त्याला भगवंतांची प्राप्ती होणार नाही.

श्रीकृष्ण-उद्धव संवादात श्रीकृष्णांनी उद्धवांना सिद्धीप्राप्तीची प्रक्रिया सांगितली आहे. साधकाने इंद्रिये, प्राण आणि मन यांनी आत्मसंयमित केले किंवा योगसाधनेने एकाग्रवश केले आणि परमात्म चिंतनात लक्ष केंद्रित करण्याची साधना सुरू ठेवली की त्याच्यासमोर, अनेक सिद्धी सेवेकरिता प्रकट होतात. उद्धवांनी कोणत्या धारणेने कोणती सिद्धी प्राप्त होते आणि सिद्धींचे प्रकार किती असे विचारले. त्यावर श्रीकृष्णांनी उद्धवांना सिद्धींचे निरुपण केले. धारणेने सिद्ध झालेल्या योग्यांनी अठरा सिद्धींचे वर्णन केले आहे. त्यातील आठ सिद्धी प्रधान असून इतर दहा सिद्धी सात्त्विक गुणानेही प्राप्त होतात. त्या न्यून तथा लघु सिद्धी असतात.

या सिद्धींमध्ये शरीराकाराच्या संदर्भात 'अणिमा', 'महिमा' आणि 'लघिमा' अशा सिद्धी होत. श्री हनुमंतांनी सत्कार्यासाठी या सिद्धींचा उपयोग केला होता. इंद्रियांच्यासाठी 'प्राप्ती' अशीही एक सिद्धी आहे. लौकिक आणि पारलौकिक पदार्थांचा अनुभव घेण्यासाठी 'प्राकाम्या' या सिद्धीचा वापर केला जातो. मायेच्या किंवा मायावी कार्यासाठी इच्छेनुसार कार्य करून घेण्यासाठी 'ईशिता' या सिद्धीचा उपयोग होतो. प्रपंचात किंवा विषयात असूनही त्या मूळ आसक्त न होण्यासाठी 'वशिता' सिद्धीचा वापर केला जातो तर जे जे सुख घ्यावेसे वाटते (ईहजीवनात) त्या सुखाची वांच्छा करून त्याची प्राप्ती करून घेण्यासाठी 'कामावसायिता' सिद्धीचा वापर केला जातो. अशा या (i) अणिमा (अणुप्रमाणे सूक्ष्म) (ii) महिमा (विश्वव्यापीपर्यंत वाढणे) (iii) लघिमा (किडा, मुंगी वा त्यापेक्षाही लघुरूप) (iv) प्राप्ती (इंद्रियांना शक्ती एकवटून सहाय्य करणारी) (v) प्राकाम्या (लौकिक, पारलौकिक इच्छा पुरविणारी) (vi) ईशिता (मायावी किंवा मायेनुसार कार्य) (vii) वशिता (स्वाधीन ठेवणे) (viii) कामावसायिता (इच्छा-वासनापूर्ती करणे) अशा प्रमुख आठ सिद्धी आहेत.

याव्यतिरिक्त (i) तहानभूक इ. शारीरिक वेग निरोध (ii) दूरची वस्तु, दृश्ये पाहाणे किंवा दूरचे बोलणे किंवा आवाज इ. ऐकणे (iii) मनोवेगाने शरीराचा प्रवास करविणे (iv) इच्छेनुसार कोणतेही रूप घेणे (v) पर काया प्रवेश करणे



(vi) इच्छेनुसार शरीराचा त्याग करून सूक्ष्मरूपाने असणे (vii) देव-अप्सरा यांच्या क्रीडांचे दर्शन घेणे (viii) संकल्प करून ती गोष्ट करणे (ix) सर्वत्र सर्वांना आज्ञापालनास भाग पाडणे (x) सगुणरूप देवदर्शन घडविणे व त्यांकडून इच्छापूर्तीची कांक्षा मांडून पूर्तता करवून घेणे. अशा दहा लघुसिद्धी सत्त्वगुणांच्या विकासाने लोककल्याण व संकटमोचनार्थ तथा सत्कार्यासाठी योग्याला प्राप्त होतात.

आणखी काही सिद्धी अशा- (i) भूत, भविष्य, वर्तमान यांची माहिति जाणून घेणे (कोणाही संदर्भात) (ii) शीत-उष्ण, सुख-दुःख, राग-द्वेष अशा द्वंद्वापासून मुक्तता किंवा अलिप्तता तथा तटस्थता (iii) दुसऱ्याचे मन जाणणे (iv) अग्नी, सूर्य, जल, विष यांच्या शक्ती स्तंभित करणे. (v) सर्वत्र विजयी होणे. अशा पाच सिद्धी योग्यांना सर्वकल्याणार्थ प्राप्त होतात. याशिवायही अनेक सिद्धी सांगता येतात. उदा. वाचासिद्धी - संकल्पसिद्धीमध्ये अंतर्भूत असते. अशी सिद्धींची यादी, सूक्ष्म प्रकारात्मकतेने वाढत जाते.

पंचमहाभूतांच्या सूक्ष्मतम मात्रांचे संघटन म्हणजे देह किंवा शरीर होय. हेच ईश्वराचे शरीर होय (अहं ब्रह्मः अस्मि). जे साधक माझ्या अशा शरीराची उपासना अनन्यपणाने करतात त्याला 'अणिमा' सिद्धी प्राप्त होते. ज्यामुळे शीळेत किंवा कड्यामध्येसुद्धा योग्याला प्रवेश करता येतो. माउली ज्ञानेश्वरांनी पार्थिव भिंत चैतन्ययुक्त करून चालविली ती या सिद्धीचा उपयोग करून चांगदेवांचा अहंकार नाहिसा करण्यासाठी.

जो योगी महत्‌तत्त्वाकार असा माझ्या स्वरूपाची शारीरोपासना करतो त्याला 'महिमा' सिद्धी प्राप्त होते. एवढेच नव्हे तर पंचमहाभूते हे शरीर आहे असे मानून उपासना किंवा साधना करतो त्याला परमात्मरूप अथवा पंचतत्त्वरूपविश्व एवढे विशाल होता येते. विश्वरूप दर्शनासाठी योगश्वर श्रीकृष्ण, समुद्रप्राशनासाठी महर्षी अगस्त्य किंवा श्रीराम कार्य करतांना राक्षसांशी संघर्ष करण्यासाठी श्री हनुमानांनी या सिद्धीचा उपयोग केला.

जो योगी पंचमहाभूतात्म शरीररूपात उपासना करतो, त्यास अणिमा, महिमा व लघिमा या सिद्धी प्राप्त होतात. त्याला परमाणूप्रमाणे सूक्ष्म किंवा लघु होता येते. श्री हनुमंतांनी या सिद्धीचा वापर श्रीलंकेत प्रवेश करण्यासाठी केला होता.

सात्त्विक अहंकारयुक्ततेने जो शरीरोपासना करतो आणि समस्त इंद्रियांचा अधिष्ठाता होतो त्याला 'प्राप्ती' सिद्धी प्राप्त होते. श्री हनुमंतांनी संजीवनी आणण्यासाठी या सिद्धीचा वापर केला होता.

जो योगी आपल्या शारीर योगाने महत्‌तत्त्वस्वरूपात अव्यक्त जन्मा अर्थात, सूत्रात्मा किंवा कारणात्मा म्हणून स्थिरचित्त होतो त्याला 'प्राकाम्या' नावाची सिद्धी प्राप्त होते. त्याला इच्छेनुसार सर्व भोग प्राप्त होतात. ब्रह्मा, विष्णू, महेश, आदिमाया, आदिलक्ष्मी, आदिशक्ती, सर्व महर्षी, सर्व नाथ, सर्व संतपदाला पोचलेल्या त्या विभूति या सिद्धीने समृद्ध असतात.

जो योगी त्रिगुणात्मक मायेचे स्वामी कालस्वरूप विश्वरूपाची धारणा ठायीच करतो तो शरीरे आणि जीवांना आपल्या इच्छेनुसार प्रेरित करू शकतो. यालाच 'ईशित्व' सिद्धी म्हणतात.

अशाप्रकारे ज्या प्रकारच्या धारणेने योगी शारीरतः परमात्मस्वरूपाची साधना करतो त्यास त्या-त्या धारणेनुसार सिद्धी प्राप्त होतात व कार्ये करता येतात.

सिद्धी प्राप्तीनेच आपण सर्वथा सिद्ध झालो आहोत असा अहंकार योग्याठायी निर्माण होऊन, तो जगत्‌संमोहनात अडकण्याची व षड्रिपूंच्या जाळ्यात गुंतून स्वतःला सिद्धपुरुष, परमेश्वर असे घोषित करीत, स्वतःचे देव्हारे माजवीत, जीवमात्रांच्या भक्ती तथा श्रद्धेचा स्वार्थासाठी दुरुपयोग करतो. त्याच्या योगी अवस्थेला ग्रहण लागले असे समजावे. अशा सिद्ध विभूति समाजाला भोंदविण्यात आणि समाजाचा स्वतःच्या भोगतृप्तीसाठी उपयोग करतात. आपल्या सहवासातील शिष्यसाधकांनाही त्याच मार्गी लावून सिद्धींचा बाजार मांडतात. त्यांना प्राप्त झालेल्या सिद्धींचा प्रभाव हळूहळू नाहिसा होऊन, ते योगच्यूत होऊन निष्प्रभ होतात. त्यांना जीवनमुक्त होता येत नाही. म्हणून सिद्धींच्या मोहात पडता कामा नये असा दंडक आहे. सद्‌गुरुंच्या सान्निध्यात अशा संमोहनापासून दूर होता येते.

जो योगी प्राण, मन व शरीर यांवर विजय मिळवून संयमी झाला आहे, परमेश्वराच्या सच्चिदानंद स्वरूपाची धारणा करूनच साधना करतो आहे, त्याला सर्व सिद्धी प्राप्त असतातच. असा योगी सच्चिदानंद स्वरूपाचेच कार्य म्हणून आतील प्रेमाने, करुणेने, निर्लेपपणाने सर्वांच्या कल्याणासाठी श्री गणेश आणि श्री हनुमान यांच्याप्रमाणे संकटमोचक म्हणून करुणापूर्णतेने प्रसंगी ज्ञानप्रस्तुतीकरणासाठी सिद्धींचा वापर करतो. ईश्वर, देव, संत, ऋषी, मुनी हे अशाप्रकारे सिद्धींचा उपयोग, चराचराची दुरिते नाहिशी करण्यासाठी करतात. तथापि ते सिद्धीवश होत नाही. त्याच्या ठायी भगवान विष्णूंप्रमाणे सर्व सिद्धी दास्यत्वाने कार्यरत होतात. असा योगी स्थितप्रज्ञतेने योगसाधना करीत, ज्ञानात्मक कर्तव्यतत्परतेने चिरंतनाचा प्रवास करीत राहतो. तो योगी परमात्मतत्त्वाशी अद्वैत अवस्था अर्थात समाधीमग्न अवस्थेत अमृततत्त्वाने असतो.



मंत्राने, तंत्राने, योगसाधनेने सर्व सिद्धी प्राप्त होतातच. स्थितप्रज्ञ विभूति कोणत्याही मार्गाने साधना करतांना सिद्धींना मार्गातील अडथळा न होऊ देता प्रवास करतो.

रिद्धी ही सिद्धीच आहे. जीव आणि जगतातील, दुःख, दैन्य, दारिद्र्य, रोग, व्याधी इ. त्रितापांवर विजय मिळवून समृद्धी प्राप्त करून देण्यासाठी सिद्धींचा वापर ईश्वरी अवतार, ऋषी, मुनी, तपस्वी, सिद्ध, साधू करतात. श्री गणेशांच्या ठायी ही सिद्धी असते. श्री हनुमंतांच्या ठायीही ही सिद्धी ओतप्रोत असून, ह्या दोन्ही देवता संकटमोचक म्हणूनच ओळखल्या जातात.

**१३. शिव-पार्वती संवादातून ब्रह्मविद्या तथा योगशास्त्राचा योगिक जीवनशैली प्रबोधित करणारा - योगी आणि सांसारिक तथा कुटुंबवत्सल यांसाठीचा सुलभ ग्रंथ 'शिवस्वरोदय'** : योग या प्राचीन मार्गाचे समुपदेशन प्रत्यक्ष भगवंतांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेत केले आहे. भगवान पतंजलींनी तर सूत्ररूपाने सुस्पष्ट असे योगदर्शन अर्थात योगविज्ञान सर्वांसाठी प्रसिद्ध केले. त्याशिवाय योगशास्त्राचे पुन्हा पुन्हा मार्गदर्शन करणाऱ्या महामानवांची परंपरा भारतात खूप मोठी आहे. असे असूनही ३९३ श्लोक शिव-पार्वती संवादातून प्रकटलेले योगशास्त्र, योगसाधकांना आणि योगजीवनशैली स्वीकारून प्रपंच करणाऱ्या सांसारिकांना अतिशय स्पष्ट, सूत्ररूप, समस्यांना नेमके उत्तर देऊन, मार्गदर्शन करणारे 'योगदर्शन' 'शिवस्वरोदय' या ग्रंथनामाने प्रकटले आहे. ते अतिशय लोकप्रिय झाले आहे.

फार पूर्वी एकदा श्री महादेवींनी श्री महादेवांना सर्वसिद्धी प्राप्त करून देणारे ज्ञान आपल्याला सांगावे अशी प्रार्थना केली.

*देव्युवाच । देवदेव महादेव कृपां कृत्वा ममोपरि ।।*
*सर्वसिद्धिकरं ज्ञानं कथयस्व मम प्रभो ।।१।।*

असे म्हणून त्यांनी ब्रह्मांड प्रचलनाविषयीची जिज्ञासा प्रकट केली तेव्हा

*ईश्वर उवाच । तत्त्वाहम्हांडमुत्पन्नं तत्वेन परिवर्तते ।।*
*तत्त्वे विलीयते देवि तत्वा ब्रह्माण्डनिर्णयः ।।३।।*

हे ब्रह्मांड तत्त्वापासून उत्पन्न झाले आहे. तत्त्वानेच चालले आहे त्याचा लय तत्त्वातच होतो. हाच ब्रह्मांडाचा निर्णय होय, असे स्पष्ट केले.

तत्त्वाचे स्वरूप प्रकाशित करून सांगण्याची विनंती श्री देवींनी केली तेव्हां महेश्वरांनी तत्त्वस्वरूप विषद केले - मायारहित, आकाररहित, अद्वितीय, प्रकाशमान अशा महेश्वरांपासून अर्थात परमेश्वरापासून तथा परमात्म्यापासून आकाश - वायू - तेज - जल - पृथ्वी पंचतत्त्वे निर्माण झाली. त्यांचेही विस्तृत असे पाच

भेद आहेत. या पंचतत्त्वांपासून सर्व विश्व निर्माण झाले. विश्वाचे पोषण, प्रजनन यांपासूनच होते. देहा ठायी हीच पंचतत्त्वे आहेत.

त्यानंतर महादेवांनी स्वरशास्त्र सांगावयास सुरुवात केली. शरीरामध्ये स्वर उदय पावतो. त्यातून–

*हकारो निर्गमे प्रोक्तः सकारेण प्रवेशनम् ।।*
*हकारः शिवरुपेण सकारः शक्तिरुच्यते ।।५०।।*

'हं' व 'सं' या उच्चाररूपाच्या ज्ञानाने त्रिकाल ज्ञान प्राप्त होते. हे सर्वश्रेष्ठ ज्ञान होय. स्वर ज्ञान हे सूक्ष्माहून सूक्ष्म, अनुभूत होणारे, नास्तिकांना विस्मित करणारे परंतु श्रद्धावंतांना आधारभूत असते. हे ज्ञान दुराचारी आणि नास्तिक यांना शिकवू नये. हे ज्ञान मुळात देहाच्या ठायीच असते. सर्व ज्ञान व शास्त्रे स्वराच्या ठायीच असतात. शरीरातील नाडीभेद (दशनाडी व ७२००० उपनाड्या) आणि त्यातील दश वायुंचा संचार यांचे ज्ञान झाले की योगी मोक्षाचा अधिकारी होतो. सारे काही स्वरातूनच निर्माण झाले आहे. स्वरज्ञानाने अनिष्टांचा नाश आणि इष्टांची प्राप्ती होते.

नामरुपांदिक (प्रत्येक पदार्थ) सर्व भ्रामक असून, त्यातच अज्ञानवश लोक गुरफटतात. म्हणूनच स्वरोदय शास्त्र (ब्रह्मविद्या/योगशास्त्र) सर्वश्रेष्ठ शास्त्र होय. शुद्ध स्वरज्ञान प्राप्त झाले की अशुभ योगांचा परिणाम होत नाही. यासाठी शरीराचे ज्ञान आवश्यक असते.

नाभीस्थळी असणाऱ्या कंदातून निघालेल्या अंकुरातून बहात्तर हजार नाड्या निघून शरीरात पसरलेल्या आहेत. यांत कुंडलिनी नामक शक्ती मज्जारज्जूनामक सूत्रामध्ये असते. त्यांतून दशनाड्या उर्ध्व व दशनाड्या अधो जातात. प्रत्येक बाजूला दोन–दोन नाड्या आडव्या आहेत. अशा एकूण १०+१०+२+२=२४ नाड्या आहेत. त्यातील दहा वायूवाहक नाड्या मुख्य आहेत. या नाड्या चक्राप्रमाणे वर व खाली आणि आडव्या पसरल्या असून, या सर्वांना प्राणाचा (शक्ती + चैतन्य + वायू) आश्रय आहे. दहातील तीन अत्युत्तम नाड्या (i) इडा (ii) पिंगळा (iii) सुषुम्ना नावाने ओळखल्या जातात. याशिवाय (iv) गांधारी (v) हस्तिजिव्हा (vi) पुषा (vii) यशस्विनी (viii) अलंबुजा (ix) कुहू (x) शंखिनी अशा सात नाड्या होत. मुख्य तीन नाड्यांतील इडा डाव्या बाजूस, पिंगळा दक्षिण/उजव्या बाजूस व सुषुम्ना मध्यभागी असते. गांधारी डाव्या डोळ्यात तर हस्तिजिव्हा उजव्या डोळ्यात, पुषा उजव्या कानात व यशस्विनी डाव्या कानात असून, अलंबुजा मुखामध्ये असते. कुहू लिंगामध्ये तर शंखिनी मूळ गुदस्थानी



असते. या सर्व कुंडलिनी शक्तियुक्त नाड्या होत. त्या शक्ती + चैतन्य + वायू युक्त असतात.

इतर दश नाड्या या वायूवाहक आहेत. त्यातून प्राण, अपान, समान, उदान, व्यान असे पाच व नाग, कूर्म, कृकल, देवदत्त, धनंजय असे पाच असे एकूण दश वायू आहेत. (i) त्यातील प्राण वायू नित्य हृदयात (ii) अपान गुदात (iii) समान बेंबीमध्ये (iv) उदान कंठात (v) व्यान सर्व देहामध्ये असतो. (vi) नाग ढेकर उत्पन्न करतो (vii) कूर्म डोळे झाकतो (viii) कृकल शिंक आणतो (ix) देवदत्त जांभाई आणतो (x) धनंजय सर्वव्यापी असतो.

देहातील प्राण संचार इडा, पिंगळा आणि सुषुम्ना नाड्यातून घडतो. इडा–चंद्र, पिंगळा–सूर्य आणि सुषुम्ना 'हं' 'सं' अर्थात शिवस्वरूप होय. स्वर तथा श्वास सकारात्मक असला तर सुखात्मक फलदायी होतो.

एकाग्रचित्ताने, समाधानाने चंद्रसूर्याच्या मार्गाने सर्व काही जाणता येते. स्थिर जीवानेच तत्त्वविचार केल्यासच लाभ तथा जय प्राप्त होतो. चंद्रसूर्याच्या अभ्यासाने म्हणजे प्राणायामाने तो त्रिकालज्ञ होतो. वाम नाडी इडा अमृतरूपाने जगाचे पोषण करते; तर उजवी पिंगळा चंचल अंशाने जग उत्पन्न करते. सुषुम्ना (तिसरा नेत्र) प्रलयंकारी असल्याने कर्मास योग्य नव्हे. बाहेर पडतांना वाम व प्रवेश करतांना दक्षिण योग्य असते. चंद्र हा सम तर सूर्य हा विषम मानून तसेच चंद्र ही स्त्री तर सूर्य हा पुरुष वर्ण होय. चंद्रनाडी प्रवाहित असता सौम्य कृत्ये करावीत. सूर्य नाडी प्रवाहित असतांना क्रूर कर्मे करावीत आणि सुषुम्ना वाहत असतांना पारलौकिक भोग आणि मोक्ष प्राप्त करून देणारी कर्मे करावीत.

नाडी कार्यकाल पुढीलप्रमाणे असतो. (i) चंद्रनाडी – शुक्ल प्रतिपदा ते तृतीया (ii) सूर्य नाडी चतुर्थी ते षष्ठी या क्रमाने आलटून–पालटून पुढील दिवशी कार्यकाल असतो. यात कृष्ण पक्षात (i) प्रतिपदा ते तृतीया सूर्य (ii) चंद्र चतुर्थी ते षष्ठी असे आलटून–पालटून असते. यातही प्रत्येक दिवशी अडीच घटिकांच्या क्रमाने आलटून–पालटून कार्यकाल असतो. क्रमाप्रमाणे कर्मे करावीत. शुक्ल पक्षात डावा व कृष्ण पक्षात उजवा स्वर संचारतो. चंद्राचे रात्री व सूर्याचे दिवसा निवारण करावे. या सर्व नियमात्मक क्रिया जाणून कर्मे करणाराच योगी पदाला पोहचतो. त्याला त्रैलोक्य क्षणात वश होते. चंद्रमार्गाने उदय होऊन सूर्यमार्गाने अस्त होईल तर तो योग बहुगुणसंपन्न असतो. उलट मार्ग वर्ज्य करावा. गुरू, शुक्र, बुध व सोम या वारी विशेषे करून कृष्णपक्षामध्ये उजवी नाडी सर्व चंचल कार्याची सिद्धी करणारी असते. कृष्णपक्षामध्ये विशेषकरून रवि, मंगळ व शनि या

वारी उजवी नाडी चंचल कृत्यास उत्तम होय. दिवसाच्या अडीच घटिकांचा प्रवास पाहता प्रथम वायू, दुसरी अग्नी, तिसरी पृथ्वी, चौथी उदक, पाचवी आकाश असा क्रम असतो. ही पांच तत्त्वे क्रमाने वाहतात. अहोरात्र चंद्रसूर्याची बारा संक्रमणे होतात. यानुसार ज्योतिषशास्त्रांचे ज्ञान महादेवांनी प्रस्तृत केले आहे व त्यानुसार नाडीसंचाराचा उपयोग करावा असे सांगून विधिनिषेधांचे ज्ञान प्रसारित केले आहे. त्यानंतर योगसिद्धीविषयी भाष्य आहे-

*इडायां सिद्धिदं प्रोक्तं योगाभ्यासादि कर्मच ।।*
*तत्रापि वर्जयेद्वायुं तेज आकाशमेव च ।।१११।।*
*सर्व कार्याणि सिद्‌ध्यंति दिवा रात्रिगतान्यपि ।।*
*सर्वेषु शुभकार्येषु चंद्रकारः प्रशस्यते ।।११२।।*

अर्थात योगाभ्यासादिक कृत्ये ही इडा नाडीवर घडली असता सिद्धीकारक होतात. तरीसुद्धा या नाडीमध्ये वायू, तेज व आकाश यांचे मिश्रण असतां तो वर्ज्य होय. रात्री करावयाची कार्ये दिवसासुद्धा होतात. त्यासाठी चंद्रस्वर प्रशस्त होय. असे नमूद करून पुढे अनिष्ट कार्ये व इष्ट कार्ये यांविषयी विधिनिषेध कथन केले आहेत. विविध सुष्ट वा दुष्ट अपेक्षित कार्ये कशी सिद्ध करता येतील, त्यात प्राप्त सिद्धींचा वापर कसा करावा याविषयी मार्गदर्शन केले आहे. स्वर ज्ञानावरील निरुपण झाल्यानंतर महादेवींनी - स्वरज्ञान रहस्य कथन करण्याची विनंती केली. ब्रह्मदेव म्हणाले-

*ईश्वर उवाच ।। स्वरज्ञान रहस्यात्तु न काचिच्चेष्टदेवता ।।*
*स्वरज्ञानरतो योगी स योगी परमो गतः ।।१३९।।*
*पंचतत्वाभ्दवेत्सृष्टिस्तत्वे तत्वं प्रलीयते ।।*
*पंचतत्त्वं परं तत्वं तत्त्वातीतं निरंजनम् ।।१४०।।*

योग्यांनी सिद्धी प्राप्त करून तत्त्वे जाणावी याविषयी विस्ताराने विवेचन केले आहे. जीवमात्रांतील एकात्मता स्पष्ट करतांना एकात्मतेचे सूत्र सांगितले आहे-

*सर्वलोकस्थजीवानां न देहो भिन्नतत्वकः ।।*
*भूलोकात्सत्यपर्यंत नाडी भेदः पृथक्पृथक ।।१४३।।*
*वामो वा दक्षिणे वाऽपि उदयाः पंच कीर्तिताः ।।*
*अष्टधा तत्त्व विज्ञानं शृणु वक्ष्यामि सुंदरि ।।१४४।।*

आठ तत्त्वांचे ज्ञान स्पष्ट करून न्यासांचे महत्त्व विषद केले आहे. तत्त्वभेद जाणण्याची एक पद्धत म्हणजे, आरशावर श्वास सोडून त्यावर दिसणाऱ्या आकृतीवरून ज्ञात्यांनी तत्त्वांचे भेद जाणावे. त्यानंतर गात्रांच्या ठिकाणी पंचतत्त्वे



विशेषत्वाने कोणत्या स्थानी वास करतात हे स्पष्ट केले. वायू आणि शारीर नाड्या यांचे भेद व बलस्थाने सांगितली आहेत. सर्वत्र गमन करणारे ते आकाशतत्त्व होय व तेच तत्त्व मोक्ष प्राप्त करून देणारे असते हे स्पष्ट केले आहे. जीवनव्यवहारावर ही तत्त्वे कोणता परिणाम कोणत्या प्रकारे करतात हेही स्पष्ट केले आहे. पंचतत्त्वातील प्रत्येक तत्त्वाचे वैद्यकशास्त्रीय गुणांचे वर्णन केले आहे. निरनिराळ्या नक्षत्रांचा या तत्त्वव्यवहारांशी कोणता संबंध असतो याची सूक्ष्म व स्पष्ट चर्चा केली आहे. स्वरज्ञानी पुरुषाची अद्वितीयता स्पष्ट करतांना-

*स्वरज्ञानी नरो यत्र धनं नास्तिः ततः परम् ।।*
*गम्यते स्वरज्ञानेन अनायासं फलं भवेतं ।।२१३।।*

अशी प्रौढी सांगितली आहे. त्यावर महादेवींनी महाज्ञान असे हे स्वरोद्य ज्ञान त्रिकालज्ञ होण्याला कसे साधन होते; हे स्पष्ट करण्यास सांगितले. तसेच संसारास सर्व कर्मांची सिद्धी करून देण्यासाठी मनुष्यमात्राला परम मैत्रभावाने कोण सहाय्यभूत होते; याविषयी सांगण्यास सांगितले. त्यावर महादेवांनी प्राणतत्त्वाची महती विषद केली-

*प्राण एव परं मित्रं प्राण एव परः सखा ।।*
*प्राणतुल्यो परो बंधुर्नास्ति नास्ति वरानने ।।२१८।।*

त्यानंतर वायूस्वरूपाचे शास्त्र महादेवांनी सांगितले आहे-

*गमने तु च्चतुर्विशन्नेत्रवेदास्तु धावने ।।*
*मैथुने पंचषष्टिश्च शयने च शतांगुलं ।।२२१।।*
*प्राणस्य तु गतिर्देवि स्वभावाद्द्वादशांगुलम् ।।*
*भोजने वचने चैव गतिरिष्टादशांगुलम् ।।२२२।।*

प्राणप्रमाण अंगुलांनी प्रमाणित केले आहे. चालतांना २४, धावतांना ४२, मैथुनकाली ६५, निद्राकाळी १०० अंगुले असे प्रमाण सांगून सामान्यतः व भोजनसमयी १२ व १८ अंगुले असते असे स्पष्ट केले आहे. या प्रमाणात एक अंगुली कमी केल्यासही भोगी निरिच्छ होतो. चार अंगुले कमी केली तर वक्तृत्व बहरते, तीन कमी केल्यास कवित्व येते, पाच कमी - दूरदृष्टी, सहा कमी - आकाश संचार, सात कमी- शीघ्र वेग हे सांगून सिद्धी आणि निधी केव्हा प्राप्त होतात हे सांगितले आहे-

*अष्टमे सिध्द्यश्चैव नवमे निधयो नव ।।*
*दशमे दशमूर्तिश्च छाया नैकादशे भवेत ।।२२५।।*
*द्वादशे हंसचारश्च गंगामृतरसं पिवेत ।।*
*आ नखाग्राप्राणपूर्णे कस्य भक्ष्यं च भोजनम् ।।२२६।।*

अंगुलीप्रमाण - आठ कमी - अष्टसिद्धी, नऊ कमी - नवनिधी, दहा कमी - दशमूर्तित्व व अकरा कमी - छाया पडत नाही म्हणजे देवत्व येते. बारा कमी - ब्रह्मस्वरूप होतो. हे शास्त्र योग्यांकरिता स्पष्ट करून सांगितले आहे. यानंतर या संबंधातील विधिनिषेध स्पष्ट केले आहेत. तसेच इतर गुणधर्म व त्यांचे परिणाम विशद केले आहेत. त्या प्राणांपरिमाणांचा नाडीप्रवाहांशी असलेला संबंध विषद करून प्रश्नोत्तरे, भाकिते इ. ज्ञान यातून कसे प्रकट होते हेही सांगितले आहे. विशिष्ट गात्रावर ध्वनी केल्यास परिणाम काय होतो हेही स्पष्ट केले आहे. उदा.-

*अंगुष्ठतर्जनीवंशे पादांगुष्ठे तथा ध्वनिः ।।*
*युद्धकाले च कर्तव्यो लक्षयोद्धा जयी भवेत् ।।२४३।।*

अर्थात् अंगठा, तर्जनी, वंशू व पायांचा अंगठा या ठिकाणी ध्वनी करावा, म्हणजे तो पुरुष लक्षावधी लोकांवर जय मिळवितो. याप्रमाणे अभ्यासाने सोहं व हंस यांचे ज्ञान झाले असतां जीवाला सर्वकाळ जयप्राप्ती होते. या अभ्यासाने प्राश्निकाचे प्रश्नही कसे सोडविता येतात हे विशद केले आहे. पूर्णांग व शून्यांग यांचा निर्णय व सर्वजयप्राप्तीची सूत्रे सांगितली आहेत-

*निश्चलां धारणां कृत्वां पुष्पं हस्तन्निपात्येत ।।*
*पूर्णांगे पुष्पपतनं शून्यं वा तत्परंभवेत ।।२६५।।*
*तिष्ठन्नुपविशन्यो वै प्राणमाकर्षयन्निजम् ।।*
*मनोभंगम कुर्वाणः सर्व कार्येषु जीवती ।।२६६।।*

निश्चल अंतःकरण करून हातांतून फूल हळूच खाली टाकावे. जिकडे फूल पडेल ते पूर्णांग व दुसरे शून्यांग असे जाणावें, असे सांगून उभे किंवा बसलेले असतां जो पुरुष आपले प्राण आकर्षण करून मनाचा उत्साह कमी होऊ देत नाही तो सर्व कार्यामध्ये जय पावतो. जीवनातील परस्पर संघर्षांवरील भाष्य ऐकल्यावर पार्वतींनी यमावर अर्थात काल किंवा मृत्यूवर कसा विजय मिळवावा, याविषयी भाष्य करण्यास सांगितले. त्याचे उत्तर देतांना महादेवांनी दिलेले उत्तर अद्वैत सिद्धी स्पष्ट करणारे आहे -

*ईश्वर उवाच ध्यायेद्देवं स्थिरो जीवं हुहुयाज्जीवसंगमे ।।*
*इष्टासिद्धिर्भवेत्तस्य महालाभो जयस्तथा ।।२७२।।*

जीवाचे जीवसंगमात हवन करावे अर्थात स्थिर अंतःकरणाने परमेश्वराचे ध्यान करून परमात्मस्वरूप व्हावे म्हणजे मृत्यूवर विजय मिळतो.

नंतरच्या २७५ ते २९८ श्लोकांमध्ये स्त्रीपुरुष संभोग व प्रजननशास्त्र तथा इष्टापत्यप्राप्ती प्रक्रिया योगशैलीने कशी साधता येते याचे सूत्रबद्ध ज्ञान प्रसृत केले



आहे. यासंदर्भातही गुरुचे महत्त्व विशद केले आहे.

उत्तरायण किंवा दक्षिणायण प्रारंभाला हा तत्त्वाभ्यास सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार ऋतुचक्रातील बदलांचा अभ्यास कसा करता येतो, तसेच त्यातील सूत्रे कोणती हेही सांगितले आहे. ऋतुचक्रातील बदलांचा शरीरावर कसा परिणाम होतो हे वैद्यकशास्त्र प्रमाणित पद्धतीने सांगितले आहे. त्यानुसार यमनियमांचे मार्गदर्शन केले आहे. त्यातील विधिनिषेध व इष्टानिष्ट परिणाम विषय अनुभूतिसंकेत स्पष्ट केले आहेत. मृत्यूसमयीचे, मृत्यूपूर्वीचे शारीर बदल स्पष्ट करून त्या अनुषंगाने मृत्यूनिर्णय कसा करता येतो त्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत.

यानंतर प्रत्यक्ष ईश्वरदर्शन आणि आनंदप्राप्ती कशी होते हे स्पष्ट केले आहे.

*एकांतं विजनं गत्वा कृत्वादित्यं च पृष्ठतः ।।*
*निरक्षयेन्निजच्छायां कंठदेशे समाहितः ।।३५१।।*
*ततश्चाकाशमीक्षेत ही परब्रह्मणे नमः ।।*
*अष्टोत्तशतं जस्वा तः पश्यति शंकरम् ।।३५२।।*
*शुद्धस्फटिकसंकाशं नानारूपधरं हरम् ।।*
*षण्मासाभ्यासयोगेन भुचराणां पतिर्भवेत् ।।*
*वर्षद्वयेन तेनाथ कर्ता हर्ता स्वयं प्रभुः ।।३५३।।*
*त्रिकालज्ञत्वंमाप्नोति परमानंदमेव च ।।*
*सतताभ्यासयोगेन नास्ति किंचित्सिदुर्लभम् ।।३५४।।*

अर्थात् माणसांची फारशी वर्दळ नाही तेथे एकटे जाऊन सूर्याकडे पाठ करून सावधान अंतःकरणाने आपल्या छायेचा कंठप्रदेश अवलोकन करावा. त्यानंतर ''हीं परब्रह्मणेनमः'' अशा अष्टोत्तर शतमंत्राचा जप करून आकाशाकडे पाहिले की शंकरांचे दर्शन होते. त्या शंकर स्वरूपाचा वर्ण शुद्ध स्फटिकाप्रमाणे स्वच्छ असून त्या रूपाला नाना प्रकारच्या आकृती धारण करता येतात. याप्रमाणे सहा महिन्यांच्या अभ्यासाने सर्व भूचरांना राजा होण्याचे भाग्य लाभते. दोन वर्ष साधना केली असता उत्पत्ति, स्थिती, लय करण्याचे सामर्थ्य येते. सतत अभ्यास केल्याने अत्यंत आनंदाची प्राप्ती होऊन त्रिकालज्ञता प्रकटते अशा योग्याला दुर्लभ असे कांहीच राहात नाही.

या साधनेतील निषेधात्मक गोष्टी तथा निसर्गातील रंग, रूप, रेखा यांचे मानवी शरीरांशी संबंध व त्यानुसार निषेधात्मक फळांचीही चर्चा केली आहे. मृत्यूविषयीचे संकेत स्वर आणि नाडी यांच्या संबंधातून कसे निश्चित होतात; व त्यामुळे मृत्यूविषयीचे ज्ञान कसे होते हे ३५५ ते ३६७ मध्ये स्पष्ट केलेले

आहे. वैद्यकशास्त्रात या संकेतांचा अंदाज वर्तविण्यासाठी उपयोग केलेला असतो. लोकवाङ्मयातही हे संकेत प्रचलित दिसतात.

मृत्यूला, काळाला किंवा यमाला कसे टाळता किंवा फसविता येते याचेही ज्ञान शिवस्वरोदयात आहे तेही परंपरेने लोकवाङ्मयात आढळते–

*तीर्थस्नानेन दानेन तपसा सुकृतेन च ।।*
*जपैर्ध्यानेन योगेन जायते कालवंचना ।।३६८।।*

अर्थात– तीर्थाचे स्नान, दान, तप, पुण्य, जप, ध्यान, योग यांच्या योगाने कालाला भ्रमित करता येते. योगाभ्यासाने चतुर्विध पुरुषार्थ यशस्वीपणे पूर्ण करून, धर्माचरणाने जीवन कसे परिपूर्ण करता येते याचे मार्गदर्शन पुढील ३७० ते ३७२ पर्यंत सांगून योगाभ्याससिद्धतेसाठीची तंत्रे व पद्धती पुढे निवेदन करून; मंत्र, तंत्र व योग या ब्रह्मविद्या तथा योगशास्त्र्याच्या निश्चित सिद्धीचे संकेत पुढील ३८३ ते ३९३ या दहा श्लोकात सांगितले आहेत ते श्लोक असे–

*विश्वस्य वेदिका शक्तिर्नेत्राभ्यां परिदृश्यते ।*
*तत्रस्थं तु मनो यस्य याममात्रं भवेहिह ।।३८३।।*
*तस्यायुर्वर्धते नित्यं घटिकात्रयमानतः ।।*
*शिवेनोक्तं पुरातंत्रे सिद्धस्य गुणगव्हरे ।।३८४।।*
*बद्धं पद्मासनस्थो गुदगतपवनं सन्निरुध्द्यामुमुच्चै ।*
*तस्यापानरंध्रे क्रमचितमनिलं प्राणशक्त्या निरुध्य ।*
*एकीभूतं सुषुम्नाविवरमुपगतं ब्रह्मरंध्रे च नीत्वा*
*निक्षि प्याकाशमार्गे शिवचरणरता यांति ते केऽपिधन्याः ।।३८५।।*
*एतज्जानाति यो योगी एतत्पठति नित्यशः ।।*
*सर्वदुःखविनिर्मुक्तो लभते वांछितं, फलम् ।।३८६।।*
*स्वरज्ञानं नरे यत्र लक्ष्मीः पदतले भवेत ।।*
*सर्वत्र च शरीरेऽपि सुख तस्य सदा भवेत ।।३८७।।*
*प्रणवः सर्ववेदानां द्विजानां भास्करो यथा ।।*
*मृत्युलोके तथा पूज्यः स्वरज्ञानी पुमानापे ।।३८८।।*
*नाडित्रयं विजानाति तत्त्वज्ञानं तयैव च ।।*
*नैव दान भवेत्तुल्यं लक्षकोटिरसायनम् ।।३८९।।*
*एकाक्षरप्रदातारं नाडीभेद विवेचकम् ।।*
*पृथिव्यां नास्ति तद्रव्यं येद्दत्वा चानृणो भवेत ।।३९०।।*
*स्वरतत्वं तथा युद्धं देवि वश्य त्रियस्तथा ।।*



*गर्भाधानं च रोगश्च कलादुर्धेनैवमुच्यते ।।३९१।।*
*एवं प्रवर्तितं लोके प्रसिद्धः सिद्धयोगिभिः ।।*
*चंद्रार्कग्रहणे जाप्यं पठतां सिद्धिदायकम् ।।३९२।।*
*सुस्थाने तु समासीनो निद्रां चाहारमल्पयेत ।।*
*चिंतयेत्परमात्मानं यो वेद सभवेत्कृती ।।३९३।।*
*इति श्री शिवपार्वती संवादे स्वरोदयशास्त्रं समासम् ।।*

**समारोप :–**

ब्रह्मविद्यायाम योगशास्त्रे याविषयीची चर्चा करणारे अनेक ग्रंथ व परंपरा सद्‌गुरुंकडून निर्माण झाल्या आहेत. ब्रह्मविद्या हे गूढ, जादू किंवा अनाकलनीय असे नाही. ते विज्ञान आहे. मानवाच्या मन, आत्मा आणि शरीर यांच्या स्पष्ट आकलनाने, मानवाचा पंचतत्त्वात्मक सृष्टीशी असलेला अन्योन्य संबंध, परमात्मतत्त्व आणि त्याचा स्वसंवेद्यतेने घडलेल्या सृष्टी विलासात्मक चक्रनेमी क्रम यांचे भौतिक ज्ञान यांच्या सर्व गोष्टी विचारात घेऊन माहिती करून घेऊन, योगशास्त्रप्रणित यमनियमादी अष्टांगयोगाचा किंवा तत्संबंधी सद्‌गुरुप्रणित परंपराप्राप्त योगशास्त्रात्मक प्रक्रियेचा अभ्यास केला तर, ‘सोऽहं’, ‘अहं ब्रह्मः अस्मि’ या अवस्थेचा मानव अनुभव घेऊ शकतो. सिद्ध अवस्थेत, परमात्मा आणि आत्मांश यांचा सृष्टीव्यापारातील व्यवहारात कोणतीही कृती, रूप अवस्था योगी सिद्ध करू शकतो. पंचत्वांचे संघटन किंवा समावेशन, विघटन तथा पृथक विशिष्ट रूपनिर्माण, विलय, प्रलय अशा कोणत्याही गोष्टी त्याला अशक्य नसतात. सामान्य अविद्येत गुरफटलेल्या किंवा योगशास्त्राचे ज्ञान नसलेल्या व्यक्तीला किंवा केवळ भौतिक ज्ञानावर विसंबलेल्या व्यक्तीला सिद्ध योग्यांनी घडविलेल्या घटना, प्रसंग, कृती, अवस्था या चमत्कार वाटल्या तरी योगशास्त्राच्या ज्ञानाने त्या चमत्कार नाहीत हे लक्षात येईल.

* * *

# रामराष्ट्रस्वरूपता आणि सद्गुरु शक्तिपात – समाधी सिद्धता

महर्षी अगस्त्य आणि महर्षी वसिष्ठ या ऋषीद्वयांनी मानवी जीवनाला रामराष्ट्रस्वरूप जीवनमुक्तता सिद्धीचे परिमाण दिले. समाधी साधना सिद्ध करण्याची सनातन अशी दोन ध्येये भारतीय सांस्कृतिक परंपरेमध्ये आणि भारतीय ब्रह्मविद्या तथा योगशास्त्रानुसार पुढे आलेली दिसतात. एक ध्येय अजन्मा होणे पूर्णतः स्वरूपसिद्ध होणे अर्थात निजरुपाशी अद्वैत होऊन निर्गुण, निराकार, निर्विकार अशा सच्चिदानंदपदी जाणे. दुसरे ध्येय म्हणजे समाधीसिद्ध झाल्यानंतर ज्ञानोत्तर भक्तिस्वरूपात स्थितप्रज्ञतेने जीवमात्रांचे कल्याण करण्यासाठी अर्थात सृष्टीच्या ठायी रामराज्य तथा रामराष्ट्र व्यवस्थापित करण्यासाठी समाधीमग्नतेने सतत समर्पित असे जीवनमुक्त जीवन अवलंबिणे. त्यासाठी प्रसंगोपात पुन्हा पुन्हा प्रकटणे. पुन्हा पुन्हा अवतार रूपात जन्म घेऊन; जनताजनार्दनाचे ज्ञानवान कर्मपरतेसाठी प्रबोधन करीत; जीवमात्र व वस्तुमात्रांचे कल्याण साधण्यासाठी, पंचमहाभूतात्मक सृष्टीचे सर्वांगीण तथा सर्व घटकांचे व्यवस्थापन करण्यासाठी कर्मशील होणे होय.

**१. समाधी सिद्धीची परंपरा राष्ट्रस्वरूप जीवनधारणेसाठी :–**

पुरुषकारणाने संपूर्ण प्रकृतीचे स्वधर्माधिष्ठित नियमित प्रचलन सुरू राहावे यासाठी, निजस्वरूप असे समाधीसिद्ध स्थितप्रज्ञ, सेवारत असतात. हेच ब्रह्मतत्त्व, विष्णूतत्त्व अर्थात शिवतत्त्वानुसार आगमशास्त्रीय शक्तिनियमन कार्य होय. ईश्वराचे अर्थात परब्रह्मस्वरूप ब्रह्मा, विष्णू, महेश यांचे अवतारित्व प्रसिद्ध होते, ते याच प्रकृतीच्या स्वधर्मानुसार विहित अशा ज्ञानात्मक कर्मपरतेसाठी. आगमशास्त्रांचा प्रपंच यासाठीच मांडलेला असतो. बहुतेक ऋषी, मुनी, सिद्ध, साधू, स्वामी, संत तथा राजधर्मी स्थितप्रज्ञ योगी यांनी याचसाठी समाधी साधनेचा अवलंब केला आहे. वास्तविक पाहाता, पूर्णता जीवनमुक्तदशा साधनेने सिद्ध होऊन निजपदाला पोचलेल्या अशा विभूति, निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी अशा स्वरूपात, परब्रह्मस्वरूपातच समावेशित असू शकतात. पुराणांचा दाखला द्यावयाचा तर ब्रह्मदेवांनी निर्माण केलेल्या ऋषीलोकांतील प्रारंभीचे असंख्य ऋषी प्रजापतींचे कार्य अवलंबिण्याऐवजी, उर्ध्वरेतवृत्तीने मोक्षपदालाच परतून गेले.

वैदिक ऋषींनी व तत्सम समस्त सिद्ध, ऋषी, मुनी, साधू, संत, योगी यांनी, सकल जीवमात्र तथा वस्तुमात्रांच्या कल्याणासाठी परब्रह्मयाच्या अपार करुणापूर्णतेचा, सेवामार्ग अवलंबून ब्रह्मकार्य करण्यासाठी, ज्ञानवान निष्काम कर्मपरतेचा मार्ग स्वीकारला. मनुष्यमात्राच्या ठायी 'अहं ब्रह्मः अस्मि'ची अनुभूति घडविण्याचा प्रयत्न करीत; कुटुंब, समाज, राष्ट्र व विश्वकल्याणासाठी पुरुषार्थ संपादण्याचा प्रबोध केला. या प्रबोधक कार्याचे अग्रणी म्हणून ऋषी अगस्ती आणि त्यांचे अनुज महर्षी वसिष्ठ या ऋषीद्वयींचे नाव घ्यावे लागते. मानवी जीवनाचे राष्ट्रस्वरूप परब्रह्मत्व रामस्वरूपात विषद करीत रामराष्ट्र अशी आध्यात्मिक जीवनशैली, ब्रह्मविद्या–योगशास्त्र यांच्या साधनामार्गाने दिली.

**२. संत समर्थ स्वामी रामदासांची जीवनदृष्टी :–**

मध्ययुग आणि वर्तमान युगात संत स्वामी समर्थ रामदास यांनी, महर्षी अगस्ती आणि महर्षी वसिष्ठांच्या संकल्पनेतील रामराष्ट्र जनजीवनात उभविण्याचा प्रयास केला. समग्र मानवी जीवनाला स्थितप्रज्ञ जीवनशैली स्वीकारून भारतीय वैश्विक राष्ट्रस्वरूपाकरिता ज्ञानवान कर्मयोगाचे प्रबोधन घडविले. योगवैज्ञानिक समत्व दृष्टीने, भारत हे वैश्विक रामराष्ट्र होऊ शकेल, असा बोध त्यांनी दासबोधातून केला. व्यष्टीपासून समष्टीपर्यंत सर्वांभूती एकच रामतत्त्व अर्थात आत्माराम आहे, हे लक्षात घेऊन; प्रकृतीच्या चक्रनेमिक्रमातील, व्यवस्थापनानुसार एकात्मिक कुटुंब, एकात्मिक समाज, एकात्मिक प्रदेश, एकात्मिक राष्ट्र, एकात्मिक बृहद् राष्ट्र आणि एकात्मिक वैश्विक राष्ट्र अशा स्वरूपात, रामतत्त्व संवेदित करीत सर्वांभूतीच्या समत्वाचे जागरण करून, रामराष्ट्र स्वरूपात विश्वकल्याण साधता येते; हे श्रीरामपासनेचा मार्ग प्रबोधित करून सांगितले.

**३. रामराष्ट्रोपासनेचा संदेश :–**

सज्जनगड येथील समर्थ सेवा मंडळाचे कार्याध्यक्ष, समर्थचरणरज आण्णाबुवा कालगांवकर यांनी, श्रीरामभक्त प्रा. के. वि. बेलसरे यांनी संपादित केलेल्या, 'सार्थ श्रीमद् दासबोध' या ग्रंथाच्या प्रस्तावनेतील श्री समर्थांचे थोडक्यात चरित्र मांडतांना केलेला उल्लेख महत्त्वाचा वाटतो. 'श्री समर्थांच्या वंशात एकवीस पिढ्या रामोपासना चालू होती. अशा परम पावन कुलांत रामनवमी दिवशींच,

जन्मकाळाच्या वेळी दुपारी बारा वाजतां श्री समर्थ अवतार, जांब गावी झाला. वयाच्या पांचव्या वर्षी मारुतरायांचा अनुग्रह झाला.' रामराष्ट्राचे आद्य पायिक श्री मारुतरायांचा अनुग्रह हा रामराष्ट्रोपासनेचा संदेशच म्हणावा लागेल! भगवान शिवावतार, अकरावे रुद्र, श्रीमद् हनुमानांनी रामोपासनेने रामस्वरूपता सिद्ध केली आणि भारतीय रामराष्ट्राच्या कार्यासाठी चिरंजीव झाले! त्यांचा अनुग्रह म्हणजे रामराष्ट्रोपासनेचा संदेशच होय!

पुढे कालगांवकर म्हणतात, 'दुसऱ्या कोणाही महापुरुषाने इतक्या लहान वयांत (चिंता करितो विश्वाची) अशी सर्वव्यापी चिंता केल्याचा इतिहासात दाखला सांपडत नाही. 'श्री समर्थांचे सर्वच चरित्र विलक्षण आणि उत्कट आहे. ते पुढे लिहितात, 'रामा तुजकारणे । जिवलगांचा संग सोडला ।।' अशी आर्त करुणा भाकून, आतां तुझ्याशिवाय कोणी नाहीं ह्या जाणिवेंत बारा वर्षे कृतयुग, त्रेतायुगांतील ऋषीमुनींना लाजवील असें उग्र अनुष्ठान केलें. रामप्रभूंनी दर्शन दिलें व श्री समर्थ कृतकृत्य झाले.' श्री समर्थ रामदासांनी भक्तियोग आणि ज्ञानयोग या दोन्ही प्रकाराने बारा वर्षे समाधी साधना केली. त्यांची समाधी सिद्ध झाली. माउलींचे कारुण्य त्यांच्या ठायी प्रकटले. ज्ञानोत्तर भक्ती करण्याचा निर्णय घेतला. कालगांवकर लिहितात, 'यात्रा संपवून श्री समर्थ कृष्णाकाठीं रामरायांचे आदेशानुसार आले. प्रभूंची प्रार्थना केली. प्रभूंकडून वर घेतला. 'राघवाचा वर पावलो सत्वर' असे म्हणून 'हेळामात्रे मुक्त करीन जना' अशी प्रतिज्ञा केली.' प्रत्यक्ष प्रभुरामचंद्रांनीच समर्थांना राष्ट्रकार्यार्थ अर्थात राष्ट्रोपासनेसाठी सिद्ध केले. समर्थ रामदासांनी राष्ट्रोपासनेला अर्थात रामराष्ट्रोपासनेला सुरुवात केली ती प्रत्यक्ष प्रभुरामचंद्रांच्या अर्थात रामतत्त्वाच्या अर्थात परब्रह्मस्वरूपाच्या म्हणजे आत्मारामाच्या संदेशानेच, हेही या घटनेतून सिद्ध होते.'

रामराष्ट्रोपासना हेच पारमार्थिकदृष्ट्या सोलीव सुख होय; हा संदेश ठायीच प्रकटला. संत समर्थ स्वामी रामदास यांना सद्गुरु प्रभुरामचंद्र अर्थात रामतत्त्व यांचेकडून अवघी समाधीसिद्धी अवस्था प्राप्त झाली. ही अवस्था सद्गुरुंकडून कोणत्या प्रकारे प्राप्त झाली हे समर्थ रामदासांनी 'पारमार्थिकदृष्ट्या सोलीव सुख' या स्फुटरचनेत मांडले आहे.

**४. सद्गुरुंकडून आध्यात्मिक सोलीव सुखाकरिता शक्तिपात :–**

श्रीमद् हनुमानांचा अनुग्रह झालेल्या समर्थ रामदासांचे परात्पर सद्गुरु प्रभुरामचंद्र होत. योगी स्थितप्रज्ञ जीवनमुक्त चिरंजीव श्री मारुतरायांनी स्वामींना स्वतःबरोबरच स्वरूपाने रामदास केले होते. रामोपासना दिली. अखंड रामोपासना



करणाऱ्या संत सद्गुरु स्वामी रामदासांनी, प्रभुरामचंद्रांकडून सोलीव सुखाची अनुभूति शक्तिपात प्रक्रियेने मिळविली. स्वामी समर्थ रामदास श्रीराम कार्यासाठी सिद्ध झाले. श्रीरामकार्य म्हणजेच सर्वकल्याणात्मक श्रीरामराष्ट्राचे प्रस्थापन होय.

सोलीव सुखप्राप्तीची प्रक्रिया मोठ्या नाट्यमयतेने घडते. श्री स्वामी समर्थ रामदासांनी 'पारमार्थिकदृष्ट्या सोलीव सुख' या मथळ्याखाली प्रत्यक्ष शक्तिपात प्रक्रियेतून समाधीसिद्धतेची परमावधी कशी घडते हे कथन केले आहे.

हे कथन करतांना माउलीच्या स्नेहाळ दृष्टीने, जीवदशा भोगणाऱ्या सर्वांना, या सोलीव सुखाची प्राप्ती व्हावी; अशी वैश्विक भूमिका रामदासांची दिसते. ते सद्गुरु प्रभुरामचंद्रांना करुणा भाकतात–

*जयजयाजी सद्गुरुराया । पूर्णब्रह्मा प्रतापसूर्या ।*
*तुज नमोनी आचार्या । करुणासिंधो ।।१।।*
*जे भवसमुद्री पोळले । विषयमदे अंध जाहले ।*
*चौऱ्यांशींत वाहू लागले । मार्ग सुचेना तयासी ।।२।।*
*ऐसे विश्व बहुत बुडाले । मी जीव म्हणोन धांवू लागले ।*
*मुळीचे स्मरण विसरले । मी कोण ऐसे ।।३।।*
*तयासि मुक्त करावया पूर्ण । तूं बा उतरलासि ज्ञानघन ।*
*रोगिया औषधी देऊन । भवमोचन करिशी ।।४।।*

प्रकृती विलासातील सृष्टीत जीवदशा भोगणारे जीव ठायीच्या आत्मरूपाला विसरतात. जीवात्म्यालाच, जीव अहंकाराने, जीव हाच मी अशा भावनेने, वासनादेहाच्या वासनांचे चोचले पुरविण्यात दंग होतात. त्यामुळे चिरंतन सोलीव सुख त्यांना अनुभवता येत नाही. देहभावाने स्वार्थांध होऊन, त्रिताप भोग भोगतांनाही, अहंकारवशतेने तात्कालिक सुखानुभूतींच्या शृंखलेत, दुःखसागरात, आशाळभूत, अशांत, महत्त्वाकांक्षी, अतृप्त अशी दशा भोगतात. या प्राकृतिक चक्रनेमीक्रमाच्या, क्षणभंगूर जाळ्याला खरे मानून, त्याच मायेत गुंततात. ठायीचे खरे शाश्वत आत्मारामतत्त्व विसरून जगतात. असा दुःखभोग जगणाऱ्या जीवांचे कर्म स्वार्थ आणि देहवासनांनी बाधित होतात. यशापयशाच्या भ्रामक कल्पनेत जीव सतत दुःखभोग भोगतात. अशा जीवांना आत्मारामाचा बोध व्हावा, म्हणजे ते निरपेक्ष ज्ञानवान स्वधर्म कर्म करण्यास सिद्ध होतील; या दुर्दम्य इच्छेने, स्वामी समर्थ रामदास सद्गुरुंकडे प्रार्थना करतात. ते म्हणतात–

*आपण आपणा ते पावे । ऐसे माझे मनी बोलावे ।*
*ते दातारे गोचर करावे । रोकडे ब्रह्म ।।६।।*

सद्गुरु स्वामींच्या सर्वात्मक कल्याणासाठी केलेल्या प्रार्थनेने प्रसन्न झाले आणि सद्गुरुंच्या ठायीच्या ज्ञानसागरास भरते आले. त्यांनी आपल्या सत्‌शिष्याला जवळ घेऊन शक्तिपात क्रिया घडविली –

*मग स्नेहाळ नवल केले । वोसंगाशी शिष्या घेतले ।*
*अर्धमात्रा रस काढिले । पूर्ण फुंकिले कर्णरंध्री ।।९।।*
*खडतर औषधी दिव्यरसायन । नयनी झोंबले जाउन ।*
*डोळियाचा डोळा फोडून । चित्‌सूर्य भेदिले ।।१०।।*

सद्गुरुंनी शिष्याला आपल्या जवळ घेऊन ॐस्वर अर्थात शब्दब्रह्मरूपी अर्धमात्रा ब्रह्मरस काढून शिष्याच्या कानात ते परावाणीयुक्त असे ॐकार मंत्र रसायन प्रेषित केले. त्या तीव्र औषधी रूपातील दिव्य रसायनाने अर्थात सद्गुरुंच्या योगसिद्धी अवस्थेतून पूर्णब्रह्मस्वरूप असे ज्ञान कानातून डोळ्यात पोहचले. त्यामुळे भ्रामक असा क्षणभंगूर प्राकृतिक विलासात मग्न असलेल्या डोळ्यांना ते ज्ञानांजन झोंबले. त्या अंजनाने, वरवर सृष्टी पाहणाऱ्या डोळ्यांतील, अज्ञानवश दृष्टी भेदून; अंतदृष्टीने पाहण्याची दिव्य दृष्टी उघडली! आत्मारामापर्यंत घेऊन जाण्याची क्षमता असणाऱ्या चित्ताच्या मायामग्नतेला भेदून, प्रत्यक्ष परब्रह्मरूपी ज्ञानसूर्य ठायीच प्रकाशित केला. सद्गुरुठायीचा ब्रह्मरस शिष्याठायी उतरल्याने

*पूर्ण अंश गगनी भेदिला । अर्क तो पिंडीमाजी उतरला ।*
*त्रिकुट श्रीहाट चुराडा केला । सेखी भरला गगनगर्भी ।।*

माया पटलरूपी गगनाचा भेद करून, तो ज्ञानअर्क अवघ्या देहात संचारित झाला. वासनादेहाच्या आधीन असलेला आत्माराम प्रकाशला आणि अवघा देह आत्मस्वरूप झाला. पिडा, पिंगळा, सुषुम्ना त्रिकुट पार करून, मस्तकातील श्रीहाटात, देहभावाने असलेल्या भ्रामकतेचा अर्थात अज्ञानाचा चुराडा केला. आत्मा परमात्मस्वरूप झाला. अवघे अस्तित्व ठायीच जाणवू लागले. ब्रह्मस्थिती प्राप्त झाली. सद्गुरुंच्या मंत्रकृपेने शिष्य समाधीसिद्धी भोगण्यास समर्थ झाला. विदेही अवस्था प्राप्त झाली. त्या विदेही अवस्थेतील देहभावाची अवस्था कशी झाली हे सांगतांना स्वामी म्हणतात–

*उग्र तेज लखलखाट । तेथे जाला चौदेहाचा आट ।*
*भ्रांती पडली बळकट । तेव्हां बाळ निचेष्टित पडे ।।१२।।*

स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण अशा चौदेह ठिकाणी लखलखाट झाला. देह ज्ञानमय झाला. देहपणच निमाले. म्हणूनच बाळ निचेष्टित पडला असे म्हटले आहे. ही शिष्याची अवस्था पाहून सद्गुरुंनी शिष्याला शक्तिपात केला.



*ऐसे पाहोनी सद्गुरुनाथ । पद्महस्त मस्तकी ठेवित ।।*
*वत्सा सावध त्वरित । निजरूप पाहा आपुले ।।१३।।*

उजवा हात मस्तकी ठेवून, विदेही अवस्थेत शिष्याला सावध करून, 'निजरूप' अर्थात ठायीच झालेले ब्रह्मरूप अर्थात सच्चिदानंदरूप अनुभवण्यास सांगितले.

स्वामी समर्थ रामदास, सद्गुरुकृपेने समाधीयोग सिद्धी कशी प्राप्त झाली ते सांगून एकप्रकारे सद्गुरु समाधीयोग सिद्धी सत्‌शिष्याकडून कशी करून घेतात, हे सद्गुरुंनी शिष्याकडून संवादात्मकतेने प्रात्यक्षिक कसे करून घेतले, ते सांगत आहेत. समर्थ म्हणतात–

*जागृत करोनि ते वेळी । अजपाची दोरी देऊनी जवळी ।*
*विहंगम डोल्हारी तयेवेळी । अलक्ष्य लक्षी बैसविले ।।१४।।*
*धैर्याचे आसन बळकट । आणि इंद्रिये ओढुनि सघट ।*
*धरे ऊर्ध्व पंथे वाट नीट । अढळपदी लक्ष लावी ।।१५।।*
*पुढे करूनिया जाणीव । मागे सारोनि नेणिव ।*
*जे जे जाणिव अभिनव । ते तूं नव्हेसि तत्त्वता ।।१६।।*
*तै मार्गाची करूं नव्हाळी । प्रथम घंटानादाची नव्हाळी ।*
*दुसरी किंकिणीची मोवाळी । तिसरी अनुहत कोल्हाळ ।।१७।।*
*आता अग्री लक्ष लावी । काय दिसेल ते न्याहाळी ।*
*चंद्रज्योति प्रकाशली । व्यूह बांधिला बळकट ।।१८।।*
*ते सुख अंतरी घेऊनि । पुढे चाल करी संगमी ।*
*तेथे विजु ऐसा कामिनी । चमकताती सुवर्णरंग ।।१९।।*
*तेहि जाणीव मागे सारी । पुढे सूर्यबिंब अवधारी ।*
*ज्वाळा निघती परोपरी । डंडळू नको कल्पांती ।।२०।।*
*वायोमुख करोनी तेथे । गिळी वेगे सूर्यकिरणाते ।*
*मग देखसी आनंदमार्तंडाने । तेजोमय ममपुत्रा ।।२१।।*
*अनंतभानु तेज अद्भूत । खदिरांगार ज्वाळा उसळत ।*
*धारिष्ठ तेथे न निभत । दुर्घट व्यूह तेथीचा ।।२२।।*
*तेथे हुशारीचे काम । अग्री लक्ष लावोनि नेम ।*
*तीरे लावोनि सुगम । मागे सारी सूर्याते ।।२३।।*
*पुढे दिसेल जे नवल । ते पाही हंसमेळ ।*
*चंद्रकिरण शीतल । पाहसी तू मम वत्सा ।।२४।।*
*तेव्हा मागील दाह शमेल । शीतळाई सर्वांगे होईल ।*

*चंद्राची प्रभा सुढाळ । फडफडीत चांदणे ।।२५।।*
*तेचि डोळियाचा डोळा पाही । देहातीत वर्म विदेही ।*
*चिन्मय सुखाची बवाई । भोगी आपुली की गा ।।२६।।*

अशाप्रकारे समाधीसाधनेची परमावधी म्हणजे चिन्मय सुख अनुभूती ठायीच घेणे होय. अशी समाधीसिद्ध झाल्यावर, ठायी कोणत्या प्रकारे अनुभूती येते हे खरेतर अनिर्वाच्य आहे, तरीदेखील सर्व साधकांना मार्ग नीट ज्ञात व्हावा आणि समाधीयोगाची साक्षात अनुभूती अनुभवता यावी यासाठी सद्‌गुरु प्रभुरामचंद्र त्याचेही वर्णन करतात. ते स्वामी रामदासांनी सर्वांसाठी उघड केले आहे-

*अनुभवाची शीग भरली । आग्रापरी उसळली ।*
*भूमंडळी प्रभा पडली । कर्पूर वर्ण नभ जाहले ।।२७।।*
*तया मध्यभागी सघन । अढळपद दैदिप्यमान ।*
*उर्वरित ब्रह्म जाण । ध्रुव बैसला अढळ ते ।।२८।।*
*ते तुझे स्वरूप नेटे वाटे । जेथे समस्त जाणणे आटे ।*
*ऐके जालासि थिटे । बळकटपणे बलाढ्य ।।२९।।*
*ऐसे सुख योगिया लाधले । तेव्हा देहाचे मरण गेले ।*
*सांगणे ऐकणे मुराले । एकत्वपणे एकचि ।।३०।।*
*शांति येवोनि माळ घाली । अलक्ष्यसेजे निजेली ।*
*हंसपदे ऐक्य जाली । सुख सुखाते निमग्न ।।३१।।*

हंसस्थितीला पोहोचलेल्या योग्याठायी जाणीव नेणीव, शब्दादीसाधने, वासनादेहिक व्यवहार आदि सारेच विरून जाते. ही ज्ञानमय तथा ब्रह्मावस्था प्राप्त झाली की योगी स्थितप्रज्ञ अवस्थेत देही असून विदेहीपणाने, सोलीव सुखाचा अनुभव ठायीच घेऊ लागतो. 'सुख, सुखात निमग्न' होते, अशी ही समाधीमग्न अवस्था असते. या सिद्ध-स्थितप्रज्ञ अर्थात जीवनमुक्त स्थितीचे वर्णन स्वामी, सद्‌गुरु मुखाने करतात-

*तेथील अनुभव घेऊनि । स्वानुभव पाहे कलटुनी ।*
*आला मार्ग ते क्षणी । दिसेनासा झाला ।।३२।।*

समाधीयोग मार्गप्रक्रियाही दिसेनासी होते. अशी ही परावस्था असते. त्याचेही योगशास्त्रीय वर्णन करतांना सद्‌गुरु सांगतात-

*त्रिकुट श्रीहाट गोल्हाट । बुडाले ते औटपीठ ।*
*इडा-पिंगळा-सुषुम्नातट । विराले ते स्वात्मसुखे ।।३३।।*
*स्थूल, सूक्ष्म, कारण । नेणो काय जाले महाकारण ।*



*इंद्रिये चुबकळी जाण । धाव मोडली तयांची ।।३४।।*
*पंचभूतांचे खवले । तयांचे ठावचि पुसले ।*
*अपरिमित आनंदले । निमग्न जाले सुखांत ।।३५।।*
*सखोल भूमी ऐसे जाले । सुख सुखासी घोटले ।*
*स्वये आत्मत्व प्रगटले । माझे देहि रोकडे ।।३६।।*
*मग सहज समाधी जिरवून । शिष्य उठला घाबरा होऊन ।*
*हे सद्‌गुरु देणे (वरदान) काय उत्तीर्ण म्यां व्हावे ।।३७।।*

स्वामी समर्थांनी सद्‌गुरुकृपेने शक्तिपातपूर्वक समाधीयोग कसा सिद्ध झाला/होतो याचे वर्णन करून राजयोग तथा समाधीयोगाची प्रक्रिया क्रमवार सुसूत्रतेने वर्णन करून सांगितली आहे. ही प्रक्रिया आपण साधकाला उपयुक्त व्हावी म्हणून, अनिर्वचनीय असूनही निवेदित करतो आहोत हे स्पष्ट केले आहे.

स्वामी समर्थांना सामूहिक समाधीमग्नता अभिप्रेत आहे. स्थितप्रज्ञ ज्ञानवान असा स्वयंसेवी समर्थ समूह निर्माण झाला तर एकात्मसंघमन तयार होऊन; रामराष्ट्र अवतरेल असा जणू राष्ट्रस्वरूप निर्मितीचा सिद्धांत रामदास मांडत आहेत. ते म्हणतात-

*अनिर्वाच्य बोल बोलिले । साधकाचे उपेगा आले ।*
*सिद्ध तरी डोलो लागले । बद्ध मुमुक्षु होताती ।।४८।।*
*यापरते आन नाही बोलणे । श्रीराम दाशरथीची आण ।*
*एकपत्नी तो सुजाण । आपुले पद दे दासा ।।४९।।*

असा समाधीयोग साधून साधक श्रीरामकृपेने रामस्वरूप होतील. असे रामस्वरूप साधकसिद्धांचा मेळावा भूमंडळी रामराष्ट्र उभवू शकेल आणि सर्वकल्याणात्मक व्यवस्था निर्माण होईल.

**५. रामराष्ट्रस्वरूपता हीच जीवनमुक्तता :-**

वैश्विक सर्वकल्याणात्मक राष्ट्रनिर्मिती करण्यासाठी केवळ प्रार्थना करून भागणार नाही. रामराष्ट्रस्वरूपतेसाठी समाधीसाधना करून; स्थितप्रज्ञ अवस्था अर्थात ज्ञानमय अवस्था ठायीच निर्माण करून, ज्ञानोत्तर भक्तीद्वारे, अविरत सर्वकल्याणात्मक सेवा व प्रबोध करीत बलोपासना घडली पाहिजे. कुटुंब, समाज, प्रदेश, राज्य, राष्ट्र, विश्व या प्रत्येक स्तरावर भक्कम अशा पुरुषार्थपूर्ण, कर्तव्यतत्पर, ज्ञानवान कर्मसाधकांची अर्थात स्थितप्रज्ञसिद्धांची फळी उभी करावी लागते. स्वामी समर्थ सद्‌गुरुस्वरूप तर झालेच होते. तशाच प्रकारचा शक्तिपात घडवून सिद्ध, स्थितप्रज्ञ असे ज्ञानोत्तर भक्ती करणाऱ्या समर्थयोग्यांचा संघ निर्माण करण्याचा

प्रयत्न करणे आवश्यक आहे हे लक्षात घेऊन 'श्रीमत् दासबोध' या ग्रंथाचे अवतरण आणि समर्थ तथा रामदासी संप्रदाय यांची मांडणी समर्थांनी मांडली.

समाधीसाधना सिद्ध झाली की स्थितप्रज्ञता येते. या अवस्थेला सिद्धावस्था असे म्हणतात. सिद्ध समाधीमग्नतेने कार्यरत होतो. निःस्पृहतेने सेवामग्न होतो. अशा सिद्ध, निःस्पृह, स्थितप्रज्ञ राष्ट्रसेवकाची, राष्ट्रस्वरूप अशी अवस्था, अर्थात राष्ट्र आणि राष्ट्रसेवक अद्वैत अवस्था, स्वामी सिद्धलक्षणांतून स्पष्ट करतात. ज्ञानवानकर्मपरतेतून अशा स्थितप्रज्ञ समाधीमग्नांची निःस्पृहता कशी प्रकट होते हे या लक्षणनिरुपणातून स्पष्ट होते.

दासबोधातील पाचव्या मंत्रांच्या दशकात, सिद्धलक्षण निरुपण केले आहे. सिद्धावस्थेला गेलेला साधक हा ज्ञानमय अवस्था भोगत असतो. त्याचे समाजजीवनातील वर्तन ज्ञानोत्तर भक्तिस्वरूपाचे असते. त्यामुळे समर्थ स्वामी रामदास म्हणतात, सिद्धसाधू हा निःसंदेह वृत्तीने वावरत असतो. त्याचे ज्ञान संशयातीत असते. संशय सर्वनाश करतो. ओवी क्र. १२ ते २४ पर्यंत संशयाने सारे व्यर्थ होते. यावरील व्याख्यान करून स्वामी म्हणतात–

*वेर्थ संशयाचा संत । वेर्थ संशयाचा पंडित ।*
*वेर्थ संशयाचा बहुश्रुत । निश्चयेंविण ॥२२॥*

याकरिता ज्ञानसाधनेत निःसंशयता असावी म्हणजे ज्ञानाविषयी, सत्यतेसंबंधाने, निश्चय अर्थात दृढता असावी. स्वामी म्हणतात–

*असो निश्चयेंविण जे वल्गना । ते अवघीच विटंबना ।*
*संशयें कांहीं समाधाना । उरी नाहीं ॥२६॥*
*म्हणोनि संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान ।*
*तेंचि सिद्धाचें लक्षण । निश्चयेंसी ॥२७॥*

परमात्मा श्रीराम अर्थात सच्चिदानंदस्वरूप हा एकच मुख्य देव होय हे विवेकाने निश्चित करावे. हा परमात्मा मी च्या ठिकाणीच आहे. अर्थात 'अहं ब्रह्मः अस्मि ।' आत्माराम हाच देव, असा निश्चय करून सिद्धाचे वर्तन घडते. प्रकृतीतील सृष्टीचक्रनेमिक्रम हा उत्पत्ति, स्थिती, लय असा असतो. मात्र त्यातील आत्माराम हा अविनाशी, अचल, नित्य असतो. तो ठायीच आत्माराम स्वरूपात असतो. याचा निश्चय साधूचे ठिकाणी असतो. हे लक्षात घेऊन सिद्धाचे वर्तन ओळखावे. सिद्धाची लक्षणे सांगतांना स्वामी पुढे म्हणतात– विदेहता, सच्चिदानंदस्वरूपता अर्थात निजरुपता अर्थात देही असूनही अर्थात सगुण असूनही निर्गुणच्या समत्वदृष्टीने अशा सिद्धाचे वर्तन सुरू असते–



*लक्षणें म्हणिजे केवळ गुण । वस्तु ठाईंची निर्गुण ।*
*तेचि सिद्धांचे लक्षण । वस्तुरूप ॥४४॥*

असे स्वामी स्पष्ट करतात.

मायोद्भवनाम ज्ञानदशक अशा आठव्या दशकात स्वामींनी पुन्हा सिद्धलक्षणांची चर्चा केली आहे. साठ ओव्यांमध्ये केलेल्या या चर्चेत पहिल्याच ओवीत स्वामी म्हणतात–

*॥ श्रीराम ॥ अंतरी गेलियां अमृत । बाह्य काया लखलखित ।*
*अंतरस्थिति बाणतां संत । लक्षणे कैसी ॥१॥*

परमेश्वरस्वरूपता प्राप्त झालेल्या सिद्ध साधू हा परमेश्वरस्वरूपाने सर्वांठायी समत्व दृष्टीनेच वावरत असतो. त्याचे अंतःकरण निर्दोष, निर्मम, निःस्वार्थ, निष्काम, निर्मल, सम आणि अत्यंत पवित्र असते. स्वामी म्हणतात–

*साधू आपणचि येक । तेथें कैंचा दुःखशोक ।*
*दुजेविण अविवेक । येणार नाहीं ॥४५॥*
*आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची ।*
*म्हणोन नैराशता साधूची वोळखण ॥४६॥*
*मृदपणें जैसें गगन । तैसें साधूचे लक्षण ।*
*याकारणे साधुवचन । कठीण नाही ॥४७॥*
*स्वरूपाचा संयोगी । स्वरूपचि जाला योगी ।*
*याकारणे वितरागी । निरंतर ॥४८॥*

स्वामी सिद्धलक्षणे सांगतांना समारोपात म्हणतात–

*निरंतर स्वरूपीं राहातां । स्वरूपचि होईजे तत्त्वतां ।*
*मग लक्षणें आंगी बाणतां । वेळ नाही ॥५७॥*
*स्वरूपीं राहिल्यां मती । अवगुण अवघेचि सांडती ।*
*परंतु यासी सत्संगती । निरुपण पाहिजे ॥५८॥*

असा सिद्धयोगी जगतात वागतांना सर्वांठायी आत्माराम अनुभवत, एकात्म, गुणात्मक, सर्व कल्याणात्म असे अखिल जगत व्हावे, अर्थात कुटुंब, समाज, ग्राम, प्रदेश, देश, राष्ट्र, विश्व या सर्वपदी राष्ट्रभावना जागृत करण्यासाठी ज्ञानवान कर्म करीत असतो.

ज्ञानवान सिद्धयोगी हे आपल्या प्रेमपूर्वक समर्पण वृत्तीने, अपार करुणेने कार्यरत होतात. हे योगी व्यक्ती, समाजसंस्था, राजसंस्था, राष्ट्र आणि विश्वव्यापक संस्कृतिसंवर्धनाचे कार्य करीत एकात्म मानवी समाज निर्माण करतात.

स्वधर्माचरण करतांना, पूर्णतः निःस्वार्थ वृत्तीने ते व्यक्तीपासून वैश्विक मानवापर्यंत सर्वकल्याणात्मकतेचा विचार करीत कर्म करतात. स्वामी समर्थ रामदासांनी अशा योग्यांची निःस्पृहता, भीमदशक या अकराव्या दशकांत १० व्या समासात 'निःस्पृह वर्तणूक' याविषयी वर्णनात्मकतेने निरुपित केली आहे. एकप्रकारे राष्ट्रनिर्मितीसाठी लोकसंग्रह करतांना राष्ट्रस्वरूप आत्मारामाशी समाधीमग्न होऊन, ज्ञानवान कर्म कसे करावे, याचा प्रबोधच समर्थांनी केला आहे. स्वामी म्हणतात–

*असा राष्ट्रयोगीकर्ता भोक्ता तत्त्वता । भूमंडळीं सर्व सत्ता ।*
*त्या वेगळा त्यास ज्ञाता । पाहेसा कवणु ।।३।।*

त्याचे निःस्पृह वर्तन–

*बहुती शोधून पाहिलें । बहुतांच्या मनास आलें ।*
*तरी मग जाणावें साधिलें । महत्कृत्य ।।१६।।*
*अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ।*
*काळ सार्थकचि करावा । जनासहित ।।१७।।*
*उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनास सिकवावे ।*
*उदंड समुदाये करावे । परि गुप्तरूपें ।।१८।।*
*अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग ।*
*लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ।।१९।।*
*लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ।*
*जाण जाणोन धरावे । जवळी दुरी ।।२१।।*
*अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नस्तां वेर्थ जातें ।*
*जाणोनि शोधावीं चित्तें । नाना प्रकारे ।।२२।।*
*महंते महंत करावे । युक्तिबुद्धीने भरावे ।*
*जाणते करून विखरावे । नाना देसी ।।२५।।*

आत्मदशक या पंधराव्या दशकात 'निःस्पृहव्याप' या समासात समर्थ निःस्पृहतेने लोकांत राष्ट्रस्वरूप उभे करण्याचा खटाटोप, समत्व दृष्टीने योगी, सिद्ध, महंत यांनी करावा असे सुचवितात. समाधीसिद्धी अवस्था ही आत्मोद्धाराबरोबरच लोकोद्धारासाठी सिद्ध करण्याचा, कृपाउपदेश सद्गुरु करतात. ऋषी, मुनी, सिद्ध, साधू, संत, महंत पदी सिद्ध झालेल्या विभूति प्रकृतिठायी सृष्ट झालेल्या जगत्चक्रांचे अर्थात त्यातील वस्तुमात्र, जीवमात्र, मानवमात्र यांचे कल्याण करण्यासाठी समर्पित असतात. त्यांचा जगत्प्रपंचव्याप सच्चिदानंद स्वरूपस्थितीने सुरू असतो. स्वामी सांगतात–

*लोकी लोक वाढविले । तेणें अमर्याद जालें ।*
*भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ।।२६।।*
*ठाइं ठाइं उदंड ताबे । मनुष्यमात्र तितुकें झोंबे ।*
*चहुंकडे उदंड लांबे । परमार्थबुद्धी ।।२७।।*

समर्थांचे सद्गुरु प्रभुरामचंद्र यांनी समर्थांना श्रीमद् हनुमानांप्रमाणे श्रीरामस्वरूप प्रकटविले. सद्गुरुंच्या शक्तिपात प्रक्रियेतून संतत्व सिद्ध झाले की परमात्म्याची अर्थात परब्रह्माची पुरुष–प्रकृति आविष्कार लीला आनंदस्वरूप होऊन अनुभवण्याची स्थितप्रज्ञता प्राप्त होते. मोक्ष, मुक्ती या अवस्था या सृष्टीलीलेत आनंदस्वरूपाने अनुभवण्याची पात्रता होत. मोक्ष, मुक्ती म्हणजे केवळ सच्चिदानंदस्वरूप होणे नव्हे तर सच्चिदानंद वृत्तीने सृष्टीलीलेचा कल्याणप्रद निर्वाह होईल अशा दृष्टीने सांभाळ करण्यासाठी विवेक आणि वैराग्यपूर्वक ज्ञानवान कर्मशील होणे होय.

रामतत्त्व म्हणजे सृष्टीलीलेतील सच्चिदानंदस्वरूपाचे जागरण होय. हे कार्य प्रभुरामचंद्रांनी रामराष्ट्र उभारून केले. श्रीमद्हनुमंतांनी महायोगीरूपाने संकटमोचक कार्यासाठी चिरंजीव पद स्वीकारले. स्वामी समर्थ रामदासांनी सद्गुरुंकडून लाभलेल्या शक्तिपात प्रक्रियेतून, आनंदवनभुवन उभविण्यासाठी समाधीयोग सिद्धीचे पाठ दासबोधातून, मानसशास्त्रीय अनुबंधासह योगशास्त्राधारे दिले. हे करतांनाच रामतत्त्व जागविणारा श्रीमंत योगी घडविण्याचे कार्य, छत्रपती शिवरायांच्या रूपाने केले. कलियुगाच्या ठायी 'आनंदवनभुवन' उभविणारे – निश्चयाचा महामेरू । सकल जनांसि आधारू । अखंड स्थितिचा निर्धारू श्रीमंत योगी ।। असे छत्रपती शिवराय प्रकटविले.

*पंड पापांड उडाले । शुद्ध अध्यात्म वाढले ।*
*रामकर्ता रामभोक्ता । आनंदभुवनी ।।*

असे रामराष्ट्रस्वरूप सद्गुरुकृपेने अवतरले.

* * *

# श्री गुरु गोरक्षनाथविरचित सिद्ध-सिद्धान्त-पद्धति-योग गौतमीचा आविष्कार

## (अद्वैत योगसाधनेतील कुंडलिनी शक्तीचे जागरण)

श्री गुरु गोरक्षनाथांनी 'सिद्ध-सिद्धान्त-पद्धति' हा ग्रंथ लिहून मध्ययुगात, भक्तिसंप्रदायाच्या महापुरातही योगमार्ग सर्वसमन्वय भूमिकेतून सर्वगत केला. शैव अद्वैताचा हा मार्ग संत ज्ञानेश्वरांनी अंगिकारून अधिक प्रशस्त केला. प्रापंचिकांच्या संसारप्रपंचातील कर्ममार्गासाठी योगसाधनेचे परिमाण दिले. 'ब्रह्मविद्यायाम योगशास्त्रे' असा उपदेश अर्जुनाला भगवान श्रीकृष्ण करीत होते. तो भगवद्‌गीता ग्रंथ योगविद्येचा, समाधीसाधनेचा ग्रंथ आहे यादृष्टीने 'भावार्थदीपिके'तून अर्थात 'ज्ञानेश्वरी'तून प्रवचनाद्वारे प्रबोध घडविला. त्यामुळे गीतेचा उद्‌गाता श्रीकृष्ण हाही प्रत्यक्ष 'चैतन्यशंभू' म्हणून प्रतीत झाला-

*मज चैतन्यशंभूचां माथां । जो निक्षेपु होता पार्था ।*
*तेया गौतमु जालासि आस्था । निधि तुं गा ॥*

(ज्ञा. १५.५४५)

श्री गुरु गोक्षनाथांच्या काळाविषयी मतभिन्नता आहे. 'श्रीगोरक्षनाथकृत-सिद्ध-सिद्धान्त-पद्धति' या ग्रंथाचे मराठीमध्ये संपादन करणारे लेखक-संपादक महादेव दामोदर भट आणि सखाराम रघुनाथ आधारकर यांच्या 'शिवगोरक्ष' या भूमिका तथा परिचयात्मक लेखनातील उल्लेखानुसार 'ज्ञानदेवांचे पणजे त्र्यंबकपंत यांना श्री गोरक्षनाथांचा अनुग्रह होता तर आजोबा गोविंदपंत व आजी नीराबाई यांना गहिनीनाथांचा अनुग्रह होता असे सांगितले जाते. या सर्व गोष्टींवरून असा अंदाज बांधता येतो की, इसवीसन १००० ते ११०० च्या सुमारास नाथपंथातील साधू उत्तरेतून दक्षिणेत येत असत.' यावरून या सुमारास श्री गोरक्षनाथांचा काळ मानता



येईल. गोरक्षनाथांच्या नावावर त्यांच्या संबंधात संस्कृत, हिंदी इ. भाषांत अनेक ग्रंथ आढळतात. यात श्री गोरक्षनाथांच्या उपदेशावर आधारित नाथतत्त्वज्ञानात्मक ग्रंथ 'गोरक्षमत' तसेच 'गोरक्षबानी' असे ग्रंथ होत. परंतु हे ग्रंथ श्री गोरक्षनाथांचे असल्याचे मानण्याविषयी मतभिन्नता आहे. ब्रिग्स, आउफ्रेच यांनी अभ्यासातून नऊ ग्रंथ गोरक्षनाथांचे असल्याचा निर्वाळा दिला आहे. यातील सर्वात महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे, नाथतत्त्वज्ञानाविषयीचा 'सिद्ध-सिद्धान्त-पद्धति हा ग्रंथ होय.

नाथ संप्रदायात पिंड-ब्रह्मांड विचार; शिवशक्ति हेच अंतिम प्रकाशरूप, स्वसंवेद्य, व्यक्ताव्यक्तविवर्जित आणि द्वैताद्वैतविलक्षण सत्य; कुंडलिनी योग, सोऽहं अजपा साधना अर्थात अजपागायत्री याविषयी गोरक्षनाथांच्या 'योगमार्तंड' ग्रंथातील विचार, हे तत्त्वज्ञान विषय महत्त्वाचे मानले जातात. 'सिद्ध-सिद्धान्त-पद्धति' हा ग्रंथ या सर्व विषयांसह सर्वसमन्वयक ग्रंथ मानला जातो.

'सिद्ध-सिद्धान्त-पद्धति' या ग्रंथातील प्रकरणांना उपदेश असे म्हटले आहे. ग्रंथात पिण्डोत्पत्ति, पिण्डविचार, पिण्डसंवित्ती, पिण्डाधार, पिण्डपदयोः समरसकरण, अवधूतयोगिलक्षण असे सहा उपदेश आहेत. यातील विषयांचा अनुक्रम स्थूल परिचय पाहायचा तर प्रथमोपदेशात अनाम्यापासून अर्थात ब्रह्मापासून गर्भपिंडापर्यंत उत्पत्तिक्रमाने कशी झाली त्याचे वर्णन आहे. पिंडविचार या दुसऱ्या उपदेशात नवचक्रे, सोळा आधार, तीन लक्ष्य पाच व्योम, अष्टांगयोग इ. माहिती आहे. पिंडसंवित्तीमध्ये पिंडातच ब्रह्मांड याविषयी विवेचन आहे. पिंडाधारमध्ये कुल, अकुल, कुंडलिनी, शिवशक्ति हे विषय मांडले आहेत. पिंडोपदयात समरसकरण सांगतांना नाथ संप्रदायाचे वेष, महात्म्य, गुरुकुलसंताने असे भाग वर्णिले आहेत. सहाव्या उपदेशात अवधूताची लक्षणे सांगितली आहेत. तसेच गुरुकृपेची महती कथन केली आहे. 'गुरुमय ज्ञेयं निरुत्थपदं' हे घोषित केले आहे.

पहिल्या उपदेशात चराचरात निजा - परा - अपरा - सूक्ष्मा - कुंडलिनी या पाच शक्ती कशा निर्माण झाल्या; अनाम्य (निजरुपातून) अनाद्यपिंड - प्रकृतिपिंड - गर्भपिंड यांच्या उत्पत्ती कशा झाल्या, पंचमहाभूतांपासून प्रकृतिपिंड कसा झाला हे सांगून अंतःकरण पंचक, कुल पंचक, व्यक्तिशक्ती पंचक, करण पंचक अशा पंचीकरणाचा विचार सांगितला आहे. 'पिंडी ते ब्रह्मांडी व ब्रह्मांडी ते पिंडी' नाथ संप्रदायाचे आद्य तत्त्व प्रतिपादन केले आहे. चंद्राच्या सोळा कला, सूर्याच्या बारा कला आणि तेरावी निजकला स्वयंप्रकाशी कशी आहे याचे सांप्रदायिक अर्थ सांगितले आहेत. योगशास्त्रदृष्ट्या शरीरांतर्गत दहा नाड्या, दहा वायू इ. चर्चा करून; नरनारी रजोबिंदूसंयोगाने गर्भपिंडोत्पत्ती कशी होते ते प्रतिपादिले आहे.

दुसऱ्या उपदेशात 'पिंडविचार' स्पष्ट करतांना शरीरांतर्गत नऊ चक्रांचा विचार मांडला आहे. मूळ गोरक्षनाथांनीही षट्चक्रविचार केला आहेच, परंतु त्यात तालुचक्र, निर्याणचक्र व आज्ञाचक्र समाविष्ट केली आहेत. या नवचक्राकार देहात सोळा आधारांची चर्चा करून त्या ठिकाणी केलेल्या ध्यानाचे फलित सांगितले आहे. पुढे तीन लक्ष्यांची (ध्येयांची) माहिती आली आहे. यानुसार पतंजलींच्या 'स्थिरसुखमासनम्' ऐवजी 'स्व-स्वरूपे समसन्नता' अभिप्रेत आहे. म्हणजे स्वरूपाशी तल्लीन होणे हा वैष्णवमार्ग गोरक्षनाथांना अभिप्रेत आहे.

तिसऱ्या पिंडसंवित्ती उपदेशात पिंडतत्त्वात म्हणजे देहातच सर्व ब्रह्मांड - सप्तपाताल, सर्वलोक, अष्टमूर्ती, नवखंडे, सप्तसमुद्र, संपाद्विप, नद्या-उपनद्या, पर्वत व तेहतीस कोटी देव आहेत यांची स्थाने गोरक्षनाथ सांगतात. सुख म्हणजे स्वर्ग, दुःख म्हणजे नरक, कर्म तेच बंधन व निर्विकल्पता म्हणजे मुक्ती असे सूत्र गोरक्षनाथ सांगतात.

चवथ्या पिण्डाधार उपदेशात कुल - अकुल व कुंडलिनीविषयी नाथ संप्रदायाचे मूलभूत तत्त्वज्ञान सांगितले आहे. शिव (अकुल) व शक्ति (कुल) वस्तुतः एकच असून कार्यदशेमध्ये ती पराशक्ति म्हणून व अकार्यदशेमध्ये ती शिव म्हणून ओळखली जाते. यातूनच नाथ परंपरेत चिद्‌विलासवाद मांडला गेला. ज्ञानेश्वरांच्या 'अमृतानुभवात' त्याचे दर्शन घडते. शांकर तत्त्वज्ञान आणि नाथ तत्त्वज्ञानात एकवाक्यता किंवा साम्य आहे असे म्हणता येते. 'सौंदर्य लहरीतील' संपादक म. दा. भट आणि स. र. आधारकर यांनी शंकराचार्यांचा संदर्भासाठी दिलेला श्लोक असा-

*शिवः शक्त्यायक्तो यदि भवति शक्तः प्रभावितुं*
*न चे देवं देवो न खलु कुशलः स्पंदितुमपि ॥*

पाचव्या 'पिण्डपदयो, समरसकरणं' या उपदेशात सद्‌गुरु महिमा, सिद्धांचा वेष, पदपिंडाचे समरसीकरण इ. विषयांची चर्चा केली आहे. यातच गोरक्षनाथांची गुरुमहिमा मंडनाविषयीची घोषणा येते-

*न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं न गुरोरधिकं ।*
*शिवशासनतः शिवशासनतः शिवसाशनतः शिवशासनतः ॥*

सहाव्या 'अवधूतयोगिलक्षणं' या उपदेशात अवधूत योग्याची लक्षणे सांगितली आहेत. १) प्रकृतिविकारापासून निराळा २) मनाने स्ववश करतो ३) प्रत्याहारस्वरूप आनंदात चित्तलीन करतो ४) संसारवृत्तीहीन असतो ५) सर्वभेदांपासून दूर असतो ६) स्वपिंडाला अमर करण्यासाठी तो अमरीपान अर्थात मायेला गिळून टाकणे



साधतो. सोऽहं वृत्तीने, समदृष्टीने पाहतो ७) धैर्य हा त्याचा दंड, निजाशक्ती हाच योग पट्ट, द्वैताद्वैत हीच त्याची भिक्षा असते ८) आत्मा, परमात्मा व जीवात्मा यांची अभिन्नता दर्शविणारे नाथ तत्त्व हे 'आदेश' होय. सर्व कार्य या अद्वैताने घडते.

(या प्रकरणातील संपूर्ण चर्चेसाठी व ग्रंथपरिचयासाठी म. दा. भट व स. र. आधारकर यांनी संपादित केलेले, अ. र. नांदुरकर, प्रोफिशन्ट पब्लिशिंग हाऊस, ५३५, शनिवार पेठ, पुणे ४११०३० यांनी प्रकाशित केलेल्या 'श्री गुरु गोरक्षनाथविरचित सिद्ध-सिद्धान्त-पद्धति' पुनर्मुद्रण २०१० या ग्रंथाचा संदर्भग्रंथ म्हणून स्वैर वापर लेखक, संपादक, प्रकाशक यांच्या सौजन्याने केला आहे. कृतज्ञ)

चतुर्थोपदेश असा पिंडाधार उपदेश नाथ तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. यात कुंडलिनी शक्तीचे सूक्ष्म विवरण केले आहे. तोच पिंडाधार आहे असे स्पष्टपणे सांगितले आहे.

पहिल्याच श्लोकात आधारशक्ती म्हणून या शक्तीला घोषित केले आहे.

*अस्ति काचिदपरम्परा संवित्स्वरूपा सर्वपिण्डाधारत्वेन नित्यप्रबुद्धा*
*निजा शक्तिः प्रसिद्धा कार्यकारणकर्तुणामुत्थान-दशांकुरोन्मीलनेन*
*कर्तारं करोति अतएवाधारशक्तिरिति कथ्यते ।*
*अत्यंत निजप्रकाश - स्वसंवेदानुमवैक्यगम्यमान - शास्त्रलौकिक -*
*साक्षात्कार - साक्षिणी सा पराचिद्रपिणी शक्तिर्गीयते ।*
*सैव शक्तिर्यदा सहजेन स्वस्मिन्नुन्मीलिन्यां निरुत्थानदशायां वर्तते तदा*
*शिवः सैव भवति ॥१॥*

अर्थात- अपरंपरा (अनिर्वचनीय), संवित्सरूपा (ज्ञानस्वरूप) आणि सर्व पिंडब्रह्मांडाची आधारतत्त्व असलेली नित्यप्रबुद्ध अशी एकनिजाशक्ति प्रसिद्ध आहे.

जगत्‌रूप कार्यस्वरूप, पंचमहाभूते निर्माण कारणरूप आणि इच्छामात्र चैतन्यपूर्ण कर्तास्वरूप अशा उत्थानाने, गुणत्रयांतील पृथकत्वरूपी दशांकुररूपात उन्मीलनाने ही शक्ती सर्व प्राकट्याचे कर्तारूप असल्याने या निजा शक्तीला आधारभूत शक्ती असे म्हणतात.

निजप्रकाश, स्वयंवेद्य व अनुभवानें जाणली जाणारी शास्त्र आणि प्रपंचाचा साक्षात्कार घडविणारी अशा या निजा शक्तीला 'पराचिद्रुपिणी' असे म्हणतात. ही शक्ती जेव्हा सहजतेने उदित होऊन निरुत्थानावस्थेत असते तेव्हा ती शिव म्हणून प्रसिद्ध होते.

*अतएव कुलाकुलस्वरूपा सामरस्य - निज - भूमिका निगद्यते ।।२।।*
कुल-अकुल अर्थात शक्ति-शिवस्वरूपाच्या संबंधात सामरस्याची भूमिका महत्त्वाची ठरते.

*कुलमिति । परासत्ताहन्त - स्फुरन्ता - कला -*
*स्वरूपेण सेव पञ्चधा विश्वस्याधारत्वेन तिष्ठति ।।३।।*
कुल म्हणजे १) परा २) सत्ता ३) अहंता ४) स्फुरता व ५) कला होय. ही शक्ती विश्वाच्या आधाराने अशा पांच प्रकारे राहते.

*अतएव परापरा निराभासावभासकात्प्रकाशस्वरूपा या सा परा ।।४।।*
*अनादि-संसिद्धा परमाद्वैत - परमेकमेवास्तीति*
*या अङ्गीकारं करोति सा सत्ता ।।५।।*

यामुळेच परा व अपरा असे या शक्तीला म्हटले आहे. (परा-कुल स्वरूप व अपरा - कनिष्ठ) निराभासाची (जडवर्गाची) अवभासात्मक स्वरूपाची प्रकाशमयी शक्ती ती पराशक्ति होय. अनादि, साधनासिद्ध, परमअद्वैत अशा अखंड स्वरूपाचा जी अंगीकार करते ती सत्ता होय.

*अनादिनिधनोऽप्रमेय - स्वभावः किरणानन्दोऽस्म्यहमित्यहंसूचनशीला या सा पराऽहन्ता ।।६।।*
अर्थात अनादि निधन, चिद्रूप अप्रमेय स्वभाव, किरणानंद आणि अहंवृत्तिसूचकता हे कुलस्वरूपांतील पराशक्तीचे गुण आहेत.

*स्वानुभव - चिच्चमत्कार - निरुत्थानं दशां प्रस्फुटी करोति या सा स्फुरता ।।७।।*

स्वानुभवजन्य ज्ञानाच्या आनंदामध्ये व निरुत्थानदशेमध्ये प्रकट होणारी ती स्फुरता होय.

*नित्य-शुद्ध-बुद्ध-स्वरूपस्य स्वयं प्रकाशत्वमाकलयतीति या सा पराकलेति उच्चते ।।८।।*
अर्थात्, नित्यशुद्ध व ज्ञानघन अशा स्व-स्वरूपाच्या स्वयंप्रकाशाचें आकलन करणारी पराकला असे संबोधिली जाते.

या शक्तीचे आणखी वर्णन करतांना श्री गुरु गोरक्षनाथ पुढे म्हणतात-

*अकुलमिति । जातिवर्ण - गोत्राद्यखिल - निमित्तत्वेनैकमेवास्तीति*
*प्रसिद्धं । तथा चोक्तमुमामहेश्वरसंवादे :-*
*निरुत्तरेऽनन्यत्वादखण्ड त्वादद्वयत्वादनन्याश्रयत्वाद्*
*निर्धामत्वादनामत्वादकुलं स्यान्निरुत्तरमिति ।।९।।*



अर्थात, जाति-वर्ण, गोत्र वगैरे सर्व कारणानें एकच असणारे 'अकुल' प्रसिद्ध आहे. उमा-महेश्वर संवादात निरुत्तर नामक तंत्रशास्त्रांत म्हटलें आहे की, अनन्यत्व, अखंडत्व, अद्वयत्व, अनन्याश्रयत्व, निर्धामत्व असे अकुलाचे गुण आहेत. या गुणांनी युक्त असे-

*एवं कुलाकुल - सामरस्य - प्रकाश - भूमिका - स्फुटीकरणे एकैव*
*समर्था या सा ऽ परम्परा शक्तिरेवावशिष्यते ।*
*अपरम्परं निखिलविश्व-प्रपञ्चजालं परं तत्वं सम्पादयत्ये कीकरोत्य*
*परम्पराशक्तिराशावती प्रसिद्धा ।।१०।।*
अर्थात, कुल-अकुल सामरस्य प्रकाशाची भूमिका परस्फुटित करणारी एकमात्र अपरंपराशक्ती अवशिष्ट म्हणून राहते. अपरंपराशक्ती सर्व विश्वरूपी प्रपंचजालाच्या तत्त्वाचें संपादन करते. ही शक्ती आशावती म्हणून प्रसिद्ध आहे. आणि तीच इतर शक्तींची आधारभूत शक्ती आहे.

*उक्तं ललित - स्वच्छन्दे:*
*अकुलं कुलमाधत्ते चाकुलमिच्चति ।*
*जल-बुदबुदवद् - न्यायेदेकाकारः परा शिवः ।।११।।*

ललितस्वच्छंदतंत्रात म्हटले आहे :- अकुलापासून कुल उत्पन्न झाले. हे कुल परासत्तादि शक्तिरूपाच्या कार्यरूपाने विद्यमान असते. पाणी व बुडबुडा यांच्या संबंधाप्रमाणें शिव व कुल यांचा संबंध आहे.

*अतएवैकाकार एवानन्त - शक्तिमान निजानन्दतयावस्थितोऽपि*
*नानाकारत्वेन विलसन् स्वप्रतिष्ठां स्वयमेव भजतीति व्यवहारः ।*
*उक्तं प्रत्याभिज्ञायाम् :-*
*अलुप्त - शक्तिमान्नित्यं सर्वाकारतया स्फुरन् ।*
*पुनः स्वेनैव रूपेण एक एवामशिष्यते ।।१२।।*
अर्थात, जल आणि बुडबुडे यांत दाखविलेलें शिवाचें अस्तित्व याचा विचार करतां असे दिसते की, शिव एकाकार, अनंत शक्तिमान आणि आपल्याच निजानंदात सदैव निमग्न असूनसुद्धां आपल्याच निजशक्तीनें नाना आकार धारण करून विलास करतो. यात आपल्या अंतरिक अस्तित्वाला आपणच भजत असतो, असा शिवाचा व्यवहार आहे.

प्रत्यभिज्ञानामक तंत्रग्रंथात म्हटलेच आहे कीं, हा अलुप्त व शक्तिमान शिव सर्व आकार धारण करून स्फुरण पावतो व पुन्हा स्व-स्वरूपांतच एकटा असा उरतो.

*अतएव परमकारणं परमेश्वरः परात्पर- शिवः*
*स्वरूपतया सर्वतोमुखः सर्वाकारतया स्फुरितुं शक्नोतीत्यतः शक्तिमान्।*
*उक्तं वाकमेश्वरतन्त्रेः*
*शिवोऽपि शक्तिरहितः शक्तः कर्तुं न किञ्चन ।*
*स्वशक्त्या सहितः सोऽपि सर्वस्याभासको भवेत ।।१३।।*

अर्थात्, याप्रमाणे शिव परमकारण, परमेश्वर, परात्पर अशा शिवरूपांत सर्वतोमुख होऊन नाना आकार घेऊन स्फुरण पावतो. म्हणून तो शक्तिमान् आहे. वामके तंत्रात म्हटल्याप्रमाणे शिव शक्तिरहित असेल तर तो कांहीच करू शकत नाही. पण शक्तिसहित असेल तर तो सर्व आभास निर्माण करतो.

*अतएवानन्त - शक्तिमान् परमेश्वरः विश्वसंवित्स्वरूपी विश्वमयो भवतीति प्रसिद्धं सिद्धानां च परापर - स्वरूपा कुंडलिनी वर्तते ।*
*अतस्ते पिण्डसिद्धाः प्रसिद्धाः । सा कुण्डलिनी प्रबुद्धा ऽ प्रबुद्धा चेति द्विधा ।*
*अप्रबुद्धेति तत्तत्पिण्डे चेतन रूपा (स्वभावेन नानाचिन्ताव्यापारोद्याम प्रपंचरूपा)*
*कुटिल-स्वभावा कुन्डलिनी ख्याता । सैव योगिनां तत्ताद्विलसितविकाराणां निवारणोद्यम स्वरूपा कुण्डलिन्यूर्ध्वगामिनी सुप्रसिद्धा भवति ।।१४।।*

अर्थात्, अनंत शक्तिमान् शिव चित्तस्वरूपांत विश्वमय होतो. हा सिद्धांत प्रसिद्ध आहे. सिद्धांना पर-अपरस्वरूप कुंडलिनीचें ज्ञान व अनुभव असतो म्हणून ते पिंडसिद्ध म्हणून प्रसिद्ध आहेत.

ही कुंडलिनी प्रबुद्ध व अप्रबुद्ध अशी दोन प्रकारची म्हणून प्रसिद्ध आहे. अप्रबुद्ध कुंडलिनी सर्वदेहांत चेतरूप असून, स्वभावानें नाना चिंता, व्यापार, उद्यम आणि प्रपंच करणारी असते. ती कुटील स्वभावाची म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रबुद्ध कुंडलिनी योग्याच्या देहांतील नाना प्रकारच्या विषय व विकारांच्या वैराग्यामुळे निवारण करणारी असल्यामुळे ती उर्ध्वगामिनी म्हणून प्रसिद्ध आहे.

*ऊर्ध्वामिति सर्वतत्त्वान्यपि स्व-स्वरूपमेवेत्यूर्ध्वे वर्तते अतएव सा*
*विमर्शरुपिणी योगिनः स्व-स्वरूपमवगच्छन्तीति सुप्रसिद्धा ।।१५।।*

अर्थात्, उर्ध्व कुंडलिनीची व्याख्या पुढीलप्रमाणे- ही कुंडलिनी सर्व तत्त्वस्वरूप आहे. ती विमर्शरुपिणी म्हणजे सूक्ष्म विचारस्वरूप आहे. म्हणून योग्यांना स्व-स्वरूपाचें दर्शन घडविण्यास समर्थ आहे.



*तथा चोन्त्कमेवरूलके :- मध्यशक्ति - प्रबोधेन अधः शक्ति-निकुञ्चनात् ।*
*उर्ध्व-शक्ति-निपातेन प्राप्य ते परमं पदम ।।१६।।*

अवरूलक नावाच्या तंत्रात, मध्यशक्तीच्या प्रबोधनानें, अधःशक्तीच्या आकुंचनाने व ऊर्ध्वशक्तीच्या निपाताने परमपद प्राप्त होते. (१) मध्यशक्ती (२) अधःशक्ती (३) ऊर्ध्वशक्ती असे तीन प्रकार करता येतात.

*एकैव सा मध्योर्ध्वधः - प्रभेदेन त्रिधा भिन्ना शक्तिरभिधीयते ।।१७।।*

तीन भेदांनी ही शक्ती प्रसिद्ध आहे.

*बाह्येन्द्रिय - व्यापार - नाना - चिन्तामया सैवाधः शक्तिरुच्यते ।*
*अतएव ये योगिनः तस्या आकुञ्चनं मूला-धार-बन्धनात*
*सिद्धं स्यात् । यस्माच्च चराचरं जगदिदं चिदचिदात्मकं प्रभवति ।*
*तदेव मूलाधारं संवित्प्रसरं प्रसिद्धम् ।।१८।।*

बाह्येंद्रियाच्या व्यापाराविषयी विविध प्रकारच्या चिंता धारण करणाऱ्या शरीरस्थ शक्तीला अधःकुंडलिनी म्हणतात. म्हणून योगाजन मूलाधार बंधनाने तिचे आकुंचन करण्यात मग्न असतात. यामुळे या चराचरात्मक जगाचा चित्-अचित् स्वरूपात प्रादुर्भाव होतो. ते मूलाधारचक्र ज्ञानप्रकाशचक्र म्हणून प्रसिद्ध आहे.

*उक्तं शिवानन्दाचार्ये :-*
*सर्व-शक्ति-प्रसर-संकोचाभ्यां जगत्सृष्टिः संहतिश्च भवत्येव न सन्देहः*
*तस्मात्तां मूलमित्युच्यते ।*
*अतः प्रायेण सर्वसिद्धाः मूलाधार-रता भवन्ति ।।१९।।*

शिवानंद आचार्यांच्या म्हणण्यानुसार - आदिशक्तीच्या प्रसरण व संकोचनाने जगाची उत्पत्ति व संहार होतो यात संदेह नाही. हीच आदिशक्ती मूलाधारचक्रांत वास करते म्हणून सर्व सिद्धपुरुष मूलाधारचक्राच्या ध्यानात मग्न असतात.

*तरङ्गित - स्वभावं जीवात्मानं वृथा भ्रमन्तमपि*
*स्वप्रकाशमध्ये स्व-स्वरूपतया सर्वदा धारयितुं समर्था या सा मध्याशक्तिः कुण्डलिनी गीयते*
*स्थूल-सूक्ष्म-रुपेण महासिद्धान्त प्रतीयते इति निश्चयः ।।२०।।*

तरंगीत स्वभावाच्या व वृथा भ्रमण करणाऱ्या जीवात्म्यांना ही शक्ती निजप्रकाश व स्वस्वरूप दाखवण्यास समर्थ असते. या शक्तीला मध्याशक्ती कुंडलिनी म्हणतात. स्थूल व सूक्ष्म रूपानें ही शक्ती महासिद्धांना नक्कीच प्रतीत होते.

*स्थूलेति निखिल-ग्राह्याधार-ग्राह्यस्वरूपाणि पदार्थान्तरैर्भ्राम्यमाणा*
*इव तद्रूपा वर्तते सा कुण्डलिनी साकारस्थूला पुनस्त्वियभेव स्व-*

*प्रसार - चातुर्यतया वर्तमाना गोनिनां परानन्दतया कुण्डलिनी या निश्चयभूता वर्तते सा सूक्ष्मा निराकारा प्रबुद्धा महासिद्धानां मते प्रसिद्धा ।।२१।।*

अखिल ग्राह्य गोष्टींचा आधार आहे व स्वतः ग्राह्यस्वरूप असून नाना आकारांच्या ग्राह्य पदार्थांत भ्रमण करणारी आहे व तद्रूप आहे अशी ती कुंडलिनी साकार स्थूल होय. हीच कुंडलिनी स्वतःच्या प्रसारप्रक्रियेतील चातुर्याने वर्तमान योग्यांना परमानंद देते हे निश्चित आहे. तद्वत निराकार सूक्ष्म व प्रबुद्ध कुंडलिनी महासिद्धांच्या सिद्धांतात प्रसिद्ध आहे.

*उक्तं तत्त्वसारे :-*

*सृष्टिः कुण्डलिनी ख्याता द्विधा भागवता तु सा ।*

*एकधा स्थूलरूपा च लोकानां प्रत्यया (गा) त्मिका ।।२२।।*

सृष्टी कुंडलिनी प्रसिद्ध आहे. ती दोन भागात विभागलेली आहे. असे तत्त्वसार ग्रंथात सांगितले असून, पहिल्या प्रकारची कुंडलिनी स्थूल आहे व ती सर्व लोकांना अनुभवगम्य प्रत्ययात्मिका आहे.

*अपरा सर्वगा सूक्ष्मा व्याप्तिव्यापक वर्जिता ।*

*तस्या भेदं न जानाति मोहितः प्रत्ययेन तु ।।२३।।*

सूक्ष्मस्वरूप सर्वगामी अशी दुसरी कुंडलिनी व्याप्तिव्यापक धर्माच्या पलीकडे आहे. त्यातील भेद मूढ लोकांना कळत नाहीत.

*तस्मात्सूक्ष्मा परा संवितस्वरूपा मध्याशक्तिः कुण्डलिनी योगिभिर्देह-सिध्यर्थं सद्गुरु-मुकाज्ज्ञ त्वा स्व-स्वरूपदशायां प्रबोधनीया ।।२४।।*

म्हणूनच सूक्ष्म, परा, संवितस्वरूपा, मध्यमा कुंडलिनी शक्तीचें देहसिध्यर्थ, योगी असलेल्या सद्गुरुमुखांतून स्व-स्वरूपदशेचें ज्ञान होण्यासाठी प्रबोधन करून घ्यावे.

*अथ ऊर्ध्व - शक्तिनिपातः कथ्यते ।*

*सर्वेषां तत्त्वानामुपरि - वर्तमानत्वान्निर्नाम*

*परमं पदमेव उर्ध्व प्रसिद्धं तस्याः*

*स्व-संवेदन-नाना- साक्षात्कार सूचनशीला या उर्ध्वशक्तिरभिधीयते ।*

*तस्याः निपातनमिति स्व-स्वरूप-द्विधा-भास-निरासः किन्तु*

*स्वस्वरूपाखण्डत्वेन भवति ।।२५।।*

उर्ध्वकुंडलिनीचा शक्तिनिपात सांगतांना म्हटले आहे. सर्व तत्त्वांच्यावर अस्तित्वात असल्यानें निर्नाम परमपद ऊर्ध्व या नावानें प्रसिद्ध आहे. स्वसंवेदनापूर्वक



नाना आकारानें साक्षात्कार प्रकट करण्याचा त्या पदाचा जो स्वभाव आहे त्या स्वभावाला ऊर्ध्वशक्ति असे म्हणतात. तिचा निःपात म्हणजे केवळ स्व-स्वरूपाच्या द्विधाभासाचा निःपात नव्हे, तर स्व-स्वरूप अखंड आहे असे ज्ञान होणें.

*उक्तश्च :-*

*शिवस्याभ्यन्तरे शक्तिः शक्तेरभ्यन्तरः शिवः ।*

*अन्तरं नैव जानीयाच्चन्द्रचान्द्रिकयोरिव ।।२६।।*

शिवामध्येंच शक्ती आहे व शक्तीमध्येंच शिव आहे. चंद्र व चांदणे यामध्यें ज्याप्रमाणें अंतर विलगता येऊ शकत नाही. द्वैताचा केवळ आभास मात्र असतो.

*अत ऊर्ध्व शक्ति निपातेन महासिद्ध-योगिभिः परमपदं*

*प्राप्यते इति सिद्धम् ।।२७।।*

ऊर्ध्वशक्तीच्या निपातानें महासिद्ध योग्यांना परमपद प्राप्त होतें हे सिद्ध आहे.

*उक्तश्च :-*

*सत्वे सत्वे सकलरचना राजते संविदेका ।*

*तत्वे तत्वे परम-महिमा संविदेवावभाति ।।२८।।*

सर्व स्थूल, सूक्ष्म प्राण्यांच्या रचनेंत एकमात्र अशी संविदशक्ति असते ती प्रकाशित होते. सर्व तत्त्वांत परमसामर्थ्याच्या रूपानें संविदशक्तीचें दर्शन घडतें.

*भावे भावे बहुल तरला लम्पटा संविदेषा ।*

*भासे-भासे भजन-चतुरा बृंहिता संविदेव ।।२९।।*

सर्व भावांत बहुल अनेक स्वरूपांत निजस्वरूपविहारिणी संवितशक्ति भासमान होते. सर्व भासांत (जीवाच्या प्रतिबिंबात) भजनचतुर संवित 'सर्वव्यापी' होते.

*विमुक्तं भवति परापर-विमर्शरुपिणी संविन्नना-शक्तिरुपेण*

*निखिल-पिण्डाधारत्वेन वर्जते इति सिद्धान्तः ।।३०।।*

*इति श्रीगोरक्षनाकृतौ । सिद्धसिद्धान्तपद्धतौ*

*पिण्डाधारो नाम चतुर्थोपदेशः ।।४।।*

परापरविमर्शरुपिणि (स्थूलसूक्ष्म विचाररूप) संविद नाना शक्तिरूपानें अस्तित्वांत असल्यानें सकल पिंडाचा आधार आहे असा सिद्धांत आहे.

नाथ संप्रदायात श्री गुरु गोरक्षनाथांनी कुल-अकुल अर्थात शक्ति-शिव यांच्या सामरस्यपूर्ण अद्वैताचा अर्थात श्रीविष्णूपदीच्या सच्चिदानंदस्वरूपाचा अनुभव पंथराजमार्गाने अर्थात योगमार्गाने म्हणजेच अष्टांगयोग, हटयोग, ध्यानयोग (तंत्र, मंत्र, यंत्र योग हेही यात समाविष्ट करता येतील.) मार्गावर कुंडलिनी जागरण प्रक्रियेची कल्पना 'पिंडी पिंडाचा ग्रासू' या सूत्रानुसार अधः, मध्य- उर्ध्व शक्तीचे

आकुंचन वा प्रसरण तसेच बोध अवस्था अबोध अवस्था यांतील अनुभव यांविषयी अतिसूक्ष्म चर्चा करून कुंडलिनीशक्ती हाच पिंडाधार असून तिच्या उर्ध्वप्रवासाने शिव-शक्ति समावेशन अनुभूतीपर्यंत जाऊन अवघे स्थूल आणि सूक्ष्म विश्व ठायीच कसे अनुभूत होते याचे स्पष्ट अनुभूतिपूर्ण मार्गदर्शन केले आहे.

* * *



# ‘आत्मसंयम योग’ अंतर्गत समाधी साधना प्रक्रिया

## भगवद्‌गीता आणि भावार्थदीपिका तथा ज्ञानेश्वरी

नरदेहाच्या ठिकाणी सच्चिदानंदस्वरूप होण्याची निसर्गतःच इच्छा असते. ही इच्छा दुर्दम्य असावी. त्या इच्छापूर्तीसाठी त्याने दृढ निश्चयाने प्रयत्नशील तथा अभ्यासशील असावे, असे अभिप्रेत असते. कर्मयोगी आणि संन्यासी अर्थात ध्यान योगी या दोहोंनाही सच्चिदानंदमग्नतेपर्यंत पोहोचता यावे यासाठीच योगसाधनेची मांडणी योगपरंपरेतील योगीजनांनी केली आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील सहाव्या अध्यायात म्हणजे ‘आत्मसंयम योग’ या प्रकरणात योगीराज श्रीकृष्णांनी अर्जुनाला यासंबंधात स्पष्ट असे ज्ञान प्रसारण केले आहे. श्रीकृष्णांनी मांडलेले, श्रीकृष्णार्जुन संवादातून प्रकटलेले ज्ञान हे पातंजल योगवैज्ञानिक परंपरेतील आहे असे म्हणता येते. श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील टीकेत माउली ज्ञानेश्वरांनी केलेली टीका ही केवळ अर्थप्रतिबोधक आहे असे नाही तर नाथसांप्रदायिक परंपरेतील योगसाधना प्रक्रिया त्यांनी निवेदित तथा विश्लेषित केली आहे. या योगसाधना प्रक्रियेचा परामर्श येथे घ्यावयाचा आहे.

**अ) श्रीमद्‌भगवद्‌गीतेत उल्लेखित प्रक्रिया :-**

सहाव्या अध्यायातील चवथ्या श्लोकात ‘योगारूढ’ पुरुषाचे परिमाण सांगितले आहे.

*यदा हि नेन्द्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ।*
*सर्वसङ्कल्पसन्यासी योगारूढस्तदोच्यते ।।४।। ६.४*

ऐंद्रियभोगात आणि कर्माच्या ठिकाणी निरासक्त आणि निःसंकल्प (निर्हेतुक) (निरासक्त) होणाऱ्या पुरुषाला योगारूढ असे म्हटले जाते.

ज्याला योगी होऊन सच्चिदानंदस्वरूप स्थितीचा अनुभव घ्यायचा आहे त्याने स्वतःच स्वतःचा संसारसमुद्रातून अर्थात त्रिगुणात्मक आणि आसक्त अशा

भवसागरातून स्वतःला संयमाने, निःसंकल्प तसेच निरासक्त होऊन स्वतःचा उद्धार करावा लागतो. म्हणजेच ज्ञान-विज्ञानाच्या जाणिवेने अंतःकरण निर्विकार होऊन ज्याला इंद्रियांवर अर्थात वासनादेहावर विजय मिळविता आला आहे, ज्याला सर्वाभूती परमेश्वर अशा जाणिवेच्या अभ्यासाने समदृष्टी प्राप्त झाली आहे तोच सच्चिदानंदस्वरूप स्थितीला जाऊ शकतो.

योगारूढ पुरुषाची मानसिक तथा आत्मिक पूर्वतयारी झाल्यानंतर योगाभ्यासाने अर्थात ध्यानयोगाने त्याला सच्चिदानंदस्वरूप स्थिती अर्थात अद्वैत अथवा मोक्ष अवस्थेचा अनुभव ठायीच घेता येतो. या योगसाधनेची प्रक्रिया स्पष्ट करतांना-

१) **ध्यानधारणेसाठीची पवित्र जागा आणि आसन** कोणत्या प्रकारचे असावे ते स्पष्ट केले आहे -

*शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमानसमात्मनः ।*
*नात्युच्छितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥११॥ ६.११*

शुचिर्भूत अशा प्रदेशात शुद्ध जमिनीवर क्रमाने कुश (दर्भ), मृगाजिन त्यावर वस्त्र अंथरून आसन तयार करावे. हे आसन फार उंच किंवा फार सखल असता कामा नये, असे स्थिर आसन मांडावे.

२) **ध्यानमुद्रेची स्थिती** स्पष्ट केली आहे -

*तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः ।*
*उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये ॥१२॥ ६.१२*
*समं कायाशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ।*
*सम्प्रेक्ष नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन ॥१३॥ ६.१३*

त्या आसनावर शरीर, डोके आणि मान सरळ रेषेत ठेवून स्थिर व्हावे. आपल्या नाकाच्या शेंड्यावर दृष्टी ठेवून अन्य दिशांकडे लक्ष जाऊ देऊ नये. (श्लो. १२) चित्त व इंद्रियांच्या क्रिया ताब्यात ठेवून एकाग्र मनाने अंतःकरण शुद्धीसाठीचा अभ्यास करावा. (श्लोक १२)

३) **व्रतस्तता -** अभ्यास करणाऱ्या योग्याने व्रतस्थ असले पाहिजे -

*प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ।*
*मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥१४॥ ६.१४*

ब्रह्मचर्य व्रत बाळगावे. अंतःकरण शांत आणि निर्भय असावे. सावधानपणे मन आवरून (निरासक्त करून) माझ्या ठिकाणी (परमेश्वरा ठिकाणी- शिव- विष्णू वा देव-पांडुरंग इ.) लावून, आपला सर्वप्रकारचा भार अर्थात जबाबदारी परमेश्वरावर सोपवून परमेश्वर हेच आश्रयस्थान आहे असा निश्चय करून अभ्यासमग्न व्हावे.



४) **परमेश्वराच्या ठिकाणी एकाग्र मनाचे फलित** - मनावर संयमाने विजय मिळवून जिवात्म्याला परमेश्वराच्या ठिकाणी एकरूप करणाऱ्या योग्याला परमेश्वराच्या ठिकाणी (माझ्या/श्रीकृष्णाच्या) असणारी परमानंदाची अत्युच्च अवस्था अर्थात सच्चिदानंदस्वरूप अशी शांती प्राप्त होते.

५) **हा अभ्यास करतांना यमनियमांचे पालन संयमाने करावे लागते-**

*नात्यश्नतस्तु योगोऽस्थि न चैकान्तमनश्नतः ।*
*न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥१६॥ ६.१६*

अर्थात भगवंत अर्जुनाला सांगतात, हा योग फार खाणाऱ्याला, अजिबात न खाणाऱ्याला, फार झोपाळूला तसेच नेहमी जागरण करणाऱ्याला साध्य होत नाही.

*युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।*
*युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥१७॥ ६.१७*

यथायोग्य आहार-विहार करणाऱ्याला, कर्मांमध्ये यथायोग्य व्यवहार करणाऱ्याला आणि झोपणे व जागणे ज्याचे यथायोग्य आहे त्यालाच दुःखाचा नाश करणारा हा योग साध्य होतो.

६) **योगसाधनेचा परिणाम -** योग साध्य झालेल्या योग्याच्या ठायी साधनेचा परिणाम दिसतो -

*यदा विनियेत चित्तमात्मन्येवावतिष्ठते*
*निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥१८॥ ६.१८*

एकाग्रचित्त जेव्हा परमात्म्यात स्थिर होते, तेव्हां सर्वभोगांची इच्छा नाहीशी होते. अशा योग्याला योगयुक्त म्हणतात.

*यत्रापरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ।*
*यत्र चैवात्मनात्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥२०॥*

योगाभ्यासाने नियमित स्थिर झालेले चित्त नेहमीच परमात्म्याच्या ठायी शांत व ध्यानमग्न होते. या योग्याला सच्चिदानंदघन परमात्म्याची ठायीच अनुभूती येते.

७) **जन्मान्तरात संकल्पसिद्धी स्वरूपात योगसिद्धी घडतेच -**

*शनैः शनैरूपरमेद् बुध्या धृतिगृहीतया ।*
*आत्मसंस्थं मनः कृत्वा न किञ्चिदपि चिन्तयेत् ॥२५॥ ६.२५*

अभ्यास सातत्याने उपरत असावे. धैर्यमुक्त बुद्धीने परमात्म्यात मनाला स्थिर करून; कर्म करीत असतांना अन्य कशाचाही विचार करू नये. अर्थात प्राप्त कर्मास कोणत्याही गोष्टीत लिप्त होऊ नये.

*पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ।*

*न हि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ।।४०।। ६.४०*

अशा योगाभ्यास करणाऱ्या योग्याचा इह वा परलोकी नाश होत नाही. भगवद्प्राप्तीसाठी अर्थात समत्व तथा सच्चिदानंदस्थिती होण्यासाठी कर्म करणारा कोणीही कधीच अधोगतीला जात नाही.

*प्राप्य पुण्यकृतां लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ।*

*शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ।।४१।। ६.४१*

योगाभ्यासात मग्न योगी, देहविसर्जन करावे लागले तरी स्वर्गादी उत्तम लोकांत विधिलिखित काळ राहून, हा योगभ्रष्ट योगी शुद्ध आचरण असणाऱ्या योग्य कुळात जन्म घेतों. (योगाभ्यास एका जन्मात पूर्ण झालेला म्हणजेच शरीर विसर्जनामुळे जो पुढील जन्म घेतो त्या योग्यास 'योगभ्रष्ट' अर्थात योगसिद्धीच्या वाटेवरील अपूर्ण अवस्थेतील योगी)

*पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ।*

*जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ।।४२।। ६.२२*

पूर्वजन्मीच्या अभ्यासाने नव्या जन्मात योगी पुन्हा सच्चिदानंदस्वरूप स्थितीकडे अर्थात भगवंताकडे आकर्षिला जातो व वेदविहित कर्मे ओलांडून जातो.

*प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ।*

*अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम ।।४३।। ६.४३*

मागील जन्मातील योगसाधनेच्या संस्कारांच्या योगाने प्राप्त जन्मात प्रयत्नपूर्वक पूर्णसिद्धी मिळवून जन्ममरणाच्या फेऱ्यातून (तवतापातून) मुक्त होऊन तात्काळ समाधीयोग सिद्धीस जातो.

अर्थात परमगतीला जातो अर्थात पूर्ण ज्ञानमय अर्थात सच्चिदानंदस्वरूपस्थितीला पोहोचतो, अद्वैत पावतो.

८) **सर्वश्रेष्ठ योग्याची व्याख्या –**

*योगिनामपि सर्वेषां मद्गतोनान्तरात्मना ।*

*श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ।।४७।। ६.४७*

परमेश्वराच्या ठायी अंतरात्म्याला स्थापन करून श्रद्धेने सच्चिदानंदस्वरूपाची भक्ती तथा चिंतन करीत राहतो तो सर्वात श्रेष्ठ योगी होय. अर्थात परमेश्वररूप होऊनच कर्म करीत असतो तो सर्वश्रेष्ठ योगी होय.



**ब) भावार्थदीपिका अर्थात श्री ज्ञानेश्वरीत विवेचित प्रक्रिया**

**१) योगसाधनेसाठी पवित्र स्थळ व आसन :–**

*जेथ अराणुकेचेनि कोडें । बैसलिया उठों नावडे ।*

*वैराग्यासी दुणीव चढे । देखलिया जें ।।अ. ६–१६४।।*

*जें येणें मानें बरवंट । आणि तैसेंचि अति चोखट ।*

*जेथ अधिष्ठान प्रगट । डोळां दिसे ।।अ. ६–१७१।।*

*स्वभावें वाटे येतां । जरी वरपडा जाहला अवचितां ।*

*तरी सकामुही परि मोघौता । निर्घो विसरे ।।अ. ६–१६८।।*

*परि आवश्यक पांडवा । ऐसा ठावो जोडावा ।*

*तेथ निगुढ मठ होवावा । कांशिवालय ।।अ. ६–१७९।।*

*दोन्हीं माजि आवडे तें । जें मानलें होय चित्तें ।*

*बहुत करूनि एकांतें । बैसिजे गा ।।अ. ६–१८०।।*

*म्हणोनि तैसें तें जाणावें । मन राहतें पाहावें ।*

*राहेल तेथ रचावें । आसन ऐसें ।।अ. ६–८१।।*

*वरी चोखट मृगसेवडी । माजी धूतवस्त्राची घडी ।*

*तळवटीं अमोडी । कुशांकुर ।।अ. ६–१८२।।*

*परि सावियाचि उंच होईल । तरी आंग हन डोलेल ।*

*नीच तरी पावेल । भूमिदोषु ।।अ. ६–१८४।।*

*म्हणोनि तैसें न करावें । समभावें धरावें ।*

*हे बहु असो होआवें । आसन ऐसें ।।अ. ६–१८५।।*

वैराग्य दुपटीने वाढेल, हलूच नये असे वाटेल, भोगीही माघारी जाणे विसरेल अशाप्रकारे जे स्थान श्रेष्ठ, पवित्र, जणू प्रत्यक्ष ब्रह्मदृश्यमान होते आहे असे एकांत स्थान अर्थात निगूढ मठ किंवा शिवालय पाहावे. साधकांची वस्ती असावी, गोड पाण्याचे झरे असावेत, बहरणारी वनश्री असावी, मंद शितल तरी प्रकाशमान वातावरण असावे, हिंस्त्र श्वापदे नसावीत, कोकिळ, सारस, मोर असे जीव अधूनमधून वावरले किंवा त्यांनी शब्द केला तरी चालेल. अशाप्रकारे मन स्थिर शांत राहील अशी जागा निवडून तेथे समतल जागा पाहून, वरच्या बाजूला मृगाजिन अंथरावे. त्यावर धुतवस्त्राची घडी अंथरावी. आसनाच्या तळाशी दर्भांकूर घालावेत. समतल आसनाला हलण्याडोलण्याचा किंवा भूमीतील किटकादींचा दोष लागणार नाही अशा रितीने आसन तयार करावे.

२) ध्यान मुद्रेची स्थिती :–

*मग तेथ आपण । एकाग्र अंतःकरण ।*
*करूनि सद्‌गुरु स्मरण । अनुभविजे ।।अ. ६-१८६।।*
*ऐसें ऐक्य हें सहजे । फावे तवं राहिजे ।*
*मग तेणेंचि बोधे बैसिजे । आसनावरी ।।अ. ६-१८९।।*
*प्रवृत्ति माघौति मोहरे । समाधि ऐलाडी उतरे ।*
*आघवें अभ्यासूं सरे । बैसतखेवो ।।अ. ६-१९१।।*
*मुद्रेची प्रौढी ऐशी । तेचि सांगिजेल आंता परियेसीं ।*
*तरी उरू या जघनासी । जडोनि घालीं ।।अ. ६-१९२।।*
*चरणतळें देव्हडीं । आधारमुद्राच्या बुडीं ।*
*सुघटितें गाढीं । संचरीं पां ।।अ. ६-१९३।।*
*सव्य तो तळी ठेविजे । तेणें सिवणीमध्यु पीडिजे ।*
*वरी बैसे तो सहजें । वामचरणु ।।अ. ६-१९४।।*
*गुदमेंढ्रां आंतौतीं । चारी अंगुळें निगुतीं ।*
*तेथ सार्थ सार्थ प्रांती । सांडुनिया ।।अ. ६-१९५।।*
*माजीं अंगुळ एक निगे । तेथ टांचेचेनि उत्तर भागें ।*
*नेहेटिजे वरि आंगे । पेललेनि ।।अ. ६-१९६।।*
*उचलिलें का नेणिजे । तैसें पृष्ठांत उचलिजे ।*
*गुल्फद्वय धरिजे । तेणेचिमाने ।।अ. ६-१९७।।*
*अर्जुना हें जाण । मुळबंधाचे लक्षण ।*
*वज्रासन गौबा । नाम थासी ।।अ. ६-१९९।।*

पोटऱ्यांना चिकटवून दोन्ही मांड्या घालाव्यात म्हणजे पद्‌मासन साधावे. नंतर दोन्ही तळपाय मुडपून आधारचक्राच्या तळाशी म्हणजे गुदस्थानावर दोन्ही पावले नीट घट्ट बसवावीत. म्हणजे भद्रासन साधावे. उजव्या पायाची टांच तळाशी ठेवून तिने गुदद्वाराची शिवण मध्यभागी दाबावी, मग डावा तळपाय सहज वर बसतो. गुद आणि वृषण यांमधील बरोबर जी चार बोटे जागा आहे, त्यापैकी दीड बोट खाली आणि दीड बोट वरची जागा सोडून मधील एक बोट जागेत डाव्या पायाच्या टांचेच्या वरच्या भागाने शरीर तोलून धरले जाईल अशा रितीने नेटाने रेटावे. नकळत अंग उचलले वाटेल अशा बेताने पाठीचा कणा किंचित ताठ करावा. तेवढ्याच प्रमाणात पायाचे घोटे उचलून धरावेत. म्हणजे 'मूळबंध' आसन अर्थात 'वज्रासन' साधावे. त्यामुळे गुद्‌द्वार बंद होऊन अपान वायू मागे सरू लागतो.



३) समाधी योग प्रक्रिया :–

ओवी क्र. २०१ ते ३३० अशा १३० ओव्यांमध्ये संत ज्ञानेश्वरांनी विस्ताराने ही योग प्रक्रिया सांगितली असून १३, १४ व १५ अशा तीन श्लोकांवरील हे प्रदीर्घ भाष्य आहे.

समं कायशिरोग्रीवं धारवन्नचलं स्थिरः । संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ।।१३।।

तंव करसंपुट आपैसें । वाम चरणीं वैसे । तंव बाहुमूळीं दिसे । थोरीव आली ।।१।। माजि उभारलेनि दंडें । शिरकमळ होय गाढें । नेत्राद्वारींचीं कवाडें । लागूं पाहती ।।२।। वरचिलें पातीं ढळती । तळींचीं तळीं पुंजाळती । तेथ अर्धोन्मीलित स्थिती । उपजे तया ।।३।। दिटी राहोनी आंतुलीकडे । बाहेर पाऊल घाली कोडें । ते ठायीं ठावो पडे । नासाग्रपीठीं ।।४।। ऐसें आंतुचां आंतुचि रचे । बाहेरी मागुतें न वचे । म्हणोनि राहणें आधिये दिठीचें । तेथेंचि होय ।।५।। आतां दिशांची भेटी घ्यावी । कां रूपाची वाट पाहावी । हे चाड सरे आघवी । आपैसया ।।६।। मग कंठनाळ आटे । हनुवटी हे हडौती दाटे । ते गाढी होवोनि नेहटे । वक्षःस्थळीं ।।७।। माजि घंटिका लोपे । वरी बंधु जो आरोपे । तो जालंधरु म्हणिपे । पंडुकुमरा ।।८।। नाभी बरी पोखे । उदर हें थोके । अंतरीं फांके । हृदयकोशु ।।९।। स्वाधिष्ठानावरिचिले कांठीं । नाभिस्थानातळवटीं । बंधु पडे किरीटी । वोढियाणा तो ।।२१०।।

प्रशान्तात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः । मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ।।१४।।

ऐसी शरीराबाहेरलीकडे । अभ्यासाची पावर पडे । तंव आंतु त्राय मोडे । मनो- धर्माची ।।११।। कल्पना निमे । प्रवृत्ती शमे। आंग मन विरमे । सावियाचि ।।१२।। क्षुधा काय जाहली । निद्रा केउती गेली। हे आठवणही हारपली । न दिसे वेगां ।।१३।। जो मूळबंधे कोंडला । अपानु माघौता मुरडला । तो सवेंचि वरी सांकडला । फुगुं धरी ।।१४।। क्षोभलेपणें माजे । उवाइला ठायीं गाजे । मणिपूरेंसीं झुंजे । राहोनियां ।।१५।। मग थांबलीये वाहटुळी । सैंघ घेऊनि घर डहुळी । बाळपणींची कुहीटुळी थांबली । बाहेर घाली ।।१६।। भीतरी वळी न धरे । कोट्यामाजी संचरे । कफपित्तांचे थारे । उरों नेदी ।।१७।। धातूंचे समुद्र उलंडी । मेदाचे पर्वत फोडी । आंतली मज्जा काढी । अस्थिगत ।। १८।। नाडीतें सोडवी । गात्रांतें विघडवी । साधकातें भेडसावी । परि बिहावें ना ।।१९।। व्याधीतें दावी । सर्वेचि हरवी । आप पृथ्वी कालवी । एकवाट ।। २२०।। तंव

येरीकडे धनुर्धरा । आसनाचा उबारा। शक्ति करी उजगरा । कुंडलिनीये ।।२१।। नागाचें पिलें । कुंकुमें नाहलें । वळण घेऊनि आलें । सेजे जैसें ।।२२।। तैशी ते कुंडलिनी । मोटकी औट वळणी । अधोमुख सर्पिणी । निजैली असे ।।२३।। विद्युल्लतेची विडी । वन्हिज्वाळांची घडी । पंधरेयाची चोखडी । घोंटीव जैशी ।।२४।। तैशी सुबद्ध आटली । पुटीं होती दाटली । तें वज्रासने चिमुटली । सावध होय ।।२५।। तेथ नक्षत्र जैसे उलंडलें । कीं सूर्याचें आसन मोडलें । तेजाचें बीज विरूढलें । अंकुरेशीं ।। २६ ।। तैशी वेढियातें सोडिती । कवतिकें आंग मोडिती । कंदावरी शक्ती । उठली दिसे ।।२७।। सहजें बहुतां दिवसांची भूक । वरि चेवविली तें होय मिष । मग आवेशें पसरी मुख । ऊर्ध्वा उजू ।।२८।। तेथ हृदयकोशातळवटीं । जो पवनु भरे किरीटी । तया सगळेयाचि मिठी । देऊनि घाली ।।२९।। मुखींचां ज्वाळीं । तळीं वरी कवळी । मांसाची वडवाळी । आरोगूं लागे ।। २३०।। जे जे टाय समांस । तेथ आहाच जोडे घाउस । पाठी एकदोनी घांस । हियाही भरी ।।३१।। मग तळवे तळहात शोधी । ऊर्ध्वीचे खंड भेदी । झाडा घे संधी । प्रत्यंगाचा ।।३२।। आधार तरी न संडी । परि नरखींचेंही सत्त्व काढी । त्वचा धुवूनि जडी । पांजरेशीं ।।३३।। अस्थींचे नळे निरपे । शिरांचे हीर वोरपे । तंव बाहेरी विरूढी करपे । रोमबीजांची ।।३४।। मग सप्तधातूंचा सागरीं । ताहानेली घोट भरी । आणि सर्वेचि उन्हाळा करी । खडखडीत ।। ३५।। नासापुटौनि वारा । जो जातसे अंगुळे बारा । तो गचिये धरूनि माघारा । आंतु घाली ।। ३६ ।। तेथ अध वरौतें आकुंचे । ऊर्ध्व तळौतें खांचे । तया खेवामाजि चक्रांचे । पदर उरती ।।३७।। एऱ्हवीं तरी दोन्ही तेव्हांचि मिळती । परी कुंडलिनी नावेक दुश्चित्त होती । ते तयातें म्हणे परौती । तुम्हीचि कायसीं एथें ।। ३८ ।। आइकें पार्थिव धातु आघवी । आरोगिता कांहीं नुरवी । आणि आपातें तंव ठेवी । पुसोनियां ।। ३९।। ऐसी दोनी भूतें खाये । ते वेळीं संपूर्ण धाये । मग सौम्य होऊनि राहे । सुषुम्नेपाशीं ।। २४०।। तेथ तृप्तीचेनि संतोषें। गरळ जें वमी मुखें । तेणें तियेचेचि पीयूषें। प्राणु जिये ।। ४१।। तो आगी आंतूनि निघे । परि सबाह्य निववूंचि लागे । ते वेळीं कंसु बांधिती आंगे। सांडिला पुढती ।।४२।। मार्ग मोडिती नाडीचे । नवविधपण वायूचें । जाय म्हणऊनि शरीराचे । धर्मु नाहीं ।।४३।। इडा पिंगळा एकवटती । गांठी तिन्ही सुटती । साही पदर फुटती । चक्रांचे हे ।।४४।। शशी आणि भानु । ऐसा कल्पिजे जो अनुमानु । तो वातीवरी पवनु । गिंवसितां न दिसे ।।४५।। बुद्धीची पुळिका विरे । परिमळु घ्राणी उरे । तोही शक्तीसवें संचरे । मध्यमेमाजी ।।४६।। तंव वरिलेकडोनि



ढाळें । चंद्रामृताचें तळें । कानवडोनी मिळे । शक्तिमुखीं ।।४७।। तेणें नातकें रस भरे । तो सर्वांगामाजी संचरे । जेथिंचा तेथ मुरे प्राणपवनु ।।४८।। तातलिये मुसे । मेण निघोनि जाय जैसें । कोंदली राहे रसें । वोतलेनि ।।४९।। तैसें पिंडाचेनि आकारें । ते कळाचि का अवतरे । वरी त्वचेचेनि पदरें । पांघुरली असे ।।२५०।। जैसी आभाळाची बुंथी । करूनि राहे गभस्ती । मग फिटलिया दीप्ति । धरूं नये ।।५१।। तैसा आहाचवरि कोरडा । त्वचेचा असे पातवडा । तो झडोनि जाय कोंडा । जैसा होय ।। ५२।। मग काश्मीरांचे स्वयंभ । कां रत्नबीजा निघाले कोंभ । अवयवकांतीची भांब । तैसी दिसे ।। ५३ ।। नातरी संध्यारागींचे रंग । काढूनि वळिले तें आंग । कीं 'अंतर्ज्योतीचे लिंग । निर्वाळिलें ।। ५४।। कुंकुमाचें भरींव । सिद्धरसाचें वोतींव । मज पाहतां सावेव । शांतिचि ते ।।५५।। तें आनंदचित्रींचे लेप । नातरी महासुखाचें रूप । कीं संतोषतरूचे रोप । थांवलें जैसें ।।५६।। तो कनकचंपकाचा कळा । कीं अमृताचा पुतळा । नाना सासिंनला मळा । कोंवळिकेचा ।।५७।। हो कां जे शारदियेचिये वोले। चंद्रबिंब पाल्हेलें । कां तेजचि मूर्त बैसलें । आसनावरी ।।५८।। तैसें शरीर होये । जे वेळीं कुंडलिनी चंद्र पीयें । देहाकृती बिहे । कृतांतु गा ।। ५९।। वृद्धाप्य तरी बहुडे । तारुण्याची गांठी विघडे । लोपली उघडे । बाळदशा ।। २६० ।। वयसा तरी येतुलेवरी । एऱ्हवीं बळाचा बळार्थु करी । धैर्याची थोरी निरुपम ।। ६१ ।। कनकद्रुमाचां पालवी । रत्नकळिका नित्य नवी । नखें तैसीं बरवीं । नवीं निघती ।।६२।। दांतही आन होती । परि अपाडें सानेजती । जैसीं दुबाहीं बैसे पांती । हिरेयांची ।।६३।। माणिकुलियांचिया कणिया । सावियाचि अणुमानिया । तैसिया सर्वांगीं उधवती अणिया । रोमांचिया ।।६४।। करचरणतळें । जैसीं कां रातोत्पलें । पाखाळीं होती डोळे । काय सांगों ।। ६५।। निडाराचेनि कोंदाटें मोतिये नावरती संपुटे । मग शिवणी जैशी उतटे । शुक्तिपल्लवांची ।।६६।। तैशी पातिचिये कवळिये न समाये । दिठी जाकळोनि निघों पाहे । आधिलीचि परी होये । गगना कळिती ।।६७।। आइके देह होय सोनियाचें । परि लाघव ये वायूचें । जे आप आणि पृथ्वीचे । अंशु नाहीं ।। ६८ ।। मग समुद्रापैलाडी देखे । स्वर्गीचा आलोचु आइकें । मनोगत वोळखें । मुंगियेचें ।।६९।। पवनाचा वारिका वळघे । चाले तरी उदकीं पाऊल न लागे । येणें येणें प्रसंगें । येती बहुता सिद्धि ।।२७०।। आइकें प्राणाचा हात धरूनि । गगनाची पाउटी करूनी । मध्यमेचेनि दादरेहूनि । हृदया आली ।।७१।। ते कुंडलिनी जगदंबा । जे चैतन्यचक्रवर्तीची शोभा । जिया विश्व- बीजाचिया कोंभा । साउली केली ।।७२।। जे शून्यालिंगाची पिंडी । जे

परमात्मया शिवाची कैरंडी । जे प्राणाची उघडी । जन्मभूमि ।।७३।। हें असो ते कुंडली । हृदयाआंतु आली । अनाहताचां बोली । चावळे ते ।।७४।। शक्तीचिया आंगा लागलें । बुद्धीचें चैतन्य होतें आलें । तें तेणें आइकिलें । अळुमाळु ।।७५।। घोषाचा कुंडीं । नादचित्रांचीं रूपडीं । प्रणवाचिया मोडी । रेखिलीं ऐसीं ।।७६।। हेंचि कल्पावें तरी जाणिजे । परी आतां कल्पितें कैचें आणिजे । तरी नेणों काय गाजे । तिये ठायीं ।।७७।। विसरोनि गेलों अर्जुना । जंव नाशु नाहीं पवना । तंव वाचा आथी गगना । म्हणऊनि घुमे ।।७८।। तया अनाहताचेनि मेघे । मग आकाश दुमदुमों लागे । तंव ब्रह्मस्थानींचें बेगे ।। फिटलें सहजें ।।७९।। आइकें कमळगर्भाकारें । जें महदाकाश दुसरें । जेथ चैतन्ये आधातुरें । करूनि असिजे ।। २८०।। तया तया हृदयाचां परिवरीं । कुंडलिनियां परमेश्वरी । तेजाची शिदोरी । विनियोगिली ।।८१।। बुद्धीचेनि शाकें । हातबोनें निकें । द्वैत जेथ न देखे । तैसें केलें ।।८२।। ऐसी निजकांती हारविली । मग प्राणुचि केवळ जाहाली । ते वेळीं कैसी गमली । म्हणावी पां ।।८३।। हो कां जे पवनाची पुतळी । पांघुरली होती सोनेसळी । ते फेडूनियां वेगळी । ठेविली तिया ।।८४।। नातरी वारयाचेनि आंगें झगटली । दीपाची दिठी निमटली । कां लखलखोनि हारपली । वीजु गगनीं ।।८५।। तैशी हृदयकमळवेऱ्हीं । दिसे सोनियाची जैशी सरी । नातरी प्रकाशजळाची झरी । वाहत आली ।। ८६ ।। मग तिये हृदयभूमी पोकळे । जिराली का एके वेळे । तैसें शक्तीचें रूप मावळे । शक्तीचिमाजी ।।८७।। तेव्हां तरी शक्तीचि म्हणिजे । एऱ्हवीं तो प्राणु केवळ जाणिजे । आतां नाद बिंदु नेणिजे । कळा ज्योती ।। ८८ ।। मनाचा हन मारु । कां पवनाचा धरु । ध्यानाचा आदरु । नाहीं परी ।। ८९।। हे कल्पना घे सांडी । तें नाहीं इये परवडी । हे महाभूतांची फुडी । आटणी देखा ।। २९०।। पिंडे पिंडाचा ग्रासु । तो हा नाथसंकेतींचा दंशु । परि दाऊनि गेला उद्देशु । महाविष्णु ।।९१।। तया ध्वनिताचे केणे सोडुनी । यथार्थाची घडी झाडुनी । उपलविली म्यां जाणुनी । ग्राहीक श्रोते ।।९२।।

युञ्जन्नेनं सदात्मानं योगी नियतमानसः । शान्तिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ।।१५।।

ऐकें शक्तीचें तेज लोपे । तेथ देहाचें रूप हारपे । मग तो डोळियांचि माजि लपे । जगाचिया ।।९३।। एहवीं आधिलाचि ऐसें । सावयव तरी असे । परी वायूचें कां जैसें । वळिलें होय ।।९४।। नातरी कर्दळीचा गाभा । बुंथी सांडोनी उभा । कां अवयवचि नभा । निवडला तो ।। ९५।। तैसें होय शरीर । तैं तें म्हणिजे खेचर । हें पद होतां चमत्कार । पिंडजनीं ।। ९६ ।। देखें साधकु निघोनि



जाये । मागां पाउलाची वोळ राहे । तेथ ठायीं ठायीं होये । हे अणिमादिक ।। १७।। परि तेणें काय काज आपणयां । अवधारीं ऐसा धनंजया । लोप आथी भूतत्रया । देहींचा देहीं ।। ९८ ।। पृथ्वीतें आप विरवी । आपातें तेज जिरवी । तेजातें पवन हरवी । हृदयामाजीं ।।९९।। पाटीं आपण एकला उरे । परि शरीराचेनि अनुकारें । मग तोही निगे अंतरें । गगना मिळे ।।३००।। ते वेळीं कुंडलिनी हे भाष जाये । मारुत ऐसे नाम होये । परि शक्तिपण तें आहे । जंव न मिळे शिवीं ।।१।। मग जालंधर सांडी । कंकारांत फोडी । गगनाचिये पाहाडीं । पैटी होय ।।२।। ते ॐकाराचिये पाटी । पाय देत उठाउठी । पश्यंतीचिये पाउटी । मागां घाली ।।३।। पुढां तन्मात्रा अर्धवेरी । आकाशाच्या अंतरीं । भरती गमे सागरीं । सरिता जैशी ।।४।। मग ब्रह्मरंध्रीं स्थिरावोनी । सोहंभावाचिया बाह्या पसरूनीं । परमात्मलिंगा धांवोनी । आंगा घडे ।। ५।। तंव महाभूतांची जवनिका फिटे । मग दोहींसि होय झटें । तेथ गगनासकट आटे । समरसीं तिये ।।६।। पैं मेघाचेनि मुखीं निवडला । समुद्र कां वोघीं पडिला । तो मागुता जैसा आला । आपणपेयां ।।७।। तेवीं पिंडाचेनि मिषें । पदीं पद प्रवेशे । तें एकत्व होय तैसें । पंडुकुमरा ।।८।। आतां दुजें हन होतें । कीं एकचि हें आइतें । ऐशिये विवंचनेपुरते । उरेचिना ।।९।। गगनीं गगन लया जाये । ऐसें जें कांहीं आहे । तें अनुभवें जो होये । तो होऊनि ठाके ।।३१०।। म्हणोनि तेथिंची मातु । न चढेचि बोलाचा हातु । जेणें संवादाचिया गांवाआंतु । पेटी कीजे ।।११।। अर्जुना एऱ्हवीं तरी । इया अभिप्रायाचा जे गर्वु धरी । ते पाहें पां वैखरी । दुरी ठेली ।।१२।। भ्रूलता मागिलीकडे । तेथ मकाराचेंचि आंग न मांडे । सडेया प्राणा सांकडें । गगना येतां ।।१३।। पाठीं तेथेंचि तो भासळला । तव शब्दांचा दिवो मावळला । मग तयाहि वरी आटु भविन्नला । आकाशाचा ।।१४।। आतां महाशून्याचा डोहीं । जेथ गगनासीचि टावो नाहीं । तेथ तागा लागेल काई । बोलाचा इया ।।१५।। म्हणूनि आखरामाजि सांपडे । कीं कानवरी जोडे । हें तैसें नव्हे फुडें । त्रिशुद्धी गा ।। १६ ।। जैं कहीं दैवें । अनुभविलें फावे । तैं आपणचि हें टाकावें । होऊनियां ।। १७ ।। पुढती जाणणें तें नाहींचि । म्हणोनि असो किती हेंचि । बोलावें आतां वायांचि । धनुर्धरा ।।१८।। ऐसे शब्दजात माघौतें सरे । तेथ संकल्पाचे आयुष्य पुरे । वाराही जेथ न शिरे । विचाराचा ।।१९।। जें उन्मनियेचें लावण्य । जें तुर्येचें तारुण्य । अनादि जें अगण्य । परमतत्त्व ।। ३२० ।। जें आकाराचा प्रांतु जे मोक्षाचा एकांतु । जेथ आदि आणि अंतु । विरोनी गेले ।।२१।। जें विश्वाचें मूळ । जें योगद्रुमाचें फळ । जें आनंदाचें केवळ । चैतन्य गा ।।२२।। जें महाभूतांचें बीज । जें

महातेजाचें तेज । एवं पार्था जें निज । स्वरूप माझें ।।२३।। ते हे चतुर्भुज कोंभेली । जयाची शोभा रूपा आली । देखोनि नास्तिकीं नोकिलीं । भक्तवृंदे ।।२४।। तें अनिर्वाच्य महासुख । पैं आपणचि जाहले ते पुरुष । जयांचे कां निष्कर्ष । प्राप्तिवेरीं ।।२५।। आम्हीं साधन हें जें सांगितलें । तेंचि शरीर जिहीं केलें । आमुचेनि पांडे आले । निर्वाळलेया ।।२६।। परब्रह्माचेनि रसें । देहाकृतीचिये मुसे । वोतींव जाहले तैसे । दिसती आंगें ।।२७।। जरि हे प्रतीति हन अंतरीं फांके । तरी विश्वचि हें अवघें झांके । तंव अर्जुन म्हणे निकें । साचचि जी हें ।। २८ ।। कां जें आपण आतां देवो । हा बोलिले जो उपावो । तो प्राप्तीचा टावो । म्हणोनि घडे ।।२९।। इये अभ्यासीं जे दृढ होती । ते भरवसेनि ब्रह्मत्वा येती । हें सांगतियाची रीती । कळलें मज ।।३३०।।

या विवेचनाचा मतितार्थ आणि प्रक्रिया पुढीलप्रमाणे सांगता येते.

द्रोणाकार शरीराचे हाताचे तळवे डाव्या पायावर सहजच टेकतात. खांदे उंचावलेले दिसतात. मस्तक खांद्यात खेचल्यासारखे दिसते. वरच्या पापण्या ढळत नाहीत तर खालच्या पापण्या खालीच पसरतात. डोळे अर्धवट उघडे वाटतात. दृष्टी नाकाच्या शेंड्यावर स्थिरावते. चौफेर दिशा इ. गोष्टी पाहण्याची इच्छा नाहीशी होते. हनुवटी गळ्याखालच्या खळगीत रुतून बळकटपणे छातीवर दाब देते. कंठमणी लोप पावतो. म्हणजे जालंधरबंध साधला जातो. बेंबी फुगते. पोट खपाटी जाते. हृदय फुलते असा ओढीयाणा बंध साधला जातो. आत चंचल मनोवृत्तीचा जोर कमी होतो. प्रवृत्ती शांत होऊन शारीरभाव शांत होतो. मूळबंधाने अपान वायू माघारी फिरतो. तेथेच तो विस्तार पावतो व अनावर होतो. मणिपूर चक्राला धडका देतो. बालपणापासूनची शरीरातील घाण शरीराबाहेर घालवून देतो. मग अपान कोठ्यात शिरतो. उसळलेला अपान वायू शुक्र, रस, रक्त, मांस अशा सप्तधातूंचे समुद्र उलथून टाकतो. मेदांचे पर्वत फोडतो. हाडांतील मज्जा बाहेर काढतो. वायूमार्गाची नाडी मोकळी होते. या प्रक्रियेची योग्याला भीती वाटते. कधीतर अपान शरीरात व्याधी निर्माण करून नष्टही करतो. कफ पित्ताचे जलांश, मांसमज्जादि पृथ्वीचे अंश कालवून एकवटतो. याचवेळी वज्रासनाच्या उष्णतेने कुंडलिनी जागृत होते.

(कुंकुम) केशराच्या पाण्याने न्हालेले नागिणीचे पिलू वेटोळे घालून जसे झोपी जाते, त्याप्रमाणे कुंडलिनी शक्ती लहानशी साडेतीन वेटोळे घालून खाली तोंड करून सर्पिणीप्रमाणे निजलेली असते. अतिशय तेजस्वी अशी ही कुंडलिनी वेटोळे अकस्मात सोडवून नाभीकंदावर उभी राहाते. निर्माणापासूनच भुकेली



असलेली कुंडलिनी आवेशाने तोंड उर्ध्व दिशेने करून सरसावते. प्रथम अपानवायू पोटात घालते. पायाचे तळवे, तळहात, अंगातील मांसखंड सर्वांचा वेध घेत शरीरातील सर्व अवयवांचा झाडा घेते. मात्र स्वाधिष्ठान चक्राचे स्थान सोडीत नाही. नखातल्या सारासह त्वचाही पिळून घेऊन ती हाडांना भिडते. हाडांच्या पोकळी, शिरांच्या काड्या देखील कोरून काढते. केसांची रूजही होरपळते. तहानलेली कुंडलिनी शक्ती, रस, रक्त, मांस, मेद, अस्थि, मज्जा, शुक्र या सात धातूंच्या सागराचा एकच घोट करते आणि शरीराचा खडखडीत उन्हाळा करते. दीर्घ जोराचा श्वास माघारी वळवते. खालचा अपानवायू या हालचालींमुळे आकुंचित होतो. वरचा प्राणवायू खाली दाबला जातो. यामुळे षट्चक्राचे नुसते पदर उरतात. तरीही शिल्लक अपानवायू ग्रासतो. शरीरातील पंचमहाभूतांचा एकप्रकारे ग्रास घेऊन शांत होत कुंडलिनी सुषुम्नानाडीजवळ राहते. तेथे तृप्त होऊन समाधानाच्या संतोषाने ती गरळ ओकते. त्या विषाने प्राणवायू जागतो. तो प्राणवायू अग्नीतून बाहेर पडतो, परंतु शरीर अंतर्बाह्य शीतल करून हरवलेले गात्रातील सामर्थ्य पुन्हा प्रकट होऊ लागते. मंद नाडीमुळे नऊही प्रकारचे वायू संपल्याने शरीरधर्मही राहात नाहीत. इडा आणि पिंगळाचे ऐक्य घडते. ब्रह्माविष्णूरूद्र ग्रंथींच्या गाठी सुटतात. मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध आणि आज्ञा या षट्चक्राचे पदर अलग होतात. श्वास थांबलेसे वाटते. कुंडलिनीबरोबर ज्ञानग्रहण प्रक्रिया उर्वरित गंध कुंडलिनी शक्तीबरोबर सुषुम्नेमध्ये संचार होतो. वरच्या बाजूकडून चंद्राच्या सतराव्या कलेचे अमृत कुंडलिनीच्या मुखात पडते. त्या योगाने कुंडलिनी शक्तीनळीत तो अमृतरस भरतो तो सर्वांगात प्राणवायूने तो जेथल्या तेथेच मुरतो. चंद्रामृताची सतरावी कलाच अवतरावी असा योगी प्रकाशमान होतो. हे शरीर म्हणजे मूर्तिमंत शांतीच वाटते. लहानगे बालक अवतरावे असे निरागस रूप प्रकटते. शरीर वायूप्रमाणे हलके होते. याला त्रिकोलातीलही सर्व गोष्टी दिसतात. त्याची हालचाल वाऱ्याप्रमाणे सर्वत्र अवकाशात घडू लागते. प्राणवायूचा हात धरून, हृदयाची पायरी करून, सुषुम्नेचा जीना चढून कुंडलिनी हृदयापर्यंत पोचली की कुंडलिनी जगदंबाची माता होते. योग्याच्या ठायी ब्रह्मचैतन्यस्वरूप जीवाच्या सार्वभौमत्वाची शोभा प्रकटली असे वाटते. योगी समाधीची शांती अनुभवतो. जणू शून्यलिंगाची साकार पिंड आहे. ॐकाराची जन्मभूमी असावी असे वाटू लागते. ज्ञानरूपचैतन्य अनाहतचक्रापर्यंत आलेले असते. अनाहताचे दशनाद– चिणी, किंकिणी, घंटानाद, शंखनाद, विणानाद, टाळनाद, वेणुनाद, भेदीनाद, मृदुंगनाद, घेघनाद यांचा घोष ऐकू येऊ लागतो. त्यातून ॐकाराची विविध चित्रे

प्रकटतात. मात्र योग्यांव्यतिरिक्त हा नाद इतरांना ऐकू येत नाही.

अनाहतनाद घुमू लागला की ललाटस्थानी ब्रह्मरंध्राचे द्वार उघडते. त्यावर कमलचक्र महदाकाश असते. तेथे चैतन्य अतृप्त स्थितीत असते. तेथवरच कुंडलिनीचा प्रवास घडतो. तेथून ती हृदयाकाशात अंतर्धान पावते. येथेच पंतमहाभूतांवर योगी त्यांच्या वासनांचा नाश करून विजय संपादन करतो. तो योगी पूर्वीसारखाच भासमान झाला तरी त्याचा देह हाच चमत्कार वाटू लागतो. तो सर्वत्र संचार करू शकतो. सर्व सिद्धी त्याला प्राप्त असतात. कुंडलिनी हे नावच राहात नाही. तेथे पश्यंती वाणी मागे टाकून ब्रह्मरंध्रालाच जणू तिने कवटाळलेले असते. तेथेच शक्ती आणि परमात्मा यांचे दृढालिंगन होते. योग्याला मूळ स्वरूप परब्रह्मस्वरूप अर्थात सच्चिदानंदस्वरूपच होतो. अनुभव शब्दांच्या पलीकडे असतात. हीच परब्रह्मस्थिती होय. योगी आत्मस्वरूपच झालेला आहे असे ठायीच अनुभवतो. ही उन्मनी अवस्था हेच समाधी अवस्थेचे वैभव आहे. योगी अवर्णनीय अशा महासुखात्मक, परमात्मतत्त्वच आत्मरूपाला पावला असे होते. हा अनुभव अंतर्यामी प्रकाशेल, तर हे सगळे विश्व प्रत्यक्ष परब्रह्मच आहे असे होते.

* * *



# जीवनमुक्ती अनुभवामृत

ब्रह्मविद्या–योगशास्त्राच्या साधनेची परमसिद्धी म्हणजे जीवनमुक्तदशा अनुभवणे होय. संत ज्ञाननाथांनी या परमसिद्धी सिद्धअवस्थेचे अनुभवन, अनुभवामृत किंवा अमृतानुभव या शब्दात केले आहे. मोक्ष म्हणजे जीवनमुक्तता होय. योग्यांचे अंतिम लक्ष्य ठायीच ही जीवनमुक्त सिद्धी अवस्था अनुभवत, अविनाशीपणाने प्रवास अनुभवणे होय. जीवनमुक्त होणे, मोक्ष प्राप्त करणे म्हणजे निर्गुण, निराकार, निर्विकार, महाशून्य, निज, केवल, सच्चिदानंदस्वरूप, स्वसंवेद्य आत्मरूपाची, मनोस्वरूपस्थिती अनुभवत राहाणे होय. ही अवस्था म्हणजे सर्वमुक्त तरी स्वसंवेद्य अवस्था होय! ही अवस्था म्हणजेच परमानंद होय. ही अवस्था म्हणजेच अखिल अस्तित्वाचा उत्सव ठायीच अनादि आणि अनंतपणाने घडत राहाणे होय! ही अवस्था म्हणजे शिवशक्तिसमावेशन स्वरूपतेची, परिपूर्ण शंभूअवस्था होय! म्हणजेच 'समत्वम्' अवस्था सिद्ध होणे होय.

**१.** समाधी साधना, जीवनमुक्त दशेपर्यंत परिपूर्ण होणे हे केवळ सद्‌गुरुकृपेनेच घडू शकते. संत, स्वामी, ज्ञाननाथ म्हणतात–

*आतां उपायवनवसंतु । जो आज्ञेचा आहेवतंतु ।*
*अमुर्तचि परि मूर्तु । कारुण्याचा ।।१।।*
*मोडोनि माया कुंजरु । मुक्त मोतियाचा वोगरू ।*
*जेववीता सद्‌गुरु । निवृत्ति वंदू ।।३।।*
*कैवल्य कनकाचिया दाना । जो न कडसी थोर साना ।*
*द्रष्ट्याचिया दर्शना । पाढाऊजो ।।५।।*
*जो भेटलियाची सवे । पुरति उपायांचे धांवे ।*
*प्रवृत्ति गंगा स्थिरावे । सागरीं जिये ।।८।।*
*जयाचेनि सावायें । जीवु ब्रह्मउपर लाहे ।*

*ब्रह्म तृणातळी जाये । उदासें जेणें ॥१६॥*
*किंबहुना इया भाखा । द्वैताचा जेथे उपखा ।*
*फेडोनिया स्वसुखा । श्रीगुरु वंदिला ॥५४॥*
*म्हणौनि शिष्य आणि गुरुनाथु । या दोहो शब्दांचा अर्थु ।*
*श्रीगुरुचि परी होतु । दोहों ठायी ॥६१॥*
*पहाता निरंजनीं निदेला । तो निर्विवाद येकला ।*
*परि चेता चेवविता जाहला । दोन्ही तोचि ॥६६॥*
*ऐसें करणियावीण । स्वयंभचि जें निवृत्तिपण ।*
*तयाचे श्रीचरण । वंदिले ऐसे ॥७९॥*
*आतां ज्ञानदेवु म्हणे । श्रीगुरु प्रमाणें येणें ।*
*फेडिली वाचा ऋणे । चौही वाचांची ॥८०॥*

(अमृतानुभव - सद्गुरुस्तवन- १, ३, ५, ८, १६, ५४, ६१, ६६, ७९, ८०)

सद्गुरु श्री निवृत्तिनाथांचे स्तवन करतांना श्री ज्ञाननाथांनी सद्गुरुचे प्रमाण, अर्थात योग्यता सर्व योगसाधकांना निरुपित केली आहे. सद्गुरु तोच की जो शिष्याला ठायीच सद्गुरुस्वरूपदशेस नेतो. अर्थात शिष्य आणि सद्गुरु यांचे अद्वैत साधत, पूर्ण ज्ञानअवस्थेस सिद्ध करतो. ज्ञान अवस्था ही वैखरी, मध्यमा, पश्यंती आणि परा वाणी या चत्वार वाच्यांच्या पलीकडे सच्चिदानंदस्वरूप अशी मनोस्वरूप अवस्था असते. सद्गुरु कसा असावा, त्याची कसोटी कोणती, शिष्याच्या साधनेसाठी सद्गुरु कसोटीस उतरणे आवश्यक असते, या सद्गुरुत्वाची अनुभूति कशी येते, सद्गुरुकृपेने सद्गुरुत्वसिद्धी शिष्याच्या ठायी कशी होते? सद्गुरु संकल्पना, सद्गुरु स्तवनाच्या निमित्ताने श्री ज्ञाननाथ निरुपित करतात.

**२.** सद्गुरुंच्या कृपेने ज्ञान प्राप्त झाल्यामुळे जीवनमुक्त अवस्थेपर्यंतचा प्रवास घडला. या प्रक्रियेमध्ये परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरीं या चार वाणींच्या माध्यमातून सद्गुरुमुखाने ही ज्ञानप्राप्ती झाली. वाणी स्वसंवेद्य अशा आत्मरूपाचा आविष्कार असतो. वाणीद्वारे जीव मोक्षपदापर्यंत जातो. ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर अर्थात जीवनमुक्त अवस्थेत वाणी सुद्धा आपल्या व्यक्त रूपाचा लय आत्मरूपात म्हणजे निर्गुण, निराकार, निविकारात करते. श्री निवृत्तिनाथ हे सद्गुरु श्री ज्ञाननाथ हे सत्‌शिष्य आणि ज्ञानाविष्कार करणारी वाणी हे तीनही घटक आत्मस्वरूपात, अविनाशी, निर्गुण, निराकार, निर्विकार अशा प्रकारे सच्चिदानंदस्वरूप होतात. म्हणूनच सद्गुरु स्तवनानंतर या चत्वार वाणीचे ऋण श्री ज्ञानेश्वर व्यक्त करतात व ऋण फेडण्यासाठी वाणी ज्यांच्या मुखातून ज्ञानाविष्कार करीत आहे; त्या सद्गुरुंनाच, वाणी ऋण फेडण्यासाठी वंदन करतात. श्री ज्ञाननाथ म्हणतात-

*येऱ्हवी परादिका चौघी । जीवमोक्षाच्या उपेगीं ।*
*अविद्येसवें आंगीं । वेंचती कीर ॥२॥*
*तेवीं अविद्येसवें । चौघीं वेंचती जीवें ।*
*तत्त्वज्ञानाचेनि नांवे । उठतीचि या ॥७॥*
*जें ज्ञान स्वयें बुडे । म्हणोनि भारी नावडे ।*
*ज्ञानें मोक्षु घडे । तें निमालेनि ॥२४॥*
*तें ऋणशेष वाचा इया । न फेडवेचि मरोनियां ।*
*तें पाया पडोनि मियां । सोडविलें ॥३२॥*
*म्हणोनि परा पश्यंति । मध्यमा हन भारती ।*
*या निस्तरलिया लागती । ज्ञानीं अज्ञानींचि ॥३३॥*

(अमृतानुभव - वाचाऋण परिहार- २, ७, २४, ३२, ३३)

**३.** चत्वार वाणींमुळे ज्ञान अज्ञान यांची जाणीव होते. अज्ञान फिटून ज्ञान प्रकटते हे सांगताना, श्री ज्ञाननाथ ज्ञानाज्ञान भेद स्पष्ट करतात- हा भेद स्पष्ट करतांनाच त्यांचा अनुबंधही स्पष्ट करतात-

*आतां अज्ञानाचेनि मारें । ज्ञान अभेदें वावरें ।*
*नीद साधोनि जागरें । नांदिजे जेवीं ॥१॥*
*जगी पोतासाचेनि मिसें । आपणपें जाळिलें जैसें ।*
*ज्ञाना अज्ञाननाशे । तैसें जाळें ॥५॥*
*तैसें पिऊनि अज्ञान । तंववरी वाढे ज्ञान ।*
*जंव आपुलें निधन । निःशेष साधे ॥१०॥*
*म्हणोनि ज्ञानें उजळे । कां अज्ञानें रुळे ।*
*तैसे नव्हे, निर्वाळे । ज्ञानमात्र जें ॥१७॥*
*तैसें असणें कां नसणें । हे कांहींच माणुसवाणें ।*
*नसोनि असणें । ठाये ठावो ॥३७॥*

(अमृतानुभव - ज्ञानाज्ञान भेद कथन - १, ५, १०, १७, ३७)

**४.** परमात्म्याचे वर्णन करतांना सत्, चित् आणि आनंद या तीन पदांचा आपण वेध घेतो. वास्तविक या तीन पदांचा परब्रह्माशी स्वरूप संबंध आहे हे लक्षात घेतले तर; या पदांवर भाष्य केल्याने परमात्मा, परब्रह्म याविषयी ज्ञान होईल असे नाही. सच्चिदानंद पदे जाणवली तर परब्रह्मच जाणवते. यासाठी संत

ज्ञाननाथ दृष्टांत देतात–

*कांति काठिण्य कनक । तिन्ही मिळोनि कनक एक ।*
*द्राव गोडी पीयुख । पीयुषचि जेवी ॥२॥*
*येऱ्हवीं सच्चिदानंदभेदे । चालिलीं तिन्ही पदें ।*
*परि तिन्ही उणी आनंदे । केली येणे (परब्रह्माने) ॥६॥*
*म्हणोनि सच्चित्सुख । हे बोल वस्तुवाचक ।*
*नव्हती हे शेष । विचाराचे ॥१९॥*
*तैसा सच्चिदानंद चोखटा । दाऊनि द्रष्ट्या द्रष्टा ।*
*तिन्हीं पदें लागतीं वाटा । मौनाचिया ॥२५॥*
*आतां यावरी जे बोलणें । तें येणेंचि बोले शहाणें ।*
*जैं मौनाचें ही निपटणें । पिऊनि गेलें ॥५३॥*

(अमृतानुभव – सच्चिदानंद पदत्रय विवरण – २, ६, १९, २५, ५३)

**५.** ज्ञानार्जन प्रक्रिया शब्दातून अर्थात भाषेतून घडते हे खरे, परंतु अमूर्त विषद करून सांगितले तरी; अशुभप्राप्ती झाली की शब्द आणि अर्थ दोन्ही विरून जातात. म्हणूनच ज्ञानमार्गावर शब्द हे साधन आहे हे स्पष्ट करीत श्री ज्ञाननाथ शब्द खंडन करतात. 'शब्द' या वस्तुचे महत्त्व सांगतांना श्री ज्ञाननाथ म्हणतात–

*बाप उपेगी वस्तु शब्दु । स्मरणदानी प्रसिद्धु ।*
*अमूर्ताचा विशदु । आरिसा नव्हे? ॥१॥*
*विधिनिषेधांचिया वाटा । दाविता हाचि दिवटा ।*
*बंधमोक्ष कळिकटां । शिष्टु हाचि ॥५॥*

शब्द खंडन करतांना मात्र शब्दांच्या मर्यादा, काल्पनिकता इ. दोष दाखवून श्री ज्ञाननाथ दृष्टांत देतात–

*अगस्तीचिया कौतुका । पुरती जरी मृगतृष्णिका ।*
*तरी मार देतों तर्का । अविद्येसी ॥२६॥*
*साहे बोलाची वळघी । ऐसी अविद्या असे जगीं ।*
*तरी जाळुं ना का जगी । गंधर्वनगरे ॥२७॥*
*मनोरथाचें परियळ । आरोगिजतु कां लक्ष वेळ ।*
*परि उपवासावेगळे । आनु आथी? ॥३३॥*

शब्द हे मायासृष्टी निर्माण करतात. अनुभव मात्र शब्दातीत असतो; याविषयी अनेक दृष्टांत देऊन, श्री ज्ञाननाथ म्हणतात–

*आणि आत्मा हन आत्मया । दाऊनी बोलू महिमेया ।*
*येईल हें साविया । विरुद्धचि ॥७५॥*
*म्हणोनि आत्मा आत्मलाभें । नांदऊनि शब्द शोभे ।*
*येईल ऐसा न लाभे । उमसुं घेतो ॥९५॥*

शब्दखंडन करतांना अखेरीस श्री ज्ञाननाथ म्हणतात –

*एवं शब्दैकजीवनें । बापुडीं ज्ञानें अज्ञानें ।*
*साचपणें वनें । चित्रांची जैसीं ॥१०२॥*
*या शब्दाचा निमाला । महाप्रलयो हो सरला ।*
*अभ्रासवें गेला । दुर्दिनु जैसा ॥१०३॥*

(अमृतानुभव – शब्द खंडन – १, ५, २६, २७, ३३, ७५, ९५, १०२ व १०३)

जीवनमुक्त दशेस जाता, शब्द ज्ञान लयास जाते. ही दशा अशी शब्दातीत आहे.

**६.** अज्ञान खंडन करतांना, श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, अज्ञान शोधू जाता ज्ञानच प्रकाशित झालेले असते. जीवनमुक्त दशा ही परिपूर्ण ज्ञानमय अवस्था असते. तेथे सच्चिदानंद अर्थात केवलानंद स्थिती निर्माण झालेली असते. त्यामुळे त्या अवस्थेत अज्ञान असणे शक्यच नाही. म्हणून श्री ज्ञाननाथ म्हणतात–

*आणि ज्ञान हे जें म्हणिजे । तें अज्ञानचि पां दुजें ।*
*येक लपऊनि दाविजे । येक नव्हे ॥६॥*

अज्ञानाचे वर्णन करतांना श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

*अज्ञान जेथ असावें । तेणें सर्व नेणे होआवें ।*
*ऐसी जाती स्वभावें । अज्ञानाची ॥९॥*
*स्वप्नी दिसे ते स्वप्न । मा देखता काय ज्ञान ।*
*तैसें कार्याचि अज्ञान । केवळ जरी ॥४९॥*
*एवं प्रत्येक्ष अनुमान । प्रमाणा भाजन ।*
*नहोनि जाले अज्ञान । अप्रमाण ॥५५॥*
*म्हणोनि अज्ञान अक्षरें । नुमसूं आता निदसुरें ।*
*परि आन येक स्फुरे । इयेविषयी ॥८५॥*

याप्रमाणे अज्ञानच अस्तित्वात नाही असा अनुभव अज्ञान शोधकाला येतो. कारण शोध हा ज्ञानप्रक्रिया असते. त्यामुळे प्रश्न पडतो–

*तया नांव अज्ञान ऐसें । तरी ज्ञान होवावे कैसें? ।*
*येऱ्हवी कांहींचि असे । आत्मा काई ॥१०१॥*

अज्ञानाचा शोध घेता अनुभव येतो तो असा–

*आतां सांगिजे ते केउतें । शब्दाचा संसारा नाहीं जेथे ।*
*दर्शना बीजें तेथे । जाणीव आणी ।।११९।।*

असा अनुभव घेतांना लक्षात येते–

*एवं ज्ञानाज्ञान मिठी । तेंही फांकतसे दिठी ।*
*दृश्यपणें ये भेटी । आपणपयां ।।१३१।।*

म्हणूनच आत्मानुभवाच्या ठिकाणी ज्ञानअज्ञान हे राहातच नाही. कारण आत्म्याच्या ठायी केवळ आनंदानुभवच असतो. त्यामुळे अज्ञान हा विषयच राहात नाही. श्री ज्ञाननाथ म्हणतात–

*तैसें पाहणें न पाहणें । पाहणेंपणेंचि हा नेणें ।*
*आणि दोन्ही हें येणे । स्वयेचि असिजे ।।१९७।।*

जीवनमुक्त स्थितीत आत्मस्वरूप अशी स्वयंप्रकाशी अवस्था असते तेथे त्या अवस्थेत –

*जेणें ज्ञान सज्ञान होये । ह्रङ्मात्र दृष्टीतें विये ।*
*प्रकाशाचा दिवो पाहे । प्रकाशासी ।।२७३।।*
*म्हणौनि जग ज्ञाने स्फितें । बोलता अज्ञानवादातें ।*
*विखुरली होती आतें । वाचेचिये ।।२७७।।*
*ना ज्ञानी अज्ञान जालें । तें होतांचि अज्ञान गेलें ।*
*पुढती ज्ञान येकलें । अज्ञान नाहीं ।।२८७।।*
*म्हणौनि अज्ञान सद्‌भावो । कोण्हे परी न लाहों ।*
*अज्ञान कीर वावो । पाहों ठेलियाही ।।२९३।।*

केवळ ज्ञान राहाते असे सांगतांना, अज्ञानच नसेल तर ज्ञान तरी कशास म्हणावयाचे; असा प्रश्न येतो. जीवनमुक्त अवस्थेत, आनंदोत्सव स्थितीत निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, सच्चिदानंदस्वरूप, स्वसंवेद्य असे आत्मरूपच असेल तर अज्ञानसापेक्ष ज्ञान तरी कसे असेल; असा प्रश्न उपस्थित होतो.

(अमृतानुभव – अज्ञान खंडन – ६९, ४९, ५५, ८५, १०१, ११९, १३१, १९७, २७३, २७७, २८७, २९३)

**७.** जीवनमुक्त दशेत अज्ञान असतच नाही मग ज्ञान तरी शब्द कसा राहील? असा प्रश्न उपस्थित करून; संत श्री ज्ञानेश्वर महाराज ज्ञान खंडन करतात– सद्‌गुरुंनी आम्हास स्वरूपस्थितीस नेले त्यामुळे अज्ञान, ज्ञान हे नावच राहिले नाही असे म्हणतांना–



*तैसे आमुचिनि नांवें । अज्ञानाचें ज्ञानही नव्हे ।*
*आम्हांलागीं गुरुदेवें । आम्हीच केलों ।।१।।*
*प्रगटो लपो न लाहो । येथें नाही नवलावो ।*
*परी कैसनिही विपावो । असणयाचा ।।७।।*

संत ज्ञानेश्वर महाराज ज्या स्थितीमध्ये अर्थात, जीवनमुक्त अशा परमात्मस्वरूप स्थितीमध्ये अज्ञान प्रकटूच शकत नाही तेथे ज्ञानाचे वर्म तरी कसे सांगता येईल. अज्ञान आणि ज्ञान परस्परांच्या सापेक्षतेने किंवा पार्श्वभूमीवरच विचारात येऊ शकते–

*म्हणोन अज्ञान नाहीं । तेथेंचि गेलें ज्ञानही ।*
*आता निमिषोन्मेषा दोहीं । ठेली वाट ।।१२।।*
*आणि जाणे तोचि नेणे । नेणे तोचि जाणे ।*
*आतां कें असे जिणें । ज्ञानज्ञाना? ।।१८।।*
*एवं ज्ञानाज्ञानें दोन्ही । पोटीं सूनि अहनी ।*
*उदैला चिद्‌गगनीं । चिदादित्यु हा ।।१९।।*

(अमृतानुभव – ज्ञान खंडन – १, ७, १२, १८, १९)

**८.** जीवनमुक्त दशेला जायचे तर योग्याला परमात्म्याशी अनुसंधान ठेवूनच साधना करावी लागते. हा परमात्मा सत्, चिद्, आनंदस्वरूप असून तो निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, महाशून्य, केवल, निज असा स्वसंवेद्य आत्मरूप आहे. तत्स्वरूप होणे म्हणजे जीवनमुक्त होणे होय. सद्‌गुरुकृपेने, सद्‌गुरुच्या सान्निध्यात, शब्दब्रह्माच्या चत्वार वाणीमुळे जीवनमुक्त स्वरूपांपर्यंतचे ज्ञान अर्थात संवेदन घडू शकते. त्यासाठी सद्‌गुरुकृपेनेच, सद्‌गुरुच्या सान्निध्यात, साधना करीत, ठायीच्या जीवदशेचा ठायीच निरांस घडवावा लागतो. स्थितप्रज्ञेने प्रकृतीच्या प्रचलन स्थितीगतीच्या प्रवाहात वावरावे लागते. ही साधना चत्वारवाणींच्या पलीकडे ठायीच भोगावयाची असते. जीवनमुक्त स्थिती म्हणजेच आनंदोत्सव अवस्था. ही अवस्था भोगतांना, पुरुष आणि प्रकृतीचेही ठायीच अद्वैत घडते. हे सांगतांना संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात– प्रत्यक्ष परमात्मा शिवही निरुपाधिक आहे. त्यातूनच पुरुषाचे प्राकट्य होऊन प्रकृतिप्रचलनस्वरूपात असंख्य रूपाने सृष्टीउपाधींचे अस्तित्व प्रकटते. परमात्म्यापर्यंत पोहोचतांना या गती किंवा प्रवाहाच्या उलटगतीने साधना घडत असते–

*ऐसी इयें निरुपाधिके । जगाची जियें जनकें ।*
*तिये वंदिली मियां मूळिके । देवोदेवी ।।१।।*

हे देवोदेवी निर्गुण, निराकार, निर्विकार असे सच्चिदानंदस्वरूप होण्याची नित्य साधना करीत असतात. कारण तेच त्यांचे मूळ स्वरूप आहे–

*जो प्रियुचि प्राणेश्वरी । उलथे आवडीचे सरोभरीं ।*
*चारुस्थळीं येकेहारी । एकांगाची ।।२।।*
*आवडीचेनि वेगें । येकयेकाते गिळिती अंगें ।*
*की द्वैताचिनि पांगे । उगळिते आहाती ।।३।।*

असा परमात्म्याचा पुरुषप्रकृतिविलास अनुभवत, जीवनमुक्तीपर्यंतची साधना करावी लागते. कारण–

*जें एकचि नव्हे एकसरे । दोघां दोनीपण नाहीं पुरें ।*
*काइ नेणों साकारें । स्वरूपें जियें ।।४।।*

या लीलेचे वैशिष्ट्य म्हणजे–

*आपुलिये आंगी संसारा । देखिलिया चराचरा ।*
*परि नेदितीचि तिसरा । झोंक लागो ।।७।।*

असे द्वैतलीला आणि अद्वैतलीला ठायीच घडत असते. यांसाठी संत ज्ञानेश्वर सूर्य आणि त्याची प्रभा यांचा दृष्टांत देऊन म्हणतात–

*जिये प्राणेश्वरीवीण । शिवीही शिवपण ।*
*थारों न शके ते आपण । शिवें घडली ।।२८।।*

ही स्थिती स्पष्ट करतांना माउली म्हणतात–

*जया दोघांच्या आलिंगनीं । विरोनि गेली दोन्ही ।*
*आघवियाचि रजनी । दिठीचिजे ।।४६।।*

द्वैत हरपून अद्वैत स्थिती निर्माण झाली की अवघा विलासात्मक उपाधींचा पसारा हरपतो. हीच सच्चिदानंद स्थिती होय! ही जीवनमुक्त स्थिती, समाधीसाधनेची परमावधी असते. सद्गुरुकृपेने आपण या जीवनमुक्त स्थितीचा अनुभवामृत प्राशन करीत आहोत म्हणूनच, ज्यांच्या ठायी शिवशक्ती समावेशनमधून घडलेले अनुभवास येत आहे अशा सद्गुरुकृपेने त्यांच्या ठायीच्या शिवशक्ती समावेशन स्वरूपाला, श्री ज्ञाननाथ नमन करतात. ते म्हणतात–

*शिवशक्ति समावेशें । नमन केलें म्या ऐसें ।*
*रंभागर्भ आकाशें । रिगाला जैसा ।।६४।।*

(अमृतानुभव – शिवशक्ति समावेशन – १, २, ३, ४, ७, २८, ४६, ६४)



९. जीवन्मुक्त स्वरूपाचे अनुभवन करणारे संत ज्ञाननाथ, समाधी योगमार्गावर मार्गक्रमण करणाऱ्या साधकांसाठी जीवनमुक्त दशेचा अनुभव सार्वत्रिक करतात. हेच माउली ज्ञानेश्वरांचे पांडुरंगावतारकार्य होय! जीवनमुक्त दशा कथन करतांना सहजच माउली उद्घोषणा करतात–

*आतां आमोद सुनास आले । श्रुतिसि श्रवण रिघाले ।*
*आरिसे उठले । लोचनेसी ।।१।।*

द्वैताद्वैताच्या पलीकडील जीवनमुक्त अवस्था दृष्टांतांच्या सहाय्याने कथन करतांना आपणच आनंदस्वरूप अर्थात आमोदस्वरूप झालो आहोतच हे स्पष्ट करतात. ते म्हणतात, कानच श्रुति झाले, लोचनच दृश्य झाले, तत्त्व आणि शक्ती, पुरुष आणि प्रकृतीचे द्वैत समावेशन होऊन; स्वरूपस्थिती निर्माण झाली. ते आणखी दृष्टांत देतात–

*आपुलेनि समीरपणे । वेल्हावती विंजणे ।*
*कीं माथेचि चांफेपणे । बहकताती ।।२।।*
*जिव्हा लोधली रसें । कमळ सूर्यपणें विकाशे ।*
*चकोरचि जैसे । चंद्रमा झाले ।।३।।*
*फुलेंचि जाली भ्रमर । तरुणीची झाली नर ।*
*जाले आपुलें शेजार । निद्राळुचि ।।४।।*
*दिठीवियाचा रवा । नागरू इया ठेवा ।*
*घडिला कां कोरिवां । परि जैसा ।।५।।*
*चूतांकूर झाले कोकिळ । आंगच झाले मलयानीळ ।*
*रस झाले सकळ । रसनावंत ।।६।।*

एकूण काय अनुभव, अनुभूती आणि अनुभवभोक्ता यांचेच अद्वैत होऊन स्वरूपस्थिती झाली. म्हणजेच भोगविषय, भोक्ता आणि भोगानुभूती यांचे समावेशनच झाले. ते म्हणतात–

*तैसें नवा नवा अनुभवी । वाजतां वाधावी*
*अप्रियेच्या गांवी । नेणिजे तें ।।९।।*

आत्मरूप ठायीच प्रकाशमान झाले. मुळात अक्रियात्मक आत्मरूपाच्या ठायीच त्याच आत्मरूपायोगे संपूर्ण वैविध्यपूर्ण अनुभूति घडविणारी प्रकृतीच समावेशित झालेली असल्याने अनुभवांची पृथकता, ज्ञानात्मकतेने आनंदस्वरूप झाली – म्हणून ही निजस्थिती –

*तैसे संबंधु होये न होये । तव इंद्रियांचें ते नव्हे ।*
*मग असतेंचि आहे । संबंधु ना ॥१७॥*

त्यामुळे उपाधींशी वैराग्यावस्था निर्माण होऊन निर्विकार ताटस्थाने आनंदमयता भोगणे सुरू झाले. म्हणजे तो योगीच परमात्मस्वरूप अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार झाला. मग त्याच्या ठायी उपाधी विचार तरी कसा प्रकटणार? –

*तैसा उदैलिया निर्विषयें । ज्ञानी विषयी हो लाहे? ।*
*तंव दोन्ही न होनी होये । काय नेणों ॥२५॥*

जीवनमुक्त दशेचे वर्णन करतांना म्हणतात, संत ज्ञानेश्वर महाराज अष्टांगयोगाने सिद्धीस जाऊन; जीवनमुक्त झालेल्या विभूतीपुढे, प्रत्यक्ष अष्टांगयोग दर्शन व साधना देखील दिवसाच्या चंद्राप्रमाणे निस्तेज होते. अर्थात ती साधना शास्त्रासह विरून जाते –

*प्रत्याहारादि अंगी । योगें आंग टेंकिलें योगी ।*
*तो जाला इये मार्गी । दिहाचा चांदु ॥२७॥*
*द्वैतदशेचें आंगण । अद्वैत वोळगे आपण ।*
*भेद तंव तंव दुण । अभेदासी ॥२९॥*

या योग्याच्या जीवनमुक्त दशेमध्ये –

*आठवु आणि विसरू । तयातेंही घेऊं नेदी पसरू ।*
*दशेचा वेव्हारू । असाधारणु ॥३३॥*
*झाला देवोचि भक्तु । ठावोचि झाला पंथु ।*
*होऊनि ठेला एकांतु । विश्वचि हे ॥३५॥*
*आतां देवातेंचि देवे । देववरी भजावें ।*
*अर्पणाचेनि नांवे । भलतीया ॥४१॥*

द्वैतातील भज्य-भक्त आणि भक्ती हे उपचारच नाहिसे होतात. कारण जीवनमुक्त दशा उपाधीरहित असते. देवच भक्त होतो किंवा भक्तच देव होतो अशा ठायीच परब्रह्म अवस्थेत उपाधी कशा राहणार? अशा जीवनमुक्त ठायी उपनिषदे, सुक्ते आदि निंदा स्तुती चर्चा असे शब्दजाल राहातच नाही. ठायीच शिवावस्था झालेली असते. मौनावस्था आपसुकच निर्माण झालेली असते–

*निफजे ना निमे । आंगे आंग घुमे ।*
*सुखा सुख उपमे । देव वेल यया ॥६०॥*

जीवनमुक्त स्थितीत प्रकृती आणि पुरुष यांची अवस्था वर्णन करतांना संत ज्ञानेश्वर माउली म्हणतात–



*अहो! अर्धनारीनटेश्वरें । गिळित गिळित परस्परें ।*
*ग्रहण झालं एकसरें । सर्वग्रासे ॥६३॥*

परस्परच अद्वैत होत – निर्गुण, निराकार, निर्विकार, सच्चिदानंदस्वरूप होतात. श्री ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

*शिवाशिवा । समर्थ स्वामी । येवढीये आनंदभूमि ।*
*घेपे दीजे एकें आम्हीं । ऐसे केलें ॥६५॥*
*चेतचि मा चेतविलें । निदैलेंचि मा निदवलें ।*
*आम्हीचि आम्हा आणिलें । नवल जी तुझें ॥६६॥*

ठायीच अनुभूत होणाऱ्या जीवनमुक्त दशेचे अवघे श्रेय श्री ज्ञानेश्वर महाराज, सद्गुरु निवृत्तीनाथांना देतात. त्यावर श्री सद्गुरु निवृत्तीनाथही समाधानी होतात. तथापि श्री ज्ञानेश्वर श्रेय देतांना म्हणतात–

*किंबहुना ये दातारा । मी तूं याचा संसारा ।*
*वेचोनि होसि सोयरा । तेणेंचि तोषे ॥७१॥*

जीवनमुक्त दशेचे वर्णन, अर्थात अमृतानुभवाचे वर्णन आपण करू शकलो ते केवळ सद्गुरुकृपेनेच होय. आपल्याला हे सच्चिदानंद सुख सद्गुरुकृपेने अपसुकच लाभले आहे –

*मणोनि हे असंवर्य दैविकेचें औदार्य ।*
*वांचोनि स्वातंतर्य । माझे नाही ॥६॥*
*आणि हा येवढा ऐसा । परिहारू देवू कायसा ।*
*प्रभुप्रभाव विन्यासा । आड ठावूनी ॥७॥*

(अमृतानुभव – जीवनमुक्त दशा कथन – १ ते ६, ९, १७, २५, २७, २९, ३३, ३५, ४१, ६३, ६५, ६६ व ७१)

श्री गुरुकृपेने हे समाधीधन अर्थात समाधीसाधनेची परमावधी साधता आली. जेथे शब्दादि साऱ्याच उपाधी अंतर्धान पावतात; अशी जीवनमुक्त दशा अनुभवता आली. असे असूनही समस्त साधकांसाठी या दशेचे वर्णन ग्रंथरूपाने करता आले, ते सद्गुरुकृपेचे वैभव होय. संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात–

*आम्हीं बोलिलों जें काहीं । तें प्रगटची असे ठायीं ।*
*मा स्वयंप्रकाशा काई । प्रकाशावे बोलें? ॥८॥*

प्रत्येक क्षणाला, जीवनमुक्त दशेठायी नाविन्यपूर्ण अनुभूती येते तरी सामान्यतः या दशेचे स्वरूप कसे असते; ते आपण निवेदिले आहे, असे श्री ज्ञानदेव महाराज म्हणतात–

*पढियंतें सदा तेंचि । परी भोगीं नवी नवी रूची ।*
*म्हणोनि हा उचितचि । अनुवाद सिद्ध ।।१३।।*
*या कारणें मियां । गौप्य दाविलें बोलुनियां ।*
*ऐसें नाहीं आपसया । प्रकाशुचि ।।१४।।*

या गौप्यस्फोटामुळे -

*ज्ञानदेवो म्हणे श्रीमंत । हें अनुभवामृत ।*
*सेंवोनि जीवन्मुक्त । हेंचि होतु ।।१९।।*

हा अनुभव अगदीच वेगळा असल्याचे सांगतांना श्री ज्ञानदेव महाराज म्हणतात-

*आणि मुक्त, मुमुक्षु बद्ध । हें तंववरी योग्यता भेद ।*
*अनुभवामृत स्वाद । विरुद्ध जंव ।।२५।।*
*म्हणोनि ज्ञानदेवो म्हणे । अनुभवामृते येणें ।*
*सणु भोगिजे सणें । विश्वाचेनि ।।३१।।*

(अनुभवामृत - ग्रंथ परिहार - ६, ७, ८, १३, १४, १९, २५, ३१)

अनुभवांमृतातील अमृतानुभव स्पष्ट करून सांगण्याचे, अतिमहत्त्वाचे कार्य संत माउली ज्ञानदेवांनी करून; राजयोग तथा अष्टांगयोग तथा योगमार्गाचे अंतिम ध्येय कोणते असते हे तर स्पष्ट केले. हे ध्येय म्हणजे जीवनमुक्त दशा प्राप्त होणे; अर्थात द्वैताद्वैतापलीकडील सच्चिदानंद दशा प्राप्त करून देणे होय. समाधीसाधना ही एकप्रकारे पुरुषोत्तम योगातील मूळाकडे जाण्याचा उलट प्रवास आहे. म्हणूनच ती अतिशय खडतर साधना आहे. साधकाला गुरुकृपेने साधना अवलंबावी लागते. या साधनेची परमावधी म्हणजे जीवनमुक्त दशा होय! पुरुष आणि प्रकृति यांच्यामुळे निर्माण झालेल्या अतिव्यापक अर्थात सर्वव्यापक अशा उपाधींच्या पसाऱ्यातून, प्रकृतीच्या उत्पत्ति, स्थिती, लय, पुनरुत्पत्ती या चक्रनेमिक्रमाच्या पलीकडे पोचावयाचे असते. वासना देहाला या साधनेत मोठाच संघर्ष करावा लागतो. जीवात्मा हा अहंकार नष्ट करून; ठायीच्या आत्मरूपाला परमात्मस्वरूप व्हावे लागते. येथवरच्या प्रवासात मनाला आत्मसंयम साधावा लागतो. शब्दब्रह्माचा वाचायुक्त पसारा, ज्ञानाज्ञानभेद, शब्द, अज्ञान, ज्ञान या सर्व गोष्टींच्या मायाजालातून पार व्हावे लागते. या भवसागरातून सद्‌गुरुकृपेने, निकराने, आत्मसंयमाने, पंचीकरणाच्या पलीकडे जाण्याची साधना करावी लागते. ठायीची मनोवस्था - आत्मावस्था आणि तत्त्वस्वरूप परब्रह्मावस्था यांचे स्वरूप साधावे लागते. अशा मनोस्वरूपाने, निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, महाशून्य, निज, केवल तरी स्वसंवेद्य आत्मरूपाचे सच्चिदानंदस्वरूप ठायीच प्रकटविण्याचा



अभ्यास करावयाचा असतो. अशी जीवनमुक्त दशा या सृष्टीपसाऱ्यात केवळ नरदेहालाच सद्‌गुरुकृपेने अनुभवणे शक्य आहे. असे नरदेहाचे असामान्यत्व संत ज्ञानेश्वर माउली करतात. ठायीच्या जीवनमुक्त दशेचे वर्णन अमृतानुभव या ग्रंथरूपाने श्री निवृत्तीनाथांच्या कृपेने घडवून, नराचे 'अहं ब्रह्मः अस्मि' हे स्वरूप उघड करतात!

* * *

# श्री संत शेखमहंमद महाराज श्रीगोंदेकर कृत योगसंग्राम : सोहं सिद्धी प्रक्रिया (राजयोग) (समाधीसाधना) स्पष्ट करणारा ग्रंथ

श्री संत शेखमहंमद महाराज श्रीगोंदेकर कृत 'योगसंग्राम' हा, समाधीयोग साधना, राजयोग साधना अर्थात सोहं सिद्धी साधना प्रक्रिया उलगडून सांगणारा ग्रंथ होय. श्री ज्ञानेश्वर उत्तरकालीन आणि श्री एकनाथ समकालीन, समाधीयोगावरील, हिंदू आणि सुफी तथा मुस्लिमांसाठी अतिशय महत्त्वाचा असा हा ग्रंथ होय. श्री संत शेख महंमदांनी शके १५६७ ते १६१८ या अवधीत 'योगसंग्राम' हा ग्रंथ परिपूर्ण केला असावा. शके आणि इ.स. याविषयी मतभेद आढळतात. डॉ. रा. चिं. ढेरे संपादित 'योगसंग्राम'च्या प्रस्तावनेत, 'या ग्रंथाची रचना श्रावण शु. १५ शके १५६७ सोमवार (पार्थिव नाम संवत्सर) या दिवशी सांगता पावली' असे नमूद केले आहे. वेगवेगळ्या नोंदीच्या आधाराने संपादन करतांना, संपादकीयमध्ये तथा प्रस्तावनेत, मी, शके १६१८ मध्ये 'योगसंग्राम लिहून पूर्ण झाला' असे नोंदविले आहे. श्री संत शेखमहंमदांनी योगसंग्रामातील प्रसंगांच्या लेखन नोंदी करून, ग्रंथ एकत्रित मांडला असावा असे मानता येते.

**१) 'योगसंग्राम'च्या आवृत्त्या :–**

'योगसंग्राम' हा ग्रंथ १८ प्रसंगात (अध्यायात), २३०१ ते २३१९ ओव्यांचा आहे. ओवीसंख्येविषयीही वेगवेगळ्या नोंदी आढळतात. या ग्रंथाच्या आवृत्त्यांची नोंद पुढीलप्रमाणे दिसते– (१) 'योगसंग्राम' शेखमहंमद संग्रह, श्रीगोंदे, इ.स. १७५० नक्कल. (२) 'योगसंग्राम'– संपादक शिवराम सीताराम वागळे, प्रकाशक– इंडियन प्रिटींग प्रेस, गिरगाव शके १८८५. (३) प्रकाशित मूळ प्रत इ.स. १६९६ ची, द्वितीय प्रकाशन, रामतत्त्व प्रकाश प्रेस बेळगाव, इ.स. दिसत नाही.



(४) 'योगसंग्राम' तृतीय प्रकाशन, दामोदर सावळाराम आणि मंडळी, मुंबई. (५) 'योगसंग्राम' ८, ९, १३, १४, १५, १६ व १८ अध्याय पूर्ण व १०, ११ व १२ अपूर्ण – रावळबाबा मठ, संग्रह श्रीगोंदे प्रत, शेवटची दोन पाने इ.स. १७५५ नंतरची असावीत. परंतु इतर लेखनकाल १७५५ इ.स.चे. (६) 'योगसंग्राम' १७ वा अध्याय पूर्ण, भारतीय इतिहास संशोधन मंडळ संग्रह इ.स. १८२० नंतरची नक्कल. (७) 'योगसंग्राम' बडोदे ओरिएंटल इन्स्टिट्यूट सेंट्रल लायब्ररी बडोदे बाडांक प्रत इ.स. १७९३. (८) श्री. भावे यांनी प्रकाशित केलेल्या व आवृत्तीवरून डॉ. ढेरे यांनी प्रकाशित केलेल्या वरदा बुक्स पुणे १६ – १९८१ च्या आवृत्तीसह त्यांनी काही नोंदी केल्या आहेत. त्यानुसार. (९) 'योगसंग्राम' संपा. वा. सी. बेंद्रे, प्रकाशक– पी. पी. एच. बुक स्टॉल, मुंबई ४, इ.स. १९५९ आणि (१०) 'योगसंग्राम' : संपा. डॉ. अनिल नागेश सहस्रबुद्धे, प्रकाशक, अध्यक्ष व सभासद– श्री संत शेखमहंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठान व ग्रामस्थ, श्रीगोंदा, जि. अहमदनगर. यातील डॉ. सहस्रबुद्धे यांच्या नोंदींव्यतिरिक्त अन्य नोंदी, डॉ. सहस्रबुद्धे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. केलेल्या डॉ. भीमा मोदळे यांच्या प्रबंधात आहेतच. त्याशिवाय (११) श्रीगोंदे येथील प्रकाशक सुभाष वीरचंद देसाई यांनी वीरचंद दलीचंद यांच्या प्रस्तावनेसह १५.२.९३ रोजी 'योगसंग्राम' या ग्रंथाची दुसरी आवृत्ती प्रसिद्ध केली आहे. अशा एकूण ११ नोंदी 'योगसंग्राम'च्या संपादित प्रतींच्या मिळतात.

**२) संत शेखमहंमदांचे वाङ्मय :–**

'योगसंग्राम' या समाधी साधनेविषयीच्या ग्रंथाव्यतिरिक्त जनसामान्यांसाठी स्वतंत्र उपयुक्त असे लेखन या संत शेखमहंमदांनी केले आहे. त्यांच्या नावावरील ग्रंथसंपदा अशी– (१) योगसंग्राम (२) पवन विजय (३) निष्कलंक प्रबोध (४) गायका (५) मदालसा (६) साठी संवत्सर (७) अभंग व स्फूटरचना (८) हिंदुस्थानी कविता आणि (९) ज्ञानसागर – या अनुपलब्ध ग्रंथाची नोंद सापडते. या ग्रंथसंपदेचे यथायोग्य पुनर्संपादन तथा प्रकाशन करण्याचे कार्य 'श्री शेखमहंमद महाराज देवस्थान उत्सव प्रतिष्ठान व ग्रामस्थ, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर' या संस्थेने, (१) योगसंग्राम (सार्थ)– संपा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे (२) श्री संत शेखमहंमद महाराज कृत, अभंगवाणी (सार्थ), संपा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे व डॉ. यु. म. पठाण (३) पवनविजय, निष्कलंक प्रबोध, गायका, मदालसा, हिंदुस्थानी कविता– असे लेखन एकत्रित मिळावे म्हणून – श्री संत शेखमहंमद यांची अमृतवाणी, संपा. डॉ यु. म. पठाण, अशा तीन ग्रंथांच्या स्वरूपात केलेले

आहे. साठीसंवत्सरची फोटोकॉपी डॉ. भीमा मोदळे यांच्या टंकलिखित प्रबंधात जोडली आहे.

**३) गुरुपरंपरा :–**

संत शेखमहंमदांची गुरुपरंपरा सांगताना, चाँद बोधले असे सुफी परंपरेने सांगितले जाते. तथापि संतयोगी परंपरेनुसार, सद्गुरु चंद्रभट बोधले हे संत शेखमहंमदांचे गुरू होत. जनार्दन स्वामींना आणि संत शेखमहंमद यांना त्यांनी गुरुपदेश केला. सद्गुरु चंद्रभट बोधले यांनी दत्तसंप्रदायाची धुरा सांभाळली होती. श्री ज्ञानेश्वरी आणि भागवत ग्रंथाचा अभ्यास या दोन्ही शिष्यांकडून त्यांनीच करवून घेतला. एवढेच नव्हे तर श्री जनार्दनस्वामींचे शिष्य संत एकनाथ यांचा भागवत ग्रंथ तथा भावार्थ रामायण ग्रंथ सद्गुरु चंद्रभट बोधले यांनी पाहिला होता, अशी नोंद आढळते. सुफी गुरुपरंपरा ही अभिनिवेशाने आली असली तरी; वेदोपनिषदे, ब्रह्मसूत्रे व श्रीमद्भगवद्गीता या प्रस्थानत्रयींचा तसेच श्रीमद्भागवताची परंपरा सांभाळणारे, भागवत आणि दत्त संप्रदायाच्या परंपरेतील विभूतिमत्त्व म्हणूनच श्री चंद्रम्भट बोधले हे सद्गुरु होत. 'संत शेखमहंमद' या चरित्रग्रंथात मी याविषयी सविस्तर लिहिले आहे.

**४) 'योगसंग्राम'चे स्वरूप :–**

येथे आपण समाधीयोग अर्थात राजयोग मार्गे सोऽहम सिद्धी स्पष्ट करून सांगण्यासाठीच लिहिलेल्या 'योगसंग्राम' या ग्रंथाचा परिचय करून घेत आहोत.

**(i) ग्रंथनाम –** 'योगसंग्राम' हे योगदुर्गाचे सांगरूपक आहे. बहुधा श्री ज्ञानेश्वरीच्या प्रभावाने हे घडले आहे. श्री ज्ञानेश्वरीत बाराव्या अध्यायात योगदुर्गाचे सांग रूपक (ओ. ४६ ते ४८) आलेले आहे. त्याचबरोबर नवव्या अध्यायात योगसंग्रामाचे रूपक (ओ. २११ ते २१७) आहे. एकनाथांनी भागवत टीकेत (अ. ९–१२० ते १४२) योगदुर्ग जिंकण्यासाठी होणारा योगसंग्राम, श्री ज्ञानेश्वरांच्या संस्कारातूनच मांडला आहे. संत शेखमहंमद यांनी सद्गुरु चंद्रभट बोधले यांच्या कृपेने श्री ज्ञानेश्वरींचे परिशीलन केले होते. तसेच गुरुबंधू श्री जनार्दनस्वामी यांचे शिष्य संत एकनाथ यांची भागवतटिकाही पाहिली होती. स्वाभाविकपणे समाधीयोगावर समग्र ग्रंथ लिहितांना संत शेखमहंमदांनी आपल्या ग्रंथाला 'योगसंग्राम' असे नाव देऊन सांगरूपकाचा उपयोग करीत आपला ग्रंथ आकारला हे उघड आहे.

**(ii) सांगरूपक व साधना शास्त्र –** सांगरूपकाचे स्वरूप पाहता; आत्मा हा योद्धा आहे. त्याने मनाच्या वारूवर (अश्वावर) आरूढ होऊन; अहंकाराशी युद्ध मांडले आहे. देहभाव हा दुर्ग सर करून; अद्वैत अर्थात समाधीयोग साधायचा आहे.



देहभावाच्या ठायीच्या संकल्प-विकल्प, काम–क्रोधादि षड्रिपू, आळस आदि अवगुण यांनी उन्मत्त झालेल्या अहंकाराच्या सैन्याशी संग्राम करावयाचा आहे. आत्म्याने ब्रह्मांडशिखर अर्थात ब्रह्मांडजनिता किंवा कारण असे परमात्मास्वरूप गाठले अर्थात समाधीसिद्ध झाली, अर्थात अद्वैत साधले की हा योगसंग्राम संपतो. समाधी साधनेकरिताचे हे सांगरूपक स्पष्टपणे १ ते ४ आणि १७ व १८ व्या संग्राम प्रसंगात आले आहे. म्हणजे या सहा अध्यायात स्पष्टपणे राजयोग साधना किंवा समाधी साधना शास्त्र मांडले आहे. ही साधना करण्यासाठी साधकाला आत्मसंयम साधावा लागेल म्हणजे, संग्रामासाठी योद्ध्याला सिद्ध करावे लागेल. याविषयीची तयारी ५ ते १६ अशा १२ प्रसंगात, इष्टानिष्ट आचारप्रबोध परखडपणे करीत; साधनेला पोषक असे प्रबोधन, उपदेश अशा स्वरूपाचे लेखन केले आहे. सांगरूपक असे म्हटले असले तरी संत शेखमहंमदांच्या मांडणीत शास्त्रशुद्ध क्रमबद्धता नाही. उद्देश समाधीयोगविषयक ज्ञान प्रसृति असला तरी; पाखांडखंडन, हिंदु–मुस्लिमांच्या अनाचार, दंभाचार यांवर सडकून टीका करीत आचारपद्धतीवर ताशेरे ओढत, जमेल तशी प्रबोधक कीर्तनकाराप्रमाणे किंवा समाजसुधारकाप्रमाणे मांडणी केली आहे. विवेकाने जे जाणले, अनुभवले ते चिंतनात्मकतेने मांडले. असे एकूण लेखनाचे स्वरूप आहे.

**(iii) रचनाबंध व भाषा –** ओवी ह्या छंदाचा मुक्तपणे वापर करीत, प्रसंग अर्थात संग्राम प्रसंग असे अध्यायाला संबोधित. श्री ज्ञानेश्वरी या भगवद्गीता योगशास्त्रावरील अठरा अध्यायातील विषयमांडणीप्रमाणे अठरा प्रसंगांचा 'योगसंग्राम' ग्रंथ सिद्ध केला आहे. हिंदु–मुस्लिम (सुफी) ग्रंथलेखन परंपरांचे एकत्रित दर्शन येथे कळत–नकळत घडते. मात्र हा ग्रंथ श्री ज्ञानेश्वरी आणि भागवताची परंपरा अवलंबितो असे स्पष्ट जाणवते.

मांडणी आणि भाषेचा विचार करता श्री ज्ञानेश्वर, श्री एकनाथ यांच्या ग्रंथमांडणीप्रमाणे, गणेशादि देवता, ॐकार यांना नमन करून, सद्गुरुला वंदन करून, प्रसंगलेखनाची सुरुवात होते. प्रसंगातील विषयाचा निर्देशही होतो. ग्रंथलेखनासाठी पारंपरिक मराठी भाषेचा वापर करीत असतांनाच उर्दू भाषा किंवा दखनी भाषेचा वापर संत शेखमहंमद करतांना दिसतात – सतराव्या प्रसंगाची सुरुवात या दृष्टीने लक्षणीय आहे.

*श्रीगणेशाय नमः । जल्लेजला लहु अल्ला गनि प्यारा ।*
*जय जय जी जयवंत नरा ।*
*विश्वव्यापक निज परमेश्वरा रहिमान साचा ।।१।।*

*अव्वल समजो एक बिस्मिल्ला । मग सहस्त्रनामे विश्व व्यापला ।*
*बंदगी करो छोडो गलबला । सद्‌गुरु सेवूनिया ।।२।।*

अर्थातच सनातन भारतीय परंपरा आणि सुफी परंपरा यांचा समन्वय संत शेखमहंमद साधतात. गुरुसान्निध्यातील आणि ग्रंथपरिशिलनातील भाषा आणि मुस्लिम सुफी परंपरेतील घरातली आणि सहवासात आलेल्या सुफी संतांची भाषा यांचा हा परिणाम आहे.

'योगसंग्राम' अर्थात ब्रह्मविद्या, योगशास्त्र मांडतांना भारतीय परंपरेतील सद्‌गुरु चंद्रभट बोधले, संत ज्ञानेश्वर यांच्याकडून अवगत झालेली परिभाषाच ते वापरतात. उदा.

*पूर्व दिशा पाठीशी घेऊन । मग चाललो आधारीहून ।*
*ब्रह्म्यास भेटलो जाऊन । स्वाधिष्ठानी ।।* प्र. १७-५९।।

संत शेखमहंमद दुचेष्मा या स्पुटात म्हणतात, ज्ञान एकच आहे. फरक भाषेचा आहे. आपल्या भोवतीचे साधक लक्षात घेऊन त्यांनी भाषा समन्वय साधला आहे.

येथे आपण योगसंग्रामासाठीची तयारी घडविणारे ५ ते १६ असे १२ प्रसंग समजावून घेऊन नंतर १ ते ४ व १७ व १८ असे सहा प्रसंग समजावून घेणार आहोत.

**(iv) 'योगसंग्राम' – आशयस्वरूप–**

**अ) संग्राम तयारी प्रसंग ५ ते १६ –**

११६ ओव्यांच्या पाचव्या प्रसंगात (अध्याय) राजयोग शास्त्राचे ज्ञान सद्‌गुरुंशी एकरूप झाल्याने अपसूक लाभते असे सांगून; सद्‌गुरु आणि सत्‌शिष्य यांचे ऐक्य साधण्यात अनेक अडथळे असतात, याविषयी सावध केले आहे. गुरू पारखून घ्यावा. पाखंडी गुरू किंवा विविध पंथांचे दुराभिमानी गुरू वितंड करतात. संत शेखमहंमद आचार्य, संन्यासी, फकीर, मुलाणी, ब्राह्मण यांची गुणात्मकता स्पष्ट करतात. उदा.–

*जैसा बारा वर्षा जन्मला व्याघ्र । तैसी साधुसज्जनांची तुटार ।*
*अभक्तास जन्म असंख्यात विस्तार । विष्ठेत जीव जैसे ।।१७।।*

अशी सद्‌गुरुंची आणि सत्‌शिष्याची गुणात्मकता स्पष्ट करतांना ते दृष्टांत देतात–

*तप्त लोहन्याये तो सद्‌गुरु जाण । पाणी जिरे तैसे शिष्याचे लक्षण ।*
*ऐसे पाहिजे गुरुसि जिरालेपण तया नाव सत्‌शिष्य ।।४६।।*



'सोहं' अनुभव घ्यायचा असेल तर वितंड सोडला पाहिजे. असे सांगून संत शेखमहंमद या अध्यायात कुंडलिनी जागृतीची क्रमवार अवस्था (ओ. ८७ ते ९०) स्पष्ट करतांना; गुरु-शिष्यांविषयीच्या गुणदोषांची परखडपणे चर्चा करतात –

*चवदा पंथ आचार्य सोफी खरा । आपल्याच मार्गा म्हणवी बरा ।*
*आणिकांते निखंदुनी करी तोरा । त्याचे ज्ञान मिथ्या असे ।।१००।।*

स्वतःच्या पंथाचा तोरा मिरविणे योग्य नाही. असे दूरभिमानी मिथ्या ज्ञान प्रसृत करतात असे सांगून,

*स्वये अंतरी झुंझोन झुंजल्याची कीर्ती ।*
*कोठे ऐकिली देखिली नव्हती ।*
*हे मज अनसुट संधि गवसली पूर्ती ।*
*स्वये कीर्तोन कीर्ति कीर्तविया ।।१११।।*

असे स्पष्ट करीत आपण स्वानुभवाने ही चर्चा करीत आहोत असे शेखमहंमद स्पष्ट करतात.

१२१ ओव्यांच्या सहाव्या प्रसंगात – (अध्याय) सद्‌गुरुंचा आविष्कार ॐकारातून झाला असे स्पष्ट करीत, ॐकाराचा विचार विविध अक्षरे, विविध भाषा यांतून कसा झाला आहे याचे वर्णन करून; शब्दब्रह्माविषयी विवेचन केले आहे. शब्दांचा सदुपयोग करण्याचा प्रबोध येथे केला आहे. संत शेखमहंमद म्हणतात–

*श्रीगणेशाय नमः । ॐ नमोजी अक्षर बावन मातृकासी ।*
*निराकार गवसिले सहजेसी । मग आकार मांडिले निर शून्यासी ।*
*संस्कार छपन्न भाषा ।।१।।*

शब्दसामर्थ्याबरोबरच मंत्रसामर्थ्याचाही बोध संत शेखमहंमद करतात. शब्दशक्ति सद्‌गुरुकृपेशिवाय ज्ञात होणे शक्य नाही याकडेही ते लक्ष वेधतात.

*सुशब्द निज कल्पतरुचे फळ । अपशब्द महा दुःखाचे ढिसाळ ।*
*शब्द ॐकाराचे स्वये कल्लोळ । शुभ अशुभ वाटती ।।७४।।*

ते पुढे म्हणतात–

*शब्द बोलता बंदिखाने फुटती । शब्द बोलता मोकळे ते गुंतती ।*
*एका शब्दे ब्रह्मादिक मानवती । घरास येऊनिया ।।८६।।*

याच प्रसंगात प्रकृतिपुरुषविषयक चर्चा केली आहे.

*प्रकृतिपुरुषाचे अंगसंगे ऐका । सवेगे विकासल्या अष्ट नायिका ।*
*त्या सांगतो ऐकावे उन्मेखा । श्रोती ज्ञातेपणे ।।१००।।*

प्रसंगाच्या अखेरी चर्चा करतांना, नरदेहाचा सदुपयोग करावा अन्यथा देहवासनेने आयुष्य व्यर्थ जाईल असे स्पष्ट करून; सद्गुरु आणि शब्दांचा सदुपयोग याविषयाने व्याख्यानाची सांगता करतात.

१०० ओव्यांच्या सातव्या प्रसंगात (अध्यायात) निर्गुण भक्तीचे रहस्य, अद्वैत मार्गावर अर्थात समाधी साधनेत; रिद्धी, सिद्धी, मुक्ती, वैकुंठ या कल्पनेमध्ये अडकलेले लोक मुख्य निजरुप विसरतात आणि जन्ममरणाच्या फेऱ्यात अडकतात, याविषयी चर्चा करून सावध केले आहे. सद्गुरुकृपेने, निर्गुणाशी एकरूप होऊन, अद्वैत साधनेने अजन्मा व्हावे असा बोध केला आहे. ते म्हणतात–

*शेख महंमद सांगे ईश्वर सौभाग्य । नवखंड पृथ्वी जयाचा भोग ।*
*अनेक चौदा भुवनी उपभोग । करूनी अकर्ता माळी ।।४२।।*
*जैसे मळ्याचे रूप करी माळी । मग तो पावे सकळ नव्हाळी ।*
*तैसे तुझे रूप केलिया नव्हाली।मुक्ति, रिद्धी, सिद्धी ओळंगती ।।९१।।*

– अद्वैत बोधाने अर्थात समाधी सिद्धीने खरी जीवनमुक्तता मिळते याविषयी संत शेखमहंमद निर्णय देतात–

*शेख महंमदी संतोष सद्गुरु खुणे ।*
*सत्यस्वामि जेव्हा लागली होती पाने ।*
*तेव्हा धावा केला अद्वैत बोधाने ।*
*मग झेंडू फूटोन गेला ।।९९।।*

वैकुंठादि कल्पनारूपी पाने (भुजंग) यांनी विळखा घातलेला असतांना, सद्गुरुकृपेने अद्वैत बोध साधना केली. त्यामुळे झेंडू (देह) फुटून, जीवनमुक्त होता येते.

१०० ओव्यांच्या आठव्या प्रसंगात (अध्यायात) संतपरंपरेतील संतांप्रमाणे पाखांडखंडन करून आचारबोध केला आहे. निर्गुणाचे सोवळेपण विचार घेण्याचा प्रबोध केला आहे–

*जैसे स्तन चुकोन करडे । अजा गळा चोखिती वाढेकोडे ।*
*तैसे पंडित झाले असती वेडे । निजबोधा चुकोनिया ।।१३।।*
*कडी आंगठ्या असोनि थोटा । जो पवित्रास दान नेदी करंटा ।*
*अनाचरी भजे उन्मत्त खोटा । तो वाचेस न यावा ।।४२।।*
*जो दांभिक करी भजन । तो अद्यापवरी न होय पावन ।*
*जैसे कानड्याच्या प्रेतालागुन । दांभिके गौरविले ।।६६।।*
*सर्व अलंकार करून वेश्या । उन्मत्त अविचारा दाविती कैशा ।*
*तैसे दांभिक दांभिका परियेसा । वित्पत्ति दाऊ पाहे ।।७४।।*



असा परोपरीने दंभस्फोट करून–

*निर्गुणा तुझे सगुणाकार । मजसी वोवळे न दिसे साचार ।*
*बाहिर अभ्यंतर स्वरूप साक्षात्कार । दिसे भासे मीपणाविण ।।८५।।*

वासना देहाहंकाराने निर्गुणाला पारखे होतात आणि व्यर्थ सोवळ्यावोवळ्यांचे प्रदर्शन करीत मिरवितात. हे संत शेखमहंमदांनी स्पष्ट केले आहे.

१०९ ओव्यांच्या नवव्या प्रसंगात (अध्यायात) ईश्वराचे निर्गुणत्व सिद्ध करण्यासाठी ईश्वराचे अनेक लटके दोष चातुर्याने वर्णन केले आहेत. त्यासाठी देवाशी लटके भांडणही मांडले आहे. ग्रह, तारे, नक्षत्र यांच्या फेऱ्यांचा अर्थ सांगून निर्गुणाची प्रपंचलीला उलगडून दाखविली आहे. सोहं विचार स्पष्ट करतांना परमार्थ अर्थात समाधी साधना हा सुदृढ शरीराचा विषय आहे हे स्पष्ट केले आहे. मानवी वर्तनातील अवलक्षणे, सुलक्षणे, व्यभिचार, पातिव्रत्य आणि सुवर्तनाचा विचार मांडला आहे. भेदाभेद निर्गुणाठायी नसतो हे सांगून वृत्तीने निर्गुण भजनी लागावे असे संत शेखमहंमद सुचवितात. ईश्वराचे दोष दाखवितांना ते म्हणतात–

*मखमालिची पुष्प असती चंदना । तरी तुझे कर्तव्य थोर गा निर्गुणा ।*
*समुद्र सांडवता खारेपणा । तरी तुझा इन्साफ ।।१९।।*

ते पुढे सांगतात–

*निर्गुणा चवदा भुवने तुझ्या कटी । ती भक्ती साठविला ह्रदय संपुटी ।*
*आता हार पतकरि उगा शेवटी । मजसी पुरी न पडे तुझी ।।३४।।*

लक्षणे सांगतांना ते म्हणतात–

*चतुर म्हणविती आपुले ठायी । स्वहिताविण झकले वाई ।*
*सच्चिद श्री निर्गुणाचे ठायी भाव प्रेमे न लाविती ।।८३।।*
*कस्तुरी देखोन राजाच्या भाळा । दुर्बळे लाविला बिबव्याचा टिळा ।*
*चिडोन डाग पडला कपाळा । बिबव्यास दुषू नये ।।९२।।*

सद्भक्ताची विनवणी मांडतांना–

*मज ऐसे चिंतिले पाविजे ईश्वरा । प्रेमबोधे भजन करीन दातारा ।*
*जाळीन अविद्याच्या अनाचारा । सद्गुरु स्वामी सेऊनिया ।।१०४।।*

९५ ओव्यांच्या दहाव्या प्रसंगात (अध्यायात) भवसागरातील दुःखभोग कसे भोगावे लागतात ते सांगून स्थूळ देहाचे उत्पत्ती, स्थिती, लय, पुनर्जन्म आणि गुणदोष यांचे वर्णन केले आहे. यातून सद्गुरुकृपेने कसे तरून जावे व निर्गुणाशी अद्वैत साधावे यावर संत शेखमहंमद चर्चा करतात–

*जैसा एक जंबुक भुंकी करी । अनेक जंबुक भुंकती परोपरी ।*
*तैसी मज घालमेल केली थोरी । विषयभुतांनी ।।१३।।*
*देवऋषी घुमारे पंचाक्षरी । आपुले स्वहित नेणती अघोरी ।*
*ते माझी भूते दैवते केवी दूरी । करू शकतील ।।४१।।*

परंतु सद्‌गुरुंकडूनच समाधी सिद्धीचे, निर्गुण अद्वैताचे वचन मिळू शकते असे सांगतांना ते सद्‌गुरुमुखीचे वचन सांगतात–

*तैसी तुज मज आहिक्य काचणी । संचिते लागली शिष्या शिरोमणी ।*
*दहन करीन पातकाच्या खाणी । निमिष न लागता ।।९२।।*

१०९ ओव्यांच्या अकराव्या प्रसंगात (अध्यायात) हळूहळू 'योगसंग्राम' ग्रंथाच्या प्रस्तावाकडे एक-एक पाऊल टाकतात. वासना देहाच्या नावाने मानव बहकतो यासाठीच मी 'योगसंग्राम' अद्वैत सिद्धी शास्त्र मांडत असल्याचे स्पष्ट करतात. वेश्या आणि पतिव्रता यांचा दृष्टांत पिंगळा आख्यानाने देऊन 'शरीर तंव हीन हाडांची मोळी ।' अशी देहाची व्यर्थता सांगून संत शेखमहंमद बोध करतात–

*जैसे जनास योनीचे ध्यान । तैसा जरी आठवे श्रीहरी संपूर्ण ।*
*तरी हेळामात्रे चुके भ्रमण । साधिल्यावीण साधे ।।१०३।।*

१०६ ओव्यांचा बारावा प्रसंग (अध्याय) पूर्णतः पाखांड खंडनासाठी आहे. दुष्ट रूढीपरंपरा आणि द्वैतभावाने अनेकानेक शूद्र देवदेवतांची पूजाअर्चा, अज्ञान व त्यापोटी, रूढीदास्यत्व यांवर संत शेखमहंमद प्रहार करतात. सद्‌गुरुकृपेने अज्ञान नाहीसे होईल असा निर्वाळा देतात. ओवी क्र. २७ ते ४७ मध्ये प्रत्येक वाराचा वेगळा देव वेगळी कर्मकांडे यांवर पाखांड खंडनात्मक टीका करून, ते म्हणतात–

*मूर्ख नवस करून देवांप्रती । म्हणे आम्हा द्यावी धनधान्यसंपत्ती ।*
*ऐसेच मूर्ख वेळोवेळा बोलती । उग्र व्रत धरूनिया ।।८०।।*
*जागर गोंधळादी विधिनाट्यातील दांभिकता बाजारूपणा ।*

यावर तडाखे मारीत ते म्हणतात–

*नासिक सांडोन गंध पुष्पयाती । आवडी जरी श्रवणी घालिजेती ।*
*तरी सुगंधे काही न होय तृप्ति । मन वासनेची ।।१०४।।*

म्हणूनच सद्‌गुरुकृपेने निर्गुण निजरूपाची साधना करून निवांत व्हावे, असा प्रबोध संत शेखमहंमद करतात.



१०० ओव्यांच्या तेराव्या प्रसंगात (अध्यायात) पाखांड खंडन आणि अज्ञानात्मक आचार, दंभाचार यांवर आणखी प्रहार करीत ब्रह्मज्ञान हेच खरे ज्ञान होय. ते सद्‌गुरुकृपेनेच सिद्ध होते याकडे संत शेखमहंमद लक्ष वेधतात. वेदोपनिषदे, शास्त्रे, पुराणे त्याच ब्रह्माचा शोध घेत आहेत. पंडित स्वअहंकाराने वितंड माजवतात. पाखांड खंडन करताना संत शेखमहंमद म्हणतात–

*एक नग्न मोहनीवस्त्र हरी । श्वापदे नग्न मोहन वनांतरी ।*
*वस्त्रे हीन फिरती अघोरी । त्याला साधू म्हणो नये ।।४३।।*

निखळ ज्ञान साधनेविषयी ते म्हणतात–

*जेव्हा आपण कल्पनेसी मारावे । तेव्हाच त्या मरणाला पाहावे ।*
*सोहं तत्त्व तैसे वोळोखावे । निजी मरोनिया ।।९७।।*

१३१ ओव्यांच्या चवदाव्या प्रसंगात (अध्यायात) संत शेखमहंमद अन्नवस्त्राचे महत्त्व स्पष्ट करून; पापपुण्याविषयी प्रबोध करतात. अद्वैत प्राप्त झाले की पापपुण्य असे काहीच राहात नाही याविषयी व्याख्यान करून शेखमहंमद या नामाचे अद्वैत तत्त्वज्ञान या संदर्भाने स्पष्टीकरण करतात.

*सहा अक्षरी शेख महंमद । अक्षरांचा वेगळा सांगेन भेद ।*
*तेणे आनंदती सिद्ध साधु भेद । टीका ऐकता ।।८८।।*
*शे म्हणिजे सेविले सद्‌गुरु निधान। ख म्हणजे खळखळेवेगळे संपूर्ण ।*
*भाव धरून प्रेम उन्मन । सोहं तत्त्व बोधे ।।८९।।*
*म मायारहित जनार्दन । अहंकारावेगळे लक्षण ।*
*त्यास नाही बद्धता जाण निर्विकार सदा ।।९१।।*
*मागुते म अक्षर आले । मळावेगळे ब्रह्म कोंदले ।*
*म्हणऊन अक्षर दुणावले स्तवना लागी ।।९२।।*
*द द्वैतावेगळा स्वहिंबपणे । यालागी द अक्षर लागले पाहणे ।*
*स्तुति वर्णिता कष्टली पुराणे । अहं धरिती तेवेळे ।।९३।।*

यातील हं अक्षर अहंकारावेगळे लक्षण सांगते असे संत शेखमहंमद म्हणतात. सद्‌गुरुकृपा मिळविण्यासाठी रामकृष्ण अवतार घडले असे सांगत, स्वतःच्या जन्माचे स्पष्टीकरण त्यासंदर्भाने करतांना म्हणतात–

*शेख सैय्यद महंमद महंमदी । श्रोते पातले आशीर्वादी ।*
*ग्रंथ चालिला निजप्रेमाचा बोधी । जयजयकार वचने ।।३१।।*

महंमदी परंपरेत जन्मास येऊनही 'निज' अर्थात परब्रह्म अर्थात 'अद्वैत' सिद्धीसाठी

सद्गुरुकृपेने ग्रंथ निरुपण करीत असून, श्रोते या सिद्धीकरिता आशीर्वाद देण्यास आले आहेत, असे संत शेखमहंमद म्हणतात.

११६ ओव्यांच्या पंधराव्या प्रसंगात (अध्यायात) संत शेख महंमद 'योगसंग्राम' ग्रंथाचा विषय प्रतिपादन करतात. सद्गुरु अद्वैतापर्यंत घेऊन जाण्यास समर्थ आहेत हे स्पष्ट करतात. ज्ञानाची आस असेल तरच सद्गुरु ओळखता येईल. सद्गुरुच्या सान्निध्यात अडीच घटका बसूनच अद्वैत प्रेमबोध होईल याविषयी निरुपण करतात. सद्गुरु सेवेसाठीची शिष्याची मानसिक तयारी ते करून घेतात.

संत शेखमहंमद गुरुपरंपरा सांगताना म्हणतात–

*श्री गणेशाय नमः । ॐ नमोजी चांग बोधले ।*
*त्यांनी जाणोपंता अंगिकारले ।*
*जाणोबाने एका उपदेशिले दास्यत्वगुणे ।।१।।*

अशी श्री चंद्रभट – श्री जनार्दनपंत – श्री एकनाथ अशी गुरुपरंपरा सांगून–

*सत् चांद बोधल्याचे कुळी शेक । महंमदांनी चर्चिला विवेक ।*
*ते विवंचनेला संत प्राश्निक आशिर्वाद देती ।।४।।*

ज्या चंद्रभटांनी श्री जनार्दन स्वामींपासून शिष्यपरंपरा सुरू केली, त्याच गुरुकुल परंपरेत शेखमहंमद विवेक ज्ञानाची चर्चा करीत आहेत असे सांगून श्री चंद्रभट बोधले – श्री संत शेखमहंमद अशी गुरुपरंपरा सांगतात–

*रवीने देखिले विश्वजनास । जन ओळखोन न देखे भानूस ।*
*तैसे साधु जगी उदास । दीक्षा कोण्ही नेणती ।।१०७।।*

सूर्यप्रकाशाचा दृष्टांत देऊन शिष्य कोणत्या जातधर्मपरंपरेतील आहे हे विचारात न घेता सद्गुरु दीक्षा देतात, असे सद्गुरु माहात्म्य सांगतात.

११४ ओव्यांच्या सोळाव्या प्रसंगात (अध्यायात) बद्धमुक्त, मुक्तबद्ध, नित्यमुक्त या अवस्थांचा परिचय करून देत, सद्गुरुकृपेने नित्यमुक्त होण्यासाठी द्वैत पसाऱ्यात केवढा संग्राम मोठ्या शूरत्वाने करावा लागतो, हे संत शेखमहंमद सांगतात. 'सोहं'चा अनुभव घेण्यासाठी वैराग्य आणि ज्ञानसाधना आवश्यक असल्याचे स्पष्ट करून; राजयोग साधकाची मानसिक तयारी पूर्ण करून घेतात. अद्वैत बोध 'सोहं' स्तरावर नेणारे संत, ऋषी, कवी यांचे कुळ कोणते हे फोल ठरते. सद्गुरुकृपेने 'सोहं' ज्ञानचर्चा ही 'अद्वैत' साधण्यासाठी, आत्मतत्त्वापर्यंत पोहोचण्याची सुरुवात असते हे स्पष्ट करून; संग्रामाचे महत्त्व विशद करतात–

*आता बद्ध मुक्त तो कसा । आणि मुक्त बद्ध ते परियेसा ।*
*सांगेन नित्यमुक्ताची दशा । सभे श्रोत्यां लागुनी ।।७।।*



असे म्हणत १३ व्या ओवीपर्यंत व्याख्या स्पष्ट करतात. परब्रह्म ज्ञान सद्गुरु ठायीच असते असे सांगत ते म्हणतात–

*सहज साधु जाय जेथ । श्रीहरि त्यासवे असे तेथ ।*
*हे जनास न भासे नत्य । पाषांडबुद्धीने ।।४२।।*

हे स्पष्ट करतात. संत ज्ञानेश्वरांच्या श्रोतृगौरवाप्रमाणे श्रोत्यांचा गौरव करून, श्रोते योगसंग्रामास राजहंसाप्रमाणे विवेकाने सिद्ध होतील असा विश्वास व्यक्त करतात–

*धन्य संत श्रोत्यांची हेरी । होती परमार्थाचे अधिकारी ।*
*नीरातून क्षीर अंगिकारी । राजहंस जैसा ।।१०६।।*

आपण पाखांडखंडन करून श्रोत्यांना डोळस केले याचा स्पष्ट उल्लेख करतात–

*ठाई ठाई लोक हटकिले । निद्रिस्त ते सावध केले ।*
*कुतर्की उन्मत्त बुझाविले । ज्ञान वैराग्ये ।।१०९।।*

**ब) प्रत्यक्ष राजयोग साधना – योगसंग्राम – (१ ते ४ व १७ व १८)**

प्रसंग १ ते ४ आणि १७ व १८ या सहा प्रसंगांत 'योगसंग्राम' अर्थात राजयोगसाधना शास्त्र किंवा समाधीसाधना शास्त्र निवेदिले आहे. ५ ते १६ अध्यायात शास्त्र समजावून घेऊन समाधी साधनेसाठीची मानसिक तयारी करून घेतली. अर्थातच १ ते ४ अध्याय हे ग्रंथारंभाचे प्रसंग असल्याने श्रोतृसंवादासह मनोभूमिका तयार करण्याचे आणि संग्रामासाठीची पायाभूत मांडणी करण्याचा प्रयत्न येथे केला आहे.

१०० ओव्यांच्या पहिल्या प्रसंगात (अध्यायात) गुरुशिष्य संवादात्मकतेने विषय प्रतिपादन करण्याचा प्रयत्न, उपनिषदे आणि श्री संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत त्र्यंबकस्वामी यांची आठवण करून देतो. यात मंगलाचरण, नमन, विषयाचे महत्त्व, व्याप्ती सांगून विषय प्रतिपादनास मनःशक्तीपासून सुरुवात केली आहे. माया जंजाळात गुरफटलेल्या अज्ञानी लोकांना ॐकारस्वरूप आणि योगशास्त्रज्ञानाची आवश्यकता कशी आहे हे 'ॐ नमः सिद्धम' यांवर निरुपण करून; कृपा, अविद्या, चैतन्या, महदा, निद्रा या मनोविकार व शक्तींचे विवेचन केले आहे.

*म अक्षर मागा सरल्या उपरी । पुन्हा सि आरंभिली साचारी ।*
*वर्णावया साधकेश्वरी । आरंभ केला आता ।।४७।।*
*शिघ्र सिद्धांत ते साधकु । ज्याचेनि तरे हा विश्वलोकु ।*
*भाव भक्तीचा होय अभिषेकु । चरणी जयांचे ।।४८।।*

असे म्हणत 'सी' वर स्पष्टीकरण करतांना 'सी' अर्थात सिद्धांत अर्थात ब्रह्मविद्येचा सिद्धांत सद्गुरुंकडून प्राप्त होतो हे सांगत, ॐ नमः सिद्ध - याचे विवेचन केले आहे. हे ६५ ओव्यांपर्यंत विस्तारले आहे. ज्ञान प्रक्रिया कशी साधावी याविषयी मार्गदर्शन करतांना ते म्हणतात-

*ज्यासी पडेल गुरुत्व ठावे । तेणे मौन्य धरूनिया राहावे ।*
*गंभीरत्वे आचरण करावे । या जनामध्ये ।।७४।।*

प्रत्यक्ष सद्गुरु आपणाशी संवाद करीत ज्ञानदान करीत आहेत हे सांगतांना संत शेख महंमद म्हणतात-

*सद्गुरु म्हणे शेख महंमद । आणिक एक ऐक पां शब्द ।*
*प्रारब्ध संचित क्रियाविवाद । ज्याच्या गुणे ।।८४।।*

सद्गुरु सांगतात-

*कृपा चैतन्या महदा शक्ति । अविद्या निंदा उघडी प्रचीति ।*
*या दोघीजणी प्रसिद्ध भांडती । जाणत निर्लज्ज पणे ।।८५।।*

असे सांगून या विकार व मनःशक्तींविषयी निरुपण ८८ ते ९४ ओव्यांत करतात.

१०४ ओव्यांच्या दुसऱ्या प्रसंगात (अध्यायात) गुरुशिष्य संवादातून पंचमहाभूतात्मक ब्रह्मोत्पत्ती कशी झाली याविषयी चर्चा केली आहे. शक्ती निष्पत्ती, सृष्टीचा चक्रनेमिक्रम, उत्पत्तीची लक्षणे, चतुरखाणी जीव, खनिजे असे विषय स्पष्ट करण्याचा खटाटोप आहे. भक्तियोग आणि सर्वांभूती परमेश्वर हे भक्त प्रल्हाद आख्यानाधारे स्पष्ट केले आहे. सद्गुरुकृपेनेच ज्ञानयोगसिद्धी अर्थात ब्रह्मविद्या व ब्रह्मज्ञान प्राप्ती शक्य आहे हे स्पष्ट केले आहे. ब्रह्मज्ञान प्राप्तीची तयारी शिष्याठायी होणे आवश्यक असते. संत शेखमहंमद म्हणतात-

*तो साधु भजनी निराशे (निरपेक्षपणे) भजे ।*
*म्हणे विश्वलोक मजसि साजे । ते तारावे गा ईश्वरा वोजे ।*
*या लागी ग्रंथ करी ।।२१।।*

ग्रंथनिर्मितीचे कारणच शिष्याला सर्वात्मक परमेश्वररुपसिद्धीसाठी सिद्ध करणे हे आहे.

*पंचमहाभूते सबळ सगुण । त्यांचे हे पंचवीस गुण विकारण ।*
*त्यांमाजि शक्ति घेती अवतरण । कल्पने संगे ।।३।।*

अशा प्रकारे सृष्टी उत्पत्तीचे पंचीकरण निरुपण केले आहे. साधूचे लक्षण सांगतांना ते म्हणतात-



*कृपे संगे साधुचा अवतार । तो हृदयी वागवी ईश्वर ।*
*कदा पडो नेदी विसर । सोहं बोधाचा ।।२०।।*

ब्रह्मज्ञान प्राप्त होण्याची प्रक्रिया तुला मी सांगतो. असे म्हणत, त्याविषयी विचारावे असे स्वतःच सुचवून संत सांगतात-

*निद्रा मुरोनि उन्मनी प्रकाश*
(अज्ञान विरून जाऊन ज्ञानसेवनास मन आतूर होते) ।
*स्वरूपी लय लागे*
(मन स्वरूपात ब्रह्माठायी-परमतत्त्वाठायी सामावू लागते सावकाश।)
*ब्रह्मानंदे प्रेमबोधे उल्हास*
(सच्चिदानंद अनुभूत होऊ लागतो)
*ते पुस पैं शिष्या मज ।।९१।।*

सद्गुरु शिष्याकडून ब्रह्मविद्या आत्मसात करून घेण्यासाठीची निरपेक्ष उत्कट आस अपेक्षितात.

११० ओव्यांच्या तिसऱ्या प्रसंगात (अध्यायात) योगसाधनेची प्रत्यक्ष स्थिती तपशीलवार वर्णन करून निर्देशिली आहे. परमतत्त्व हे अविनाशी नित्य सिद्ध आहे. त्याचे वर्णन ज्ञानी परोपरीने करतात. कृपा, चैतन्या, महदा, अविद्या आणि निद्रा या चहुशक्तींसह पाच शक्ती त्या कृपेतून म्हणजे आत्मतत्त्वातूनच प्रकटतात आणि तेथेच लीन होतात. कृपा आणि अविद्यास्वरूपासह निद्रा यांचा सतत संघर्ष होतो. हा संघर्ष सद्गुरुकृपेने आत्मज्ञान प्राप्त झाले की नाहिसा होतो. अविद्या अर्थात भ्रामक असा संसारप्रपंच म्हणजेच द्वैतभाव आत्मज्ञानात्मक अनुभूतीत विरून जातो. कृष्णासह दशावतारांचा खेळ हा अद्वैत भावना किंवा अद्वैत संवेदना अर्थात अनुभूती सिद्ध करण्यासाठीच आहे, असे निरुपण शिष्यांसाठी केले आहे. योगसाधनेची स्थिती सांगतांना सद्गुरु सांगतात-

*आता बगासनी बैसावे शुद्ध । देव्हडा देऊनी वोढीया नागबंध ।*
*मग दृढासनास व्हावे शुद्ध । मणिचक्रपुरी ।।२।।*

याप्रमाणे योगासन सिद्धीसाठी पुढील काही ओव्यात योगसाधनेत कोणते अनुभव येतील याचे जवळपास वीस ओव्यांत वर्णन आले आहे. योगसाधनेविषयी सत्शिष्याने शंका विचाराव्यात आणि सद्गुरुने सांगाव्यात अशा प्रकारे निरुपण करीत-

*आज्ञा दिधली तुज मूळ उत्तरे । जे जे करशील ते दिसेल बरें ।*
*मायबापे उद्धरुनि निज अक्षरे । अनुसंधाना पाते ।।४८।।*

असे आश्वासन सद्गुरु देतात. शिष्य आत्मज्ञानाविषयी शंका विचारतो–

*गुरु तुह्मांपे आलो कवण्या गती । हे सांगावे जी अविनाशमूर्ति ।*
*तेणे फिटेल पै माझी भ्रांति । उमज पडुनिया ।।५२।।*

पुढील निरुपणात सद्गुरु संचित आणि प्रक्रियचे निरुपाय करतात. आत्मज्ञान प्राप्त झाल्यावर लौकिकातील वर्तन कसे होते याचे वर्णन करतांना संत सांगतात–

*आत्मविज्ञान कृपेचे आभास भासे । दुष्ट बोलणे अविद्येचे मूर्ख रूशे ।*
*शास्त्रज्ञाने महदेचे वर्तत असे । प्रसिद्धपणे जनी ।।९०।।*

अनुसंधान साध्यतेचे वर्णन केवड्याचा दृष्टांत देऊन करतात–

*आता अनुसंधान केतकीच्या झाडा । जो सिद्ध निपजला केवडा ।*
*तो सुगंध कृपेचा निवाडा । काटे ते अविद्येचे ।।९५।।*

प्रपंच आणि अनुसंधान यातील प्रक्रिया रुपकात्मकतेने समजावून सांगताना–

*कृपाशक्ती चैतन्याची होय माता । चैतन्या महदेची माय लागे तत्वता।*
*अविद्या महदेची होय सुता । अंगलगे अंगसंगे ।।१००।।*

ब्रह्मज्ञान योगस्थितीविषयी निरुपण करून संत शेखमहंमद प्रत्यक्ष समाधीसाधनेकडे सत्‌शिष्याला घेऊन जात आहेत.

१०३ ओव्यांच्या चवथ्या प्रसंगात (अध्यायात) आत्म्याचा विसर पडून शक्ती षडरिपूंच्या जाळ्यात अडकून आत्मस्वरूपाला पारख्या होतात. आत्मस्वरूपज्ञानाच्या अनुसंधानासाठी सद्गुरुला शरण जावे. सद्गुरुने सत्‌शिष्य ओळखूनच उपदेश करावा. साधकाने सिद्धींच्या मोहात अडकता कामा नये. नवविधा निस्सीम अनन्य भक्तीला आणि सद्गुरुला शरण जातो तोच खरा शिष्य. असा शिष्यच सद्गुरुस्वरूप होतो अशा विषयांची चर्चा या प्रसंगात करून १७ व्या अध्यायातील प्रत्यक्ष योगसंग्रामासाठी शिष्याला सिद्ध केले आहे.

षड्‌रिपूंच्या जाळ्यात न अडकता–

*अशुचे शरीरी शुच आचरावें । निज नामाते हृदयी धरावे ।*
*जैसा बुधला विकला । घृताच्या नावे अशुच असता ।।२०।।*

असे आत्मरूप आठवावे. सत्‌शिष्य ओळखावा असे म्हणतांना–

*सद्‌भाविक चित्त मनाचे उदार । ईश्वरी भक्ति निश्चयें मन निर्धार ।*
*निकट बोधिक हृदयी गंगानीर । ऐसे शिष्य अंगिकारावे ।।९६।।*

कारण–

*जे उदास निःसंग दृढ गंभीर । संकल्प विकल्पाचा केला केर ।*
*आत्मतत्त्वाचा पुसती विचार । ते वाटेकरी मुक्तीचे ।।९७।।*



*काया वाचा मन सर्वस्वेशी । भाव चित्त वाहती सद्गुरुशी ।*
*स्वये तर्किले इतर देवी देवतांसी । एवं सच्छिष्येत्वे ।।१००।।*

२४० ओव्यांच्या सतराव्या प्रसंगात (अध्यायात) संत शेखमहंमद महाराजांनी सर्व जनांसाठी, ब्रह्मविद्या सोहंसिद्धीयोग, समाधीयोग, राजयोग किंवा अद्वैतसिद्धीयोग म्हणून ओळखला जाणारा आत्मसंयमक योग उलगडून सांगितला आहे. आसने, आधारचक्रे, नाडीविज्ञान, प्राणायाम यांसह समाधीपर्यंत येताना, प्रत्यक्ष अद्वैत अनुभूतीपर्यंत पोहोचतांना; आत्मा, मन, लिंगदेह, त्यातील विविध त्रिकुटे, गुणात्मकता, भावना, वासना, कल्पना, इच्छा, रिद्धीसिद्धी आदि गोष्टी स्पष्ट करून लिंगदेहाच्या मायापाशात, वासनादेहत्वामुळे, आत्मा व मन यांना या सर्वांशी कोणत्या प्रकारे युद्ध करावे लागते हे सांगितले आहे. त्यांच्यावर विजय मिळवून, मन आणि आत्मा, आत्मा आणि परमात्मा यांचे अद्वैत घडविण्यासाठी योगसंग्राम करावा लागतो, हे स्पष्ट केले आहे. मनाच्या अश्वावर स्वार होऊन, आत्म्याला परमात्मतत्त्वाचा वेध घ्यावा लागतो, याचे वर्णन केले आहे. राजयोगाची साधना करण्यासाठी या प्रसंगाचा सूक्ष्म अभ्यास, संत शेखमहंमदांना सद्गुरु म्हणून स्वीकारून करावा लागेल. 'संग्राम' या प्रसंगाचे सांगरूपक योजून आत्मा हा योद्धा आणि मन हा तेजिया (घोडा) शरीर हे क्षेत्र, त्यातील देहिक वासना, भावना इ. गुण या सर्व सैन्यदलाशी संग्राम करावा लागतो. श्री ज्ञानेश्वरांच्या आणि श्री एकनाथांच्या दुर्ग कल्पनेशी या सांगरूपकाचे साम्य दाखवता येते.

द्वैत आणि अद्वैताचा संबंध स्पष्ट करतांना–

*अद्वैतापासून द्वैत भासे । जैसे रविपासून बिंब प्रकाशे ।*
*वेगळीक नाही दोहीस । मूळ एक पणे ।।१३।।*
*पाहता परतलीये दृष्टी । द्वैत अद्वैताचे पाटी ।*
*भिन्नत्व दिसे सृष्टी । कल्पनेसंगे ।।१४।।*

असे स्पष्ट करतात. याचा ठायीच अनुभव घेऊन जीवन मुक्त होण्यासाठी हा संग्राम करावयाचा आहे. ते सद्गुरुकृपेने साध्य होते.

*मही* (पृथ्वी अर्थात देह क्षेत्र) *कडासन सबळ ।*
*चौदा भुवने धरिले स्थूळ । अंतरी संग्राम मांडिला प्रबळ ।*
*सावध श्रोते परियेसा ।।३६।।*

येथून समाधी साधना शास्त्र सांगावयास सुरुवात झाली आहे.

*मग पद्मासनापुढे वज्रासन । दिधले देव्हडे ।*
*सिद्धासन साधिले गाढे । योगसंग्रामालागी ।।३८।।*

अहंकाराचा वध करून-

*मग तेथूनही निघालो । पुढे अनुहाता प्रवेशलो ।*
*जाऊन ईश्वरास भेटलो । सात्विकपणे ।।६६।।*
*झालो गिळून ज्यालपणास । ठाव नाही जीवशिवास ।*
*यातिनावाचाही ऱ्हास । श्रद्धा बाणल्या ।।७३।।*

वातपित्तकफावर मात करून षड्रिपूंचा नाश करून-

*जेव्हा हे मन चढे त्रिवेणी । तेव्हा सहज समाधी बैसे लोचनी ।*
*जिकडे पाहे तिकडे स्वरूपावाचूनी । दुजे अनु ना भासे ।।८९।।*
*मग बाहिज अंतरी निज । दिसे भासे ब्रह्मबीज ।*
*सहज समाधी लागे सहजी सहज । चहू अवस्थांमाजी ।।९०।।*

अशी समग्र प्रक्रिया स्पष्ट करतांना ते म्हणतात-

*ऐशी अष्टदळाची झडती (अष्टांगयोगसाधना) ।*
*सांगितली विज्ञानयुक्ती ।*
*याहून सांगतो उघड प्रचिती । परी संत कोपती माते ।।९३।।*

निकराचे युद्ध योद्धा कसे करीत आहे, याचे सांगरूपात्मक वर्णन करतांना-

*शीघ्र करी घेतली हेतुकमान (अद्वैत ध्येयरूपी धनुष्य)*
*तेजियावरी आत्मा राऊत निधान ।*
*वोढी विरक्तीचे तीर जाण । विवेक सोडीत असे ।।९७।।*

असे सांगतात.

*मग अहंकार मागे मुरडला । येऊनि ह्रदयस्थळी उत्तरला ।*
*महा अविचारे खांद बांधला । आत्मा नाथासी ।।१००।।*
*समस्तांचा राजा (देहविकार सैन्याचा राजा) अहंकार ।*
*तो पाडिला मुदल धूर ।*
*मग थेरांचा झाला केर । ठायीच्या ठायी रगडोनिया ।।१२७।।*
*मग ईश्वर आनंदला । म्हणे आत्मा यशवंत झाला ।*
*आमचा मुहूर्त फळासी आला आनंदरूपे ।।१३५।।*

पुढील पन्नासावर ओव्यांत अहंकाराचे स्वरूप विषद केले आहे. रामकथेचे उदाहरण देऊन समाधीयोगाचे कथात्म निरुपण केले आहे. रिद्धीसिद्धींविषयी भाष्य केले आहे -

*आणिक अल्पानवही रिद्धी । ओळखा अष्टमसिद्धी ।*
*तोंडावर देऊन आरबा विज्ञानविधी । केला आत्मनाथे ।।१९७।।*



*नाही रिद्धि सिद्धीस कारण । मूळारंभ जितावयाचे सूचन ।*
*त्रिकुटी तीन वाटा जाण । मीन वाटे रीघ केली ।।२०७।।*

रिद्धीसिद्धींवर मात करून पुढचा प्रवास केला आहे. अहंताममता सारे पराभूत केले.

*ऐसे क्षेत्र केले शरीरास । आत्म्या राउता आले यश ।*
*आता गडघ्यावयाचा सायास आरंभिला ।।२३३।।*

मनरूपी घोडी या संग्रामात दमला आहे हे जाणून त्यास तेथेच ठाणबंद केले-

*बत्तीस पळे एकवीस दिवस । ठाणबंदी बांधिले तेजीयास ।*
*सुख वाटले राउता तेजीयास । कांटाळा सांडियेला ।।२३७।।*

मन देखील आत्मस्वरूप झाले-

*निम तंग करून जिन ओढियिला। मागुता आत्मा तेजिया स्वार झाला*
*उर्ध्वगड न्याहाळू लागला । विहंगम तेजी थरके ।।२३८।।*

मनोस्वरूपाने परमात्म्याचा वेध घेतला (उन्मन झाला) अद्वैतस्थितीपर्यंत पोचला.

३२७ ओव्यांचा अठरावा प्रसंग (अध्याय) 'योगसंग्राम' ग्रंथाचा कळसाध्याय होय. समाधीयोगापर्यंतचा संग्राम केल्यावर अनमस्क अशी आत्मावस्था (मनोस्वरूपावस्था) परमात्मपदी अद्वैत झाली. त्यावेळी अवघे विश्व आपल्यात सामावून आपणच संपूर्ण विश्व झालो आहोत; याचा अनुभव येऊन ब्रह्मानंदात विदेहीपणे निमग्न झाल्याचे प्रतिपादन केले आहे. विदेही होऊन ब्रह्मानंद भोगावा लागतो. ही कठीण प्रक्रिया निस्सीम, दृढ, अनन्य भक्तीनेच साध्य होऊ शकते. सत्संगाने हे घडते. त्यासाठी सद्गुरुसेवा अपरिहार्य आहे. सद्गुरुसेवेकरता सद्गुरुच व्हावे लागते. भक्तीसाठी भागवत संतांचा मार्ग स्वीकारला आहे. अजन्मा होऊन, अमरत्वाने वैकुंठसुख, परमात्मकृपेने भोगता येते. कलियुगाची दुरिते, प्रलय, महाप्रलय, पुन्हा सृष्टीनिर्माण आदि विषय कथात्मकतेने येथे चर्चिले आहेत. प्रत्यक्ष परमानंदस्वरूप असा हा अठरावा प्रसंग आहे, असे स्पष्ट केले आहे.

मनाचे सामर्थ्य व्यक्त करतांना संत शेखमहंमद म्हणतात-

*अरे अरे मना चतुरा । एकास दाविला चौऱ्यांसीचा फेरा ।*
*एकास नेले मुक्तिचिया द्वारा । दोहीकडे खेळसी तिळा तांदूळा ।।५।।*

म्हणूनच-

*जोवरी मन आले नाही हाती । तोवरी काही करू नये वित्पत्ति ।*
*मन दगा देईल अंती । केले कष्ट दवडील वाया ।।१४।।*

सद्गुरुकृपेने राजयोग सादावा म्हणजे-

*अघ उर्ध्व मर्ध्व शून्य । गुरुलक्षणी लाधले निरांजन ।*
*निरंजनी ब्रह्म संपूर्ण । सामावले ।।४३।।*

असा अनुभव येतो. या समाधी अवस्थेत-

*समाधीस बैसलो ना उभा । शुभ अशुभ नाही मज गा ।*
*सहजात सहजाची शोभा । सोहं तत्त्वे प्रकाशे ।।५७।।*

जेथे भक्ती तेथे श्रीहरी असा अनुभव घडतोच. यावर निरुपण करतांना कुर्कोटमुनींच्या आश्रमात पुंडलिकाला झालेल्या बोधाची कथा सांगून; साधूची निंदा सांडून सत्संग साधावा म्हणजे सहजच उद्धार होतो, याविषयी बोध केला आहे. भक्तीने ज्ञान आणि वैराग्य प्राप्त होते अर्थात अद्वैत साधता येते म्हणूनच जातीकूळ यांची बाधा भक्तिठायी नसते-

*तैसा निजभक्त भलतिया यातिचा । संचित गुरुत्वे जाला ईश्वराचा ।*
*दोष त्याच्या यातिकुळाचा । आठव करू नये ।।१५५।।*

नाग, अघोरी, विंचू, माशी यांची उदाहरणे देऊन उपजत प्रवृत्तीच्या आहारी वासनादेह जातो आणि त्याला राजयोग साधता येत नाही हे स्पष्ट करून; अभक्ताची लक्षणे पुन्हा वर्णन केली आहेत. तसेच सद्गुरु पारखून घ्यावा याविषयीही पुन्हा स्मरण करून दिले आहे. त्याकरिता भक्तीने राजयोग कसा साधावा याविषयी व्याख्यान करतांना-

*शुद्ध वैराग्ये करावी कथा । सांडोनिया द्वैत दांभिक वार्ता ।*
*समस्त सभे श्रोत्यांची व्यथा । हरेल तेणे परियेसा ।।२०९।।*

राजयोगी होण्यासाठी चंचळपण सांडावे लागते यावर विस्तृत व्याख्यान करून-

*एकचित्त बैसावे कथेसी । जैसे लय ध्यान त्या बकासी ।*
*लढले तो मच्छासि । उचलोन घेतो ।।२२८।।*

असा निर्वाळा दिला आहे. रामायण-महाभारतातील कथा निवेदन करीत एकचित्त, एकलक्ष्य असावे असा प्रबोध केला आहे. कलियुगात घडणाऱ्या दुष्ट गोष्टींची उजळणी करून प्रलयाचे भाकित केले आहे-

*शनवारचा दिवस अवधारा । सायंकाळी सुटेल उत्तरामुखे वारा ।*
*तेणे इंद्र चंद्र नवलक्ष तारा । पर्वत प्रलय पावती ।।२७३।।*

या कलियुगातही सद्भक्ताला -

*मग परमात्मा बोलेल सगुण वचन । म्या तुम्हांस केले वैकुंठभुवन ।*
*तेथे तुम्ही राहावे नाही मरण । युगानुयुगी ।।२८६।।*



असे योग्याला संत शेखमहंमद आश्वासित करतात. समाधी स्थितीवर युगांचा आणि प्रलयाचाही परिणाम होत नाही हे स्पष्ट केले आहे

नंतर आपण केलेल्या व्याख्यानाविषयी संत शेखमहंमद म्हणतात-

*स्वये बोलिलो नाही कुशल वाणी । तुम्ही श्रोते वक्ते कुशल ज्ञानी ।*
*हा ग्रंथ ऐकावा निज श्रवणी । चर्चा विवेके ।।३११।।*

ओवी क्र. ३१५ ते ३१७ मध्ये पहिल्या पाच अध्यायांची अवतरणिका देऊन, श्रावण शुद्ध प्रतिपदेला ग्रंथलेखन सुरू केले असे सांगून पौर्णिमेला ग्रंथसमाप्ती केली असे ३१८ ते ३२१ या ओव्यात स्पष्ट केले आहे. नंतर अठराव्या अध्यायाची महती वर्णन केली आहे-

*ऐसा विश्रांतीचा पूर्ण सागर । आत्माराम अविनाश दिगंबर ।*
*योगी जपताती निरंतर । अठरावा अविनाशु ।।३२५।।*
*ऐसा ब्रह्मांडनायक आदिपुरुष । ब्रह्मरसाचा आत्मकळस ।*
*ऐसा तो महा तेजाचा प्रकाश । योगियाहृदयी वसतसे ।।३२६।।*
*तेथे कैचा बारा सोळा नवरस । आत्माराम स्वयं प्रकाश ।*
*सैय्यद महंमदी सावकाश रामचिन्हाकार असे ।।३२७।।*

अशा प्रकारे अठरा अध्यायांची मांडणी 'योगसंग्रामा'मध्ये दिसते.

संत शेखमहंमद समाधीयोग शास्त्र मांडतांना साधकाला कराव्या लागणाऱ्या खडतर आणि निकराच्या मानसिक आणि शारीरिक स्तरावरील संग्रामाचे वर्णन करतात. 'योगसंग्राम'चा स्वानुभव संपादन करीत, अखेर श्रीगोंदा येथे मालोजीराजे भोसले यांनी इनाम व बांधून दिलेल्या मठात स्वतः समाधीस्थळाची रचना करून संजीवन समाधी सिद्ध करतात. शेखमहंमदांचे कार्यक्षेत्र आणि समाधीस्थान श्रीगोंदा (अहमदनगर-महाराष्ट्र) येथे आहे. तर वाहिरे, ता. आष्टी, जि. बीड येथे अलमगीर औरंगजेबाकडून मिळालेली इनामे जमीन घराण्याच्या उदरनिर्वाहासाठी विनियोगित आहे.

* * *

# श्री संत एकनाथ चर्चित योगमार्गातील सिद्धीविचार

श्री एकनाथ महाराज यांनी श्रीमद्भागवताच्या एकादश स्कंधावर लिहिलेली ओवीबद्ध टीका, हा मराठीतील एक अलौकिक ग्रंथ होय. जगद्गुरु संत तुकोबारायांनी भंडाऱ्या डोंगरावर श्री एकनाथी भागवताची अक्षरशः पारायणे करून; आत्मविद्या तथा ब्रह्मविद्या आणि भक्तियोग यांची साधना केली, असे सांगितले जाते. संत एकनाथांना शांतीब्रह्म म्हटले जाते ते सूचक आहे. समाधीसाधनेसंदर्भातील अर्थात योगशास्त्रावरील ग्रंथात, या ग्रंथाची गणना करावी लागते. संत शेखमहंमद महाराजांनी संत एकनाथांची योगसाधनेसंदर्भात, 'योगदुर्गविजय' संदर्भातील, सांगरूपकाची कल्पना आपल्या 'योगसंग्राम' ग्रंथासाठी स्वीकारली आहे.

**१) श्रीमद्भागवतातील योगविज्ञानावर भाष्य :–**

संत एकनाथ महाराजांनी श्रीमद्भागवतावर लिहिलेली टीका म्हणजे भागवतावर श्लोकार्थासह केलेले भाष्य आहे. हे भाष्य करतांना योगशास्त्र, समाधी, सिद्ध, स्थितप्रज्ञ यासंदर्भात योगशास्त्रावर व त्याअंतर्गत येणाऱ्या विषयांवर प्रकाश टाकला आहे. 'वेदांचे उणें गीतेनें, गीतेचें ज्ञानेश्वरीनें व ज्ञानेश्वरीचें नाथभागवताने भरून काढले' असे म्हटले जाते. त्यामुळे 'ज्ञानाचा एका' असे प्रतिमात्म रूप प्रचलित झाले.

श्रीमद्भागवत एकादश स्कंधातील ७ व्या अध्यायात श्रीकृष्ण–उद्धव संवादात एकूण ब्रह्मविद्येच्या चर्चेस सुरुवात होते. १० व्या अध्यायात निष्काम धर्माचरण, सद्गुरुची आवश्यकता व महात्म्य, शिष्यलक्षणे, वेदांत मीमांसकांचे मठ, धर्मकर्ममीमांसा या विषयावर श्री नाथांनी भाष्य केले आहे. ११ व्या अध्यायात बंधमोक्षाची व्याख्या, विद्या–अविद्या, जीव–परमात्मैक्यता, मुक्तांची तीस लक्षणे, भक्तियोगातील अनेकविधा भक्तिवर्णन, १२ व्या अध्यायात भववृक्षवर्णन, सद्गुरुभक्तीनें भववृक्ष छेदन असे विषय चर्चिले आहेत. १३ व्या अध्यायात



'हंस' स्थिती, भगवंतांचा हंसावतार, हंस–निजधामगमन असे विषय आले आहेत. १४ व्या अध्यायात भक्तियोगाबरोबरच ध्यानयोग विवरण आले आहे. २० व्या अध्यायात उद्धवाच्या प्रश्नांना उत्तरे देत योगमार्गातील दर्शनविचारावर चर्चा केली आहे. यात मनोजयाचा विचार आला आहे. २५ व्या अध्यायात गुणमूलक व निर्गुणमूलक ज्ञानादिवर्णन आले आहे. त्यातच त्रिविधसुख आणि निर्गुणसुखाचे विवरण आले आहे. २८ व्या अध्यायात, आत्म्याचे ठायी संसार निर्मूल, ज्ञान्याची विदेहता असे विषय आले आहेत. ३० व्या अध्यायात जराव्याधादी सदेहस्वर्गगमन घडविणे असा विषय आला आहे. योगमार्गाची अर्थात राजयोगाची तथा समाधीसाधनेची चर्चा संपूर्ण भागवतातील एकादशस्कंधात विषयांच्या अनुषंगाने आलेली आहे. श्री नाथांनी टीका करतांना योगशास्त्रीय परिभाषेसह भाष्य केले आहे.

**२) भक्ती तथा ज्ञानयोगातील अर्थात मार्गातील सिद्धींचे स्थान :–**

एकादशस्कंधावरील टीकेच्या पंधराव्या अध्यायात, सिद्धींचे व्यापक स्वरूपवर्णन, स्थान, प्राप्ती, उपयोजन आणि परिणाम या विषयांवर भाष्य केले आहे.

सिद्धपुरुषांठायींच्या सिद्धीकारणाने होणाऱ्या किंवा घडविल्या जाणाऱ्या चमत्कारांमुळे सामान्य जनता सिद्धपुरुषांकडे आकर्षित होते. त्या सिद्धींविषयी सामान्यांना प्रचंड कुतूहल असते. संतांच्या चमत्कारांची उत्तरे सिद्धी उपयोजनाद्वारे देता येतात. एकादशस्कंधातील १५ व्या अध्यायात भक्तिमार्गात सिद्धींचे विघ्न, अष्टमहासिद्धी व दहा इतर सिद्धी यांची प्राप्यता, सिद्धीसाधनोपाय, अष्टसिद्धी, दशसिद्धी व पंचसिद्धी यांचे वर्णन; सिद्धींची बाधकता व त्यांच्या त्यागाची आवश्यकता असे विषय येतात.

पंधराव्या अध्यायातील मंगलाचरणामध्ये सिद्धींच्या स्थानाविषयी भाष्य करून; भक्तीने ज्ञान प्राप्त होत असतांना सिद्धी प्रकट होतात याविषयी भाष्य आहे.

संत एकनाथ म्हणतात– *श्री गणेशाय नमः ।। श्री कृष्णाय नमः ।। ॐ नमो श्री जनार्दन ।। सकळ सिद्धींचे सिद्धस्थान । सकळ ऋद्धींचे परम निधान । तुझे श्रीचरण सर्वार्थी ।।१।। निधान साधावया अंजन । नयनीं काळिमा घालिती जन । तेणें काळवंडले नयन । थिते निधान दिसेना ।।२।। तैसे नव्हती तुझे चरण । करितां चरणरजवंदन । निःशेष काळिमा निरसे जाण । पूर्ण निधान दाविसी ।।३।।*

श्रीकृष्णचरण हेच सर्व सिद्धींचे मूलस्थान आहे. एवढेच नव्हे तर, श्रीकृष्ण

चरण हेच चारही पुरुषार्थ देणारे आहे. असे म्हणून संत एकनाथ म्हणतात, श्रीकृष्णांच्या चरणवंदनाने अर्थात भक्तीने सर्व प्रकारे अज्ञान नाहीसे होते. म्हणूनच श्रीकृष्णभक्ती हाच सर्व सिद्धतेचा मार्ग होय.

सद्गुरुकृपेने श्रीकृष्ण चरणी स्थान मिळाले. त्यामुळेच- *येणेंचि भांडवलें प्रस्तुत । प्राप्त झालें श्रीभागवत । तेथ उद्धवासी श्री अनंत । ज्ञानमतितार्थ सांगत ।।१०।। या दोघांची एकान्त मातु । प्रकट जाहली जगाआंतू । हा परीक्षितीचा विख्यात । उपकार लोकांतू थोर झाला ।।११।। ज्याचे श्रद्धेच्या आवडीं । शुक पावला लवडसवडी । तेणें गुह्य ज्ञानाची गोडी । प्रकट उघडी दाखवली ।।१२।।*

सद्गुरुकृपेने श्रीकृष्ण-उद्धव संवाद प्रसंगात ब्रह्मविद्येचे अर्थात भक्तियोग तथा ज्ञानयोग तथा समाधीयोगाचे गुह्यातिगुह्य ज्ञान जगात प्रकटले. राजा परीक्षितीच्या उद्धारासाठी शुकमुनींनी हे गुह्य ज्ञान उघड केले. ते गुह्य ज्ञान अर्थात सायुज्यमुक्तीचा मार्ग तथा परमेश्वररूप होण्याचा मार्ग अर्थात, सच्चिदानंदस्वरूप ज्ञानी होण्याचा मार्ग लोकांसाठी प्रशस्त झाला. खरोखरीच परीक्षिती राजाचेच हे उपकार म्हणावे लागतील, असे श्री नाथ म्हणतात. पुढे ज्ञान प्रकट होण्यामागील प्रक्रिया सांगतांना संत एकनाथ म्हणतात- *ते कृष्णामुखींची मातू । ऐकोनि चौदाव्या अध्यायांतू । उद्धव हरिखला अद्‌भुतु । माझा निज स्वार्थू फावला ।।२७।। मज कृष्णमूर्तीचें ध्यान । सहजें सदा असे जाण । तेणेंच होय समाधि समाधान । तरी कां प्रश्न करूं आतां ।।२८।। ऐकोनी चौदावा अध्यायो । झाला उद्धवासी हा दृढ भावो । हें देखानि स्वयें देवो । पुढील अभिप्रावो सूचित ।।२९।। दृढ विश्वासेंसी जाण । करितां माझें भजन ध्यान । पुढां उपजे सिद्धींचें विघ्न । ते अर्थी श्रीकृष्ण उपदेशी ।।३०।।*

श्रीकृष्ण मुखातून भक्तिसाधनेचे सामर्थ्य तथा वैशिष्ट्य ऐकून, भक्तियोग तथा ज्ञानयोगविषयक रहस्य ज्ञात झाल्याने, उद्धव समाधीसिद्ध झाला. योगमार्गातील, मग तो भक्तियोग असो, राजयोग असो की अन्य कोणताही योग असो योगसाधनेत भक्ती, ज्ञान, वैराग्य प्राप्त होत असतांना, श्रीकृष्णचरण दासी असलेल्या, ऋद्धी, सिद्धी स्वाभाविकपणे प्रकट होतात. परंतु त्या ऋद्धी-सिद्धींचे प्राकट्य साधनेतील विघ्न ठरते. असे का व्हावे, याविषयी उद्धव प्रश्न विचारण्याचा विचार करतात. श्रीकृष्ण उद्धवांच्या मनातील प्रश्न विचारात घेऊन, ऋद्धीसिद्धी विषयीचे गुह्यज्ञान, स्वमुखाने निवेदित करण्यास सुरुवात करतात.



**३) श्रीकृष्ण मुखाने ऋद्धीसिद्धी प्राकट्य प्रक्रिया कथन :-**

*श्रीभगवानुवाच- जितेन्द्रियस्य युक्तस्य जितश्वासस्य योगिनः ।*
*मयि धारयेतश्चेत उपतिष्ठन्ति सिद्धयः ।।१।।*

यांवर श्री नाथांचे विवरण असे- *प्राणापानजयो जयापासीं । इंद्रियजयो असे ज्यासी । यावरी उल्हास मद्‌भक्तीसी । चित्त अहर्निशी मद्युक्त ।।३२।। उद्धवा गा त्याच्या ठायीं । अनिवार सिद्धी उपजती पाहीं । ये अर्थी संदेह नाहीं । जे जे समयीं जें इच्छी ।।३३।। ऐसें उद्धवें ऐकतां । चमत्कारू झाला चित्ता । समूळ सिद्धींची कथा । श्रीकृष्ण नाथा पुसों पां ।।३४।।*

उद्धव उवाच-

*कया धारणया का स्वित्कथं स्वित्सिद्धिरच्युत ।*
*कार्य वा सिद्धयो ब्रूहि योगिनां सिद्धिदो भवान ।।२।।*

अशाप्रकारे श्रीकृष्ण भगवंतांनीच सकल सिद्धींच्या उत्पत्ती, स्वरूप, कार्य इ.विषयी निरुपण करावे अशी अपेक्षा उद्धवांनी व्यक्त केली. तेव्हा श्रीकृष्णांनी ऋद्धीसिद्धींविषयी स्थूल व सूक्ष्म निरुपण करण्यास सुरुवात केली.

*श्रीभगवानुवाच- सिद्धयोऽष्टादश प्रोक्ता धारणा योगपारेभैः ।*
*तासामष्टौ मत्प्रधाना दशैव गुणहेतवः ।।३।।*

सिद्धी या अठरा असून त्यांच्या धारणाही भिन्न भिन्न आहेत. त्यांत अत्यंत श्रेष्ठ अशा आठ सिद्धी आहेत. दहा सिद्धी या गुणात्मक सिद्धी आहेत. यासंदर्भाने संत एकनाथ म्हणतात- *सिद्धि अष्टादश जाण । त्यांची धारणा भिन्न भिन्न । ऐसें बोलिले योगज्ञ । योगसंपन्न महासिद्ध ।।३७।। या नांव गा सिद्धि समस्ता । यांत अष्ट महासिद्धि विख्याता । त्या माझे स्वरूपी स्वरूपस्थिता । आणिकासी तत्वतां त्या नाहीं ।।३८।। मनसा वाचा कर्मणा जाण । विसरोनि देहाचें देहपण । माझेनि स्वरूपें अतिसंपन्न । चैतन्यघन जो झाला ।।३९।। त्यापाशीं या सिद्धि जाण । उभ्या असती हात जोडून । परी तो न पाहे थुंकोन । निचाड जाण यापरी ।।४०।। इतर दहा सिद्धींची कथा । ज्या सत्वगुणें गुणभूता । साधक शुद्धसत्वात्मा होतां । त्या पाशी सर्वथा प्रकटती ।।४१।। अष्ट महासिद्धींची कथा । तुज मी सांगेन तत्वतां । ज्या माझेस्वरूपीं स्वभावतां । असती वर्ततां अहर्निशी ।।४२।।*

**४) सिद्धीप्राप्ती व सिद्धींचा विनियोग :-**

**अ) महासिद्धी -** भगवान श्रीकृष्णांनी उद्धवांना महासिद्धींची प्राप्ती व त्यांच्या विनियोगाविषयी सांगितले -

*आणिमा महिमा मूर्तेर्लघिमा प्राप्तिरिन्द्रयै ।*
*प्राकाश्यं श्रुतदृष्टेसु शक्तिप्रेरण मीशिता ।।४।।*
*गुणेष्वसंगो वशिता यत्कामस्तदवस्यति ।*
*एता मे सिद्धयः सौम्य अष्टावौत्पत्तिका मताः ।।५।।*

अणिमा, महिमा आणि लघिमा या तिन्ही सिद्धी देहसिद्धीच्या योगानें प्राप्त होतात. इंद्रियांसह त्या त्या विषयाची 'प्राप्ती' म्हणून जिला म्हणतात, ती महासिद्धी होय. याशिवाय प्राकाश्य श्रुतदृष्टता ही पाचवी, ईशिता ही सहावी, वशिता ही सातवी, यत्कामस्तदवस्यति ही आठवी सिद्धी होय. अशा आठ सिद्धींची प्राप्ती आणि त्यांच्या विनियोगासंबंधी संत एकनाथांनी ४३ ते ४९ ओव्यांमध्ये स्पष्ट विवरण केले आहे. नाथ लिहितात– *अणिमा महिमा लघिमास्थिती । या तिन्ही देहसिद्धीचे प्राप्ती । प्राप्तिरिंद्रियैः जे वदंती । ते जाण चौथी महासिद्धी ।।४३।। प्राकाश्य श्रुतदृष्टता । ते पांचवी सिद्धि गा सर्वथा । शक्तिप्रेरण ईशिता । हे जाण तत्त्वतां सहावी सिद्धि ।।४४।। माझे धर्म जेथ वश होती । ते वशिता बोलिजे सिद्धांतीं । ते सातवी सिद्धि वदंती । जाण निश्चितीं उद्धवा ।।४५।। त्रिलोकीं भोग जो निरुपम । तो न करितां परिश्रम । इच्छामात्रें उत्तमोत्तम । भोग सुगम हों लागे ।।४६।। (यत्कामस्तदवस्यति) इच्छिल्या कामसुखाची प्राप्ति । त्रिभुवनींची भोगसंपत्ती । एकेच काळें अवचितीं । ते जाण पां ख्यातीं आठवी सिद्धी ।।४७।। या अष्टमहासिद्धींची राशी । स्वभावें असे मजपाशीं । साधक शिणतां प्रयासीं । एकादी कोणासीं उपतिष्ठे ।।४८।। हे महासिद्धींची व्युत्पत्ती । इतर दहा ज्या बोलिजती । त्याही सांगेन तुजप्रती । यथानिगुती उद्धवा ।।४९।।* संत एकनाथ स्पष्ट करतात– देहसिद्धीच्या योगाने **अणिमा, महिमा** आणि **लघिमा** या तिन्ही सिद्धी प्राप्त होतात. विविध इंद्रियांच्या योगाने त्या त्या विषयाची 'प्राप्ती' करून देणारी चौथी महासिद्धी होय. **ईशिता** नावाची शक्ती विविध शक्तींची प्रेरणा करणारी सहावी महाशक्ती होय. वशिता या सिद्धीमध्ये प्रत्यक्ष भगवंतांचे गुणधर्म असतात. उत्तम भोग, परिश्रम न करताही केवळ इच्छेने सुगम होतात ती 'यत्कामस्तदवस्यति' ही सिद्धी होय. ही सिद्धी त्रैलोक्यातील उत्तम भोग तृप्त करते. या आठ सिद्धींचा समुदाय स्वाभाविकपणे भगवान विष्णूंचे ठिकाणीच असतो. हा समुदाय विष्णूभक्ताठायी, योगसाधनाकरतां सहजच स्वाभाविकपणे सेवेसाठी सिद्ध होतो.

**ब) इतर दहा सिद्धींची प्राप्ती आणि विनियोग :–** उद्धवांना वचन दिल्याप्रमाणे श्रीकृष्ण भगवंतांनी इतर सिद्धींची माहिती सांगितली–



*अनुर्मिमत्वं देहेऽस्मिन्दूरश्रवदर्शनम् । मनोजवः कामरूपं परकायप्रवेशनम् ।।६।। स्वच्छन्दमृत्युर्देवानां सहक्रीडा नुदर्शनम् । यथासंकल्पसंसिद्धिराज्ञाऽप्रतिहता गतिः ।।७।।* अनूर्मि सिद्धि, दूरश्रवण, दूरदर्शनकला, मनोजव, कामनासिद्धी, परकायाप्रवेश, इच्छामरण (स्वच्छंदेमरण), देवक्रीडादर्शन, इप्सितसिद्धी, अनिर्बंध संचार या सिद्धींचे वितरण करतांना संत एकनाथ म्हणतात–

*देहीं बाधिती ना उर्मि साही । ते अनूर्मिसिद्धि पहिली पाहीं । दूरली वाचा एके ठायीं । दूरश्रवण नवाई दुसरी सिद्धी ।।५०।। त्रिलोकींचा सोहळा बैसलेठायीं देखे डोळा । हे तिसरी सिद्धीची लीला । दूरदर्शनकळा ती नांव ।।५१।। मनोजवसिद्धि ऐशी आहे । कल्पिल्या ठायासी पाहें । मनोवेगें शरीर जाये । चौथी होये हे सिद्धी ।।५२।। कामरूप सिद्धीची परी । जैंसिया रूपाची कामना करी । तैसें रूप तत्काळ धरी । हे पांचवी खरी कामनासिद्धी ।।५३।। आपुलें शरीर ठेवूनि दूरी । परशरीरीं प्रवेशकरी । हे परकायाप्रवेशपरी । सहावी साजिरी अतिसिद्धी ।।५४।। काळासी वश्य नाहीं होणें । आपुलिये इच्छेनें मरणें । हे सातवीसिद्धी जाणणें । स्वच्छंदमरणें ती नांव ।।५५।। स्वर्गीं देवांचें जे क्रीडन । त्यांचें हा देखे दर्शन । स्वयें क्रीडावया अंगवण । ते सिद्धि जाण आठवी ।।५६।। जैसा संकल्प तैसी सिद्धि । ते नववी जाण पां त्रिशुद्धी ।। राजाही आज्ञा शिरीं वंदी । ज्याची गमनसिद्धी सवत्र ।।५७।। ज्याची आज्ञा आणि नमन । कोठेंही अवरोधेना जाण । हे दहावे सिद्धिचें लक्षण । ज्ञानविचक्षण जाणती ।।५८।। या गुणहेतुसिद्धींची विधी । म्यां सांगीतली हे त्रिशुद्धी । यांहीहोनि क्षुद्रसिद्धी । त्याही निज बुद्धीं अवधारीं ।।५९।।*

**क) पांच क्षुद्र सिद्धी** : भगवान श्रीकृष्णांनी उद्धवांना आणखी पांच क्षुद्र सिद्धींची माहिती सांगितली–

*त्रिकालज्ञत्वमद्वंद्वं परचित्ताद्यभिज्ञता ।*
*अंग्न्यर्काम्बुविषादीनां प्रतिष्टम्भोऽ पराजयः ।।८।।*

त्रिकालज्ञता, द्वंद्वनाश, स्वप्न आणि परमनज्ञान, महाभूते, शस्त्रे आणि विष यांच्या परिणामापासून मुक्तता (प्रतिस्तंभन) आणि सर्वविजयसिद्धी अशा पाच क्षुद्र सिद्धी होत. संत एकनाथांनी या सिद्धींचे विवरण केले आहे –

*क्षुद्रसिद्धि पंचलक्षण । भूत भविष्य वर्तमान । या त्रिकाळांचें जे ज्ञान । ते पहिले जाण ये ठायी ।।६०।। सुख दुःख शीत उष्ण । मृदु आणि अतिकठीण । या द्वंद्वांसी वश नव्हे जाण । तें दुसरें लक्षण सिद्धींचे ।।६१।। पराचें स्वप्न स्वयें सांगणें । पुढिलांचे चित्तींचे जाणणें । हे तिसरी सिद्धि म्हणणें । ऐक लक्षणें चौथीची ।।६२।। अग्नि वायु आणि उदक । शस्त्र विष आणि अर्क । यांचें प्रतिस्तंभन*

*देख । ते सिद्धि निष्टंक पैं चौथी ।।६३।। कोणासी जिंकिला न वचे पाहें । जेथींचा तेथ विजयी होये । एकला सर्वत्र विजयी लाहे । हे पांचवी आहे विजयसिद्धी ।।६४।।*

अशा प्रकारे ८+१०+५=२३ प्रकारच्या सिद्धींची गती श्रीकृष्णांनी उद्धवांना सांगितली. यानंतर अष्टमहासिद्धींची धारणा, दहा सिद्धींचे गुणहेतू आणि पांच क्षुद्र सिद्धींची लक्षणे कोणत्या प्रकारे साध्य करता येतात याच्या साधनांचे वर्णन श्रीकृष्ण करतात.

**५) सिद्धी साध्य करण्यासाठी धारणामार्ग व साधने तथा प्रयत्नांचे स्वरूप :–**

**अ) अष्टमहासिद्धी धारणात साधने –** प्रथमतः अष्टमहासिद्धींचे मार्ग, साधने व प्रयत्नांचे स्वरूप भगवंतांनी सांगितले. त्यावर संत एकनाथांनी भाष्य केले आहे. भागवतातील श्लोक असे–

*भूतसूक्ष्मात्मनि मयि तन्मात्रं धारयेन्मनः । अणिमानमवाप्नोति तन्मात्रोपासको मम ।।१०।। महत्यात्मन्मयि परे यथासंस्थं मनो द्धधत् । महिमानमवाप्नोति । भूतानां च पृथक पृथक ।।११।। परमाणुमये चित्तं भूतानां मयि रञ्जयन (रंजयन) । कालसूक्ष्मार्थतां योगी लघिमानमवाप्नुयात् ।।१२।। धारयन्मय्यहंतत्त्वे मनो वैकारिकऽखिलम । सर्वेन्द्रियाणामात्मत्वं प्राप्तिंप्राप्नोति मन्मनाः ।।१३।। महत्यात्मनि यः सूत्रे धारयेन्मयि मानसम् । प्राकाश्यं पारमेष्ठ्यं मे विन्दतेऽव्यक्तजन्मनः ।।१४।। विष्णौ त्र्यधीश्वरे चित्तं धारयेत्कालविग्रहे । स ईशत्वमवाप्नोति क्षेत्रक्षेत्रज्ञचोदनाम् ।।१५।। नारायणे तुरीयाख्ये भगवच्छब्दशब्दिते । मनो मय्यादधद्योगी मध्दर्मा वशितामियात् ।।१६।। निर्गुणे ब्रह्मणि मयि धारयन विषदं मनः । परमानन्दमाप्नोति यत्र कामोऽवसियते ।।१७।।*

**i) अणिमा** : अष्टमहासिद्धी श्रीकृष्ण भगवंतांच्या ठायीच असल्या तरी त्या साध्य करण्यास दुर्घट आहेत, असे सांगून श्रीकृष्ण सांगतात, परमात्मा अणुरेणुहूनही सूक्ष्म आहे. तो परमात्मा प्रत्येक जीवाच्या हृदयात वास करतो. साधकाने परमात्म्याच्या सूक्ष्मतेप्रमाणे अतिसूक्ष्मपणे मन परमात्म्यामध्ये स्थिर ठेवावे. परमेश्वराच्या अतिसूक्ष्मरूपाचे सतत ध्यान करावे. असे केल्यास साधकाचा देहही सूक्ष्म होतो. म्हणजेच त्याला 'अणिमा' सिद्धी प्राप्त होते. असे सूक्ष्मरूप धारण करून त्या साधकाला अछिद्र पदार्थातूनही आरपार जाता येते. तो साधक सर्वांच्या दृष्टिव्यवहारात राहूनही कोणाच्या नजरेत येत नाही किंवा कोणाच्या डोळ्याला खूपत नाही. अणिमा सिद्धीने असा संचार सर्वत्र करता येतो.



**ii) महिमा** : परमेश्वराचे स्वरूप अपार असे सर्वव्यापी आहे. महत्‌तत्त्वापासूनही ते मोठे आहे. तसे महान रूप साध्य करण्यासाठी साधकाने परमात्म्याच्या अशा सर्वव्यापीरूपाचे ध्यान करावे. आपला देह याच धारणेने व्हावा अशा मनोधारणेचा ध्यानमग्नपणे अभ्यास करावा. अशी साधना केल्यास त्याचे देहरूपही विश्वव्यापक होते. म्हणजेच त्या साधकाला महिमा सिद्धी प्राप्त झाली असे समजावे. त्याच्या व्यापकत्वाची बरोबरी पृथ्वीदेखील करू शकत नाही. एवढेच नव्हे तर सर्व विश्वच त्याच्यात सामावले आहे असा अनुभव येतो. या सिद्धीच्या योगाने योगी असा विराट स्वरूप धारण करू शकतो.

**iii) लघिमा** : अणिमा सिद्धीप्राप्तीने अच्छिद्रातूनही आरपार जाता येते; तर लघिमा सिद्धीमुळे अगदी लहान छिद्रातून पलीकडे जाता येते. म्हणजे लघुरूप धारण करता येते. अणिमामध्ये एकप्रकारे अदृश्यता आलीसे वाटते; तर लघिमा सिद्धी दृश्य असे अतिलघु रूप धारण करण्यासाठी सिद्ध करावयाची असते. वायुसमान जी सूक्ष्म तत्त्वे आहेत किंवा परमाणुस्वरूप भगवंत आहे असे म्हटले जाते. एवढ्या सूक्ष्मरूप परमेश्वराचे ध्यान करण्याचा सतत अभ्यास करून; 'लघिमा' सिद्धी प्राप्त करता येते.

अणिमा, महिमा, लघिमा या वस्तुतः मनोधारणा असून, त्यांच्या अभ्यासाने या सिद्धी सिद्ध होतात किंवा प्राप्त होतात. या तीनही सिद्धींमध्ये धारणायुक्त ध्यानाचा अभ्यास महत्त्वाचा असतो. धारणा म्हणजे स्वाभाविक अवस्थेविषयीचा आत्मविश्वास होय. परमात्मा हा सूक्ष्मस्वरूप, लघुस्वरूप आणि सर्वव्यापकस्वरूप असा आहे. तो त्याचा स्वाभाविक गुण आहे. तोच परमात्मा जीवाच्या ठिकाणी स्थित असल्याने त्याच्या ठायीही तो स्वाभाविक गुण आहे असा आत्मविश्वास निर्माण व्हावा ही मनोधारणा होय. त्यामुळे त्या त्या स्वरूपाचा ध्यान अभ्यास केल्यास ती ती सिद्धी प्राप्त होते.

अन्य पांच महासिद्धीही याच धारणातत्त्वांनी प्राप्त करता येतात. त्यांचा विधी पुढीलप्रमाणे सांगता येतो.

**iv) इंद्रियप्राप्ती** : परमात्म्याचे ठिकाणी शुद्ध अहंकार (स्वसंवेद्यता) असतो. त्यांपासून इंद्रियांचे ठायी विकार निर्माण होतात, असा तो चैतन्य प्रदान करणारा परमात्मा आहे. शुद्धअहंकारयुक्त चैतन्य योगाने इंद्रियांच्या ठिकाणी, ऐंद्रियदेवतांशी, संयोगाने इंद्रियप्रकाशधर्म येतो. त्यामुळे जगातील इंद्रियांच्या ठायी जे व्यापार घडतात ते सर्व इंद्रियप्रकाश सिद्धी प्राप्त झालेला, परमात्मस्वरूप अर्थात साक्षात चैतन्य, स्वतःच ते व्यापार करीत आहे असा अनुभव दृष्ट होतो. अशी

'इंद्रियप्राप्ती' सिद्धी त्या अहंकारयुक्त चैतन्यतत्त्वाच्या ध्यान अभ्यासाने प्राप्त होते. अशा प्रकारे त्या योग्याच्या अनुबंधाने ज्या ज्या इंद्रियांचा व्यापार जेथें जेथें होतो, तो त्या योग्यानेच अर्थात परमात्मरूपानेच केला आहे, अशी प्रतिती येते. अशी ही 'इंद्रियप्राप्ती' सिद्धी होय.

v) **प्रकाशसिद्धी** : महत्‌तत्त्व हेच मायेचे पहिले स्फुरण असते. हे महत्‌तत्त्व म्हणजे परमात्मा, स्वतःच सूत्रात्मा स्वरूपात प्रकट झाला आहे. अशा त्या सूत्रात्म्याचे सावधचित्ताने ध्यान करणाऱ्या साधकाला सूत्राच्या प्रकाशप्रवाहाने ब्रह्मांडे व हिरण्यगर्भ (तेजोगोल) ही प्रकाशमान होतात व वशही होतात. सूत्रात्म्याच्या निधीध्यासपूर्वक ध्यानाने, योगी ठायीच, कोटी ब्रह्मांडेही निर्माण करू शकतो. हे प्रकाश सिद्धीचे महत्त्व होय. यामुळे ब्रह्मांडात आणि तेजोगोलांच्या ठिकाणी असलेले सर्वकाही त्यास पाहाता येते.

vi) **ईशिता सिद्धी** : सर्वनियंत्या श्री विष्णूंचे निरंतर धान्य केल्याने ईशत्व प्राप्त होते म्हणजे ईशिता सिद्धी प्राप्त होते. ईशिता सिद्धी प्राप्त झाल्याने अदृश्य वस्तु तथा गोष्टी पाहाण्याचेही सामर्थ्य प्राप्त होते. यामुळे प्रपंच संसारात घडणाऱ्या, वावरणाऱ्या गोष्टी तो पाहू शकतो. त्यातील समस्यांचे निवारण करू शकतो. ईशिता सिद्धी अति सामर्थ्यवान असून, त्या सिद्धींच्या उपयोजनाने दुर्बलांकडून अतिकठीण कार्य करून घेता येते. ठार मारणे, पुन्हा जिवंत करणे, अचेतनाला सचेतन करून; कार्य करविणे अशा गोष्टी करता येतात.

vii) **वशिता सिद्धी** : तुरिया ही जागृति, स्वप्न आणि सुषुप्तिच्या पलीकडील नारायण अवस्था होय. यश, श्री, वैराग्य, ज्ञान, ऐश्वर्य आणि औदार्य अशा षड्‌गुणसंपन्न नारायणस्वरूपाचे ध्यान तथा अभ्यास केला असता 'वशिता' सिद्धी प्राप्त होते. या सिद्धीयोगाने सर्वप्रकारचे भोग भोगूनही सर्वांपासून त्या कैवल्याप्रमाणे अभोक्ताच राहता येते. अशी ही अति सामर्थ्यवान सिद्धी आहे.

viii) **यत्कामस्तदवस्यति सिद्धी (कामनिवृत्ती सिद्धी)** : निर्गुण व परिपूर्ण अशा श्रीकृष्णांचे अर्थात परमात्म्याचे साधकाने ध्यान केल्यास त्यास सर्व इच्छांच्या पलीकडील परमानंदांची प्राप्ती होते. परमानंदांची प्राप्ती झाली असतां, सर्व इच्छा लुप्त होऊन जातात, अशी निष्काम आनंदस्थिती स्वरूप 'यत्कामस्तदवस्यति' सिद्धी प्राप्त होते. याच सिद्धीला सर्वकामनिवृत्तीसिद्धी असेही नाव आहे.

अशा या अष्टमहासिद्धी साध्य करण्याचे सामर्थ्य देव, मानव व तत्सम मानवी रूपांना अर्थात दानव, राक्षस, यक्ष, किन्नर तथा किंपुरुष, विद्याधर, गंधर्व आदि योनींना असते. या सिद्धींचा वापर साधक, सर्वकल्याणासाठी तसेच



सर्वसामान्यांठायी ज्ञानमार्गाचा विश्वास तथा श्रद्धा निर्माण व्हावी म्हणून, दुर्धर संकटांवर व दुर्जनांवर मात करून विजय संपादण्यासाठी करतात. साधकांनी अशा कल्याणात्मक गोष्टीऐवजी, मोहवश होऊन; स्वतःचा बढीवार मिरविण्यासाठी अर्थात स्वतःचे देव्हारे माजविण्यासाठी करू नये असा दंडक सद्‌गुरु अवश्य घालतात. या सिद्धीमध्ये अडकून पडलेला साधक मोक्षपदाला अर्थात अजन्मा होऊ शकत नाही. याकरिता या सिद्धी योगमार्गातील मोठे विघ्न आहे असे मुमुक्षू आणि सद्‌गुरु अवश्य सांगतात.

**ब) अन्य दहा महत्त्वाच्या गुण सिद्धीं–धारणा व साधने :–** अष्ट महासिद्धींवरील व्याख्यानांनंतर अन्य महत्त्वाच्या दश सिद्धींच्या धारणा व साधने यांसंबंधी भगवंतांनी श्लोक क्र. १८ ते ३० मध्ये स्पष्ट सूत्रे सांगितली आहेत. एकादश स्कंधातील १५ व्या अध्यायातील, या तेरा श्लोकांवर १०७ ते १८० अशा सत्तर ओव्यांत विवेचन संत एकनाथ महाराजांनी केले त्यांचा मतितार्थ असा–

i) **दूरश्रवणसिद्धी** : आकाशाचा आत्मा हा परमात्माच आहे. स्वर, नाद, शब्द हे सारे आपला विलास आकाशाच्या आश्रयानेच करतात. त्यांचे निवासस्थानही आकाशच आहे. परमात्मा अर्थात आकाश असे प्राणांचा प्राण, वाणींची वाणी, सरस्वतीचे जीवन आहे. अशा आकाशात्म श्रीकृष्णांचे अर्थात परमात्म्याचे ध्यान साधकाने आपल्या हृदयात केले तर; प्रकट होणाऱ्या सर्वदूरच्या वाणींचे श्रवण तो योगी करू शकतो. अशी दूरश्रवणसिद्धी त्यास प्राप्त होते. अंतःकरणात भगवंतांची नादयुक्त धारणा धारण केली असतां जगातील गुप्त गोष्टी त्याच्या कानावर पडतात. अशी ही दूरश्रवणसिद्धी साध्य होते.

ii) **दूरदर्शनसिद्धी** : जो साधक श्रीकृष्णस्वरूप सूर्यनारायणाचे डोळ्यांमध्ये ध्यान करतो, त्या साधनेने त्याचे डोळेच सूर्यनारायणस्वरूप होतात. म्हणजे नेत्र, सूर्य आणि भगवंत यांचे अद्वैत होते आणि साधक योगी सूक्ष्म द्रष्टा होतो तो सारे जग पाहू लागतो. ठायीच एकाच वेळी चौदाभुवनांचे दर्शन घेऊ शकतो; अशी दूरदर्शनसिद्धी सिद्ध होते.

iii) **मनोजवसिद्धी** : परमात्मा हा मनोस्वरूप आहे. साधकाने ठायीचे मन प्राणायामासह ध्यानधारणेत परमात्म्याठायी एकरूप केले तर ध्यानधारणेच्या प्रभावाने देहालाही मनोवेगाने कोठेही गमन करण्याचे सामर्थ्य सिद्ध होते. केवळ संकल्पाने मन जेथे जाते तेथे देहाचेही गमन घडते. या सिद्धीला मनोजवसिद्धी असे म्हणतात.

**iv) कामरूपसिद्धी** : कामरूपसिद्धी प्राप्त करण्यासाठी परमात्म्याची भावना मनात धारण करून; परमात्म्याचे अतर्क्य सामर्थ्य ठायी आहे अशी कल्पना करता येते. अनेक प्रकारची रूपे घेऊन ती पुन्हा विसर्जित करून पूर्वरूपाला प्राप्त होण्याचे सामर्थ्य प्रकटते अशी परिपूर्ण सत्ता ठायी प्रकटते. देव, मनुष्य किंवा नाग यापैकी जे रूप धरण्याचा संकल्प करतो ते रूप तात्काळ धारण करता येते. यालाच काम (इच्छा) रूपसिद्धी साध्य झाली असे म्हणतात.

**v) परकाया प्रवेश सिद्धी** : परकाया प्रवेश करतांना देहातील सर्व प्राणांना (पंचप्राणांना) आवरून ज्या देहात प्रवेश करावयाचा त्या देहात धारणा धरावी. त्यावेळी लिंगदेहातील जीव आणि प्राण (देह आणि आत्मा) यांच्या एकात्म संचाराने देहांतराची अहंता वायूमार्गाने मिळून जाते. ती दुसऱ्या अपेक्षित देहात प्रवेश करते. ही परकाया प्रवेश सिद्धीची प्रक्रिया होय. यासाठी परमात्मस्वरूपाची ध्यानधारणा महत्त्वाची असते. परमात्मस्वरूपाचे दृढतर ध्यान केले असता देहमय परमात्मा असल्याचा अनुभव येतो व आपल्या पूर्वीच्या देहाला न सोडता दुसऱ्या देहांत प्रवेश करता येतो.

या प्रक्रियेत दोन प्रकारे परकाया प्रवेश करता यतो. (१) स्वदेह न टाकता परकाया प्रवेश वरीलप्रमाणे करता येतो तर (२) स्वेच्छेंने देह टाकून परकाया प्रवेश करणे होय. या दुसऱ्या प्रकाराची प्रक्रिया संत एकनाथांनी विस्तृतपणे वर्णन केली आहे. त्याचा मतितार्थ असा–

**vi) स्वच्छंद मृत्यूसिद्धी** : देहत्यागाकरिता 'स्वच्छंद मृत्यू' प्रक्रियेचा विचार करावा लागतो. ''योगमार्गानें प्राण धारण करणें हेंच स्वच्छंद मृत्यूचे लक्षण होय. त्याकरितां प्राणाचे जें ब्रह्मरंध्रापर्यंत मार्गक्रमण करावयाचें, तें योगधारण एक, गुद्द्वाराच्या ठिकाणी डाव्या पायाची टांच जोरानें नेटून बसवावी आणि गुद्द्वार अशा रितीने बंद करून अपानवायूचें खालीं जाणें बंद करावें. हृदयामध्यें वावरणारा जो प्राण असतो, तो नेहमी वर वर जात असतो, त्याला प्राणायामानें आवरून धरून अधोमुख करावा. अशा रितीनें अपानवायूचें खालीं जाणें बंद झाल्यामुळें तो वर चढून जेव्हां स्वाधिष्ठानचक्रापर्यंत पोंचेल व प्राणही अधोमुख होऊन खालीं येत येत त्याच चक्रापर्यंत येईल. तेव्हांच त्या चक्रामध्यें प्राणापानांचे ऐक्य होऊन; समसमान होतात आणि त्या दोहोंचा मिलाफ झाला म्हणजे ते दोन्ही एकरूप होऊन, पुढील मार्गाचे उल्लंघन करतात. अपानाचा अधोमार्ग असतो तोही सुटतो. प्राण हृदयांतून गळ्याकडे जात असतो, तोही जाईनासा होतो आणि दोघेही सुषुम्नेचें द्वार खुलें करून त्या तिच्या विवरांतून नीट सरळ वर जाऊं लागतात.



ह्याप्रमाणें सुषुम्नेचें स्थान सर झालें म्हणजे ते तसेच पुढें घुसून मार्गात असणाऱ्या सहाही चक्रांचे पडदे दूर करून काकीमुखांचे द्वार खुलें करून त्यांतून ब्रह्मरंध्रांत जाऊन पोंचतात. तेथें ते नीट रितीने जाऊन पोंचले की असलेल्या देहाची स्थिति सोडून जो देह धारण करण्याची त्याच्या मनांत इच्छा असते तो देह योग्याला प्राप्त होतो. वैकुंठ, कैलास किंवा अमरावती येथें जावयाचें किंवा सार्वभौम चक्रवर्ती म्हणावयाचें, अशा प्रकारची जी इच्छा तो मनांत आणितो ती स्थिति तो तात्काळ पावतो. जरी तो ब्रह्मस्वरूपाची इच्छा धरील, तरी पूर्वदेहाचे भान सोडून शुद्ध ब्रह्माच्याच ध्यानात तो निमग्न होईल आणि तो स्वतः सिद्ध बद्धच होईल. याप्रमाणें प्राणाचें धारण करून; जो आपला देह ठेवतो, तेंच त्याचे स्वच्छंद मृत्युचे लक्षण होय. कळिकाळ सुद्धा त्याच्या आधीन असतो,'' असा श्री संत एकनाथांच्या स्वच्छंद मृत्यूवरील भाष्याचा सरळ अर्थ संपादकांनी दिला आहे.

**vii) कामविलासभोग** : देवांचे दिव्यभोग भोगण्याच्या इच्छापूर्तीसाठी योग्याने परमात्म्याच्या सत्वाची धारणा मनात धरावी. याच सत्वाच्या योगाने देवांची निर्मिती व स्थापना देवलोकात तथा स्वर्गात केली आहे. या सत्वगुणाची धारणा ठायी ठेवल्याने कामविलासभोग सिद्धी प्राप्त होते व देवांचा मान योग्याला मिळतो. तो स्वर्गातील सर्व प्रकारचे उपभोग ठायीच अनुभवू लागतो.

**viii) मनोरथसिद्धी** : त्याचबरोबर तो परमात्मा सत्यसंकल्पाचा दाता आहे किंवा पूर्ण करणारा आहे हे लक्षात घेऊन; सत्यसंकल्प भगवानांच्या ठिकाणी विश्वासपूर्वक चित्त ठेवून ध्यान करावे, म्हणजे मनोरथसिद्धी प्राप्त होते. असा योगी ज्या ज्या काळीं ज्या ज्या ठिकाणीं, ज्या ज्या कामांत आणि ज्या ज्या स्थितींत ज्याची ज्याची मनांत इच्छा करील ते ते मनोरथ सफल होईल.

**ix) आज्ञासिद्धी** : स्वतंत्र, केवल, सर्वसत्ताधीश, सर्वनियंता अशा परमात्म्याची धारणा ठायी धरून; ध्यान करावे म्हणजे योगी परमात्मस्वरूपच होऊन, त्याच्याठायी सर्वसत्ताधीश अशी शक्ती प्रकटते म्हणजेच आज्ञासिद्धी प्राप्त होते. चराचरावर त्याची आज्ञा चालते.

**x) षड्उर्मिरहितसिद्धी** : कार्यासहवर्तमान रज–तम दूर लोटून केवळ सत्वाभिमानी अशा परमात्म्याची धारणा ठायी करून; ध्यान करणारा योगी षड्रिपुमुक्त सिद्धी प्राप्त करतो. अशा योग्याला शोक, मोह, जरा, मृत्यू, क्षुधा, तृषा या गोष्टींचा स्पर्शही होत नाही.

**क) पंच क्षुद्र सिद्धी :– i) त्रिकालज्ञ सिद्धी** : उत्पत्ति, स्थिती, लय ज्या परमात्म्याच्या आधीन आहे; त्या परमात्म्याच्या ठिकाणी अंतःकरण शुद्ध ठेवून,

ध्यान केल्याने, त्रिकालज्ञ सिद्धी प्राप्त होते. भूत, वर्तमान व भविष्य यांविषयीचे ज्ञान योग्याला प्राप्त होते.

**ii) अद्वंद्वतासिद्धी** : अतिप्रयासाने भगवंतांशी चित्त एकाग्र होऊन स्वरूपता येते. अशा स्थितीत सत्वगुणात्मकतेने अद्वंद्वातीतता सिद्धी प्राप्त होते. लाभ-अलाभ, सुख-दुःख, शीत-उष्ण आदि प्रकारची द्वंद्वे अशा योग्याठायी राहातच नाहीत. शस्त्र, विष इत्यादींची बाधाही त्याला होत नाही.

**iii) स्वप्न तथा परमनज्ञानसिद्धी** : भगवंताच्या ध्यानाने भगवंतस्वरूपता सिद्ध होऊन सर्वांठायींच्या भगवंतांची जाणीव होते. त्यामुळे परमन किंवा परस्वप्न यांचे ज्ञान सहजगत्या प्राप्त होते. दुसऱ्याच्या मनातील गोष्टी त्या योग्याला कळतात. यालाच चित्तचालकता असेही नाव आहे.

**iv) प्रतिस्तंभनसिद्धी** : महत्प्रयासाने भगवंतांशी एकचित्त झाल्याने भगवंत स्वरूपता अनुभवता येते. त्यामुळे वीज, वादळे, शीत, उष्ण, प्रलय इ. कशाचीही बाधा होत नाही, असा तो या सर्व प्रकारच्या आघातांना स्तंभित करू शकतो. या सिद्धीला प्रतिस्तंभनसिद्धी असे नाव आहे. शस्त्रांस्त्रांचेही स्तंभन करू शकतो.

**v) सर्वविजयसिद्धी** : भगवंतांचे एकचित्त ध्यान केल्याने भगवंतांची सर्व शक्ती ठायीच प्रकटते आणि अपराजय किंवा सर्वविजयसिद्धी प्राप्त होते. एका भगवंतस्वरूप होण्याने, अन्य कोणाचेही सहाय्य न घेताही, योगी सर्वत्र विजयी होतो. या सिद्धीला अपराजिता सिद्धी असेही नाव आहे.

**६) सर्वसिद्धीप्राप्ती धारणा प्रक्रिया :-**

अष्टमासिद्धी, दशगुणसिद्धी आणि पंचक्षुद्रसिद्धी प्राप्त करण्यासाठी विविध प्रकारच्या योगधारणा सांगितल्यानंतर अनेक योगधारणांची यातायात न करता, एकाच धारणेने सर्वसिद्धी कशा प्राप्त होऊ शकतात या विषयी भगवंतांनी उद्धवांना उपदेश केला आहे. त्यावर संत एकनाथांनी विस्तृत भाष्य केले आहे. ते मुळातून अभ्यासणे इष्ट होईल. श्लोक क्र. ३२ वरील हे भाष्य योगसाधनेत अर्थात समाधी साधनेत अति महत्त्वाचे आहे.

*जितेन्द्रियस्य दान्तस्य जितश्वासात्मिनो मुनेः । मध्यारणां धारयतः कासा सिद्धीः सुदुर्लभा ॥३२॥ पांच पांच इंद्रियांची जोडी । जिणोनि शमदमपरवडी । उभवूनि वैराग्याची गुढी । प्राणापान ओडी जिंकिल्या ॥८१॥ विवेकाचे नि बळें जाण । वृत्ति राखोनि सावधान । सदा करितां माझें मनन । मननें मन जिंकिले ॥८२॥ यापरी गा साधकासी । धारणा धरोनि मानसीं । मी एक ध्यांता अहर्निशीं । सकळ सिद्धी दासी त्यासी होती ॥८३॥ सांडूनि सकळ उपाये । मी एक ध्यानीं धरिल्या पाहें । साधकासी काय उणें आहे । दुर्लभ काये सिद्धींचें ॥८४॥ माझे भजनें सावकाशीं । सिद्धी प्रकटती साधकासी । त्या सेव्य नव्हती त्यासी । तेंचि हृषीकेशी सांगतु ॥८५॥* १८१ ते १८५ या पाच ओव्यांत संत एकनाथ सांगतात, शमदमाच्या बळाने पंचज्ञानेंद्रिये आणि पंचकर्मेंद्रिये यांना जिंकून अर्थात जितेंद्रिय होऊन वैराग्याची पताका फडकविली आणि प्राणापानांच्या ओढीही जिंकल्या, तसेच विवेकबळाने वृत्तीला सावध ठेवून सर्वकाळ परमेश्वराचेच मनन केले की मनाने मन जिंकल्याचा अनुभव येतो. याप्रमाणे साधकाने मनांत धारणापूर्वक रात्रंदिवस परमेश्वराचे अर्थात श्रीकृष्णांचे ध्यान केले असता, सर्व सिद्धी त्यांच्या दासी होतात. परमेश्वरांचे ध्यान एकचित्ताने सतत करणे हा सर्वसिद्धी प्राप्तीचा सर्वोत्तम उपाय होय.

**७) सिद्धीप्राप्तीचे विविध प्रकार :-**

एकादश स्कंधातील पंधराव्या अध्यायात ३४ व्या श्लोकात भगवंतांनी सिद्धीप्राप्तीच्या विविध प्रकारांची चर्चा केली आहे-

*जन्मौषधितपोमन्त्रैर्यावतीरिह सिध्दयः ।*
*योगनाप्नोति ताः सर्वा नान्यैर्योगगतिं ब्रजेत ॥३२॥*

त्यावर संत एकनाथांनी १९९ व २२० अशा एकवीस ओव्यांत विस्तृत भाष्य केले आहे -

*सिद्धींचे प्राप्तीचें कारण । जन्मौषधि मंत्र तप जाण । कां साधल्या प्राणापान । सकळ सिद्धी जाण योगाभ्यासीं ॥१९९॥ एकी जन्मास्तव सहज सिद्धी । एकी त्या साधिती औषधी । एकी त्या तपादि महाविधी । एकी त्या त्रिशुद्धी मंत्रद्वारा ॥२००॥ सर्पासी वायुधारण । मीनासी जळतरण । पक्ष्यासी नभोगमन । हे जन्मसिद्धि जाण स्वाभाविक ॥२०१॥ हंस निवडी क्षीरनीर । कोकिळेसी मधुर स्वर । चंद्रामृत सेवी चकोर । हे सिद्धि साचार जन्मास्तव ॥२०२॥ जन्मास्तव सहज सिद्धी । त्या म्यां सांगितल्या सुबुद्धी । आतां साधिलिया औषधी । लाभती सिद्धी त्या ऐक ॥२०३॥ श्वेतमांदारीं गजानन । अंगारकचतुर्थी साधिल्या जाण । सकळ विद्यांचे होय ज्ञान । धनधान्यसमृद्धी ॥२०४॥ अजानवृक्षाची वोळखण । त्याचीं फळें श्वानमुखें जाण । त्याचें घडल्या क्षीरपान । होय आपण अजरामर ॥२०५॥ पिचुमंद नित्य सेविल्या देख । त्यासी बाधीना कोणी विख । पाताळगरूडीचें प्राशिल्या मुख । त्यासी देहदुःखबाधीना ॥२०६॥ पूतिकावृक्षाचे मूळीं । असे महाशक्तीची पुतळी । ते साधल्या अप्सरांचे मेळीं । कोडे तत्काळी साधक ॥२०७॥ अनंत औषधी अनंत सिद्धी । त्यांची साधना कठीण त्रिशुद्धी । तपादि सिद्धींची विधी । ऐक सुबुद्धी*

*उद्धवा ।।२०८।। कृच्छ्र पराक चांद्रायण । आसार जलाशय धुम्रपान । तप करी जें जें भावून । ते ते सिद्धी जाण तो पावे ।।२०९।। ऐक मंत्रसिद्धीचें लक्षण । प्रेतावरी बैसोनि आपण । एकरात्र केल्या अनुष्ठान । प्रेतदेवतां संपूर्ण प्रसन्न होय ।।२१०।। तेणे भूत भविष्य वर्तमान । ते सिद्धि प्राप्त होय जाण । करितां सूर्यमंत्रविधान । दूरदर्शनसिद्धि उपजे ।।२११।। जैसा मंत्र जैसी बुद्धी । तैसी त्यास प्रकटे सिद्धी । या काळ सिद्धींची समृद्धी । योगधारणा विधीमाजीं असती ।।२१२।। नेहटूनिया आसना । ऐक्य करोनि प्राणापानां । जो धरी योगीराणा । सकळ सिद्धी जाणा ते ठायी ।।२१३।। म्या सांगितली सिद्धींची कथा । झालिया प्राणापानसमता । आलिया योगधारणा हाता । तैं सिद्धी समस्ता प्रकटती ।।२१४।। प्राणापान समान न करितां । योगधारणाही न धरितां । मज एकातें हृदयीं धरितां । सिद्धीसमस्ता दासी होती ।।२१५।। मज पावावया तत्त्वतां । मज एकातें स्मरतां ध्यातां । पावो देऊन सिद्धींचे माथां । चारी मुक्ती स्वभावतां दासी होती ।।२१६।। नाना सिद्धींची धारणा धरिंता । माझी सलोकता समीपता । हाता न येगा सरूपता । मग सायुज्जता ते कैंची ।।२१७।। माझे अतिशये शुद्ध भक्त । ते मुक्तीसी दूर दवडित । माझेनि भावार्थे नित्यतृप्त । ते पूज्य होत मजलागीं ।।२१८।। जो सकळ सिद्धींचा ईश्वरू । तो मी लागें त्यांची पूजा करूं । तेथिला जो सिद्धींचा संभारू । घेऊनि निजवेव्हारू पळताती ।।२१९।। सकळ सिद्धींच्या स्वामित्वेंसी । मी भगवंत तिष्ठें भक्तांपाशीं । तेंचि श्लोकार्थें हृषीकेशी । उद्धवासी सांगत ।।२२०।।*

जन्मतः सिद्धी प्राप्त असतात. विशिष्ट औषधी व कंदमुळे, मंत्र, तंत्र, यंत्र इ. गोष्टींच्या सहाय्याने सिद्धी प्राप्त होतात. सद्गुरुच्या मार्गदर्शनाने व कृपेने सिद्धी प्राप्त होऊ शकतात. सद्गुरुंकडून शक्तीपातानेही सिद्धी प्राप्त होऊ शकतात. भौतिक प्रपंचसंसारातील समस्या, संघर्ष, अडचणी सोडविण्यातच सिद्धींचा वापर करू लागले; घरदार, शेतीपोती, धन, दारा, भोग इ. मिळविण्यासाठी सिद्धींचा वापर होऊ लागला; की योगी त्या संमोहनातच अडकतो. योगसाधनेचे, समाधीसाधनेचे जे अंतिम लक्ष्य किंवा ध्येय मुक्ती, अर्थात स्वरूपता साध्य करणे अर्थात अद्वैतसिद्धी मिळवून सच्चिदानंदस्वरूप होणे; त्या ध्येयापासून योगी दूर जातो. म्हणूनच सिद्धी हे योगमार्गातील संमोहक संकट आहे. त्यात अडकले की चारीमुक्तीपासून साधक वंचित राहतो. याकरिता समाधीसाधकाने विवेकपूर्वक सिद्धीचा वापर केला पाहिजे. सिद्धी या दैवी शक्ती प्रत्यक्ष भगवंतांकडून प्राप्त होत असतात. भगवंताठायीच्या कारुण्यानेच सिद्धींचा आवश्यक व अनिवार्य तेव्हांच लोककल्याणार्थ वापर केला पाहिजे.



**८) समाधीसाधनेचे साफल्य :–**

भगवंतांनी स्वमुखाने उद्धवाला सिद्धीविषयींचे निरुपण करून योग्याच्या अंतिम साध्याविषयी प्रबोध केला आहे. त्यासाठी सिद्धींचे स्थान आणि त्यांपलीकडील परमेश्वराचे स्वरूप निवेदित करून, सायुज्यमुक्ती, सच्चिदानंदस्वरूपता हे राजयोग, हटयोग, समाधीसाधना, मंत्र, तंत्र, यंत्र, योग, अद्वैतसिद्धीयोग, द्वैताद्वैतयोग, इ.चे अंतिम ध्येय गाठावयाचे असते. त्यासाठी परमेश्वराची अर्थात निर्गुण, निराकार, निर्विकार, अविनाशी, महाशून्य, केवल, निज, सच्चिदानंदस्वरूप, संवित्ती, स्वसंवेद्य आत्मरूपाची ध्यानधारणा आवश्यक असते. यासाठी भगवंतांनी आपले स्वरूप श्लोक क्र. ३५ व ३६ मध्ये स्पष्ट करून मार्गदर्शन केले आहे. उद्धवांना श्रीकृष्णभगवंत हेच सद्गुरु लाभले आहेत. ते सांगतात–

*सर्वासामपि सिद्धीनां हेतुः पतिरहं प्रभुः ।*
*अहं भोगस्य सांख्यस्य धर्मस्य ब्रह्मवादिनाम् ।।३५।।*
*अहमात्माऽऽन्तरो बाह्योऽनावृतः सर्वदेहिनाम ।*
*यथा भूतानि भूतेषु बहिरन्तः स्वयं तथा ।।३६।।*

योगशास्त्रातील अर्थात ब्रह्मविद्येतील सांख्यमताप्रमाणे मीच सर्वत्र अंतरबाह्य व्यापून आहे. असे स्पष्ट करून त्याचा ठायीच अनुभव घेणे हेच योगमार्गाचे अंतिम साफल्य आहे. याकरिता सिद्धींमध्ये गुंतून राहाणे म्हणजे केवळ माझ्या ठायीच्या तात्कालिक व्यवस्थापकीय शक्तींमध्ये गुंतून राहाणे होय. वस्तुतः मद्रूप झालेला योगी स्वरूपाने सर्वथा सिद्धच असतो. हे लक्षात घेऊन केवळ परमात्म्याची योग, मंत्र, जप, तप, यंत्र, तंत्र अशा कोणत्याही मार्गाने निस्सीम एकनिष्ठ, एकाग्र, ध्यानधारणा करून; स्वस्वरूपता ठायी अनुभवत सच्चिदानंदस्वरूप स्थितीमग्न व्हावे हेच समाधीसाधनेचे साफल्य होय. चारीमुक्ती आपसुकच त्या योग्याठायी अनुभवास येतात.

एकादशस्कंधातील पंधराव्या अध्यायात श्रीकृष्णांनी उद्धवांशी केलेल्या संवादातून प्राप्त होणारे सिद्धींचे ज्ञान, त्यांच्या प्राप्तीसाठी धारणा, गुणात्मकता, ध्यान आणि सिद्धींचा विनियोग यांविषयी विस्तृत चर्चा करून, नाथांनी सर्वसामान्य लोक, साधक व योगी यांना श्रीकृष्णमुखाने प्रकट झालेले ज्ञान वितरित केले आहे.

* * *

# अमृतसिद्धी योगी जगद्गुरु संत तुकाराम

जगद्गुरु संत तुकोबारायांच्या सदेह वैकुंठगमन या योगवैज्ञानिक सत्य घटनेविषयी नेहमीच चर्चा घडते. विज्ञाननिष्ठ, पुरोगामी, तथाकथित समाजसुधारक, विचारवंत म्हणविणारे विचारवंत आणि पाश्चात्य संशोधन पद्धतीने संशोधनाचा आव आणून; प्रमाणांचा भौतिकतः विचार करून; आपणास न्याय, डोळस, अंधश्रद्धा निर्मूलक म्हणविणारे, तथाकथित संशोधक; संत, समाधीमग्न, साक्षात विष्णुस्वरूप तुकोबारायांचा खून झाला असा जावईशोध लावून; निर्णय देऊन मोकळे झाले.

**१) योगवैज्ञानिक दृष्टीने पाहावे :–**

जगद्गुरु तुकोबारायांचे सदेहवैकुंठगमन, हे योगवैज्ञानिक सत्य आहे, असे स्पष्टपणे सांगणारे समकालीन आणि उत्तरकालीन संत व तुकारामभक्त, हे ब्राह्मण्यग्रस्त, ब्राह्मणवादी आणि छद्मवैज्ञानिक आहेत असे वारंवार ठासून सांगत, 'तुका विष्णु नाही दुजा' म्हणणे म्हणजे चक्क ब्राह्मणी कावा आहे, असे म्हणतात. स्वतःच जातीभेदाला अभिनिवेशाने शरण जात; समाधीमग्न, सिद्ध योगी संत तुकोबारायांचा आणि लाखो वर्षांपासून सद्गुरुपरंपरांतून प्रमाणित झालेल्या योगदर्शनाचाही स्वतःच खून करतात.

ब्राह्मण जातीला शिव्या घालून स्वतःला पुरोगामी, अंधश्रद्धा निर्मूलक म्हणवून घेत, हे तथाकथित विचारवंत, सनातन सांस्कृतिक राष्ट्राचे, अर्थात आपल्या आईचेच काळ असतात! राजकीय, सामाजिक न्यायाच्या आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वांचा पुरस्कार करणारे आपण, समग्र परिवर्तन आणीत आहोत, असे म्हणत स्वतःच्या स्वत्वाचाच खून करीत असतात ही गोष्ट सूज्ञ विज्ञाननिष्ठांनी लक्षात घेणे आवश्यक आहे. पातंजल योगविज्ञान हे मानवी जीवनाच्या आरंभापासून अनुभवसिद्धतेने प्रकट झालेले मन आणि आत्म्याच्या स्वरूपस्थितीशी मनोनुबंधित शारीर विज्ञान आहे. जड आणि अजड तत्त्वांची सांगड घालीत सप्रमाण सिद्ध झालेले दर्शन आहे.



संत तुकोबाराय हे योगभ्रष्ट अवस्थेमुळे उपजताच समाधी साधनेत मग्न होऊन भंडाऱ्या डोंगरावर सातत्याने साधना करीत, समाधीयोग सिद्ध केलेले संत आहेत. ते ज्ञानोत्तर भक्तिसाधना करीत 'अलौकिक नोहावे लोकांप्रति' या कारुण्यपूर्ण जाणिवेने, जनव्यवहार करीत होते हे प्रथम नीट समजून घ्यायला हवे. योगशास्त्र हाच भोंदूपणा आहे असे म्हणणाऱ्या अंध पुरोगाम्यांना ते कळेल याची अपेक्षाही करता कामा नये.

**२) तुका विष्णु नाही दुजा :–**

हे मी, जो ब्राह्मण नावाच्या जातीत जन्माला आहे, तो लिहितो आहे, अशी संभावना करीत; हेच तर ब्राह्मणाचे कसब असा आरडा करीत, हे विचारवंत कांगावा करतील. हे माहीत असूनही; कर्तव्यतत्परतेने जगद्गुरु तुकोबारायांचे संतत्व, सिद्धत्व, ऋषीत्व, स्थितप्रज्ञत्व याकडे लक्ष वेधण्यास मी धजावलो आहे. हे लिहिण्याचा माझा अधिकार केवळ घटनाप्राप्त लेखनस्वातंत्र्य एवढाच नाही! प्रत्यक्ष महर्षी अगस्तिमुनींनी सगुणस्वरूपात दर्शन देऊन; मला आज्ञांकित केले आणि माझ्याकडून अगस्त्यविद्येचा निर्देश करणारे 'अगस्त्य माहात्म्य' या पोथीचे लेखन करवून घेतले. योगवैज्ञानिक स्थितीगतीचा प्रत्यक्ष अनुभव गाठीशी आला. त्याच अधिकाराने जगद्गुरु तुकोबारायांच्या समाधी अवस्थांचे गूढ उकलून मांडावे, असा संकल्प करून हे लेखन घडते आहे. ब्राह्मण जातीत जन्माला आलेल्या रूढीकर्मठपणाने जगणाऱ्या रामेश्वरभट्टांना संत तुकोबारायांच्या विष्णुस्वरूपाचा अनुभव आला होता. म्हणूनच ते शरण्यवृत्तीने म्हणतात–

*तुकाराम तुकाराम । नाम घेता कापे यम ।।१।।*
*धन्य तुकोबा समर्थ । जेणे केला हा पुरुषार्थ ।।२।।*
*जळी दगडासहित वह्या । तारियेल्या जैशा लाह्या ।।३।।*
*म्हणे रामेश्वरभट्ट द्विजा । तुका विष्णु नाही दुजा ।।४।।*

(घुले संपा. गाथा ४१३२)

ही अहंकारी कर्मठ ब्राह्मणाची अनुभूती आहे हा ब्राह्मणी कावा नव्हे! याच रामेश्वर भट्टांनी संत तुकारामांची आरती लिहिली व ओवाळली आहे. ही आरती वारकरी संप्रदायामध्ये मोठ्या गौरवाने, परंपरेने म्हटली जात आहे. या आरतीत रामेश्वर भट्ट अनुभूतीपूर्वक, ठामपणे आणि डोळसपणे ग्वाही देतात, ते केवळ संत तुकारामांचे मोठेपण लोकसागरात तोंडदेखलेपणाने प्रसिद्ध करून स्वतःचे मोठेपण मिरविण्यासाठी किंवा लोकांकडून पूज्यभाव संपादण्यासाठी नव्हे! रामेश्वर भट्टांनी संत तुकोबारायांमध्ये साक्षात लोकधारक, लोकबंध अशा विष्णुरूपाचे

दर्शन घेतले आहे. आरतीला परंपरेत मंत्रसामर्थ्य प्राप्त झाले आहे. रामेश्वर भट्ट ग्वाही देतात, संत तुकोबाराय हे 'सच्चिदानंद मूर्ति' आहेत. ते लोकव्यवहारातील भाषेत सांगतात, ''तुकिता तुळणेसी । ब्रह्म तुकासी आलें ।'' संत तुकोबारायांची कोणाशी तुलनाच करायची असेल तर तुकारामच ब्रह्मस्वरूप झाले असे म्हणावे लागेल. सच्चिदानंदस्वरूपता अथवा ब्रह्मस्वरूपता या दोन्ही संज्ञा राजयोगातील समाधी साधना सिद्धीचे शिखर होय. म्हणजेच संत तुकाराम महाराज हे ज्ञानमय अवस्थेतच वावरताहेत, याची अनुभूती रामेश्वर भट्टांना आली आहे. रामेश्वर भट्टांनी संत तुकारामांच्या या विष्णुस्वरूपाचे वर्णन एका मोठ्या ध्रुपदयुक्त अभंगात केले आहे-

*भक्त भागवत जीवन्मुक्त संत ।*
*महिमा अत्यद्भुत चराचरीं ।।धृ।।*
*ऐसिया अनंता माजी तू अनंत ।*
*लीलावेश होत जगत्राता ।।२।।*
*ब्रह्मानंद तुकें तुळे आला तुका ।*
*तो हा विश्वसखा क्रीडे जनी ।।३।।*
*शास्त्र शिष्टाचार अविरुद्ध क्रिया ।*
*तुझी भक्तराया देखियेली ।।४।।*
*देऊनि तिलांजुली काम्यनिषिद्धासी ।*
*विधिविनियोगेशीं ब्रह्मार्पण ।।५।।*
*संतग्रहमेळीं जगदांध्या गिळी ।*
*पैल उदायाचळीं भानु तुका ।।६।।*
*संतवृंदेतीर्थे गौतमी हरिकथा ।*
*तुकया नरसिंहस्ता भेटों आली ।।७।।*
*शांतिपतिव्रते झाले परिणय ।*
*कामसंतर्पण निष्कामता ।।८।।*
*क्षमा क्षमेपणें प्रसिद्ध प्रथा जगीं ।*
*ते तों तुझ्या अंगी मूर्तिमंत ।।९।।*
*दया दीनानाथा तुवा जीवविली ।*
*विश्वीं विस्तारली कीर्ति तुझी ।।१०।।*
*वेदवाक्य बाहो उभारिला ध्वज ।*
*पूजिलें देवद्विज सर्वभावे ।।*



*अधर्मक्षयव्याधी धर्माशी स्पर्शला ।*
*तो त्वां उपचारीला अनन्यभक्ती ।।१२।।*
*ब्रह्म ऐक्य भावें भक्ति विस्तारली ।*
*वाक्यें सफल केलीं वेदविहितें ।।१३।।*
*देहबुद्धि जात्या अभिमाने वंचलो ।*
*तो मी उपेक्षिलो न पाहिजे ।।१४।।*
*न घडो याचे पायी बुद्धीचा व्यभिचार ।*
*मागे रामेश्वर रामचंद्रा ।।१५।।*

(घुले अ. ४१३८)

संत तुकाराम हेच रामचंद्र अर्थात रामतत्त्व असा गौरव करीत, रामेश्वरांनी भक्तियोगाचा कळसाध्याय आपल्या विभूतिमत्त्वातून साकारणाऱ्या संत तुकोबाराय यांच्याठायी आत्मसंयमयोग आणि भक्तियोग यांचा संगम कसा झाला आहे याचे वर्णन अभंगात स्वानुभवाने रामेश्वर भट्टांनी केले आहे. संत तुकोबारायांनी समाधीमग्न अवस्थेत लोकांना केलेला प्रबोध यासाठीच महत्त्वाचा ठरतो. ते म्हणतात-

*विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।१।।*
*आईका जी तुम्ही भक्त भागवत । कराल ते हित सत्य करा ।।२।।*
*कोणाही जिवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचे ।।३।।*
*तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ।।४।।*

(ओ.गा. ४३९)

समस्त जीवमात्र विष्णुच्या एकाच देहाचे अवयव आहेत असा हा जनी जनार्दन अर्थात विष्णू अनुभवावा हीच प्रेमरूपा भक्ती आणि ही सच्चिदानंद अनुभूती हा प्रबोध संत तुकोबारायांच्या सच्चिदानंदस्वरूप स्थितीची साक्ष देतो.

**३) वैदिक परंपरेचे पुनरुज्जीवक :-**

वैदिक परंपरेचे पुनरुज्जीवन भक्तियोग परंपरेच्या माध्यमातून कळसास पोचविणारे संत तुकाराम महाराज वेदांताचा अर्थात अद्वैताचा प्रचार आणि प्रसार करीत सामाजिक परिवर्तनासाठी सरसावतात. समाधी साधनेतील 'सम त्वं योग उच्वते' या सूत्रानुसार सर्वांभूति विष्णूतत्त्व या 'सम' दृष्टीने, प्रेमरूपा भक्तीचा अनुसार करावा. या अनुसारासाठी वैष्णवांचे तत्त्वाधार श्री विठ्ठल तथा पांडुरंग या सगुण रूपाच्या नामभक्तीचा साधना साधन म्हणून संत तुकोबाराय उपयोग करतात- वेदांतील गाभा नीट समजून घ्यावा असे समुपदेशन संत तुकोबाराय करतात-

*''वेदाचें गव्हर न कळे पाठकां । अधिकार लोका नाही येरां ।।१।।*
*विठोबाचें नाम सुलभ सोपारें । तारी एकसरे भवसिंधु ।।ध्रु.।।*
*जाणत्या असाध्य मंत्र तंत्र काळ । येर तो सकळ मूढ लोक ।।३।।*
*तुका म्हणे विधिनिषेध लोपला । उच्छेद या झाला मारगाचा ।।४।।*

(अ.क्र. ९४७, ओवीची गाथा, संपा. ह.भ.प. बाबासाहेब ज्ञानेश्वर देहुकर)

राजयोग, हटयोग, मंत्रयोग, तंत्र यंत्र योग हा अद्वैतसिद्धीचा अर्थात समदृष्टीने जीवनशैली प्रशस्त करणाऱ्या मार्गाचा उच्छेद झाला असून; आता सगुणरूपाची नामभक्ती हे तेवढे मंत्रसामर्थ्यात्मक साधन अगदी सोपा मार्ग म्हणून आपल्या समोर आहे. नामभक्तियोगात विधिनिषेधांचा अडसर नाही, त्यामुळे सर्वांना समत्वाने तारून नेणारे, सच्चिदानंदस्वरूप अनुभूत करणारे साधन म्हणजे विठ्ठल नामभक्ती होय.

स्वरूपाशी अर्थात प्रत्यक्ष आत्मरूपाशी तत्त्वचर्चा करून, समदृष्टीचा प्रकाश, सर्वांठायी प्रकाशित झाला की, अभिमान तथा अहंकार गळून पडेल. सर्वांना आनंद आणि सुखात्मकतेचा अनुभव येईल, असा निर्वाळा वेदपुरुष अशा आत्मरूपाविषयी देताना – संत तुकोबाराय म्हणतात–

*वेद्पुरुष तरि नेति कां वचन । निवडूनि भिन्न दाखविलें ।।१।।*

(अ. १६७२, ओवीची गाथा)

वैदिक संस्कृती ही जोपर्यंत यौगिक शैलीने सच्चिदानंदस्वरूप होण्याची सिद्धता होत नाही, तोपर्यंतच कर्ममार्गाने अनुसरायची असते. सांस्कृतिक प्रवासात स्थलकाल सापेक्ष परिवर्तने करावयाची असतात. अखेर जीवनाचे अंतिम ध्येय मन उन्मन अवस्थेस पोचणे हे आहे. वेळोवेळी कर्मकांडात्मक जीवनशैली विचार, सामाजिक व्यवस्थापन हे तात्कालिक जीवन साधन म्हणून वापरावयाचे असते, असा स्पष्ट निर्देश करीत. वर्तमानात भागवत तथा वैष्णव तथा वारकरी पंथ हा सगुणभक्तीने, विधिनिषेधात्मक कर्मकांड आणि कालबाह्य ठरलेला जन्मानुसार वर्णभेद बाजूला सारून, उन्मन अवस्थेपर्यंत नेणारा मार्ग आहे; हे तुकोबाराय स्पष्ट करतात. तथाकथित पुरोगाम्यांनी किंवा परिवर्तनवाद्यांनी भलेही हा संत तुकोबारायांचा सामाजिक विद्रोह आहे असे म्हणो. संत तुकाराम आपल्या अभंगात म्हणतात–

*वेदविहित तुम्ही आइका हो कर्मे । बोलतों तीं वर्मे संतापुढे ।।१।।*
*चारी वर्ण झाले एकाचिये अंगी । पापपुण्य भागीं विभागले ।।ध्रु.।।*
*प्रथमपाउलीं पावविला पंथ । आदि मध्य अंत भेद नाहीं ।।३।।*



*आंबे बोरी वड बाभुळा चंदन । गुणागुण भिन्न अग्नि एक ।।४।।*
*तुका म्हणे उन्मन जों होय । तोंवरि हे सोय विधि पाळी ।।५।।*

(ओ.गा. १८२३)

चार वर्ण एकाच अंगाची अर्थात पूर्ण पुरुषाची अर्थात आत्मारामपूर्ण देहाची, जीवात्म्याची सोय आहे. मस्तक, पाऊले, हात आणि ज्ञानेंद्रिये ही रक्षण, ज्ञानग्रहण, ज्ञानवितरण, व्यवहार आणि सेवा अशी एकाच देहाठायी अनुसरतात. ही विदेही होण्यापर्यंतची जीवाची सोय असते. हीच गोष्ट समाजपुरुष, राष्ट्रपुरुष, विश्वपुरुष अर्थात सर्वजीवसमूहांच्या ठिकाणी असते. ही सर्व साधने स्वरूपापर्यंत घेऊन जाण्याची साधने आहेत, हे ओळखून समत्व मनाने योगसाधना करावी.

म्हणूनच वेद ज्ञानाचा बढीवार कथन करतांना चत्वार वाणीचे मोठेपण संत तुकोबाराय सांगतात–

*वेद जया गाती । आम्हां तयाची संगती ।।१।।*
*नाम धरियले कंठी । अवघा सांठविला पोटीं ।।ध्रु.।।*
*ॐकाराचें बीज । हातीं आमुचे तें निज ।।३।।*
*तुका म्हणे बहु मोठें । आणुरेणुयां धाकुटें ।।४।।*

(ओ.गा. २९५४)

ॐकार या एकाक्षरी ब्रह्मस्वरूप बीजामुळे, आम्ही संस्कृती आदि जीवनशैलीची मांडणी मनस्वीपणे सर्वकल्याणाच्या दृष्टीने करू शकतो. मात्र वेद या ॐकार मंत्रातूनच, ठायी निजरूपाची अनुभूती येते. आपण सर्वव्यापी होतो. सारे भेदाभेद सामावून एकात्मता प्रकटते. निजरूपाच्या समत्वानेच हा विस्तारही होतो आणि निजरूपात समावेशही होतो. म्हणूनच ज्यांना वेदशास्त्र पुराणांचे ज्ञानच नाही अर्थात जे नास्तिक आहेत त्यांचे तोंडही पाहू नये. वेदप्रामाण्य मानून समत्वाने जीवनव्यवहार करणे हाच जीवनशैलीतील पुरुषार्थ होय, असे संत तुकोबारायांना प्रबोधित करावयाचे आहे. ते म्हणतात–

*वेद शास्त्र नाहीं पुराण प्रमाण । तयांचे वदन नावलोका ।।१।।*
*तार्किकाचें अंग आपणा पारिखें । माजिऱ्यासारिखे वाईचाळे ।।ध्रु.।।*
*माता निंदी (वेद निंदी) तया कोण तो आधार ।*
*भंगले खापर याच नांवें ।।३।।*
*तुका म्हणे आडरानें ज्याची चाली । तयाची ते बोली मिठेंविण ।।४।।*

(ओ.गा. ३०८६)

वेदप्रामाण्य सर्वात महत्त्वाचे आहे. किंबहुना तेच जीवनाचे सारसर्वस्व आहे, असे संत तुकोबारायांना वाटते म्हणजेच अद्वैत तत्त्वज्ञानाप्रमाणे आत्मस्वरूपता सिद्ध करण्याचा, समाधीयोगसाधनेचा अनुसार पुरुषार्थपूर्णतेने करावा; असे संत तुकोबारायांना वाटते. भक्तियोग हाही यातीलच एक मार्ग होय. म्हणूनच पाखंड्यांना ते बजावून सांगतात–

*वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा ।*
*येरांनीं वाहावा भार माथा ।।ध्रु.।।*

(ओ.गा.अ.क्र. ३१४०)

वास्तविक संपूर्ण विज्ञानाचे ज्ञानात्मक सार म्हणजे अद्वैत अर्थात 'समत्व' ते साध्य झाले की जीवनमुक्ता ठायीच सच्चिदानंद स्थितीने गावते. संत तुकोबाराय म्हणतात, वर्तमानात वेद एवढेच सांगतो की, परमात्मस्वरूप ठायीच्या आत्मस्वरूपात अनुभवा, जीवात्माच शिवात्मा आहे याचा अनुभव घ्यावा. हा अनुभव येण्याचा वर्तमानातील मार्ग अर्थात कलियुगातील मार्ग म्हणजे–

*वेद अनंत बोलिला । अर्थ इतुकाचि साधिला ।।१।।*
*विठोबासी शरण जावें । निजनिष्ठे नाम गावें ।।ध्रु.।।*
*सकल शास्त्रांचा विचार । अंती इतुकाचि निर्धार ।।३।।*
*अठरा पुराणी सिद्धांत । तुका म्हणे हेची मात (वर्म) ।।४।।*

(ओ.गा. अ. ३९८५)

वेद, उपवेद, वेदांगे, उपनिषदे, सकलशास्त्रे, अठरापुराणे, अंततोगत्वा एकच सांगतात. परमात्मा विष्णूभगवंत यांचाच हा सृष्टीविलास आहे. विष्णूतत्त्वच वैष्णवी स्वरूपात नटले आहे. या सृष्टीव्यापारात अपरिहार्यपणाने जीवनकर्म करीत असतांना, निजस्वरूपच अर्थात जीवाठायीच्या आत्मरूपाच्या योगानेच, सारे काही घडत आहे. यासाठी त्या निजरूप विठ्ठलाला आपल्या कर्माचे अधिष्ठान मानून निष्ठेने, कर्मतत्परतेने, नामस्मरण करीत असावे. अशा भक्तियोगाने ज्ञानात्मक म्हणजे आपणच विठ्ठलस्वरूप आहोत, याची अनुभूति घेत कर्म करावे. म्हणजे देहीच विदेही होऊन; सच्चिदानंदाचा अनुभव जीवनात येतो. जीवनच सच्चिदानंद स्वरूप होते. यामुळेच वेद ही मानवी संस्कृतीची माता आहे. त्या मातेची निंदा करणे म्हणजे चांडाळपण होय. वेदविरोधकांना संत तुकोबाराय खडसावतात.

*मातेची जो थाने फाडी । तया जोडी कोण ते ।।१।।*
*वेदा निंदीतो चांडाळ । भ्रष्ट सुतकीच्या खळा ।।ध्रु.।।*



*आगी लावी घरा । मग वसती कोठें थारा ।।३।।*
*तुका जाणे वर्म । येरा नाचवितो भ्रम ।।४।।*

(ओ.गा. अ. १७००)

**४) सिद्ध योगी जगद्गुरु संत तुकोबाराय :–**

संत तुकोबारायांचा जीवनक्रम पाहिला, तर प्रपंचव्यवहार लौकिकार्थाने करीत असतांनाच, ते भक्तियोग आणि राजयोग या दोन्ही मार्गांनी नित्य साधना करीत होते. मुळातच योगभ्रष्ट असलेले, संत तुकोबाराय बालवयापासून आध्यात्मिक स्वभावाने वावरत होते. 'अलौकिक नोव्हावे लोकांप्रति' ही स्थितप्रज्ञ योग्याची लोकव्यवहारातील स्थिती, त्यांच्या जीवनशैलीतून सहज अनुभूत होत होती. त्यांच्या योगभ्रष्ट अवस्थेमुळे अर्थात पूर्वजीवनातच समाधी सिद्धीपर्यंत पोहोचलेले असल्यामुळे तुकोबाराय ज्ञानोत्तर भक्तिसाधना करीत होते. वैराग्यपूर्णतेने, चराचराविषयीच्या अनंत करुणेने सेवाव्रताने अखिल समाजातील खलत्व आणि दुरिते, अंधरूढीग्रस्तता आणि त्यातून उद्भवलेला अहंभाव, पाखांडीपणा, दांभिकता या सर्वांवर प्रहार करून; संपूर्ण आध्यात्मनिष्ठ असे सामाजिक परिवर्तन करण्याचा खटाटोप संत तुकोबाराय सतत करीत राहिले. सिद्धयोगी अवस्थेमुळेच चराचराच्या, जीवमात्रांच्या तथा मानवमात्रांच्या कल्याणासाठी त्यांची योगिक अवस्था–

*अणुरेणुया थोकडा । तुका आकाशा एवढा ।।१।।*
*गिळूनि सांडिलें कलेवर । भवभ्रमाचा आकार ।।ध्रु.।।*
*सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ।।३।।*
*तुका म्हणे आतां । उरलों उपकारा पुरतां ।।४।।*

(ओ.गा. संपा. देहुकर १४१२)

सामाजिक प्रबोधनाचा खटाटोप करण्यामागील त्यांचा दृष्टिकोन वैदिक ऋषींप्रमाणे योगवैज्ञानिक होता.–

*आम्ही वैकुंठवासी । आलों याचि कारणासी ।*
*बोलले जे ऋषी । साच भावें वर्ताया ।।१।।*
*झाडूं संतांचे मारग । आडरानें भरलें जग ।*
*उच्छिष्टाचा भाग । शेष उरला तो सेवूं ।।ध्रु.।।*
*अर्थें लोपलीं पुराणें । नाश केला शब्द ज्ञानें ।*
*विषयलोभी मनें । साधन हें बुडविलें ।।३।।*

*पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।*
*तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे ।।४।।*

(ओ.गा. १००९)

समस्त लोकांना कर्मतत्परतेने जीवनमुक्त होण्यासाठी भक्तिमार्ग हे सुलभ साधन होय. त्यासाठी तत्त्वज्ञान आणि प्रवचन, कीर्तनादी माध्यमातून, केवळ शब्दज्ञानात्मक वितंड करण्यापेक्षा, प्रपंचात राहून परमार्थ साधनेचा योगमार्ग म्हणजे भक्तिमार्ग प्रसिद्ध करावा; असे संत तुकोबारायांनी ठरविले. श्रीमद्‌भगवद् गीतेतील भक्तियोग आणि भागवत धर्मातील श्रीविठ्ठल भक्तियोग त्यांनी प्रशस्त केला. भक्तियोगाचे सामर्थ्य सिद्ध करून दाखविण्यासाठी 'गाथातारण' प्रसंग घडविला. हा चमत्कार नव्हता. लोकश्रद्धेसाठी आणि कर्मकांडाने अंध झालेल्या रामेश्वर भट्टांसारख्या पाखंड्याचा अहंकार नष्ट करण्यासाठी, ठायीच्या सिद्धावस्थेतील सिद्धीचा कल्याणप्रद योगवैज्ञानिक उपयोग केला होता.

*विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद अमंगळ ।।१।।*
*आइका जी तुम्ही भक्त भागवत । कराल तें हित सत्य करा ।।ध्रु.।।*
*कोणाही जीवाचा न घडावा मत्सर । वर्म सर्वेश्वर पूजनाचें ।।३।।*
*तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ।।४।।*

*(ओ.गा. अ. ४३९)*

अशी सांगी सांगातीच्या भक्त संतांना सांगत विष्णूकार्यासाठी अर्थात उपकारासाठी हे उपाय आम्ही करीत आहोत; हे सांगण्यास संत तुकोबाराय विसरत नाहीत.

*उपकारासाठीं केले हे उपाय । येणेंविण काय चाड आम्हां ।।१।।*
*बुडतां हे जन न देखवे डोळां । येतो कळवळा म्हणऊनि ।।ध्रु.।।*
*तुका म्हणे माझे देखतिल डोळे । भोग देते वेळे येईल कळों ।।३।।*

(ओ.गा. अ. १२६७)

अखिल समाजाला प्रपंचात परमार्थाचा कर्तव्यतत्परतेने अनुभव घेता यावा आणि सर्वांना ठायीच जीवनमुक्त होता यावे, असा विश्वात्मक कल्याणाचा मार्ग संत तुकोबाराय आपल्या प्रबोधनातून तथा उपदेशातून सुचवितात ही त्यांची जनताजनार्दनाठायीची समाधी अवस्था होय. योगशैलीने वावरणारे संत तुकोबाराय आपल्या सिद्धयोगी, परमविष्णूभक्त तथा विष्णूस्वरूप स्थितीचा अनुभव लोकसागराला घडवीत जीवन व्यतीत करतात.



**५) संत शिरोमणी जगद्‌गुरु तुकोबारायांचा अमृतसिद्धी योग :–**

स्वरूपस्थितीने वावरणाऱ्या जगद्‌गुरु संत तुकोबारायांना, अखिल लोकजीवनाचा अध्यात्मनिष्ठेने उद्धार करावयाचा होता. ज्ञानोत्तर भक्तीचा मार्ग त्यांनी त्यासाठीच चोखाळला होता. भोवतीच्या जनजीवनात पाखंड पोसणारांच्या ठायीचे पाखांडपण गेले; की अवघ्या समाजजीवनाला समत्वाचा साक्षात्कार होऊन; जन गुण्यागोविंदाने, कर्तव्यतत्परतेने आणि विश्वकुटुंबीय भावनेने जीवन व्यतित करू लागतील, हेच संत तुकोबारायांना साधावयाचे होते. प्रत्यक्ष विष्णूस्वरूप तुकोबारायांनाही संपूर्ण जनजीवन असे निर्मळ, आनंदमय, कर्तव्यतत्पर होणार नाही हे ठावूक नव्हते असे नाही. अगदी अवतारी विभूतीलाही केवळ काही काळाच्या अस्तित्वाने संपूर्ण अधर्माचा नाश होऊन, धर्मनिष्ठ जनजीवन होणार नाही हे माहीत होतेच. अवतारी विभूति धर्मग्लानी घडविणाऱ्या कुटील, शोषक आणि विनाशक अशा समाजकंटकांचा नाश घडविण्यासाठी अवतार धारण करतात आणि समाजजीवनातील दुष्टांचे निर्दालन करून; अर्थात दुष्टांचा दुष्टपणा आपल्या विस्मयकारक प्रतिभेने नाहिसा करतात. लोकांना कदाचित तो चमत्कार वाटतो. तो तसा वाटल्याशिवाय ठायीच्या स्वसंवेद्य आत्मशक्तीची प्रचिती येणार नाही, याचेही ज्ञान अशा स्थितप्रज्ञ, अवतारी विभूतिमत्त्वाला असतेच असते.

आपल्या राजयोग आणि भक्तियोगाने संत तुकोबारायांनी जनसामान्यातील शोषकांना या सिद्धत्वातील शक्तीचा परिचय घडविण्याचा जाणीवपूर्वक खटाटोप केला होता. पाण्यातून अभंगगाथा पुन्हा प्रकटविणे असे चमत्कार वाटतील, असे प्रसंग समाधीमग्न तुकोबारायांनी घडविले होते. जीवन आणि मोक्ष यातील जीवनाची निवड अवतारी तत्त्वे नेहमीच करतात. युगायुगातील दुर्दैवी विनाशक शक्तींना नष्ट करण्यासाठी दशावतारांची अर्थात विष्णू, शिव, शक्ती अशा आत्मस्वरूप शक्तींच्या अवतारांची योजना आयोजित केली जाते. साक्षात विष्णूस्वरूप असल्याची प्रचिती घडविणाऱ्या तुकोबारायांनी जीवनाची सांगता करतांनाही, जनजीवनात चमत्कार, गूढ अशा वाटणाऱ्या प्रयोगांची सिद्धता करून; आपण संजीवन समाधीमग्न होत असल्याचा निर्वाळा दिला.

*आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदचि अंग आनंदाचें ।।ध्रु.।।*
*काय सांगो झालें कांहींचियाबाई । पुढे चाली नाही आवडीनें ।।२।।*
*गर्भाचे आवडी मातेचा डोहळा । तेथींचा जिव्हाळा तेथें बिंबे ।।३।।*
*तुका म्हणे तैसे ओतलासे ठसा । अनुभव सरिसा मुखा ।।४।।*

(ओ.गा. २४७)

सच्चिदानंद स्थिती स्वतःबरोबर समाजजीवनात निर्माण करण्याच्या उद्देशाने, वैकुंठातून अवतार घेऊन प्रकटलेले तुकोबारायांच्या कार्यमार्गदर्शनाचा उद्देश आता सफल झाला आहे हे स्पष्ट करतात. आपल्या ठायीच्या माउलीपणाला जनसामान्यांच्या ज्या भावस्थितीची अपेक्षा होती, (डोहाळा) ती भावस्थिती निर्माण झाल्यावर या भवसागराची आवड अर्थात आसक्तीच नाहीशी झाली. मातेच्या ठायीच्या डोहळ्याप्रमाणे गर्भाने आकार घेतला की जीव जन्माला येतो, तसे समाजातील दुष्टावा, शोषकता, पाखंड, सत्यनिष्ठेने समत्वात्मक प्रेमभावाने नाहिसे करता येते हे संवेदित केले आहे. म्हणूनच संत तुकाराम महाराज वैकुंठगमनासाठी सिद्ध होतात.

संत तुकोबारायांचा वैकुंठगमन हा अमृतसिद्धी सोहळा लोकांना अनुभूत होणे आवश्यक होते. लोकश्रद्धा वृद्ध झाली, ती जतन झाली तरच, ज्ञानात्मक वर्तन समाजजीवनात घडेल; या निश्चित संकल्पाने आपले वैकुंठगमन जगद्‌गुरु संत तुकोबारायांनी आपल्या योगमार्गातील सिद्धींचा असा लोकहितैशी उपयोग करण्याचे ठरवून; पंचत्वातील संघटनात्मकतेने प्रकट झालेला देह विसर्जित करण्याचे नाट्य प्रदर्शित केले.

सदेहवैकुंठगमन नाट्य - हे योगशास्त्रांनुसार सिद्धीप्रयोगाचे ज्ञान करवून घेतले तर; भौतिकतः योगवैज्ञानिक कसोटीवर उतरते. प्रत्यक्ष सिद्धीचा वापर तुकोबारायांनी करण्याचा संकल्प करूनच ते सदेह गुप्त झाले-

*आम्हीं जातों तुम्ही कृपा असों द्यावी ।*
*सकळा सांगावी विनंती माझी ।।१।।*
*वाड वेळ झाला उभा पांडुरंग ।*
*वैकुंठा श्रीरंग बोलावितो ।।ध्रु.।।*
*अंतकाळी विठो आम्हांसी पावला ।*
*कुडीसहितझाला गुप्त तुका ।।२।।*

(ओवी गाथा अ. १९४९)

शके १५७१ विरोधीनाम संवत्सरे फाल्गुन कृष्ण द्वितीया सोमवारी स्वामी विष्णूस्वरूप जगद्‌गुरु संत तुकोबाराय गुप्त झाले. लौकिकात स्तिमितता आणि वियोग या दोन्हींच्या संवेदना तीव्र झाल्या. अवतार साफल्याच्या वाटेवर गरुड विमानातून संत तुकोबारायांनी सर्वांसाठी अर्थात सर्वांना असा जीवनसाफल्याचा अनुभव घडविण्याच्या उद्देशाने आत्मनिवेदन मांडले-



*हेंचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।*
*गुण गाईन आवडी । हें चि माजी सर्व जोडी ।।ध्रु.।।*
*नलगे मुक्ति आणि संपदा । संत संत देई सदा ।।३।।*
*तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावें आंम्हासी ।।४।।*

(ओ.गा. ३९८२)

नरजन्माला येणाऱ्या प्रत्येकाला पुन्हा पुन्हा जन्माला येण्याची सौंदर्यभावना जागृत करणारा हा अभंग संत तुकोबारायांचा ऐहिक जीवनासाठीचा आत्मविश्वास जागृती घडविणारा अभंग होय.

हे सदेह वैकुंठगमन नाट्य जर सिद्धीप्रयोगाने घडविले असेल तर नेमका सिद्धीप्रयोग तरी कोणता केला?

'शिवस्वरोदय' या शिवपार्वती संवादातून प्रकटलेल्या स्वरविज्ञानाचा योगशास्त्रीय प्रयोग लक्षात घेतला तर अंगुली प्रमाणानुसार अकरा अंगुलीप्राण प्रमाण केले तर त्या योग्याची सावलीदेखील नष्ट होते म्हणजे तो योगी देवत्वास पोचतो व त्या अवस्थेत तो गुप्त होतो अर्थात अंतर्धान पावतो.

पातंजल योगविज्ञानातील विभूतिपादात सिद्धींचर्चेनुसार 'धर्मी' स्थितीत पोचलेला साधक त्रिकालज्ञ होतो. तर कैवल्यपादानुसार जात्यंतर परिणाम सिद्धीयोगाच्या साधनेमुळे, योग्याला विविध जन्म, विविध रूपे धारण करून विचरता येते.

श्रीकृष्ण-उद्धव संवादातील चर्चेनुसार सत्वगुणाच्या सिद्धतेने अनेक सिद्धी प्राप्त होतात. त्यात मनोवेगाने शरीराचा प्रवास घडविणे, इच्छेनुसार कोणतेही रूप घेणे, परकाया प्रवेश करणे, इच्छेनुसार शरीराचा त्याग करून सूक्ष्मरूपाने असणे, सगुणरूपात देवदर्शन घडविणे आदि सिद्धी प्राप्त होतात.

मुख्य अष्टसिद्धी तर संत तुकोबारायांच्या ठायी होत्याच. त्यातील 'प्राकाम्या' या सिद्धीमुळे लौकिक आणि पारलौकिक पदार्थांचा अनुभव घडविता येतो. तसेच ईशिता या सिद्धीमुळे मायेच्या किंवा मायावी कार्यासाठी इच्छेनुसार कार्य करून घेता येते.

समाधीयोगसाधनेने सिद्ध झालेल्या संत तुकोबारायांनी त्यांच्या ऋषीकार्यात, ज्ञानात्मक वर्तनातून दिलेल्या उपदेशांचे, केलेल्या प्रबोधाचे नम्र निष्ठेने लोकांनी पालन करावे, पाखांड विरून जावे, श्रद्धेचा सुकाळ व्हावा म्हणून सदेहवैकुंठगमन हे सिद्धीनाट्य घडविले असे म्हणता येते व त्याविषयी भौतिकता योगवैज्ञानिक सत्यता स्पष्ट करता येते. अर्थात योगविज्ञान हे विज्ञान आहे याचा किमान अनुभव

चिकित्सकांनी व तथाकथित बुद्धिप्रामाण्यवाद्यांनी घेणे आवश्यक आहे.

संत तुकारामांनी उद्घटित केलेले अभंग पाहता, हे सदेहवैकुंठगमन नाट्य तुकोबारायांनी मोठ्या विस्मयकारकतेने आणि भोवतालच्या लोकांचे डोळे दिपविणारे घडविले. विमानाचे, गरूडाचे आणि प्रत्यक्ष विष्णूभगवंतांचे दर्शन त्यांनी सर्वांना घडविले. प्राकाम्या आणि ईशिता या मुख्य सिद्धी स्नेह तसेच सगुण देवदर्शन घडविणारे व त्यांकडून इच्छापूर्तीची कांक्षा मांडून पूर्तता करवून घेणे हा लघु सिद्धीप्रयोगही तुकोबाराय करतात. येथे असा प्रश्न उपस्थित होतो की, संत तुकोबारायांना चमत्कार करवून लोकांना थक्क करावयाचे होते काय? कदाचित काही अति बुद्धिप्रामाण्यवादी किंवा अति निरीश्वरवादी तसे म्हणतीलही. अंनिसचे लोक तर हे सारे थोतांड व अंधश्रद्धेने देव्हारे माजविणारांचे आहे, असेही म्हणतील! सिद्धींचा वापर लोककल्याणासाठी करून भक्तियोगानेही जीवन पूर्णत्वाला नेता येते. श्रद्धेने ज्ञानात्मक व्यवहार केला; तर प्रत्यक्ष परमेश्वर याचिदेही याचिडोळा पाहता येतो; याचा अनुभव जनसामान्यांना घडवायचा होता. श्रुति, स्मृति, पुराणे, रामायण, महाभारत यातील ज्ञान आणि इतिहास हे योगशास्त्रावर, ब्रह्मविद्येवर आधारित आहे. म्हणूनच त्यातील ज्ञानकण वेचित पुरुषार्थ करावा, हे प्रबोधित करावयाचे होते. संत तुकोबारायांचे सदेहवैकुंठगमन हा कोणता चमत्कार नाही तर ती योगवैज्ञानिक सत्य घटना आहे, हे नास्तिकांना प्रत्यक्ष दृगोचर करण्याची क्षमता जगद्गुरु तुकोबारायांमध्ये होती.

वैकुंठगमन करण्याच्या प्रयोगाचे प्रत्यक्ष दर्शन घडवितांना संत तुकोबाराय संवाद करतात–

*शोधितांचि नये । म्हणोनि वोळगतों पाय ।।१।।*
*आतां दिसो नये जना । ऐसें करा नारायणा ।।२।।*
*परतोनि मन । गेलें ठायींचि मुरोन ।।३।।*
*विसरला तुका । बोलों चालों झाला मुका ।।४।।*

(ओ.गा. अ.क्र. १९२६)

*गरूडाचे पायीं । ठेवीं वेळोवेळां डोई ।।१।।*
*वेगीं आणावा तो हरी । मज दीनातें उद्धरीं ।।ध्रु.।।*
*पाय लक्ष्मीच्या हातीं । म्हणोन येतों काकुळती ।।३।।*
*तुका म्हणे शेषा । जागें करा हृषीकेशा ।।४।।*

(ओ.गा.क्र. १९३२)



विष्णूभगवंत स्वतः योगनिद्रा अनुभवत आहेत, हे येथे लक्षणीय आहे. त्यांना जागे करावे अशी विनंती शेषांना तुकोबाराय करतात. एवढेच नव्हे तर आता विष्णूभगवंत मला नेण्यासाठी येतील असे तुकाराम भोवतालच्या लोकांना सांगतात–

*आपुल्या माहेरा जाईन मी आतां । निरोप संता हाती आला ।।१।।*
*तुका म्हणे आतां येतील न्यावया । अंगें आपुलिया मायबापा ।।५।।*

(ओ.गा. १९३३)

विष्णूभगवंत केवळ संगे येणार नाहीत तर 'आपुलिया अंगे' अर्थात विष्णूस्वरूप करून नेतील असे ठामपणे तुकोबाराय म्हणतात. संत तुकाराम हरि आल्याचे प्रत्यक्ष वर्णन करतात–

*पैल आले हरि । शंक चक्र शोभे करी ।।१।।*
*गरूड येतो फडत्कारें । ना भी ना भी म्हणे त्वरें ।।ध्रु.।।*
*मुगुटकुंडलांच्या दीप्ति । तेजे लोपला गभस्ति ।।३।।*
*मेघश्यामवर्ण हरि । मूर्ति डोळस साजिरी ।।४।।*
*चतुर्भुज वैजयंती । गळां माळ हे रुळती ।।५।।*
*पीतांबर झळके कैसा । उजळल्या दाही दिशा ।।६।।*
*तुका झालासे संतुष्ट । घरा आलें वैकुंठ पीठ ।।७।।*

(ओ.गा. अ. १९३७)

संत तुकोबाराय भगवंतांना आपण सारेच सामोरे जाऊया असे म्हणतात.

*चला जाऊं रे सामोरे । पुढें भेटीं विठ्ठल धुरे ।।१।।*
*तुका आनंदला मनीं । कैसा जातो लोटांगणी ।*
*फेडावया धणी । प्रेमसुखाची आजी ।।ध्रु.।।*
*पुढें आले कृपावंत । मायबाप साधुसंत ।।३।।*
*तुका आळंगिला बाही । ठेविला विठोबाचे पायी ।।४।।*

(ओ.गा. १९४०)

संत तुकोबाराय निर्वाणीचा बोध लोकांना करीत भगवंताच्या हातात हात देऊन वैकुंठगमन करतात–

*बोलिलों तें आतां पाळावें वचन ।*
*कोण ऐके पुण्य माझ्या ठायीं ।।१।।*
*जातों आतां आज्ञा घेऊनीयां स्वामी ।*
*काळक्षेप आम्ही करूं कोठें ।।ध्रु.।।*
*न घडे यावरी न धरवे धीर ।*

*पीडतां हे राष्ट्र देखोनि जग ॥३॥*
*हाती धरोनिया देवें नेला तुका ।*
*जेथें नाही लोकां पराश्रम ॥४॥*

(ओ.गा. १९४५)

प्रवासाला जातांना निरोप घ्यावा तसा निरोप तुकोबाराय घेतात. भक्तियोगाने प्रत्येकाला सदेह वैकुंठाला जाता येईल, याचा निर्वाळा देतात. त्यामुळेच लोकांना संत तुकोबाराय तात्पुरत्या प्रवासाला जात आहेत असे वाटते.

*चालिलें न वाटे । गाऊनियां जाता वाटे ॥१॥*
*बरवा वैष्णवाचा संग । येतो सामोरा श्रीरंग ॥२॥*
*नाहीं भय आड । कांही विषमाचे जड ॥३॥*
*तुका म्हणे भक्ती । सुखरूप आदी अंती ॥४॥*

जगद्गुरु संत तुकोबारायांचे हे सदेहवैकुंठगमन तुकयाबंधू कान्होबा प्रत्यक्ष अनुभवत होते. संत तुकोबारायांचा संवाद पाहाता मनोवैज्ञानिक, वैद्यकशास्त्रवेत्ते, बुद्धिप्रामाण्यवादी यांना संत तुकारामांना बहुधा भ्रम झाला असावा किंवा मृत्यूसमयी झालेल्या वातात ते बरळत असावेत असे वाटेलही. योगवैज्ञानिक प्रक्रिया हेच थोतांड किंवा अंधश्रद्धा आहे, असे म्हणणाऱ्यांकडून अन्य अपेक्षा करणे म्हणजे पालथ्या घागरीवर पाणीच होय! म्हणूनच संत तुकोबारायांचे सदेहवैकुंठगमनाचे प्रत्यक्षदर्शी, संत तुकोबाराय भगवंताबरोबर प्रत्यक्ष जाताना पाहतात. दृष्टीआड झाल्यावर मात्र दिव्यअनुभूतीतून लौकिकात येतात. त्यावेळी त्यांची पहिली प्रतिक्रिया ब्रह्मविद्या - योगशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते-

*भुक्ति मुक्ति तुझें जळो ब्रह्मज्ञान ।*
*दे माझ्या आणून भावा वेगी ॥१॥*
*रिद्धि सिद्धि मोक्ष ठेवी गुंडाळून ।*
*दे माझ्या आणून भावा वेगी ॥२॥*
*नको तूं आपुल्या नेऊ वैकुंठासी ।*
*दे माझ्या भावासी आणुनि वेगी ॥३॥*
*नको होऊं कांहीं होसील प्रसन्न ।*
*दें माझ्या आणून भावा वेगीं ॥४॥*
*तुकयाबंधु म्हणे पाहा हो नाहीं तरी ।*
*हत्या होईल शिरी पांडुरंगा ॥५॥*

(ओ.गा. १९५८)



बंधुवियोगाच्या या प्रतिक्रियेत संत तुकोबारायांनी आपल्या योगसामर्थ्याने हे सदेहवैकुंठगमन नाट्य घडविले हे स्पष्टच होते. कान्होबांना संत तुकोबारायांच्या योगसाधनेची प्राप्त रिद्धीसिद्धींची जाणीव होती. रिद्धीसिद्धींचा अडसर ओलांडूनच समाधीसाधना सिद्ध होऊन; मोक्षाप्रत जाता येते याचेही ज्ञान होते. प्रपंचव्यवहार करणाऱ्या सामान्य माणसांना याची प्रत्यक्ष अनुभूती घेता येत नाही. कान्होबांची प्रतिक्रिया ही सर्वसामान्य लौकिकातील लोकांचे प्रतिनिधित्व करते. पाहाता पाहाता डोळ्यादेखत विष्णूभगवंत सगुणरूपात बंधुंना घेऊन जातात, हे सत्य लौकिकात कसे सहन होणार? कान्होबा एकप्रकारे पांडुरंगाशी भांडणच मांडतात आणि अखेरीस पांडुरंगाला बजावतात-

*तुकयाबंधु म्हणे पाहा हो नाहीं तरी ।*
*हत्या होईल शिरी पांडुरंगा ॥५॥*

पांडुरंगाने आपल्या बंधूंची हत्या केली असा आरोप होईल असेही बजावले. डोळ्यासमोर कोणी एखाद्याला ओढून नेतो असे दिसले तर, त्याची हत्या केली असा आरोप होणारच. म्हणूनच कान्होबा पांडुरंगाला म्हणतात-

*बरा जाणतोसि धर्मनीती । उचित अनुचित श्रीपती ।*
*करूं येते राती । ऐसे डोळा झांकुनी ॥१॥*
*आता जाब काय कैसा । देसी तो दे जगदिशा ।*
*आणिला वोळसा । आपणा भोंवता ॥२॥*
*सेवेचिया सुखास्तव । बळें धरिलें अज्ञानत्व ।*
*येईल परी हा भाव । ज्याचा त्यासी कारणा ॥३॥*
*तुकयाबंधु म्हणे नाहीं । आतां आम्हा बोल कांहीं ।*
*जडोनियां पाई । तुझे तुंचि घेतले ॥४॥*

(ओ.गा. १९७२)

संत तुकोबारायांच्या सदेहवैकुंठगमन प्रसंगाने लोकापवाद निर्माण होतील. नास्तिक शंका घेतील. बोल लावतील. त्यांना कसा जाब देणार? संत तुकोबारायांच्या अभूतपूर्व समाधीयोगाचे गूढ वाढतच जाणार हे खरे असले तरी, 'तुझे तुचि घेतलें' हा सत्य आपण जाणतो आहोत असे कान्होबा म्हणतात.

संत कान्होबांच्या प्रत्यक्षदर्शी निवेदनाने संत तुकाराम महाराज यांच्या 'सदेहवैकुंठगमन' या अमृतसिद्धी योगाचे गूढ उलगडते आणि संभ्रमावस्था दूर होते.

रिद्धीसिद्धींच्या उपयोजनांचा निषेध समाधीसाधनेत केला आहे. योग्याला स्वरूपस्थिती जीवनमुक्तता किंवा मोक्ष अवस्था येथपर्यंत जाण्याच्या प्रवासात रिद्धी-सिद्धी अडसर असतात हे संत तुकोबारायांनाही ज्ञात होतेच. जीवनमुक्ताची अर्थात समाधीसिद्धीस गेलेल्या स्थितप्रज्ञ ऋषी, मुनी, योगी, साधू, संन्यासी यांची अवस्था उपरोधिकपणे वर्णन करतांना संत तुकोबाराय म्हणतात-

*रिद्धीसिद्धी दासी कामधेनु घरीं ।*
*परि नाहीं भाकरी भक्षावया ।।१।।*
*लोढें बालिस्तें पलंग सुपत्ति ।*
*परि नाहीं लंगोटी नेसावया ।।२।।*
*पुसाल तरि आम्हां वैकुंठीचा वास ।*
*परि नाहीं राह्यास ठाव कोठें ।।३।।*
*तुका म्हणे आम्ही राजे त्रैलोक्याचे ।*
*परि नाहीं कोणाचे उणें पुरें ।।४।*

(ओ.गो.म. १६४२)

संत तुकोबारायांची अवस्था अशी निजस्वरूप स्थितीस पोचली होती. अशा अवस्थेत रिद्धीसिद्धी या कामधेनूप्रमाणे दास्यत्वाने ठायीच असतात. त्यांच्या उपयोजनाने विश्व दीपून जाते. मात्र स्वरूपस्थितीस अर्थात सच्चिदानंदस्वरूप झालेला सिद्ध लौकिकाच्या संदर्भात निर्गुण, निराकार, निर्विकार, निज, केवल, स्वसंवित्ती, महाशून्य, अविनाशी असा सच्चिदानंदस्वरूप, स्वसंवेद्य, आत्मरूप झालेला असतो. लौकिकात मात्र त्याच्या सिद्ध-सद्गुरु शक्तींच्या दर्शनाची अपेक्षा असते. संसारप्रपंचात गुंतलेल्या लोकांना परमार्थाचे दर्शन घडविण्यासाठी योग्याला रिद्धीसिद्धींचे उपयोजन करून; लौकिकअर्थाने अलौकिकाचे दर्शन घडवावे लागते.

संत तुकोबाराय जन्मतःच वैकुंठवासी आहेत. ते वैकुंठवासी होण्यासाठीचा प्रवास सुरू करतात. वैकुंठ, विष्णुपद या गोष्टींचा अनुभव सिद्धिप्रयोगाशिवाय घडविणे शक्य नव्हते. जनसामान्यांच्या निष्ठा, श्रद्धा ठामपणे जपण्यासाठीचे नाट्यच केवळ संत तुकोबारायांना घडवायचे आहे. त्यांचे सदेहवैकुंठगमन हा अमृतसिद्धीयोग त्यासाठी आहे; हे योगवैज्ञानिक दृष्टीने अनुभूत होते. जगद्गुरु संत तुकोबाराय यांना जगद्गुरु पदवीला लोकसागराने नेऊन ठेवले, हे त्यांच्यातील, या 'लोकीअलौकिकत्वा'मुळे हे लक्षात घेतले पाहिजे.

* * *



# कर्मयोगाचा वस्तुपाठ : संत सांवता माळी

भारतीय सांस्कृतिक राष्ट्राचे शिल्पकार म्हणूनच प्राचीन ऋषी, मुनी, साधू, तपस्वी, सिद्ध, योगी, नाथ अशा अवस्थेपर्यंत पोचलेल्या सर्व महामनांचा विचार करावा लागतो. श्रुति अर्थात वेदोपनिषदे, स्मृति, संहिता, पुराणे, दर्शने अर्थात शास्त्रे, असे विपुल वाङ्मय मानवमात्रांपुढे सादर करून; एकात्मिक मानवी समाजाची, अर्थात सांस्कृतिक राष्ट्राची जडणघडण ज्ञान-विज्ञान प्रसारातून करण्याचा प्रयत्न, या महामनांनी केला. आत्मोद्धार आणि लोकोद्धार, विश्वकुटुंबियत्वाच्या व्यापक स्नेहभावाने करण्यासाठी गुरुकुले, गुरुपरंपरा सिद्ध केली. जीवनमार्ग प्रशस्त केले. प्रसंग पुरोहित म्हणूनही कार्य केले. महर्षी वशिष्ठ आणि महर्षी अगस्त्य ही त्यातील अगदी ठळक उदाहरणे होत. सामाजिक व्यवस्था, वैज्ञानिक विकास, कलापरंपरा आदी सर्व क्षेत्रात विकास साधून अध्यात्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय आदी सर्वांगे भारतीय सांस्कृतिक राष्ट्राची उभारणी केली. अवघा मानवच नव्हे, तर जीवमात्र एक अशा वैश्विक कौटुंबिक भावनेने, ज्ञानवान कर्मशील असणे महत्त्वाचे होय. सर्वांभूती परमेश्वर, अहिंसा, सत्य, अस्तेय, धर्मचर्य, असंग्रह या तत्त्वाधारे पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश या पंचभौतिक तत्त्वांचा विवेकपूर्वक विनियोग करीत प्रपंच साधावा, यासाठी पुरुषार्थ चतुष्ट्याची मांडणी, कर्माधारित वर्ण व ज्ञाती व्यवस्था यांची शास्त्रीय चर्चा, या महामानवांनी व्यवस्थापन गुरू म्हणून करीत परंपरा निर्माण केल्या. समग्र सांस्कृतिक राष्ट्राची उभारणी ज्ञान-विज्ञान निष्ठेने करतांना, कठोर न्यायव्यवस्थाही दिली. जैविक, शारीरिक, सामाजिक, भौतिक, अध्यात्मिक, कलाक्रीडाविषयक, स्थापत्यादि गोष्टींविषयक, वैद्यकीय क्षेत्रांविषयक, पाकशास्त्रविषयक अशा सर्व क्षेत्रांसंबंधाने, मानवाला ज्ञानवान कर्मशील तसेच कर्मज्ञानवान करून, भारतीय सांस्कृतिक राष्ट्र सिद्ध केले.

**१. मध्ययुगीन संतपरंपरा :-**

मध्ययुगीन संतांचा विचार केला तर; 'बोलले जे ऋषी साच भावे वर्ताया!' यासाठी आपला जन्म आणि कर्म आहे; हे 'बुडति हे जन न देखवे

डोळा!' या दृष्टीने कर्मशील व्हावे हे संतांनी निक्षून सांगितले. भक्तियोगाचा मार्ग स्वीकारून; समग्र सांस्कृतिक भारतीय राष्ट्राच्या पुनरुत्थानाची चळवळ; अर्थात समग्र प्रबोधन आणि स्वत्वावर आधारित परिवर्तन करण्याची चळवळ संतांनी सुरू केली. परवशता, पराधिनता, निःसहायता, अंधरूढीपरंपरा, अनावश्यक अज्ञानमूलक कर्मकांड यात गुरफटलेल्या समाजाला, वैभवसंपन्न भारतीय सांस्कृतिक राष्ट्राचे भान आणून देत; आत्मोद्धार आणि लोकोद्धाराचे ध्येय भक्तिमार्गाने डोळ्यासमोर ठेवले. जीवमात्रांच्याविषयी कारुण्यपूण सहिष्णुतेचे प्रबोधन करीत; प्रपंच, परमार्थ, स्वत्व, राष्ट्रात्मकता आणि वैश्विक भावना जागवीत; 'लाभावीण प्रितीची' पराकाष्ठा करण्याचा प्रयत्न केला. या प्रबोधक बंडाची सुरुवात, श्री गुरु निवृत्तीनाथ शिष्य संत ज्ञानेश्वरांनी आपल्या सोपान, मुक्ताबाई या भावंडांसह श्री संत नामदेवांना सवे घेऊन; सर्व समाजाला कवटाळीत सुरू केली. संत ज्ञानदेव आणि संत नामदेवांच्या या सांस्कृतिक पुनरुत्थान चळवळींत चोखा, बंका, सोयराबाई, कर्ममेळा, कान्होपात्रा, गोराकुंभार, सेना न्हावी, नरहरी सोनार अशा कितीतरी समाज प्रतिनिधींबरोबर, संत सावता माळी देखील सामील झाले. ज्ञानदेव-नामदेवांच्या प्रभावळीत कर्मयोगी संत सावतांचे स्थान हे, स्थितीगतीत प्रवाहपतित झालेल्या समाजाला निश्चित डोळस आणि आत्मोद्धाराबरोबर लोकोद्धार साधण्याचा, वस्तुपाठ देणारे आहे!

**२. प्रस्थान त्रयीतील तत्त्वज्ञानाने मार्ग प्रशस्त :-**

श्रुति अर्थात वेदोपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि श्रीमद्‌भगद्‌गीता प्रस्थान त्रयींचा परंपरेने अनुसार करणाऱ्या, भागवत संतांनी सर्वांना सुलभ अशा सगुणभक्ती तथा नवविधाभक्तीचा स्वीकार केला. श्री विठ्ठल अर्थात विष्णू तथा श्रीकृष्ण या उपास्य दैवतांच्या माध्यमातून प्रपंच आणि परमार्थाची सांगड घालणाऱ्या वैष्णव तथा भागवत तथा वारकरी संप्रदाय प्रशस्त करण्याचे कार्य भागवत संतांनी केले. संत ज्ञानोबा आणि संत नामदेव यांच्या प्रभावळीतील, समकालीन संत म्हणून संत सांवता माळी या संतमालिकेत ठळक आणि आगळेपणाने उल्लेखिले जातात.

**३. संत सांवतांचे चरित्र आणि चारित्र्य :-**

सोलापूर जिल्ह्यातील, पंढरपूर जवळील अरण गावच्या परसूबा आणि नांगीताबाई यांच्या उदरी, अंदाजे शके ११७२, सन १२५० मध्ये सांवतांचा जन्म झाला. त्यांची समाधी शके १२१७, सन १२९५, आषाढ वद्य १४ होय. प्रापंचिक अशा संत सांवतांच्या पत्नीचे नाव जनाबाई असे होते. आपले चरित्र व चारित्र्य वर्णन करतांना, आजोबा दैवू माळी यांची परंपरा सांगत संत सांवता म्हणतात-



*पूर्वापार कुळीं पंढरीचा नेम । मुखी सदा नाम विठ्ठलाचे ।।*
*तारी अथवा मारी देवां तुंचि एक । न घ्यावी भाक पांडुरंगा ।।*
*वडिलांचा सेवा धर्म अजुनि चालवी । व्यर्थ न भुलवी मायापाश ।।*
*सांवता म्हणे देवा, अखंड घ्यावी सेवा ।*
*आठव असू द्यावा माझा बाप ।।*

पंढरीची वारी आणि विठ्ठल नामभक्ती हा पूर्वापार कुळाचार असल्याचे सांगत, संत सांवता विठ्ठलाची करुणा भाकतात, ती अखंड सेवा घेण्यासाठी! अन्य कोणत्या सांसारिक, प्रापंचिक अथवा भक्तिमार्गाच्या मायापाशात न गुंतवता, वडिलांचा सेवाधर्म आपल्याकडून अखंड घडत राहावा ही त्यांची मनिषा त्यांच्या कर्मयोगी चरित्रावर आणि चारित्र्यावर प्रकाश टाकते.

आपल्या ज्ञातीविषयी अर्थात वृत्तीविषयी सांगतांना आपल्या स्वधर्माचा, कुळधर्माचा आणि परंपरेने आलेल्या, ज्ञानकौशल्यातून वृत्ती ठरलेल्या कर्ममार्गाचा उल्लेख करून; प्राप्त, स्वीकृत कर्मनिष्ठेने करून; सामाजिक तथा देव, देश, धर्म ऋण फेडणे, हीच खरी भक्ती हे स्पष्टपणे सांगतात-

*आमुचि माळियाची जात । शेत लावूं बागाईत ।।*
*आम्हां हाती मोट-नाडा । पाणी जातें फूल झाडा ।।*
*शांती-शेवंती फुलली । प्रेम जाई-जुई व्याली ।।*
*सांवताने केला मळा । विठ्ठल देखियला डोळा ।।*
*स्वकर्मा व्हावे रत । मोक्ष मिळे हातो हात ।।*

स्वतःच्या पारंपरिक ज्ञातीचा (ज्ञान-कौशल्याधिष्ठित वृत्तीचा) उल्लेख करून; वृत्तीनुसार कर्म हीच सगुणभक्ती आणि ज्ञानभक्ती तथा निर्गुणभक्ती होय; असे ते निक्षून सांगतात. भक्तिमार्गाने, भक्ति-ज्ञान-वैराग्य या त्रिपदीने साधले जाणारे द्वैतातून अद्वैत, प्राप्त कर्मभक्तीनेही साधले जाते, हे स्पष्ट करतात. फुललेल्या शेवंतीतून शांतीचे संवेदन प्रकटले, तर जाई-जुईच्या बहरातून सर्वांठायी प्रेम प्रकटते. प्रेम म्हणजेच भक्ती आणि भक्तीतून ज्ञान म्हणजे परमेश्वराशी अद्वैत अनुभूती होणे. संत सांवता म्हणतात, मी कर्म केले अर्थात मळा केला-फुलविला आणि त्यातच मला याचि देही याचि डोळा विठ्ठल अनुभवास आला. परमेश्वर म्हणजे ज्ञान. ज्ञानाचा आविष्कार म्हणजे सृष्टीचे आविष्कार चलन होय. परमेश्वराची अनुभूती म्हणजे कर्माशी एकरूप होणे होय. कर्मस्वरूप होऊन जगणे होय. हाच अनुभव सूत्ररूपाने सांगतांना संत सांवता म्हणतात, 'स्वकर्मा व्हावे रत । मोत्र मिळे हातो हात ।''

**४. संत सहवास :–**

संत सांवतांना ज्ञानदेव–नामदेवांना सहवास मिळाला. त्यांच्या सवे ते तीर्थयात्रेस गेले होते, असे बोलले जाते. संत सांवतांच्या कर्मभक्तीचा विचार केला तर, याविषयी निश्चित विधान करणे कठीण आहे. कुळाची वारीची परंपरा आणि वारकऱ्यांची शेतीभातीची कामे सांभाळून घडणारी वारी, या प्रमाणाने संत सांवता तीर्थयात्रेस गेले असावेत या बोलण्यास वाव आहे. गुरुपरंपरेने त्यांना संत नामदेव यांच्याकडून उपदेश लाभला आणि नामभक्तीने त्यांचे भावविश्व भारावून गेले असे म्हणता येते. संत सांवतांची कर्मस्वरूपाची विठ्ठलभक्ति, संतांनी गौरविली आहे. संत सांवतांचे अभंग वृत्तीने गुरव असणाऱ्या, त्यांचे स्नेही संत काशीबा गुरव यांनी लिहून ठेवले, असे मौखिक परंपरेने सांगितले जाते. संत सांवता माळी आणि संत काशीबांची समाधी स्थाने अरणगावलाच आहेत. संत काशीबा हेही विठ्ठलभक्तीने, कर्मनिष्ठेने संतपदाला पोचले होते. काशीबांचा मठ पंढरपूर येथे महाद्वारी पाहावयास मिळतो. कर्मयोगी सांवतांच्या अभंगांची संख्या फारच थोडकी आहे. प्रा.डॉ. र. रा. गोसावी यांनी सकलसंतगाथेत अवघे १२ अभंग नोंदविले आहेत. निरनिराळ्या अभ्यासकांनी, निरनिराळ्या ठिकाणी उल्लेखिल्याप्रमाणे, ही अभंग संख्या ३७ ते ४० पर्यंत जाते, असे अभंगातील नाममुद्रेवरून सांगता येते. त्यांच्या भक्तीविषयीच्या चमत्कार कथा प्रचलित आहेत.

**५. संत सांवता–पांडुरंग भेटी आणि कर्मयोगाची थोरवी :–**

भक्तांच्या भेटीस पांडुरंग स्वतः विट सोडून, सगुण रूपात भक्ताकडे जातो. संत कुर्मदासास भेटायला निघालेले पांडुरंग, लहूळच्या वाटेवर संत सांवतांच्या मळ्यात जाऊन, त्यांची मोठ्या नम्रतेने भेट घेतात. जणू भक्त हाच पांडुरंग आणि पांडुरंग झाला भक्त! अशी रोमांचित करणारी कथा उल्लेखित आहे. पांडुरंगाच्या या प्रवासात पांडुरंगासारखे ज्ञानदेव, नामदेव आहेत. आणखीही संत मेळा असेल. या सर्वांना बाहेर बाजूला थांबवून पांडुरंग या कर्मयोग्याला भेटायला जातात. कामे आटोपून फावल्या वेळात ध्यानयोग आचरणारे संत सांवता या भेटीचा प्रसंग स्वतः अभंगातून निवेदित करतात–

*''विकासिले नयन, स्फुरण आले बाही ।*
*दाहले हृदयी, करुणा भरिते ।।*
*जाता मार्गी भक्त, सांवता तो माळी ।*
*आला तया जवळी, पांडुरंग ।।*
*नामा ज्ञानदेव, राहिले बाहेरी ।*
*मळिया भीतरी गेला देव ।।*
*माया ठेवोनि हात, केला सावधान ।*
*दिले आलिंगन चहूं भुजीं ।।*
*चरणी ठेवोनि माथा, विनवितो सांवता ।*
*बैसा पंढरीनाथा, करीन पूजा ।।''*

स्वकर्म हाच स्वधर्म आहे त्याचे निष्ठेने पालन हाच अद्वैत सिद्धियोग अर्थात वेदांत होय. हाच खरा एकात्ममानव आणि एकात्मजीवमात्र सांभाळण्याचा राष्ट्रधर्म तथा विश्वकुटुंबियत्वाचा, भारतीय सांस्कृतिक धर्म होय; हे संत सांवतांचे स्वत्व होते! हेच देव कार्य होय. सकल भागवत संतांची हीच धारणा होती. त्यासाठी सगुण भक्तियोगाची कास संतांनी धरली होती. संत ज्ञानेश्वर ते तुकाराम या सर्व संतांची स्वकर्मविषयक धारणा हीच होती. संत सांवतांसह सर्व संतांना, स्वकर्म धर्मपालन हेच समस्त मानवमात्र आणि जीवमात्र यांसाठी खरे पांडुरंग कार्य किंवा खरा वेद अर्थ होय; हेच भक्तियोगातूनही प्रसिद्ध करावयाचे होते. संत सांवतांना प्रत्यक्ष भेट देण्याची लीला त्यासाठीच तर घडली!

संत तुकाराम भक्तांविषयीच्या, पांडुरंगाठायीच्या, कर्मनिष्ठा समदृष्टीविषयी लिहितात–

*उंच नीच काही नेणे भगवंत । तिष्ठे भावभक्त देखोनियां ।*

या अभंगात ते उल्लेख करतात 'माळ्या सावत्यास खुरपु लागे ।।'

संत एकनाथ गौरवितात–

*भक्ताचे मनोरत पुरवी नारायण ।,*
*संसारी असोनी जीवनमुक्त भक्त । आलोसे धावत तया भेटी ।।१।।*
*समाधिसुखें तल्लीन वाचे नारायण । लाविले नयन उन्मळीत ।।२।।*
*माथां ठेवुनी हात केला सावधान । वदे नारायण सांवत्यासी ।।३।।*
*येतां तुझे भेटी चोर मागें आला । लपवी मजला लवलाही ।।४।।*
*एका जनार्दनीं ऐकोनिया बोल । सावत्यानें सखोल दृष्टि केली ।।५।।*

एकनाथांनी 'चोर' या शब्दाचा वापर करून; संत सांवतांच्या कर्मभक्तीचे वेगळेपण अधोरेखित केले आहे.

श्री पांडुरंग संत सावतांच्या पोटात लपून बसला. पांडुरंगाला शोधीत आलेल्या संतांना पांडुरंग संत सावतांच्या ठायी सापडला. ही अशीच रोमांचकारी चमत्कार कथा; सांवतांच्या कर्मयोगाची महती गाते. पांडुरंगाची कर्मस्वरूपता संत सावतांनी ओळखली. अशा ज्ञानात्मक कर्मयोगाने, पांडुरंग निष्ठेने घडणारे कर्मच

घेऊन बसला असे सांगणारी ही कथा. संत एकनाथ या कथेचे निवेदन मोठ्या सूचकतेने करतात–

संत सांवता माळी चरित्रात ते म्हणतात–

*बैसोनी निकटीं सांवत्या जवळीं । कांही वनमाळी न दिसे मज ।।१।।*
*कां हे कर्म आड आजं आलेंसे वाड । न दिसे उघड विठू माझा ।।२।।*
*कोणत्या लिंगाडें पाडिलेसे तुटी । कांहो जगजेठी अंतरला ।।३।।*
*मजविण क्षण तयासी कंठेना । एकाजनार्दनी मना कठिण केले ।।४।।*

संत सांवता कर्मनिष्ठेने माळकाम करतांना पांडुरंग क्षणभरही सांवताला विसंबत नाही. पांडुरंगच कर्मस्वरूप होऊन राहतो! या कथेत रंगवून सांगतांना, संत कथा निवेदक श्री संत संतामाई म्हणतात–

*सावतामाळी बसला मळा खुरपीत । तेथेचि आले पंढरनाथ ।।१।।*
*मज लपवी रे लपवी पोटात । तूची खरा माझा प्रेमळ भक्त ।।२।।*
*मजवर आले संकट वक्त । पोट चिरूनिया सांठविले पंढरीनाथ ।।३।।*
*सखया कृपे संती म्हणे । धरा भाव देवाचरणी ।।४।।*

पोटात लपलेले पांडुरंग संत सांवतांनी पुन्हा पोट विदासून कसे दाखविले; अशीही कथा रंगविली जाते. ही कथा, स्वकर्म हाच खरा देव आणि कर्मनिष्ठेने कर्मस्वरूप होऊन कर्म करणे हीच खरी भक्ती. हे स्पष्ट करणाऱ्या; 'सर्वश्रेष्ठ भक्त कोण?' या कथेतील नारदांच्या प्रश्नाला उत्तर देताना; भगवंतांनी दिवसभर अथकपणे कष्ट करणारा शेतकरी; हे सप्रमाण उत्तर दिले, त्या कथेशी जुळती कथा आहे.

**६. कर्मयोगाने योगसिद्धी :–**

निष्ठेने कर्म करतांना ध्यानयोग आणि भक्तियोग मनोस्वरूपाने साधता येतो हेच संत सांवता परोपरीने स्पष्ट करतात–

*नकों तुझें ज्ञान, नको तुझा मान । माझें आहे मन वेगळेंची ।।*
*नको तझी भुक्ति, नको तुझी मुक्ति । मज आहे विश्रांती वेगळीच ।।*
*चरणीं ठेवूनि माथा, विनवितसे सांवता । ऐका पंढरीनाथा, विज्ञापना ।।*

सगुण भक्ती करण्याची आपली पद्धत वेगळी आहे; ती नवविधा भक्ती प्रमाणापेक्षा वेगळी; अर्थात स्वकर्मरत होणे ही आहे, असे सांवता स्पष्ट करतात. कर्मस्वरूपाने जीवन व्यतित करणे, हीच आपल्यासाठी 'विश्रांती' आहे. तीच या दोन्ही जीवनमुक्तता किंवा मोक्ष आहे, हे ठामपणे सांगत, सांवता देवाजवळ गाऱ्हाणे मांडतात.



**७. मध्ययुगीन संतांच्या परिवर्तन कार्याची संकल्पना आणि स्वरूप :–**

मध्ययुगीन संतांनी अध्यात्मिक लोकशाहीची, अर्थात समग्र परिवर्तनाची चळवळ उभी केली, असे म्हटले जाते. या चळवळीतून समतेचा, विश्वबंधुत्वाचा आणि सर्वांभूती प्रेमाचा संस्कार घडविण्यासाठी विद्रोह केला; असे भाष्य केले जाते. संत ज्ञानेश्वरांना बडा बंडवाला म्हटले जाते. तर भागवत धर्माचा कळसाध्याय साकारणाऱ्या जगद्गुरु संत तुकोबारायांना, थेट आधुनिक परिवर्तनाशी जोडले जाते. 'संत वाङ्मयाच्या आशयनिष्ठ अभ्यासाची दिशा' या ग्रंथात मी मांडलेल्या चिंतनात, मी – संतवचनांचा संदर्भ, थेट आधुनिक आणि नवाधुनिक, भौतिक, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय विचार प्रवाहांशी; एवढेच नव्हे तर विविध द्वैती, एकेश्वरी, निरिश्वरी, पंथोपपंथांच्या विचारांशी, धर्ममतांशी लावता येतो हे संतवचनांचे सामर्थ्य आहे असे म्हटले आहे. असा संदर्भ जोडतांना सावधानता आणि विवेक वापरला पाहिजे असे नमूद केले आहे. संतांनी जातीभेद, अंधरूढीपरंपरा, कर्मकांड यांविषयी पाखंडखंडनात्मक आणि उपदेशपर प्रबोध केला हे खरे. मात्र त्यांना विद्रोही म्हणणे, त्यांच्या मौलिक अध्यात्मनिष्ठेवर अन्याय करण्यासारखे होईल! समकालीन स्थलकालपरिस्थिती लक्षात घेऊन; भूतमात्रांठायीची एकात्मता सम दृष्टीने विचारात घेऊन; त्यांना अत्यंत कळवळ्याने, प्रस्थानत्रयींशी सुसंगत असा समत्व, प्रेमभाव, निष्ठा, विश्वबंधुत्व, भूतदया, पाखंडखंडन, स्त्रीपुरुष समता, जातीभेदापलिकडील मानवमात्रातील समता आणि सगुण–निर्गुण भक्तिविचार यांविषयी प्रबोध केला आहे. हे करतांना विद्रोही भाव नव्हे तर, अद्वैत भावाचे अमृत शुद्ध स्वरूपात प्रत्यक्ष व्यवहारात ज्ञानात्मक कर्मपरतेने आणता येईल; याविषयी प्रबोध केला. संतांच्या या चळवळीत, वस्तुपाठ मांडणारे म्हणून संत सांवतांकडे पाहावे लागते. संत सांवतांच्या आत्मनिष्ठ किंवा आत्मनिवेदनात्मक अभंगांचा या दृष्टीने आशय समजावून घ्यावा लागतो –

*माझी हीन याति । तुम्ही उदार श्रीपती ।।*
*नका देऊ भुक्ति मुक्ति । माझी परिसावी विनंती ।।*
*सांवता म्हणे पांडुरंगा । दुजेपण न्यावे पंगा ।*

आणि

*भली केली हीन याति । नाही वाढली महती ।।*
*जरी असता ब्राह्मण जन्म । तरी हे अंगी लागतें कर्म ।।*
*स्नान नाही, संध्या नाहीं । याति, कुळ – संबंध नाहीं ।।*
*सांवता म्हणे हीन याति । कृपा करावी श्रीपती ।।*

या आत्मनिवेदनपर अभंगांत, जन्मानुसार जातीभेदाची खंत व्यक्त करतांना 'तुम्ही उदार श्रीपती' असे म्हणत परमेश्वर अर्थात ज्ञान, हे सर्वव्यापक, सर्वसमावेशक आणि समत्वपूर्ण असते, असे स्पष्ट केले आहे. जन्मानुसार निर्माण झालेली उच्चनीच, ज्येष्ठकनिष्ठ भेद, वेदान्त तत्त्वज्ञानात राहातच नाही; हे 'उदार श्रीपती' या शब्दप्रयोगातून सांगितले आहे. सगुण भक्तीच्या मार्गे हे 'दुजेपण भंग करावे' यासाठी पांडुरंग किंवा श्रीपतीस्वरूप अर्थात ज्ञानस्वरूप हे समाजजीवनात प्रकटावे, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. येथे ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की; कर्मनिष्ठ संत सांवता, देव देणारा किंवा करणारा असा भाव प्रकट करीत नाहीत, तर ठायीच सम भाव निर्माण व्हावा अशी साधना घडावी; असा भाव प्रकट करीत आहेत. समाजजीवनात, व्यवहार करतांना रूढीग्रस्ततेत, माया, लोभ इ. मध्ये माणूस एवढा गुरफटतो की तो सर्वांभूती परमेश्वर, या समत्व भावालाच पारखा होतो. अर्थात अज्ञानवशतेने कर्म घडू लागते. संत ज्ञानेश्वरांच्या पसायदानात 'खळांची व्यंकटी सांडो', 'भूतांपरस्परे पडो मैत्र जीवांचे' या प्रार्थनेतील अपेक्षेप्रमाणेच ही अपेक्षा आहे. हे समत्वाचे ज्ञान श्रुतींनी अर्थात वेदोपनिषदांनी व्यक्त केले आहे. प्रस्थान त्रयींचा, 'दुजेपणा न्यावें भंगा' या प्रार्थनेला, भक्कम आधार संत सावतांनी दिला आहे.

जन्मानुसार, प्राप्त ज्ञाती अर्थात वृत्ती म्हणजेच कौशल्यज्ञानात्मक वैशिष्ट्यपूर्ण कर्म मार्ग होय. तोच जाती म्हणून ओळखला जात आहे. कर्मकांडात्मक रूढीग्रस्त समाजात अपसमजाने तो हीन मानला जातो हे त्याचे वैशिष्ट्य ओळखून डोळसपणे कर्मनिष्ठ व्हावे, असे संत सांवतांना समाजाला सांगायचे आहे. विद्रोह नव्हे, तर तात्त्विक सामंजस्य प्रकट करावयाचे आहे! सामाजिक गरजा भागविण्यासाठी प्रत्येक समाजघटकाला कोणते ना कोणते काम, आपल्या मगदुराप्रमाणे करावे लागते. रूढीग्रस्ततेत त्याची मक्तेदारी होते. मक्तेदारीला सामाजिक, व्यावसायिक असे अनेक पैलू असले तरी; त्या कामाचे महत्त्व कमी होत नाही. कोणतेही काम कधीच कमी महत्त्वाचे नसते! त्या-त्या ठिकाणी अर्थात सामाजिक घटनेत, ते काम महत्त्वाचेच असते. एवढेच नव्हे तर, त्या कामाशिवाय समाजव्यवस्था अपंग होते. म्हणूनच प्राप्त कर्म हीन समजले गेले, तरी ते महत्त्वाचेच असते. भागवत, वैष्णव तथा वारकरी संप्रदायात, माउलीपणाला सर्वाधिक महत्त्व आहे. माउली लाभावीण प्रेमाने, अर्भकाची विष्ठा काढण्यापासून त्याला जेवूखाऊ घालण्यापर्यंतचे कोणतेच काम कमी महत्त्वाचे मानत नाही. प्रत्येक कामाचे वेगळेपण त्या-त्या ठिकाणी ठेवून निष्ठेने, प्रेमभावाने ते काम करावे. तीच भूमिका मनात ठेवून



कर्मभावी किंवा कर्मयोग साधायचा असतो. ब्राह्मण जातीशी तुलना करीत हेच संत सांवतांना सांगायचे असते. हे लक्षात घेतले तर 'संत हेच भूमीवर । चालते बोलते परमेश्वर ।।' ही उक्ती सार्थ ठरते.

**८. कर्मस्वरूप व्हावे :-**

कर्मनिष्ठेने जगतांना कर्मस्वरूप व्हावे म्हणजे भक्ती, ज्ञान, वैराग्य ही त्रिपदी सिद्ध होऊन ठायीच अद्वैतानुभूती, स्वरूपता प्रकटते. कर्मनिष्ठ संत सांवता म्हणतात-

*ऐकावें हे विठ्ठल धुरे । विनंती माझी हो सत्वरें ।।*
*करी संसाराची बोहरी । इतुकें मागतों श्रीहरी ।।*
*कष्ट करितां जन्म गेला । तुझा विसर पडला ।।*
*माळी सांवता मागे संतान । देवा करी गा निःस्तान ।।*

प्रपंचातील व्याप ताप संताप, यातच आपण अडकतो. परमेश्वर सृष्टीरूपाने प्रकट नटला आहे. तरी तो पुन्हा अवघ्या सृष्टीला चक्रनेमीक्रमाने सामावण्याची क्रीडा अथवा लीला करण्यासाठी, अलिप्तच असतो! हीच तर सृष्टीसंसाराची स्वरूपता आहे. सच्चिदानंदपरिपूर्णता भोगायची असेल तर कर्मस्वरूप होऊन प्रकटावे लागते. ज्ञान असे कर्मवान झाले की ते निष्काम अर्थात संसार मुक्त होते. अलिप्तपणे व्यक्तिमत्त्व प्रकटविते. हेच ठायीच देही असूनही विदेही होणे अर्थात वेदान्त भोगणे असते. सांवता म्हणतात, 'देवा करी गा निःसंतान!' निःसंतान करणे म्हणजे संसारातून अलिप्तता येणे. मात्र ही अलिप्तता संन्यासमार्गाने नव्हे तर कर्ममार्गाने येणे अपेक्षित आहे. संत सांवतांची कर्मस्वरूपता अशी की 'कष्ट करितां जन्म गेला । तुझा विसर पडला ।।'' कर्मनिष्ठ झाले की 'संसाराची बोहरी' संसारपरिपूर्ती आपसुक होते. निष्कामतेने संसारपरिपूर्ति झाली तर, प्रपंचसंसार असार आणि दुःखी असल्याचे कारणच नाही. कर्तव्यकर्मपरतेने अर्थात ज्ञानात्मक कर्मपरतेने सहजच सच्चिदानंद प्राप्ती घडते. संसार सुखाचा होतो!

संत सांवतांनी ज्ञानात्मक कर्मतत्परता, कर्मनिष्ठा ठायी बिंबविली. सांवता कर्मस्वरूप झाले! परमेश्वर आणि कर्म, कर्म करणारा आणि कर्म यांचे द्वैत हरपले. सांवता माळीपणाने परमेश्वरस्वरूप झाले. सर्वकल्याणासाठी समर्पित झाले. ते म्हणतात-

*कांदा, मुळा, भाजी । अवघी विठाबाई माझी ।।*
*लसूण, मिरची, कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी ।।*
*मोट, नाडा, विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ।।*
*सांवता म्हणे केला मला । विठ्ठल पायी गोविंला गळा ।।*

निष्काम कर्मयोगी कसा सतो, असावा; कर्मयोगाने जीवन सुफलित कसे होते; कर्मयोगाने 'विठ्ठल पायी गोविंला गळा' अर्थात जीवच शिव कसा होतो; याची अनुभूती, संत सांवता माळी सर्वांना घडवितात. कर्मयोग्याला कर्मसाधने, कर्मस्थल, कर्मफल आणि स्वतः कर्मयोगी सारेच कर्मस्वरूप अनुभूत होतात. अशा कर्मयोगाने प्रपंच, समाज अवघा मानवी व्यवहार कल्याणप्रद होतो. श्रीमदभगवद्गीतेतील कर्मविषयक चर्चेचा वस्तुपाठच, संत सांवतांच्या विभूतिमत्त्वातून समोर येतो. राष्ट्रीय पुनरुत्थानासाठी आणि मानवी कल्याणासाठी मानवमात्राने कर्मनिष्ठ व्हावे. त्याचे कर्म ज्ञानवान असावे, असा संदेश संत सावतांच्या विभूतिमत्त्वांतून आणि अभंगवाणीतून प्रेषित होतो.

* * *



# स्वामी विज्ञानानंदांची प्रकाश समाधी : एक ऐश्वर्ययोग

१८ नोव्हेंबर १९९३ रोजी, स्वामी विज्ञानानंदांनी अविनाशित्वात चिरंतन होण्यासाठी प्रकाश समाधी योग साधला! स्वामी विज्ञानानंदांनी 'न्यू-वे' असा मार्ग स्वीकारला. या मार्गाने भौतिक विज्ञान आणि मनोविज्ञान यांच्या अभ्यास व उपयोजनातून, प्रयोगांच्या माध्यमातून महाशून्य, अविनाशी सच्चिदानंदरूप, अशा परमात्मतत्त्वाची अर्थात ज्ञान अवस्थेची आणि परमात्मतत्त्वाचे अर्थात ज्ञानाचे आविष्कार रूप असलेल्या, वैश्विक सृष्टीरूपाची उकल करता येते, हे सप्रमाण सिद्ध केले. या 'न्यू-वे' ने समग्र मानवमात्रांच्या आणि भूतमात्रांच्या कल्याणाचा चिरंतन मार्ग स्पष्ट होतो; हे त्यांनी बुद्धिप्रामाण्याने आणि आत्मानुभूतीने, ठामपणे विषद केले. योगवैज्ञानिक पद्धतीने, विज्ञानाच्या प्रयोगसिद्ध साधनेने, विश्वचैतन्याशी अद्वैत साधता येते. जन्मोजन्मी सर्वकल्याणात्म मार्गाने कर्मनिष्ठेने जीवन व्यतित करून; जीवनमुक्त अवस्था ठायीच अनुभवता येते. भारतीय ऋषीपरंपरेने सिद्ध केलेले हे सत्य; स्वामी विज्ञानानंदांनी 'न्यू-वे' प्रणालीने, आधुनिक विज्ञानयुग म्हणून प्रसिद्ध असलेल्या युगात, पुनरुज्जीवित आणि प्रस्थापित केले. मनशक्ती प्रयोगकेंद्र या सत्य-साधनेचे गुरुकुल होय!

**१. समाधीसाधना आणि सामान्य मृत्यू :-**

स्वामी विज्ञानानंदांनी प्रकाश समाधी घेतली. हे योगवैज्ञानिक सत्य समकालीन तथाकथित बुद्धिप्रामाण्यवाद्यांना कळणे आणि पचणे शक्यच नव्हते. समाधीसाधनेचे योगवैज्ञानिक विश्लेषण करून, त्याचे भौतिक विज्ञानाच्या अंगाने कोणी स्पष्टीकरण करू लागले; की त्यावर छद्म वैज्ञानिक असा शिक्का मारला जातो. समाधीविषयीचा संभ्रम खूप मोठ्या प्रमाणावर समाजात रेंगाळलेला आहे. समाधी बांधणे म्हणजे थडगे बांधणे. समाधीमग्न असणे म्हणजे ध्यानमग्न असणे. समाधी घेणे किंवा समाधी साधणे म्हणजे, जीवदशेतून मुक्त होऊन;

आत्मा तथा चैतन्याची, परमात्मा तथा परमचैतन्याशी स्वरूपता साधणे होय. या अवस्थेत पंचतत्त्वात्मक देह, पंचतत्त्वात विसर्जित करण्यासाठी सोडून, आत्म्याच्या स्वरूपस्थितीत अर्थात परमात्मभावाने, अविनाशी अशा चिरंतन अवस्थेत, सूक्ष्म स्वरूपात असणे होय.

सर्वसाधारण मृत्यूनंतर देह पंचतत्त्वात विलीन करण्यासाठी अग्नी, जल, भूमी यांमध्ये समर्पित केला जातो. देह अर्थात कलेवर समर्पणाचे काम, अन्य लोक करतात.

समाधी साधल्यानंतरही देह विसर्जनाचे काम लोक करतातच; तथापि समाधीसाधना करणारी विभूती, वायू आणि आकाश समाधी घेत असेल तर, देह विसर्जन समाधीस्थळी स्वतःच करून घेण्यासाठी सोडून, समाधी साधल्याची क्रिया केली जाते. माउली संत ज्ञानेश्वर, संत शेख महंमद महाराज यांनी या प्रकाराने समाधी साधलेली दिसते. तर काही विभूतींनी आपल्या देहाचे विसर्जन समाधी बांधून कसे करावे; याविषयी समाधीसाधना करतांनाच शिष्यांना किंवा प्रियजनांना सूचना देऊन; समाधी बांधून घेण्याची निश्चिती केलेली असते. संत श्री गजानन महाराज, श्री साईनाथ महाराज आदि सिद्ध संतांची उदाहरणे प्रसिद्ध आहेत.

सामान्य मृत्यू पावलेल्या माणसाच्या बाबतीत, प्रियजन किंवा स्नेहीजन आपल्या प्रेमभावनेनुसार किंवा श्रद्धेनुसार त्या व्यक्तीच्या अवशेषांची समाधी बांधतात. सामान्य मृतांची अशी बांधलेली समाधी प्रियजनांच्या दृष्टीने पवित्र, पूज्य असली; तरी ती वस्तुतः एक देहविसर्जनाची सोय अथवा उत्तरक्रियेतील प्रक्रिया असते. सामान्य मृताच्या काय किंवा समाधीयोग साधणाऱ्याच्या काय, दोहोंच्याही बाबतीत देहातील परमात्मतत्त्वाचा अंशस्वरूप आत्मा, प्राण तथा चैतन्य जीवातून अर्थात शरीरातून मुक्तच झालेले असते. मग समाधीयोग साधणे आणि मृत होणे यांतील तात्त्विक आणि भौतिक भेद कोणता? सामान्य मृताचा आत्मा प्राण तथा चैतन्य, सूक्ष्मस्वरूपच असूनही स्वाधीन नसते. सृष्टीप्रक्रियेच्या आधीन होऊन किंवा देहवासना वृत्ती प्रक्रियेनुसार ते पुनर्जन्मास प्राप्त होते. समाधीसाधना साधणारा योगी आपले सूक्ष्मस्वरूप अर्थात ठायीचे आत्मतत्त्व तथा चैतन्यतत्त्व, परमात्मतत्त्वाशी स्वरूपता साधूनही स्वाधीन असते! ते आत्मतत्त्व सगुणसाकार अशा रूपातील सदेहता ते सूक्ष्मरूप, पुनर्संघटित करण्याचे सामर्थ्य ठायीच साधून असते! समाधीसाधना साधलेली विभूतिमत्त्वे पुन्हा सगुण रूपात प्रकट होऊ शकतात. तसेच ते पंचतत्त्वांपैकी ज्या तत्त्वात आत्मा स्थित केला



आहे; त्या तत्त्वात पुनर्विघटित करून; अंतर्धान होऊ शकतात. ऋषीपरंपरेतील सिद्ध, साधू, मुनी, ऋषी, योगी, योगसाधनेने महामना झालेली विभूतिमत्त्वे अशा स्वरूपात, चिरंतनात, केव्हाही कोणत्याही रूपात प्रकट व अप्रकट असू शकतात. समाधीयोगसाधनेत, आणखी एक भौतिक वैज्ञानिक प्रक्रिया साधता येते ती म्हणजे देहविसर्जित न करता स्तंभन योगाने, आहे त्या अवस्थेत, देह विनाक्षती अबाधित राखणे आणि त्या देहाचा युगांच्या प्रवासात पुन्हा पुन्हा वापर करणे. तसेच परकाया प्रवेश करणे आणि पुन्हा स्वदेहाच्या ठायी होऊन प्रकटणे. समाधीसाधना ही पूर्णतः भौतिक विज्ञानात्मक आणि मनोवैज्ञानिक तथा आत्मवैज्ञानिक तथा योगवैज्ञानिक प्रकिया असते.

**२. आत्मतत्त्व आणि देह :–**

समाधी साधलेल्या विभूतिमत्त्वाचा देह, अन्य मृत व्यक्तींच्या देहाप्रमाणे पार्थिवतः समाधीसाधनास्थलीच, निःचेष्ट रूपात आढळला तरी, त्या देहाचे पुनर्चैतन्यशाली पूर्ववत सगुण रूप प्रकट करण्याचे सामर्थ्य, समाधीमग्न अशा सूक्ष्म रूपात अर्थात त्या देहापासून विदेही झालेल्या आत्मरूपात असते. अन्य लोकांनी पार्थिवाचे विसर्जन कोणत्याही प्रकारात केले तरी, पंचतत्त्वातून त्या देहाचे पुनर्संघटन होऊ शकते. म्हणजे देह पंचतत्त्वात विघटित होतो तर आत्मतत्त्व, स्वनिर्णयाप्रमाणे पंचतत्त्वापैकी एका तत्त्वात मुक्तपणे स्थित होते.

समाधीमग्न आत्मरूप वा मृताचे आत्मतत्त्व ही गोष्ट परमात्मतत्त्वाचे अंशरूप असते. आत्मतत्त्व म्हणजे ज्याला लोकभाषेत जीवातील जीव किंवा प्राण असे म्हणतात ते तत्त्व नित्य, सत्य, चिद्रूप व आनंदमयच असते. समाधी साधलेल्या विभूतिमत्त्वाचे कलेवर पाहून; अनेकदा त्याने आत्महत्या केली असे विधान केले जाते. हत्या म्हणजे मारून टाकणे, विनाश करणे होय. जी गोष्ट अविनाशी आहे, त्या गोष्टीची हत्या होऊ शकत नाही. आत्मतत्त्व हे तर निर्गुण, निर्विकार, निराकार, स्वसंवेद्य चिद्रूप असे सत्य असते. ते समाधीसाधकाचे असो की सामान्य मृताचे असो. ते अमर्त्यच असते.

**३. आत्महत्या ही कल्पनाच भ्रामक :–**

मारता येते किंवा विनाश करता येतो तो पार्थिवाचा. वस्तुतः ते पार्थिव विनाश झाले असे वाटले तरी ते पंचतत्त्वात विघटित झालेले असते. पंचतत्त्वे हाही स्वसंवेद्य कृष्णस्वरूपाचा नित्य भौतिक अविनाशी, परिवर्तनशील आविष्कार असतो. आत्मतत्त्व तर कृष्णतत्त्व अर्थात महाशून्य, सत्य, चिद्रूप, आनंदरूप, स्वसंवेद्य, आद्य, केवल, निर्गुण, निराकार, निर्विकार, नित्य अशा परमात्मतत्त्वाचा

अंश असते. सृष्टीप्रक्रियेत पंचतत्त्वांच्या आविष्काराबरोबरच परमात्मतत्त्वाच्या सकल गुणात्मकतेसह ते पंचतत्त्वांच्या ठायीही अंशात्मकतेने नित्य प्रकटतेच. या आत्मतत्त्वाचे नित्यत्व श्रीमद्‌भगवद्‌गीतेत–

''वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्यम'' अर्थात हा आत्मा नाशरहित, नित्य, न जन्मणारा व न बदलणारा आहे. (श्री.भ.गी.अ.२ श्लोक २ प्र.चरण) हा आत्मा ''नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः । न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।'' अर्थात आत्म्याला शस्त्रे कापू शकत नाहीत, विस्तव जाळू शकत नाही, पाणी भिजवू शकत नाही आणि वारा वाळवू शकत नाही. (श्री.भ.गी.अ. २ श्लोक २३) – असे वर्णित झाले आहे. अशा आत्मतत्त्वाची हत्या करणे शक्य नाहीच. त्यामुळे समाधीसाधना करणाऱ्या विभूतीने आत्महत्या केली असे म्हणणे सर्वथा भ्रामक आणि मुळातच चुकीचे असते.

**४. समाधी साधनेचे श्रेष्ठत्व :–**

समाधीसाधना ही विदेही होऊन; सच्चिदानंदस्वरूप अनुभवण्याची, ताटस्थपूर्वक सृष्टीआविष्कार लीला अनुभवण्याची, सर्वकल्याणासाठी; संदेशन, समुपदेशन, आज्ञापन करून कल्याणप्रद व्यवस्थापन घडविण्यासाठी आत्मतत्त्वाने स्वीकारलेली, श्रेष्ठतम जीवनावस्था होय! अर्थात संजीवक अवस्था होय! ऋषी, मुनी, तपस्वी, योगी, सिद्ध, अवतार, चिरंजीवी, संत अशा योगविज्ञानाचा अनुसार करणाऱ्या विभूतिमत्त्वांनी, अशी समाधीसाधना साधली आहे. याच मालिकेतील आधुनिक वैज्ञानिक तथा बुद्धिप्रामाण्यनिष्ठ युगातील श्रेष्ठ विभूतिमत्त्व म्हणजे स्वामी विज्ञानानंद होत!

**५. समाधीयोग साधकाची अस्तित्व प्रक्रिया :–**

येथे आपण समाधीयोग साधकाच्या अस्तित्व प्रक्रियेची चर्चा करीत आहोत. सामान्यतः वासनादेहासह मृत होणाऱ्या जीवाच्या मरणोत्तर अवस्थेविषयी, तसेच त्याच्या वासनालिप्त मनोस्वरूप आत्मांशाचा विचार आपण करीत नाही. तो विषय पूर्णतः स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. समाधीयोग साधणारी विभूति विदेही होण्याचा निर्णय घेते. हा निर्णय वेगवेगळ्या कारणाने घेतला जातो.

समाधीयोग साधणारी विभूति जीर्ण वाटू लागणाऱ्या देहाचे विसर्जन करण्याचा निर्णय घेते. तसेच अगदी तारुण्यात पूर्ण विकसित अवस्थेतही, त्या देहाद्वारे करावयाचे कार्य पूर्ण झाले असे लक्षात घेऊन, ती विभूति विदेही होऊन; कल्याण कार्यासाठी समाधीयोग साधते. मध्ययुगातील अशा निर्णयाचे ठळक उदाहरण म्हणजे, निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई यांचा समाधीयोग होय.



समाधीयोग साधणाऱ्या विभूतीचे जीवन समस्त भूतमात्रांच्या कल्याणासाठी समर्पित असते. स्थितप्रज्ञेने आणि ज्ञानोत्तर भक्तिभावाने, त्यांचे हे कार्य विशिष्ट स्वीकृत मार्गाने सुरू असते. प्राप्त देहाचे माध्यम, जीवमात्रांच्या लोकांत, व्यवहार व समायोजन दृष्ट्या, अपुरे जाणवू लागले; की अशी विभूति समाधी साधण्याचा निर्णय घेते. भोवतीच्या स्नेहीजनांना सांगून; समाधीसिद्धीच्या क्षणी ती विदेही होऊन; भूतमात्रांच्या कल्याणासाठी सूक्ष्म अवस्थेत पंचतत्त्वातील एका तत्त्वात स्थित होते. त्या अवस्थेत ती, भारतीय दैवतकथाशास्त्रातील ब्रह्मा, विष्णू, महेश अशा त्रिदेवांप्रमाणे, सच्चिदानंदस्वरूपाशी अद्वैतही अनुभवते आणि तशाच पूर्ण ज्ञानात्मकतेने, समाधीसिद्ध अवस्थेतून जीवमात्रांच्या कल्याणासाठी ब्रह्मकार्य अर्थात, भूतमात्रांच्या सर्वांगे कल्याणासाठी ज्ञानात्मक कृपाकार्य करू लागते. या सर्व प्रक्रियेतील समाधीसाधना सिद्धीविषयीची प्रक्रिया सद्‌गुरुकृपेने घडते. सद्‌गुरु हे ज्ञानात्मकच असतात. सगुणरूपात प्रकट होऊन किंवा प्रकट असतांना ते साधकाला सिद्धीपर्यंत नेण्याचे कृपाकार्य करतात. सगुणरूपात प्रकट न होता ज्ञानात्मक प्रेरणा देऊनही ते कृपाकार्य करतात.

**६. समाधी साधना :–**

समाधी साधना ही योगशास्त्रांनुसार गुरुकृपापूर्वक साधण्याची गोष्ट आहे. ध्यानधारणा, प्राणायाम, यमनियम इ. प्रक्रिया यात महत्त्वाच्या असतात. या प्रक्रियेत सर्व प्रकारच्या सिद्धी आपसूकच प्राप्त होतात. सिद्धींचा स्वीकृत कार्यात, भूतमात्रांच्या कल्याणासाठी उपयोग करावयाचा असतो. या सिद्धींच्या संमोहनात न अडकता सिद्धविभूतीने समाधी साधावयाची असते. समाधी साधनेविषयी संत माउली ज्ञानेश्वरांनी स्पष्ट शब्दात अवस्थेचे वर्णन केले आहे –

*समाधिसाधनसंजीवननाम । शांति दया सम सर्वांभूती ।।१।।*
*शांतीची पै शांति निवृत्तिदासारू । हरिनाम उच्चारू दिधला तेणें ।।२।।*
*शम दम कळा विज्ञान सज्ञान । परोतोनि अज्ञान नये घरा ।।३।।*
*ज्ञानदेवा सिद्धि साधन अवीट । भक्तिमार्ग नीट हरिपंथी ।।४।।*

(श्री ज्ञानेश्वरांची अभंगगाथा, स.सं.गाथा– संपा. डॉ. र. रा. गोसावी, अ.क्र. ४००, सारथी प्रकाशन, पुणे)

समाधी साधण्यासाठी योगशास्त्राने अनेक मार्ग सुचविले आहेत. श्री ज्ञानदेवांनी भक्तियोगसांगितलाआहे.श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये,अर्जुनविषादयोगापासून,सांख्ययोग, कर्मयोग, ज्ञानसंन्यासयोग, योगगर्भयोग, आत्मसंयमयोग, ज्ञानविज्ञानयोग, ब्रह्माक्षर निर्देशयोग, राजविद्याराजगुह्ययोग, विभूतियोग इ.सर्व ठिकाणी योग असा शब्द

वापरला आहे. स्वामी विज्ञानानंदांनी समाधी साधण्यासाठी आत्मसंयमयोग आणि ज्ञानविज्ञानयोग स्वीकारला आहे. समाधीयोग साधण्याच्या प्रक्रियेत आत्मज्ञान प्राप्त होणे महत्त्वाचे असते. परमात्मा – अंशरूपआत्मा – जीवमात्रातील अंशरूप आत्म्यांशी संबंध, या तीनही स्तरावरील परस्परसंबंध ज्ञानात्मकतेने या अवस्थेत जाणवतात. या जाणिवेमुळे समाधी साधलेल्या विभूतिमत्त्वाचे कार्य चिरंतनासाठी सुरू असते. समाधी पंच महाभूतांतील कोणत्याही तत्त्वांत साधता येतो. पृथ्वी, आप, तेज, वायु आणि आकाश यापैकी वायू आणि आकाश या तत्त्वांचा एकत्रित विचार करावा लागतो. समाधीयोग साधणाऱ्या विभूतिमत्त्वांचा आढावा घेतला की, अपवाद वगळले तर अतिप्राचीन ऋषींसह सर्वांनी वायू–आकाश या तत्त्वांत समाधी साधलेली दिसते. यामुळेच त्यांचे महानिर्वाण झाले असा समज सर्वत्र पसरलेला दिसतो. पृथ्वी, आप आणि तेज या तत्त्वांत समाधी साधणाऱ्यांविषयी 'समाधी कसली आत्महत्या!' असा अपसमज पसरलेला दिसतो.

स्वामी विज्ञानानंदांनी प्रकाश समाधी घेतली. ब्रह्ममानसपुत्र सनक, सनत, सनंदन, सनातन तसेच चिरंजीवांपैकी भगवान परशुराम आणि भगवान हनुमान तसेच भगवान श्रीकृष्ण हे देखील प्रकाश समाधीस्थित आहेत. अगदी मध्ययुगात संत मुक्ताबाईंनी प्रकाश समाधी स्वीकारली आहे. या सुप्रसिद्ध उदाहरणाव्यतिरिक्त आणखीही काही महामानवांनी तेज अर्थात अग्नी, प्रकाश समाधी घेतली असावी. प्रभूरामचंद्रांनी जलसमाधी साधली. संत तुकोबाराय सदेह वैकुंठाला गेले परंतु सम ाधी स्वीकारताना जल, तेज आणि वायू तत्त्वाचा उपयोग करून ते आकाशतत्त्वात स्थित झाले असा अनुभव येतो. सीतामाईंनी पृथ्वीसमाधी स्वीकारली; तर त्यांची छाया बनून राहिलेल्या वेदिका देवींनी अग्नी किंवा प्रकाश समाधी आणि भू समाधी या दोन्ही प्रकारे समाधीयोग, त्रेता आणि द्वापारयुगात साधला. कलियुगाच्या सुरुवातीला, गालवमुनीशिष्य पांडुशर्मा तथा पांडुमुनी यांनी अष्टवर्गीय गोपवेषातील पांडुरंग स्वरूपात तेज समाधी साधली असे निर्देशित होते.

**७. स्वामी विज्ञानानंदांची प्रकाश समाधी प्रक्रिया :–**

स्वामी विज्ञानानंदांनी प्रकाश समाधी साधण्याची प्रक्रिया का आणि कशी घडविली; हे क्रमाने पाहता येते. स्वामी विज्ञानानंद हे मनशक्ती म्हणजे आत्मशक्ती म्हणून सिद्धांत प्रस्थापित करणारे, पहिले विज्ञाननिष्ठ ऋषी होत. मन अजड आहे अशी अनुभूवी त्यांना आली. २२ मार्च १९५७ मध्ये अपूर्व असा हा आत्मप्रत्यय आला. जीवाच्या ठायीचे जिवंतपण मन म्हणून जाणवते. हे मन वासनादेहाच्या आधीन होऊन; अनेकदा विकृतीवश होते. आत्मशक्तीपूर्ण अशा, अजड स्वरूपावस्थेतील जाणवणाऱ्या मनावर दोन प्रकाराने, अर्थात राजयोग आणि विज्ञानयोग या मार्गाने प्रयोगनिष्ठ संस्कार केले तर, मन कल्याणकारी, सहानुभूतीपूर्ण, ज्ञानात्मक असे, सुसंस्कृतपणे विचार करू शकते, हे लक्षात आले. व्यापक जीवनानुभूतीसह त्यांनी भौतिक विज्ञाननिष्ठ प्रयोगसिद्ध असा मार्ग सर्वसामर्थ्यपूर्ण मनशक्ती प्रकटविण्यासाठी निवडला. १९५८ मध्ये 'न्यू–वे' चे पुस्तक प्रकटले. २१ फेब्रुवारी १९६३ पासून त्यांनी सप्तवार्षिक संन्यास योगसाधना दत्तकुटीरमध्ये सुरू केली. 'न्यू–वे'च्या विज्ञानयोगपूर्वक, प्रयोगनिष्ठ संशोधनाची जागतिक पातळीवर मांडणी करून; १९७० मध्ये 'न्यू–वे' आश्रम, तथा गुरुकुलाची स्थापना केली. १९८४ मध्येच त्यांनी समाधी साधनेचे प्रयोग सुरू केले. त्याचबरोबर चर्चासत्रे, परिसंवादसत्रे, सत्यपूजा उपक्रम, गायत्रीमंत्र पुरश्चरण, शिक्षण, स्वावलंबन, गर्भसंस्कार, वंशकल्याणमार्ग संस्कार आदि अनेक प्रकारचे युक्त आणि कल्याणात्मक संस्कार घडविणारे उपक्रम कसे घ्यावेत, याविषयी योगवैज्ञानिक आणि भौतिकविज्ञानात्म मार्गांचे, मनशक्ती प्रकट करण्यासाठीचे मार्ग त्यांनी घालून दिले. या प्रवासात समाधीयोग साधना सुरूच होती. पृथ्वीवरील ज्ञात वैज्ञानिक शास्त्रांची मर्यादा त्यांनी जाणली होतीच. त्याबरोबर त्याच मार्गाने मनोवैज्ञानिक मार्गाकडे आणि त्यापुढे जाऊन योगमार्गाकडे कसे जाता येते हे त्यांना आत्मज्ञानाने ज्ञात झाले. विश्वकल्याणासाठी प्रचलित प्रभावळीतील देहापासून विदेही होऊन; अवकाशव्यापी आत्मशक्तीचे अर्थात मनशक्तीचे ज्ञान प्रेरित करण्यासाठी, त्यांनी प्रकाश अर्थात तेज, अर्थात अग्नी या तत्त्वाची निवड करून; प्रकाश समाधी घेण्याचे निश्चित केले. १८ नोव्हेंबर १९९३ रोजी त्यांनी त्यांच्या ठायीचे आत्मज्ञानपूर्ण आत्मतत्त्व, प्रकाशतत्त्वात स्थित केले. भोवतीच्या लोकांनी त्यांचे कलेवर जगराहाटीप्रमाणे पंचत्वात विलीन करविले.

**८. प्रकाश समाधी ऐश्वर्ययोग साधण्यापूर्वीचे हितगुज :–**

प्रकाश समाधी साधताना त्यांनी भोवतीच्या प्रियजनांशी हितगुज केले. १९९३ च्या 'शिव' कादंबरीतील त्यांचे स्फुट, सर्वकल्याणात्मक कार्यासाठी त्यांनी साधलेल्या 'प्रकाश समाधीवर' संकल्पविषयक प्रकाश टाकणारे आहे. ''स्वामीजी चंद्राभिमुख झाले. कातर आवाजात ते म्हणाले– हे शंकरा, तुझं विष मला दे. तू एकटा विष प्यालास. चिरंजीवता आम्हाला आणि वेदना तुला, ही वाटणी न्यायाची नाही. अमरतेचा हव्यास मला लोलुप करील. सुखाच्या साखरेत मला तो बुडवील. म्हणून ते सुख परावलंबी असतं. विष प्यालानंच तू मृत्यूचाही देव बनला आहेस. हे शंकरा! खरी अमृतता त्यातच आहे. ते दयामय विष मलाही दे.''

सर्वकल्याणासाठी बुद्धिप्रामाण्यावर आधारित भौतिक विज्ञान आणि योगविज्ञान यांची सांगड घालून; प्रचलित भौतिक जीवनात मनशक्ती प्रकटवून ज्ञानात्मक कर्मनिष्ठ मानव घडविण्यासाठी हा प्रकाश समाधी साधण्याचा संकल्प होता, हे स्पष्ट आहे. ''मुलांनो, मी जरी देहातून गेलो, तरी जाणार कुठे? मी इथे तुमच्यातच असेल.'' असे शिबिरातील मुलांनाही स्वामी सांगायचे.

प्रकाशतत्त्वात स्थित राहून स्वामी विज्ञानानंद परमात्मतत्त्वाच्या आविष्काररूप सृष्टीतील, भूतमात्रांच्या कल्याणासाठी, विज्ञानयोगाने ज्ञानयोगापर्यंत मानवमात्रांना संज्ञापित करीत, चिरंतन ब्रह्मसेवा कार्यरत आहेत. ह्याविषयीच्या असंख्य, अनुभूती गुरुकुलातील साधकांना, प्रेरणा-साक्षात्काराच्या रूपाने, मनोवैज्ञानिक तथा भौतिक वैज्ञानिक पातळीवर येत आहेत. सर्वात्मक कल्याणासाठी वैज्ञानिक मार्गाने मानवाच्या मनशक्ती परमात्मशक्तीच्या स्तरावर, विकसित करण्यासाठी, मनामनाला प्रकाशित करण्याचे कार्य प्रकाश समाधी ऐश्वर्ययोगाने स्वामी विज्ञानानंद करीतच आहेत!

* * *